म. ग्रं. सं. ठाणें
विषय: इतिहास
सं. नं. २५६
REFBK-0019392

सं० ६ ३e ०

६९

ई० ६१

लेखक - धनुधारि

कि०

REFBK-0019392

१६५४२

# ३२ मराठ्यांचा पत्रबद्ध इतिहास.

## मोडींत.

सांप्रत सरकारी मराठी शाळांतील चौथ्या इयत्तेंत महाराष्ट्रदेशाचा इतिहास आणि मोडी वाचनपुस्तक असे दोन निरनिराळे विषय शिकविण्याचा परिपाठ आहे. आणखी इतिहासविषय पुष्कळांना नीरस वाटतो आणि त्याचा अभ्यास कैक मुलांना कंटाळवाणा भासतो, तेव्हां ती नड दूर करावी व 'एक पंथ दो काज' याप्रमाणें इतिहास आणि मोडी वाचन, एकत्र मनोरंजक रीतीनें व्हावें ह्मणून हा पत्ररूपानें मोडींत लिहिला आहे. किं. ८७ ट. ८~॥.

**जनार्दन महादेव गुर्जर**, रामवाडी, मुंबई.

## १ महाराष्ट्रकुटुंबसंग्राह्यपुस्तकावलि.

१ **मराठ्यांच्या मर्दुमकी.** भाग १. किं. ८=
यांत मराठ्यांनीं हैदराबादकर नबाबावर केलेल्या मोहिमांची साद्यंत हकीकत आहे.

२ **जवानमर्द ब्राह्मणभाई.** भाग १. किं. ८=
बापू गोखले यांच्या पराक्रमाचें वर्णन.

३ **वीरस्नुषा राधाबाई.** किं. ८=
एक हृदयद्रावक ऐतिहासिक गोष्ट.

४ **जवानमर्द मराठेगडी.** भाग १. किं. ८=
होळकर मल्हारराव यांच्या पराक्रमाचें वर्णन.

५ **शूर अबला.** किं. ८=
झांशीकर राणी लक्ष्मीबाई, कित्तूरकर चन्नवा, ताई तेलीण या स्त्रियांचीं चरित्रें.

६ **जवानमर्द ब्राह्मणभाई.** भाग २. किं. ८≡
विठ्ठल शिवदेव विंचूरकर यांच्या पराक्रमाचें वर्णन.

७ **मराठ्यांच्या मर्दुमकी.** भाग २. किं. ८≡

यात म्हैसूरकर हैदरटिप्पू यांच्याशीं चाललेल्या युद्धांचें व कर्नाटकांतील स्वाऱ्यांचें वर्णन आहे.

८ ज़वानमर्द मराठेगडी. भाग २. किं. ।-
वीरशिरोरत्न जनकोजी शिंदे यांच्या पराक्रमाचें वर्णन.

९ आपल्या देशाचा लहानसा इतिहास. आवृत्ति २ री किं. ।|≈

१० पानपतचा मोहरा. किं. ।-
यांत पानपतच्या भयंकर रणकंदनाचा साग्र वृत्तांत आहे.

११ राजकार्यधुरंधर मंडळी. भाग १. किं. ।≈
फडणीस नानाच्या कारकिर्दीचें वर्णन.

१३ जवानमर्द ब्राह्मणभाई. भाग ३. किं. ८≈
हरिपंत फडके यांच्या पराक्रमाचें वर्णन.

## लहान मुलांचें चिमुकलें पुस्तकालय.

१ नीतिधर्मपाठ पुस्तक पहिलें. किं. ८-
२ आपणांवरील जबाबदारी. किं. ८-॥
३ स्वभाव. किं. ८-॥ ४ अभ्यास. किं. ८॥
५ आजोबानें नातवास सांगितलेल्या गोष्टी. किं. ८-॥

## प्रापंचिकांचा पुस्तकसंग्रह.

आतां पुढें काय करावें. पैसा कसा मिळेल ? किं. ।॥ ट. ८१.

जनार्दन महादेव गुर्जर, रामवाडी, मुंबई.

---

प्रत्येक महाराष्ट्रियाच्या उपयुक्त संग्रहास पात्र.

# मनुस्मृति मराठी भाषांतरसहित.

## किं. रु. ५ ट. ख. ०६.

पूर्वीं प्रसिद्ध केल्याप्रमाणें ही दुसरी आवृत्ति तयार केली आहे. संस्कृत मूल, नंतर भाषांतर, स्थलविशेषीं विपुल टीपा, आ-

सं.इ. ३९०
1512

# आपल्या देशाचा लहानसा इतिहास.

## भाग १ ला.

## प्राचीन हिंदु राजांची कारकीर्द.

### प्रकरण १ लें.

**या प्रकरणांतील विषयः—**

| | |
|---|---|
| १ आपल्या देशाचें नांव. | ३ आपल्या देशाचे स्वाभाविक विभाग. |
| २ देशाचा विस्तार व मर्यादा. | ४ देशांतील जुनाट वसाहती. |

**१. आपल्या देशाचें नांव.** आपल्या देशास **हिंदुस्थान** असें ह्मणतात. हिंदु ह्मणजे फार्शी भाषेंत **काळा** आणि फार्शी लोकांपेक्षां आह्मी काळे ह्मणून **काळे** लोकांचें ठिकाण तें हिंदुस्थान असें कित्येकांचें मत आहे. खरी हकीकत अशी दिसते कीं:—या देशांत येतांना प्रथमतः **सिंधुनदी** लागते; **स** च्या ठिकाणीं **ह** आदेश होतो; त्यामुळें **सिंधुस्थानाचें हिंदुस्थान** झालें. तेव्हां **हिंदुस्थान** हें नांव आमच्या देशास परक्यांनीं दिलेलें होय. **भरतवर्ष** किंवा **जंबूद्वीप** अशी संज्ञा आमच्या देशास ब्राह्मणांनीं व बौद्धांनीं दिलेली आढळते. **भरत** ह्मणून कोणी राजा होऊन गेला, त्याची ही भूमी, यास्तव **भरतवर्ष** किंवा **भरतखंड** असें ह्मणण्याचा परिपाठ पडला; अशा पौराणिक कथा आहेत. आर्य ह्मणजे श्रेष्ठ लोक येथें रहावयास आले तेव्हांपासून **आर्यावर्त** असेंही आमच्या देशाचें नांव आहे. आर्यभूमी असेंही कोणी कोणी म्हणतात. **इंडिया** या नांवानें आमचे

होते. पिशाच्यांनीं पहिल्यानें **पंजाब** बळकाविला. पुढें **कुरुक्षेत्रांत** आणखी अधिक मुलूख मिळून **आर्यावर्त** हें नांव प्रचारांत आलें. **आर्यावर्त=आर्यां**चा मुलूख. पूर्वींचे **ब्रह्म** लोक व दुसरे आसपासचे लोक मिळून **आर्य** लोक झाले. **आर्य** शब्द **इराणां**तही प्रसिद्ध झाला होता. **इराणी** लोक आपणांस **आर्यच** ह्मणवीत. **द्रुह्युस** नांवाचा **इराणी** लोकांचा चक्रवर्ती राजा ख्रिस्ती शकाचे पूर्वीं ५२० वर्षे झाला, तो आपणास–शिलालेखांत–**आर्य** ह्मणवितो.

**द्रुह्युसा**च्या राजवंशाची समाप्ति करणारा **म्यासिदोन**चा राजा **शिकंदर** यानें या देशावर स्वारी केली. हा **ग्रीस** देशाचा राहाणारा. तेथिल लोकांस **ग्रीक** असें म्हणतात. ग्रीक लोक **आर्य** लोकांस **यवन** या नांवानें माहीत होते. सर्व जग जिंकावें ही **शिकंदराची** महत्त्वाकांक्षा असे. **पौरस** कुळांतल्या एका राजानें **शिकंदराशीं** सामना दिला. पण त्यांत जय **शिकंदराच्याच** लोकांस मिळाला. लुबाडून बुचाटून **यवन** लोक आपल्या स्वदेशाकडे परतले!

ख्रिस्ती शकाच्या सातव्या शतकांत **पार्शी** लोक आपल्या देशांत प्रथमतः आले. लुटालूट किंवा तंटेबखेडे करण्याचा यांचा मानस मुळींच नव्हता. **खलीफा उमर** यानें **इराण** जिंकून आंतील लोकांस मुसलमान केल्यानंतर, जे कित्येक पूर्वींच्या धर्माचे लोक देशत्याग करून निघाले, ते आश्रय मागण्याकरितां आमच्या देशांत दीनवाण्यासारखे शिरले. त्यांस आश्वासन देऊन आसराही आमच्या लोकांनीं दिला. भाषा, रिवाज वगैरे सर्व त्यांनीं आमच्याकडीलच घेतले. **गुजराथें**त त्यांनीं आपली वसाहत केली.

**पार्शी** लोकांमागून **मुसलमानांच्या** टोळधाडी आमच्या देशावर कोसळल्या. या लोकांनीं बादशाही इभ्रत देखील येथें बरींच वर्षे भोगिली. तेव्हां त्यांचा इतिहास स्वतंत्र असा पुढें येणारच आहे.

मुसलमानांमागून **पोर्तुगीज, डच, फ्रेंच** आणि **इंग्रज** हे आमच्या देशांत शिरले. त्यांनींही उलाढाली पुष्कळच केल्या: तेव्हां त्यांचा इतिहासही निराळ्या भागांत विस्तारपूर्वक पुढें दिलेला आहे.

याप्रमाणें १ **यवन**, २ **मुसलमान**, ३ **डच**, ४ **फ्रेंच**, ५

**पोर्तुगीज,** व ६ **इंग्रज** इतक्या लोकांनीं आमच्या देशांत शिरून साधेल तितका व तसा आपला कार्यभाग साधून घेतला. **मुसलमानां**-च्या पूर्वी जिकडे तिकडे लहानमोठीं देशी राज्यें होतीं. **मुसलमानां**-नीं राज्यकारभार शतक दोन शतकें आपल्या हातीं ठेविला होता. हल्लीं **इंग्रजां**कडे सार्वभौमत्व आहे. मध्यंतरीं **मराठ्यां**नीं एक शतक थोडीशी हालचाल केली. तेव्हां आपल्या देशाचा इतिहास ह्मणजे पूर्वीच्या देशी राज्यांचें संक्षिप्त वर्णन झाल्यानंतर **मुसलमान, मराठे** व **इंग्रज** यांच्या कारकीर्दीचें वर्णन. तें यथानुक्रमानें आतां येईल.

## पहिल्या प्रकरणावर प्रश्न.

१. आपल्या देशाचीं एकंदर नांवें किती? आर्यावर्त नांव कशा-वरून पडलें? भरतवर्ष कां ह्मणतात? भरतखंडाचा अर्थ काय? हिंदुस्थान हें नांव कसें आलें? इंडिया कां म्हणूं लागले?

२. आपल्या देशाची पूर्वपश्चिम लांबीरुंदी किती आहे? दक्षिणेस काय आहे? कोणती दिशा कमी बंदोबस्ताची?

३. आपल्या देशाचे स्वाभाविक विभाग कोणते?

४. आपल्या देशांतील जुनाट वसाहती कोणकोणत्या लोकांच्या? ब्रह्मावर्ताचें ठिकाण कोणतें? ब्रह्म लोक कोठपर्यंत पसरले होते व पुढें पिशाचांनीं काय केलें? आर्यावर्त शब्दाचा अर्थ काय? आर्यांमागून आजवर आणखी कोणकोण आले त्यांचीं नांवें सांगा?

---

## प्रकरण २ रें.

# आर्य लोकांची थोडीशी माहिती.

### या प्रकरणांतील विषयः—

१ आर्य लोकांविषयीं माहिती—चातुर्वर्ण्याची उत्पत्ति.

२ श्रुतींचें व स्मृतींचें वर्णन.

५. **आर्य** लोकांच्या, आसपासच्या इतर लोकांशीं बरींच वर्षे अ-नेक वेळां कटकटी चालल्या. दुसऱ्यांच्या घरांत शिरून त्यांचें सर्वस्व

हरण करण्याकरितां मारामाऱ्या, दंगेधोपे करण्याचें काम **आर्यांनीं** कमी केलें, असें नाहीं. हळू हळू **ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य** व **शूद्र,** अशी चार वर्णांची स्थापना **आर्यांमध्यें** झाली. ब्राह्मण, क्षत्रिय व वैश्य या तीन वर्णांस 'द्विज' म्हणत; कारण गायत्रीचा उपदेश होई तो त्यांचा 'दुसरा जन्म' समजत. व्यापार करणारे, शेतकी करणारे व गुराखी असे **वैश्यांचे** तीन पोटभेद होते. चारी वर्णांमध्यें रोटीचा बेटीचा संबंध निषिद्ध नव्हता. तीन वर्णांची सेवा करणें, हाच **शूद्रांचा** धर्म समजत. ज्यांस गायत्रीचा अधिकार नव्हता, त्यांस **व्रात्य** किंवा **अनार्य** हा शब्द **आर्य** लावीत. योग्यता अंगीं दिसल्यास **व्रात्यांस** "व्रात्यस्तोम" नांवाचा यज्ञ करून **आर्य** आपणांमध्यें घेत. याप्रमाणें केवळ योग्यतेवर चातुर्वर्ण्याची स्थापना पहिल्यानें झाली.

६. **श्रुति** व **स्मृति** हे अनुक्रमें आर्यांच्या धर्माचे व धर्मसंबंधी कायद्यांचे ग्रंथ होत. या ग्रंथांची भाषा **संस्कृत.**

( १ ) **श्रुति** किंवा **वेद.—ऋग्वेद, यजुर्वेद, सामवेद** व **अथर्वणवेद** असे वेद चार.

**मंत्र, ब्राह्मण** आणि **उपनिषदें** असे **वेदाचे** पुनः पोटविभाग आहेत. वेदाचा सगळा मंत्रभाग अपौरुषेय ह्मणजे मनुष्यकृतीचा नव्हे, असें फार दिवसांपासून वैदिकधर्माचे हिंदु समजत आले आहेत.

**ब्राह्मण.**—मंत्राप्रमाणेंच हें एक वेदाचा भाग होय. यांत मंत्रांचा विनियोग असतो.

**उपनिषदें** किंवा **वेदान्त.**—यांत तत्वविचार भरलेला आहे. मनुष्य कोण, देवाचा त्याचा संबंध, जगांतला कारभार, असल्या विषयांचें यांत विवरण आढळतें.

( २ ) **स्मृति.**—मंत्रभागाच्या अर्थाच्या संबंधानें व इतर निमित्तांनीं निरनिराळे तट पडले. या तटांचे कायदे ज्यांत निरूपण केलेले आहेत, त्या ग्रंथांस **स्मृति** ह्मणतात. स्मृतींची मातबरी **श्रुतींच्या** खालीं समजतात. मनुस्मृति, याज्ञवल्क्यस्मृति, अशा बऱ्याच **स्मृति** प्रसिद्ध आहेत.

## दुसऱ्या प्रकरणावर प्रश्न.

५. आमचे चार वर्ण कोणते? वैश्यांचे पोटभेद कोणते? चातुर्वर्ण्यांत परस्पर रोटीचा व बेटीचा व्यवहार होता कीं नाहीं? द्विज कोण व कां? व्रात्य कोण? त्यांस आर्य आपणांमध्यें घेत कीं नाहीं? कसे घेत?

६. वेद कोणत्या भाषेंत आहेत? वेद किती? कोणकोणते? वेदाचे पोटभाग किती? "ब्राह्मणां"त काय आहे? उपनिषधांत कशाचें विवेचन आहे? स्मृति ह्मणजे काय?

---

## प्रकरण ३ रें.

# बौद्ध धर्म व त्याचा प्रसार आणि ऱ्हास.

७. ख्रिस्तीशकाच्या पूर्वीं साडेपांचशें वर्षांच्या सुमारास म्हणजे आज (१८९३) चोवीसशें त्रेचाळीस वर्षांपूर्वीं **नेपाळ** प्रांताच्या दक्षिणेस **कपिलवस्तु** नांवाच्या प्रांतीं एक मांडलिक राजा होता, त्यास एक मुलगा झाला. त्याचें नांव **बुद्ध.** तो वर्णानें क्षत्रिय होता. मोठा झाला तेव्हां त्यानें एका नवीन धर्माची स्थापना केली. या धर्माचा एक हजार वर्षें या देशांत फार प्रसार झाला. या धर्माचे लोक एकंदर मानवजातीच्या एक तृतीयांशाइतके आजमितीला हयात आहेत. **बुद्धानें** स्थापिलेल्या धर्माचें नांव **बौद्धधर्म.** आपलें बहुतेक आयुष्य **बुद्धानें** धर्मोपदेश करण्यांत घालविलें. तो पराकाष्टेचा विरक्त असे. बोलण्याप्रमाणें वागावें हा त्याचा नेम होता. एखाद्या महत्कृत्याचा पुढाकार घेणारे पुरुष अंगीकृत कार्यांत लौकर सिद्धि संपादतात, त्याचें मुख्य कारण त्यांचें निर्मळ व बोलण्याबरहुकूमचें वर्तन हें होय. **बुद्ध** म्हणजे राजाच्या पोटीं जन्मास आलेला. अन्नाची, वस्त्रपात्राची किंवा कशाचीच त्याला वास्तविक पाहतां वाण नव्हती. पण त्या सर्व वैभवावर लाथ मारून केवळ स्वतःच्या मुक्तीखातर आणि इतरांच्या कल्याणासाठीं बिचाऱ्यानें लहानपणापासून अनेक यातना व कष्ट मोठ्या आनंदानें सोशिले! लोकांचा आपणांवर विश्वास बसावयाचा

असेल, तर केवळ निरपेक्ष बुद्धि आणि बोलण्याप्रमाणें वागण्याचा प्रघात, इतकी सामग्री अवश्य हवी. इतरांस केलेल्या उपदेशाप्रमाणें स्वतः आचरण ठेवणारासच लोकोत्तर पुरुष समजून पराकाष्ठेचा मान देण्याचा संप्रदाय सर्वत्र आहे. अशांच्या हातूनच जगाचें खरें कल्याण होत असतें व हे असलेच पुरुष म्हणजे 'बोले तैसा चाले' हें ज्यांस लागू होतें ते जगांत अक्षय्य कीर्ति मिळविणारीं महान् कष्टसाध्य कामें हां हां ह्मणतां पार पाडतात. असो. **बुद्धाची** कीर्ति लौकरच दिगंतीं पसरून त्याचा धर्म सर्वांस दिवसेंदिवस जास्तच आवडूं लागला.

८. **बुद्धाचा** धर्म हळू हळू सर्व हिंदुस्थानभरच पसरून राहिला नाहीं; तर **तिबेट, चीन, ब्रह्मदेश** आणि **सिलोन** बेट—ज्यास आह्मी लंका ह्मणतों—यांच्यासारख्या दूरदूरच्या मुलुखीं पसरला. **अशोक** इत्यादि राजांच्या कारकीर्दींत तर बहुतेक राजे बौद्धधर्मीच असत. तलवारीच्या जोरावर हा धर्म बिलकूल वाढला नाहीं. किंवा अन्यधर्मांचा साक्षात् छळही कधीं या लोकांनीं केलेला दिसत नाहीं. शाळा घालून मुलांना आपल्या धर्माचीं तत्त्वें सांगविणें, दवाखाने घालून रोग्याच्या कृतज्ञेपुढें आपला धर्म ठेवविणें, असल्या बऱ्याच युक्ति **अशोक राजानें** धर्मप्रसारासाठीं केल्या. **अशोक** हा **चंद्रगुप्त** राजाचा नातू. याचें राज्य **मगध** देशांत होतें. **मगध** देशालाच हल्लीं **बिहार** प्रांत ह्मणतात. ख्रिस्ती शकापूर्वीं सुमारें अडीचशें वर्षांच्या वेळीं **अशोक** राजा राज्य करीत होता. शिलालेखांवरून पाहातां, **अशोकाची** जशी बौद्धांविषयीं तशीच ब्राह्मणांविषयीं पूज्य बुद्धि दिसते; कारण बौद्धभोजनांप्रमाणें ब्राह्मणभोजनही घालण्याची शिफारस त्यानें केली आहे.

९. **अशोकाच्या** पाठीं शेंकडों वर्षांनीं **कुमारिल** नांवाचा मोठा विद्वान् ब्राह्मण झाला, त्यानें पुष्कळ बौद्धांस वादांत जिंकून पुनः वैदिकधर्मी केलें आणि कर्मकांडाचा उद्धार केला. पुढें कांहीं वर्षांनीं **श्रीमच्छंकराचार्य** नामक अद्वितीय, परमविरक्त व महान् विद्वान् पुरुष **मलियाळ** देशांत जन्मला. त्यानें आपल्या वयाच्या बत्तिसाव्या वर्षाच्या आंतच कर्मठांचा मुख्य पंडित **मंडनमिश्र** याच्याशीं वादवि-

वाद करून ज्ञानकांडाचा उद्धार केला आणि आपलें नांव वैदिकधर्मी लोकांमध्यें अजरामर करून ठेविलें. **कुमारिल** व **शंकराचार्य** हे दोन अवतारी पुरुष जन्मले नसते, तर वेद व वेदान्त हीं नांवें आज-मितीस कानीं देखील न पडतीं.

१०. हल्लीं आपल्या देशांत मात्र बौद्धधर्म नाहीं. जैन नांवाची एक शाखा या देशांत अद्यापि आहे. यांचीं धर्ममतें बहुतेक बौद्धांचींच आहेत, तथापि कांहीं रीतीरिवाज यांनीं हिंदूंपासून घेतले आहेत. हल्लीं हे जैन सुमारें **पांच सहा लाख** आहेत.

## तिसऱ्या प्रकरणावर प्रश्न.

७. बुद्ध कोणाचा मुलगा? त्याचा बाप कोठला राजा? तो वर्णानें कोण? त्यानें कोणता धर्म स्थापिला? किती वर्षांपूर्वीं?

८. बौद्धधर्माचा प्रसार आणखी कोणकोणत्या देशांत झाला? ह्या धर्माचा प्रसार जास्त होण्यासाठीं कोणकोणते उपाय अशोकानें योजिले होते? अशोक हा कोण? त्याचें राज्य कोणतें? हल्लीं त्याच्या राज्यास काय नांव आहे?

९. बौद्धधर्माशीं प्रतिस्पर्धा कोणीं मांडिली? ज्ञानकांडाचा उद्धार कोणीं केला? किती वर्षांच्या आंत व कोणाशीं वाद करून? कुमारिल व शंकराचार्य न जन्मते, तर काय होतें?

१०. आपल्या देशांत बौद्धधर्म हल्लीं आहे काय? जैन लोक कोण? त्यांची संख्या आतां किती आहे?

---

## प्रकरण ४ थें.

# दरम्यानची हकीकत.

११. **बौद्ध** धर्माचा प्रसार चालला असतां **ग्रीक** किंवा **यवन** लोकांनीं **अलेक्झांडर** नामक राजाच्या कारकीर्दींत आमच्या देशावर स्वारी केली. अलेक्झांडर यास **शिकंदर** बादशहा असेंही म्हणतात. तो अफगाणस्थानांतून **सिंधु** नदीच्या कांठापर्यंत आला. त्या वेळीं त्या प्रांतीं **पौरस** राजाचें

इ० स० पूर्वी ३२७ व्या वर्षी अलेक्झांडरनें हिंदुस्थानावर स्वारी केली.

राज्य होतें. **शिकंदराच्या** मनांत **गंगानदीपर्यंत** राज्य काबीज करण्याचें होतें. पण ग्रीस देशांतून आलेलें त्याचें सैन्य फारच थकलें; तें पुढें चालण्यास कांकूं करूं लागलें. **जेहलम** नदीजवळ एक लढाई झाली तींत **शिकंदरास** जय मिळाला. **शिकंदर** दोन वर्षें हिंदुस्थानांत होता. तेथील मांडलिक राजांशीं सलोखा करावा व नवीं शहरें वसवावीं, असा त्यानें क्रम चालविला. ठिकठिकाणीं आपले अधिकारी व थोडेंबहुत जुजबी सैन्य ठेवून **शिकंदर** परत **ग्रीस** देशाला गेला. याच्या मनांत सर्व पृथ्वी काबीज करावी असें होतें. **हिंदुस्थान** आपल्या सत्तेखालीं आणावें ही त्याची इच्छा अखेरीस पूर्ण झाली नाहीं. तो लौकरच **ग्रीस** देशांत वारला. त्याच्यामागें राज्याच्या वांटण्या झाल्या.

**१२. चंद्रगुप्त राजा.** **शिकंदरच्या** स्वारींत धामधूम चालली, तींत **चंद्रगुप्त** नांवाच्या मांडलिक राजानें बराच स्वार्थ साधून घेतला. **नंदवंशाचें** राज्य मोडकळीस आलें होतें, तें यानें बळकाविलें. हल्लींचें **पाटणा** शहर **चंद्रगुप्ताच्या** राजधानीचें ठिकाण होतें. **शिकंदराचा** सेनापती **सेल्युकस** यानें, आपल्या वांट्यास आलेला पंजाब वगैरे, ग्रीक लोकांनीं बळकावलेला मुलूख या **चंद्रगुप्तास** विकला आणि आपली मुलगीही त्यास दिली. याप्रमाणें **चंद्रगुप्त** हा **ग्रीसच्या** **सेल्युकसाचा** जांवई झाला. **चंद्रगुप्ताच्या** दरबारांत एक **ग्रीक** वकीलही असे.

इ० स० पूर्वीं ३२६ व्या वर्षीं चंद्रगुप्तानें आपलें राज्य स्थापिलें.

**१३. अशोकराजा.** **चंद्रगुप्ताचा** हा नातू. यानें बौद्धधर्म स्वीकारिला आणि त्या धर्माची प्रतिष्ठाही यानें पुष्कळ वाढविली. हा मोठा पराक्रमी व चक्रवर्ती राजा झाला.

**१४.** या **ग्रीक** लोकांनंतर **शक** व **तुर्क** लोकांनीं थोड्याबहुत स्वाऱ्या आमच्या देशावर केल्या. **शक** व **तुर्क** हे लोक मध्यएशियांतील राहणारे. **कनिष्क** वगैरे राजे झाले ते बरेच पराक्रमी असून, धर्मानें **बौद्ध** व जातीनें **तुर्क** होते. **शकांस** अजी हांकलून लावण्याचा यत्न **विक्रमादित्यानें** केला.

१५. **विक्रमादित्य.** माळवा प्रांतांतील **उज्जयिनी** येथें हा राजा राज्य करीत होता. हा राजा शककर्ता होऊन गेला; ह्मणजे याच्या कारकीर्दीपासून एका शकाची सुरुवात झाली. या शकास **संवत्** हें नांव आहे. **नर्मदे**च्या उत्तरेस याचा शक चालतो. **शक** लोकांस यानें या देशांतून पिटाळून लाविलें. हा मोठा पराक्रमी होता. हा इ० स० पूर्वी ५७ व्या वर्षी होऊन गेला ह्मणतात. याचा वंश बरींच वर्षे **उज्जयिनी** नगरींत राज्य करीत होता.

१६. **शालिवाहन** हें मूळचें वंशाचें नांव आहे. या वंशाचें राज्य **महाराष्ट्र** देशांत असून राजधानी, **गोदावरी**च्या कांठीं **पैठण** नगरी होती. **विक्रम** वंशांत **हर्ष** नांवाचा पराक्रमी राजा झाला त्याची व **शालिवाहन** वंशांतील एका राजाची **नर्मदे**वर मोठी लढाई झाली. तींत **हर्षविक्रमादित्या**चा मोड झाल्यामुळें **महाराष्ट्रां**तील लोक **शालिवाहन** शक मोजूं लागले. या **शालिवाहन** शकामध्यें व **इंग्रजां**च्या इसवी सनामध्यें अंतर ७८ वर्षांचें आहे. जसा पहिल्या **विक्रमा**नें तसाच **हर्षविक्रमादित्या**नें आपल्या नांवाचा शक सुरू केला होता. **हर्षविक्रमादित्या**च्या शकांत व **शालिवाहन** शकांत अंतर सांगण्यासारखें नसून, पहिल्या **विक्रमा**च्या संवतांत व **शालिवाहना**च्या शकांत १३५ वर्षांचें अंतर आहे. **शालिवाहन** वंशांतील राजे विद्येस व कवींस आश्रय देणारे झाले. हा राजवंश, **शालिवाहन** शकाच्या दुसऱ्या किंवा तिसऱ्या शकांत बुडाला. **विक्रम**वंश बुडाल्यानंतर **शाहि**वंश प्रसिद्धीस आला. **शाहि**वंश बुडाल्यानंतर **गुप्त**वंशांतील राजे नावाजले. यांची राजधानी **उज्जयिनी** होती. **गुप्त**वंशांत **चक्रगुप्तविक्रमादित्य** नांवाचा राजा झाला, त्याच्या कारकीर्दींत **कालिदास** कवि झालेला दिसतो. लौकरच **काठेवाडां**त **वलभी** मुक्कामीं **गुप्त**वंशाचा सेनापति स्वतंत्र झाला. पुढें **शालिवाहना**च्या सहाव्या शतकाच्या आरंभीं **हर्षवर्धन** हा उत्तरापथाचा एकछत्री राजा होता.

१७. पूर्वी जसा **हर्षविक्रमादित्या**नें तसा या **हर्षवर्धना**नें द-

क्षिणी लोकांस जेरीस आणण्याचा प्रयत्न केला होता. पण **पुलकेशी** राजानें **नर्मदे**वर **हर्षवर्धना**चा पुरा मोड केला. **पुलकेशी**ची राजधानी **बदामी** होती. **हर्षवर्धना**चा मोड केल्या दिवसापासून **बदामी**करांनीं "परमेश्वर" असें उपपद आपल्या दुसऱ्या उपपदांस जोडलेलें प्राचीन लेखांमध्यें आढळतें. पुढें लौकरच **राठोड** कुळी प्रसिद्धीस आली. या कुळींतील **गोविंदराव** नांवाच्या राजानें **वेरुळ** मुक्कामचीं सुंदर शैव लेणीं कोरविलीं. पुढें **कल्याण**चे **चाळके** किंवा **साळुंखे** नावाजूं लागले. **कल्याण** ही मोडलेली नगरी हल्लीं **निजामा**च्या मुलुखांत आहे. **शालिवाहना**च्या दहाव्या शतकांत **कल्याण** नगरीचा **विक्रम** हा दक्षिणेंत एकछत्री राजा होता. यानें एक नवीन शकही चालू केला, पण त्याच्या पश्चात् तो लौकरच बंद पडला. **धारानगरी**चा **भोज** राजा हा **कल्याणकर विक्रमा**चा समानकालीन होता. **भोज** हा **पोंवार** कुळींतील असून, त्याच्या दरबारीं संस्कृत भाषेस मोठें उत्तेजन होतें. थोड्या वर्षांनीं **कल्याण**ची गादी **विज्जल** नांवाचा सेनापति होता, त्यानें बळकाविली. या **विज्जला**च्या कारकीर्दींत **लिंगायत** धर्माचा स्थापक **वसव** नांवारूपास आला. कांहीं वर्षांनीं एक **महाराष्ट्र** देशांत, एक **तेलंगणां**त, एक **कर्नाटकां**त अशा तीन **जाधवां**च्या गाद्या स्थापन झाल्या. **महाराष्ट्र** देशाची राजधानी **देवगिरी**, **तेलंगण** देशाची **वारंगुळ** व **कर्नाटका**ची **हलबीडु**, अशी स्थिति झाली. या गाद्या **शालिवाहना**च्या तेराव्या शतकांत मुसलमानांनीं बुडविल्या.

## चौथ्या प्रकरणावर प्रश्न.

११. बौद्ध धर्माचा प्रसार चालला असतां या देशावर कोणीं स्वारी केली? तो कोठल्या देशाचा राहणारा? तो या देशांत कोणीकडून आला व कधीं आला? त्या वेळीं तेथें कोण राजा होता? शिकंदर किती वर्षें या देशांत होता? तो परत हिंदुस्थानांत कां आला नाहीं?

१२. चंद्रगुप्ताची राजधानी कोणती? यानें कोणतें राज्य बळका-

विलें ? पंजाब वगैरे प्रांत याला कसा मिळाला ? सेल्युकसचें आणि चंद्रगुप्ताचें नातें काय ? चंद्रगुप्तानें आपलें राज्य कधीं स्थापिलें ?

१३. अशोक हा कोण ? याच्या कारकिर्दींत कोणत्या देशाच्या लोकांनीं स्वाऱ्या केल्या ?

१४. ग्रीकलोकांनंतर कोणीं स्वाऱ्या केल्या ? ते कोठले राहणारे ? त्या वेळीं येथें कोणता राजा होता ? त्यांस कोणीं हाकलून लाविलें ?

१५. विक्रमादित्य हा कोठला राजा ? याच्या शकाचें नांव काय ? तो कोठें चालतो ? विक्रमादित्य कधीं होऊन गेला ?

१६. शालिवाहनाचा शक कोठें चालतो ? हर्षविक्रमादित्य कोण ? गुप्ताची राजधानी कोणती ? हर्षवर्धन कोण ?

१७. हर्षवर्धनाचा मोड कोणीं केला ? वेरुळचीं लेणीं कोणीं कोरिवलीं ? कल्याण नगरीचा मोठा नामांकित राजा कोण ? त्यानें काय केलें ? विज्जल कोण ? वसव कोण व केव्हां झाला ?

---

## प्रकरण ९ वें.

# रजपुतांची माहिती.

१८. **रजपूत** संस्थानें, **बंगाल** व **दक्षिण**—**रजपुतां**च्या मुलुखास **राजस्थान** म्हणतात. **रजपुतां**मध्यें चार जुनाट राजवंश **जस्सलमीर**चा, **मेवाड**चा, **जयपुर**चा व **मारवाड**चा हे होत. **जस्सलमीर**चा राजवंश **शालिवाहन** वंशाबरोबर व **जाधव** वंशाबरोबरही संबंध दाखवितो. **मेवाड**चा राजवंश **वलभी** वंशाबरोबर संबंध सिद्ध करितो. तरी या दोन्ही राजवंशांचा **शालिवाहना**च्या नवव्या शतकाच्या पलीकडे इतिहासदृष्ट्या थांग लागत नाहीं. **जयपुर**चा राजवंश **नळा**च्या वंशाबरोबर आपला संबंध कल्पितो. हल्लीं **माळव्यांत नरवार** नांवाचा गांव आहे, तो मूळचा **नळवाडा** असून, **नळा**ची राजधानी समजतात. हा मुलूख मूळचा **भोजपोंवारा**चा असल्यामुळें, **धारा**नगरीच्या वाताहतीच्या पश्चात् **जयपुर**चा राजवंश अस्तित्वांत आलेला असावा. मुसलमानांनीं **कनोज**

बुडविल्यानंतर तिकडील **राठोड, राजस्थाना**कडे वळले व त्यांनीं **मारवाड**ची गादी स्थापिली. सारांश, आज नांवाजलेल्या **राजस्थानां**तील राजवंशाचा पत्ता शालिवाहनाच्या नवव्या शतकाच्या पलीकडे लागण्यासारखा दिसत नाहीं.

**१९.** बंगाल्यांत **पाळ** व **सेन** या दोन कुळींचे राजे होऊन गेले. **पाळ** हे **बौद्ध**धर्मी दिसतात. **देवपाळदेव** नामक महाबलाढ्य राजा यांच्यांत होऊन गेला. **पाळ** राजवंशाकडून सत्ता **सेन** कुळीच्या हातीं गेली. मुसलमानांनीं **सेन** कुळींतील राजाचा पराभव करून **बंगाल** काबीज केला.

**२०.** शालिवाहनाच्या वंशाच्या पश्चात् **राठोड, चाळके** किंवा **साळुंखे, गांग, पल्लव** या चार कुळी उदयास आल्या. **पांड्य** देशही याच सुमारास स्वतंत्र झालेला दिसतो. शालिवाहनाच्या पांचव्या शतकांत **राठोडांस** जेरीस आणून **साळुंख्यानीं वदामी**ची गादी स्थापिली. **गांग** कुळीचें राज्य **चेर** देशावर होतें. **चेर** देशाचा बराच भाग हल्लींच्या **म्हैसूर** प्रांतांत येतो. **पल्लवां**ची राजधानी **कांचीपुर** होती. **कांचीपुरास** हल्लीं **कंजीवरम्** म्हणतात. **पांड्य** देशाची राजधानी **मधुरा** नगरी होती. कांहीं वर्षांनीं **गांग** कुळी बुडाली आणि **चोळ** कुळी नांवाजूं लागली. **चोळां**चा अंमल सेतुबंधापर्यंत एकछत्री होता, व त्यांनीं **कल्याण**करांबरोबर पुष्कळ लढाया मारल्या. अखेरीस **हळबीड**कर **जाधवां**कडे **चोळां**चा सगळा मुलूख गेला.

**२१.** आतां आपल्या देशाचे विभाग कोणकोणते वगैरे भूगोलसंबंधीं थोडेंसें ज्ञान अवश्य हवें आहे. हा वेळपर्यंतचीं नांवें आलीं तीं प्राचीन. या प्राचीन नांवांचा आतां जवळ जवळ लोप झाला आहे, असें म्हटल्यास चालेल. मुसलमानांच्या रियासतींत प्रचारांतलीं नांवें असत; तींच पुढें इंग्रजी अमदानींत थोड्याबहुत फेरफारांनिशीं कायम झालीं. तेव्हां आजमितीला आपल्या देशाचे राजकीय विभाग कोणकोणते व कसकसे आहेत याची थोडक्यांत ठळक माहिती दिल्याशिवाय, पुढील

हकीकत मनांत फारशी चांगली ठसणार नाहीं; ह्मणून हें पांचवें प्रकरण संपवून सहाव्यांत ती माहिती दाखल केली आहे.

## पांचव्या प्रकरणावर प्रश्न.

१८. रजपूतांचे मुख्य राजवंश किती व कोणते? ते कोणकोणांबरोबर आपला संबंध लावितात? मारवाडचा राजवंश मुळचा कोठला?

१९. बंगाल्यांत कोणत्या कुळींचे राजे होते? मुसलमानांनीं राजसत्ता कोणत्या घराण्याच्या हातून घेतली?

२०. दक्षिणेंत मुसलमान येण्यापूर्वीं कोणकोणतीं राजघराणीं होतीं? पांड्यांची व पल्लवांची राजधानी कोणती? कल्याणकर विक्रमांबरोबर पुष्कळ झगडा कोणीं केला? अखेरीस चोळांचें काय झालें?

---

## प्रकरण ६ वें.

# हिंदुस्थानचे राजकीय विभाग.

२२. हल्लींचे राज्यकर्ते **इंग्रज.** यांनीं आपलें साम्राज्य या देशावर स्थापिलें आहे. यांच्या अमलांत जिकडे तिकडे शांतता आढळते. राज्यकारभाराची त्यांची हातोटीही अपूर्व आहे. राज्यव्यवस्था सुयंत्र चालावी ह्मणून या आपल्या अफाट देशाचे त्यांनीं राजकीय विभाग पाडले आहेत. आपल्या देशाचे एकंदर **राजकीय विभाग पंधरा** आहेत ते येणेंप्रमाणें:—

१ **मुंबई इलाखा.**—१ सिंधप्रांत, २ गुजरात, ३ महाराष्ट्रदेश आणि ४ कर्नाटकांतले दोन तीन जिल्हे, इतक्यांचा यांत समावेश होतो. याची राजधानी **मुंबई** शहर.

२ **मद्रास इलाखा.**—मुंबई इलाख्याखेरीज दक्षिणेंतला एकंदर प्रदेश या इलाख्यांत सामील होतो. याची राजधानी **मद्रास** शहर.

३ **बंगाल इलाखा.**—हा हिंदुस्थानाच्या पूर्वेस आहे. याची राजधानी **कलकत्ता** शहर. सगळ्या हिंदुस्थानाचीही हीच राजधानी.

४ **वायव्यप्रांत.**—अयोध्याप्रांत यांतच सामील केला आहे. राजधानीचें शहर **अलहाबाद** उर्फ **प्रयाग.**

५ **पंजाब इलाखा.**—सिंधदेशावरील प्रांत पंजाब. त्याची राजधानी **लाहोर.**

६ **रजपुताना.**—रजपूत लोकांचीं अनेक संस्थानें मिळून एक रजपुताना ह्मणून प्रांत कल्पिला आहे. यावर अम्मल बहुतेक रजपुतांचा आणि वर देखरेख इंग्रज सरकारची. प्रत्येक संस्थानिकाची निरनिराळी राजधानी.

७ **मध्यप्रांत.**—हा पूर्वीचा **नागपुरप्रांत.** राजधानी शहर **नागपुर.**

८ **मध्यप्रांतांतलीं संस्थानें.**—शिंदे, होळकर, वगैरे संस्थानिकांचा एक समूह कल्पून त्यांस मध्यप्रांतचीं संस्थानें असें ह्मणतात.

९ **वऱ्हाड.**—मध्यप्रांताच्या खालींच हा प्रदेश आहे. राजधानीचें शहर **उमरावती.** हैद्राबादच्या निजामानें तैनाती फौजेच्या खर्चासाठीं हा प्रांत लावून दिला आहे. मालकी मोंगलांची आणि व्यवस्था सर्व इंग्रजांकडे.

१० **मोंगलाई.**—हैद्राबादकर नबाब निजाम, त्याच्या राज्याला मोंगलाई असें ह्मणण्याचा परिपाठ आहे. राजधानीचें शहर **हैद्राबाद्.**

११ **ह्मैसूर** आणि **कुर्ग.**—यांचा समावेश मद्रास इलाख्यांतच होतो. ह्मैसूर एतद्देशीय राजाच्या अमलांत आहे.

१२ **हिमालयाजवळचीं संस्थानें.**—काश्मीर, नेपाळ, भूतान वगैरे देशी राजांकडे आहेत. वर देखरेख इंग्रजांची.

१३ **पोर्तुगीज** व **फ्रेंच लोकांचीं ठाणीं.**—१ गोंवा, २ दमान आणि ३ दीव हीं पोर्तुगीज लोकांचीं ठाणीं. १ पांडेचेरी, २ कारिकल, ३ चंद्रनगर, ४ यानान आणि ५ माही हीं फ्रेंचांचीं.

१४ **ब्रह्मदेश.**—तेथील **थिबा** नांवाच्या राजास पदच्युत करून तो सर्व प्रांत इंग्रजांनीं आपल्या स्वाधीन घेतला आहे. राजधानी शहर **रंगून.**

१५ **अंदमान** आाणि **निकोबार.** हीं दोन बेटें बंगालच्या उपसागरांत आहेत. या ठिकाणीं काळेपाण्याचे कैदी पाठवितात.

## सहाव्या प्रकरणावर प्रश्न.

२२. हिंदुस्थानचे एकंदर राजकीय भाग किती? त्यांचीं नांवें आणि राजधानींचीं शहरें सांगा. थिबा हा कोण?

---

# भाग २ रा.

## प्रकरण १ लें.

## मुसलमानी रियासत.

१ मुसलमानी धर्म.
२ मुसलमान लोकांचा आमच्या देशांत पहिला प्रवेश.
३ अफगाणिस्थानाकडे जयपाळ वळतो.
४ सुलतान महमुद.
५ महंमदघोरी.

मुसलमानी रियासत सुरू होईपर्यंतचा इतिहास म्हणजे मोठ्या घोंटाळ्याचा आहे. अगोदर कोणीं तो मोठा काळजीपूर्वक आणि विश्वसनीय असा लिहून ठेवल्याचें आढळत नाहीं, शिवाय समग्र देश ह्मणजे एकछत्री अमलांत असा कधींच नव्हता. मुसलमानी पादशाही पुष्कळ वर्षें सारखी चालली होती. मुसलमान लोकांत साग्र आणि सविस्तर असा इतिहास पुष्कळांनीं लिहिला आहे. तेव्हां येथूनचा इतिहास साधारणरीत्या साद्यंत व सारखा मिळतो.

२३. **मुसलमानी धर्म**—आमच्या इकडे **बौद्धधर्म** प्रबळ होत चालला अशा काळीं ह्मणजे शालिवाहनाच्या सहाव्या शतकाचें अर्ध गेल्यानंतर आरबस्थानामध्येंही एका नव्या धर्माचा प्रसार होत चालला. या अपूर्व धर्माचें नांव **मुसलमानी धर्म.** बौद्धधर्माची स्थापना जशी **बुद्धानें** केली, तशी मुसलमानी धर्माची स्थापना **महंमद** नांवाच्या **पैगंबरानें** केली. धर्माची स्थापना करण्यासाठीं ज्या पुरुषांस देव जन्मास घालतो, त्यांस **फार्शी** भाषेंत पैगंबर शब्द लावितात. **महंमद** हा जातीनें **आरब** होता, याचा जन्म **मक्का** नगरीमध्यें झाला. या **महंमद पैगंबरानें** स्थापिलेल्या धर्मास

**मुसलमानी धर्म** ह्मणतात. जे मुसलमानी धर्मानें चालतात, ते **मुसलमान** होत. तरवारीचें मोठें पाठबळ मिळाल्यामुळें **मुसलमानी धर्म** हां हां ह्मणतां वाढला. **महंमदा**च्या पश्चात् लौकरच इराणची पादशहात आरबांनीं समूळ बुडविली. जे इराणी लोक त्या काळीं पळाले व सुरतेच्या किनाऱ्यावर लागले त्यांच्या संततीस आज आपण **पार्शी** शब्द लावितों. पुढें अफगाणिस्थानापर्यंत पैगंबरी धर्म पसरला व पुष्कळ तुर्कांचा या धर्मात प्रवेश झाला. तुर्कांचा मूळचा मुलूख इराणच्या व काबुलच्या उत्तरेस आहे. सारांश, **महंमदा**च्या पाठीं आरब, इराणी व तुर्क या तिन्ही जातींच्या लोकांस **मुसलमान** शब्द लावण्याचा प्रघात पडला. **मुसलमान** शब्दावरून मूळची जात मुळींच कळत नाहीं.

**२४. मुसलमान लोकांचा आमच्या देशांत पहिला प्रवेश**—आमच्या देशाच्या अपार संपत्तीच्या दंतकथा देशोदेशीं पसरलेल्या होत्या. **आरबस्थानां**तही हा आमच्या देशाचा लौकिक पसरला होता. मुसलमानी धर्मात मानेवर समशेर ठेवूनही परधर्म्यास आपल्या धर्मात ओढणें मोठें पुण्य मानलें आहे; त्यामुळें हें पुण्य जास्त जास्त सांचवावें, या इच्छेनें "दीन दीन" करीत आरब लोक चोहोंकडे भटकत फिरूं लागले. हल्लींच्या मुंबई इलाख्यांतील **ठाणें** व **भडोच** येथें स्वारी करण्यासाठीं जलमार्गानें मुसलमान लोकांचीं कांहीं जहाजें आलीं. **कल्याणा**जवळ **मलंगड** मुक्कामीं कबर आहे, ती याच काळच्या एका आरबाची आहे. स्थलमार्गानें सिंध देशांत या लोकांनीं प्रवेश केला होता, पण प्रथम आलेला मुसलमान **कासम** हा मेल्यानंतर आरबांमध्ये यादवी माजली व हिंदुस्थानाकडेस लक्ष पोंचविण्यास त्यांस सवड झाली नाहीं. ह्मणून एक सुभेदार **सिंधदेशां**त होता त्याला हुसकून लावून, रजपुतांनीं लहानसें देशी राज्य **सिंध**मध्यें स्थापिलें, तें पुढें बरींच वर्षे चाललें

इ. स. ६३६ सालीं भडोच व ठाणें येथें आरबलोकांचीं जहाजें प्रथमतः आलीं.

इ. स. (७५०) रजपुतांनीं मुसलमान सुभेदारास हुसकून लाविलें.

**२५.** यापुढें दोन शतकें मुसलमान आमच्या देशाकडे वळले नाहींत, पण इ. स. ९७७ च्या सुमारास **जयपाळ** नामक लाहोरच्या राजास सरहद्दीवरील अफगाण लोकांच्या तंट्यामध्यें पडणें भाग पडलें. याच सुमारास **सबक्तगीन** नांवाचा सुलतान गिझनी मुक्कामीं होता. **सबक्तगीन** हा मोठा शहाणा आणि शूर पुरुष होता. एकदा **जयपाळ** आपल्या मुलखामध्यें बराच आंत शिरला असें पाहून त्याची पाठीं हटण्याची वाट यानें बंद केली. तेव्हां **जयपाळा**वर मोठेंच संकट ओढवलें. परत आपल्या मुलखीं येण्यास मोठी अडचण पडली म्हणून नाइलाजास्तव **सबक्तगीना**शीं तह करून **जयपाळ** आपल्या मुलखाकडे फिरला. मुलखीं आल्यानंतर कबूल केलेली खंडणी **जयपाळा**नें पाठविली नाहीं व त्यामुळें स्वतः **सबक्तगीन** हिंदुस्थानांत आपलें लष्कर घेऊन आला. **पेशावर** मुक्कामीं **सबक्तगीना**चें ठाणें बसलें. लढाई झाली तींत **जयपाळा**चा पराभव झाला. पुढें **सबक्तगीन** आपल्या मुलखाकडे वळला.

**२६. सुलतान महमूद**—हा **सबक्तगीना**चा मुलगा. हिंदुस्थानची अपार संपत्ति यानें स्वतः पाहिली होती आणि आपल्या साधारण शिपायांपुढें हिंदुस्थानाच्या बलाढ्य रजपुतांचा टिकाव लागेना हें त्याला आढळून आलें होतें; ह्मणून हिंदुस्थान सर करणें ह्मणजे अगदीं क्षुल्लक काम अशी त्याची समजूत झाली होती. बाप मरण्याच्या पूर्वींच **हिंदुस्थान** देशांत मुसलमानी धर्माच्या प्रसारासाठीं आपल्यास **खलीफा**ची आज्ञा आहे असें **महमूद** लोकांत सांगूं लागला होता.

इ. स. ९९६ त सबक्तगीन मेला.

दरसाल हिंदुस्थान देशावर धर्मार्थ युद्ध करण्यासाठीं त्यानें तयारी चालविली होती. इतक्यांत त्याचा बाप वारला. तेव्हां इष्टकार्यार्थ झटण्यास **महमुदास** चांगली संधि सांपडली. **महमूद** गादीवर चौतीस वर्षें होता. तेवढ्या अवधींत त्यानें आमच्या देशावर एकंदर सतरा स्वाऱ्या केल्या. त्यांपैकीं बारा मात्र नामांकित झाल्या आहेत.

**महमुदा**च्या स्वाऱ्या धर्मवेडामुळें व लुटीखातर असत. तेव्हां

देवस्थानें भ्रष्ट करावीं व संपत्ति घरीं न्यावी एवढींच काय तीं त्याला शतकृत्यें वाटत. **हिमालय** पर्वतावरील **नगरकोट**, कुरुक्षेत्रांतील **स्थानेश्वर, मथुरा** व गुजराथेंतील **सोमनाथ** हीं देवस्थानें महमुदानें उद्ध्वस्त केलीं. **जयपाळ** राजाचा दोन वेळां पराभव झाला तेव्हां गादीवर बसण्यास आपण नालायक असें समजून तो अग्निकाष्ठें भक्षण करून कैलासवासी झाला. **महमुदा**च्या सहाव्या स्वारीच्या वेळीं आमच्या देशांतील हिंदु कुलीन स्त्रियांनीं आपापले अलंकार काढून लढणाऱ्या लोकांस दिले आणि या मुसलमानांस आपल्या देशांतून हाकलून लावा असें सांगितलें. कित्येक कुलीन व श्रीमंत स्त्रियांनीं या संबंधानें मोलमजुरी करण्यापर्यंत मजल नेली. असलेंच स्तुत्य व उदाहरणीय कृत्य फ्रान्सच्या राज्यक्रांतींत फ्रेंच स्त्रियांनीं केलेलें पाश्चात्य इतिहासांतही वाचायास सांपडतें. **सोमनाथा**च्या स्वारींत रजपुतांनीं मुसलमानांचा जवळ जवळ पराभव केला होता. पण इतक्यांत **महमुदानें** गाई व बैल पुढें आणून त्यांच्यापाठीं आपल्या शिपायांस हटविलें. गाईवर व बैलावर रजपुतांचीं हत्यारें चालतना. तेव्हां सहजच हिंदूंचा मोठा मोड व देवस्थानाचा विध्वंस झाला. सारांश, अशा प्रकारच्या युक्ति केल्यामुळें व कावे दाखविल्यामुळें मुसलमानांस पुष्कळ प्रसंगीं यश आलें. खरा सामना जेव्हां होई, तेव्हां प्राय: हिंदूच मुसलमानांस पादाक्रांत करीत.

पंजाबांतल्या स्वारींत मात्र **महमुदानें** लाहोर येथें आपला एक सुभेदार नेमला. तेव्हांपासूनच **मुसलमानी रियासत** आमच्या देशांत चालू झाली, असें ह्मणावयास हरकत नाहीं.

**२७. महमुदा**नंतर सुमारें दीडशें एक वर्षें त्याच्या वंशजाचे सुभेदार **पंजाब** येथें होते. त्या वेळीं आमच्या देशांतही उत्तरेस **अजमीर, कनोज, मेवाड** वगैरे ठिकाणचे रजपूत राजे आपसाआपसांत भांडत असत. इतक्यांत **महंमद घोरी** यानें **महमूद गिझनी** याच्या सुभेदारास हुसकून लावून आपला ताबा हिंदुस्थानावर बसविला. कोणत्याही काळीं आमच्या देशांत पाहिलें तरी आपसांतल्या भांडणामुळेंच आह्मी रसातळास जाऊन पोंचलों असें आढळून येतें. या काळीं मुस-

लमानांचा आमच्या देशांत सहज प्रवेश झाला, त्याचें मुख्य कारण आह्मी आपसांमध्यें भांडत होतों, हें होय. याप्रमाणें घरफुटीमुळें आमचा नाश झाल्याचीं उदाहरणें पुढेंही येतील. सारांश, घरफूट ही सर्वथैव निंद्य होय, एवढें तरी निदान या आमच्या देशाच्या इतिहासावरून कळो, ह्मणजे झालें.

## पहिल्या प्रकरणावर प्रश्न.

**२३.** मुसलमानांचा धर्म कोणीं स्थापिला? पैगंबर कोण? मुसलमानांच्या पैगंबराचा जन्म कोठें झाला? मुसलमानी धर्माचा थोड्या काळांत पुष्कळ प्रसार झाला त्याचें मुख्य कारण काय? मुसलमानांमध्यें मुख्यत्वें किती जाती मोडत?

**२४.** आपल्या देशांत मुसलमान कां आले? प्रथमतः कोणकोणत्या ठिकाणीं हे लोक आमच्या देशांत आले? आमच्या देशांत येणाऱ्या पहिल्या मुसलमानाचें नांव काय? सिंध देशांतल्या मुसलमान सुभेदाराचें पुढें काय झालें? भडोच व ठाणें या ठिकाणीं कोणत्या वर्षीं मुसलमान आले? मलंगड कोठें व कशासाठीं प्रसिद्ध आहे? रजपुतांनीं सिंध देशांतून मुसलमान सुभेदारास कधीं हुसकून लाविलें?

**२५.** पुढें किती दिवस व कां मुसलमान आमच्या देशांत आले नाहींत? जयपाळ कोठला राजा? तो अफगणिस्थानांत कां गेला? तेव्हां तेथें कोणाशीं गांठ पडली? तेथें कोणाला आणि कां जय मिळाला? सबक्तगीन पुढें हिंदुस्थानांत कां आला? त्यानें आपलें ठाणें कोठें बसविलें? सबक्तगीन कोण, कोठला राजा?

**२६.** महमूद हा कोण? तो हिंदुस्थानावर कां आला? तो किती वर्षें गादीवर होता? त्यानें आपल्या देशावर किती स्वाऱ्या केल्या? सबक्तगीन कधीं वारला? सोमनाथाच्या स्वारींत मुसलमानांची कां व कशी फत्ते झाली? हिंदु, मुसलमानांपेक्षां शूर कमी असें कां ह्मणतां येणार नाहीं? महमुदानें कोणकोणतीं क्षेत्रें बाटविलीं? जयपाळाचें अखेर काय झालें? हिंदु स्त्रियांनीं मुसलमानांस हांकून लाविण्यासाठीं काय केलें? महमूद स्वाऱ्या करी त्या कशासाठीं? आपल्या देशांत मुसलमानी रियासत कधींपासून सुरू झाली?

२७. महमुदाचे वंशज किती वर्षें या देशांत होते ? दुसरा कोणता मुसलमान या देशांत शिरला ? आमचीं राज्यें कशानें बुडालीं ?

---

## प्रकरण २ रें.

# मुसलमानी रियासत.

१ शाबुद्दिन किंवा महमदघोरी; ठाणेश्वरची लढाई.
२ स्थानेश्वरची ( ठाणेश्वर ) दुसरी लढाई. महंमदाचा जय.
३ कुतुबुद्दीन. गुलाम बादशहा.

इ० स० ११९१ त ठाणेश्वरची लढाई.

२८. ( शाबुद्दिन ) **महंमदघोरी.** बाराव्या शतकाच्या सुमारास उत्तरेंत **पृथुराजा** राज्य करीत असे. तो दिल्लीचा आणि अजमीरचा राजा होता. हा **पृथुराजा** जितका दिलदार होता तितकाच **महंमदघोरी** हलक्या दिलाचा होता. **पृथुराजानें** पुष्कळ वेळ **महंमदघोरीस** लढाईत पकडून **दिल्लीस** नेलें आणि थोर मनानें जीवदान दिलें. पण हें **पृथुराजाचें** दान अपात्रीं होतें. पुढें **स्थानेश्वरच्या** दुसऱ्या लढाईत **पृथुराजाचा** मोड झाला, तोच काय तो **महंमदाकडून** त्यास एकदा शह मिळाला. त्या प्रसंगीं पूर्वीं अनेक वेळ मिळालेलें जीवदान अजीबात विसरून, **महंमदानें** त्यास दग्यानें पकडून आपल्या मुलखीं नेलें आणि डोळे काढून कैदेंत टाकिलें, असें रजपूत ह्मणतात. **चंद** नांवाच्या भाटानें **पृथुराजाचें** चरित्र हिंदी भाषेंत लिहून ठेविलें आहे. **अनलवाड्याच्या** रजपुतांनीं **महंमदघोरीच्या ग्यासुद्दीन** नांवाच्या भावास, एका लढाईत पराभव करून पळावयास लाविल्यामुळें **महंमदघोरीच्या** मनांत या रजपूत राजे लोकांचा सूड घ्यावयाचें फार होतें. त्याप्रमाणें मोठें सैन्य घेऊन तो दिल्लीवर आला. **स्थानेश्वरानजीक पृथुराज** व **महंमद** यांची गांठ पडली. त्यांत **गोविंदराव** या **पृथुराजाच्या** एका सरदारानें **महंमदाच्या** पाठीवर असा एक वार केला कीं, त्यामुळें

**महंमद** मूर्च्छित होऊन पडला. त्याचें सैन्य सैरावैरा पळूं लागलें. अशा प्रकारें **महंमदाचा पृथुराजानें** पराभव केला.

इ० स० ११९३त ठाणेश्वरची दुसरी लढाई.

**२९.** पुढें दोन वर्षांनीं **महंमदानें** पुन: **पृथुराजावर** स्वारी केली. सुमारें १५० लहानसहान रजपूत राजे **पृथुराजास** मदत करण्यास आले. उभय सैन्यें पुन: **स्थानेश्वर** जवळ ( यासच ठाणेश्वर असें म्हणतात. ऐथें ) भिडलीं. **कनोजचा** राजा **जयचंद** यानें **पृथुराजाशीं** दुस्मनगिरी सुरू केल्यामुळें व **पृथुराज** थोडा स्त्रीलंपट झाल्यामुळें **महंमदास** आयताच पुष्कळ फायदा झाला. **पृथुराजाचा** स्थानेश्वर येथें पुरा मोड झाला. या लढाईत त्यास दग्यानें पकडून **महंमदानें** आपल्या मुलुखीं नेलें. अशी स्थिति झाल्यामुळें आपल्या या हिंदुस्थान देशांत मुसलमानांचें राज्य कायमपणें स्थापिलें गेलें.

आपल्या देशाशीं आणि आपला मावसभाऊ **पृथुराजा** याच्याशीं बेइमान झालेल्या **जयचंद** राजाचाही पराभव लौकरच **महंमदानें** केला, आणि आपला एक सुभेदार दिल्ली येथें नेमून नंतर त्यानें आपल्या देशाचा रस्ता धरला.

**३०. कुतुबुद्दीन** ह्मणून या **महंमदापाशीं** एक गुलाम असे. त्याच्या अंगीं लोकोत्तर गुण आहेत हें पाहून **महंमदानें** त्याला थोरपदास चढविलें; आणि आपला सुभेदार ह्मणून त्यानें **कुतुबुद्दिनास** दिल्ली येथें नेमिलें. पुढें तेरा वर्षांनीं पुन: **महंमदघोरी** परत हिंदुस्थानांत येत असतां वाटेंत त्याचा खून झाला, त्यामुळें त्याच्या पश्चात् **कुतुबुद्दीन** आपणच दिल्लीचा बादशहा बनला. **कुतुबुद्दीन** प्रारंभीं गुलाम होता ह्मणून त्याच्या मागून आलेल्या बादशहांस **गुलाम बादशहा** असें इतिहासकर्ते ह्मणतात.

## दुसऱ्या प्रकरणावर प्रश्न.

**२८.** पृथुराजा कोण व कोठला? महंमदानें कां स्वारी केली? गोविंदराव कोण? त्यानें काय केलें? ठाणेश्वरचे लढाईत कोणास जय मिळाला? कोणत्या वर्षीं ही लढाई झाली?

**२९.** महंमद पुनः कधीं आला? लढाई कोठें झाली? जयचंद कोण? त्यानें काय केलें? ठाणेश्वरच्या लढाईत कोणास जय कोणत्या वर्षी मिळाला? महंमदानें या जयानंतर काय केलें?

**३०.** कुतुबुद्दीन कोण? महंमदघोरीचा अंत कसा व केव्हां झाला? कुतुबुद्दिनाच्या वंशजांस गुलाम राजे कां ह्मणतात?

---

## प्रकरण ३ रें.

# मुसलमानी रियासत.

१ गुलाम वंश–कुतुबुद्दीन. २ अलतमाश. ३ रझिया बेगम. ४ बलबन. ५ कैकोबाद. खिलजी वंश–जलालुद्दीन; त्याचा पुतण्या अल्लाउद्दीन दक्षिणेंत मराठी राज्य बुडविण्यास गेला; अल्लाउद्दीन गादीवर बसला; पुढील हकीकत. तघलख वंश–६ ग्यासुद्दीन तघलख. ७ अल्गाखान ऊर्फ महंमद तघलख. ८ फिरोजशहा; तिमूरलंगाची स्वारी. ९ सैय्यद वंश. १० लोदी वंश; पानपतचें १ लें युद्ध; बाबर.

## गुलामबादशहा.

### इ० स० १२०६—१२९०.

**३१. कुतुबुद्दीन. महंमदा**नंतर यानें उत्तर हिंदुस्थानांतील बहुतेक हिंदुराज्यें बुडविलीं. हा मोठा दानशूर असे. हा १२१० त वारला. त्याच्यामागून **अलतमाश** गादीवर आला.

**३२. अलतमाश.** (१२११–१२३६.) गुलाम वंशांत **अलतमाश** महान् पराक्रमी बादशहा होऊन गेला. **महंमद बखत्यार खिलजी** यानें बंगाल वगैरे प्रांत काबीज केला. तो **अलतमाशा**नें भांडून आपल्याकडे घेतला. सिंध व पंजाब येथील मुसलमान सरदार स्वतंत्र होऊं पाहत होते, त्यांसही **अलतमाशा**नें ताब्यावर आणिलें. **बगदाद**च्या **खलिफा**नें हिंदुस्थान हें स्वतंत्र मुसलमानी राज्य आहे असें कबूल केलें म्हणून **अलतमाशा**नें आपल्या नांवाचें नाणें पाडिलें. हा बादशहा १२३६ त मेला.

**३३. रजिया बेगम**—ही **अलतमाशा**ची मुलगी. ही मोठी शूर असे, म्हणून मुसलमान इतिहासकार 'सुलतान रझिया' या नांवानें तिचा उल्लेख करितात. ही एका हवशी गुलामावर फिदा होती म्हणून दरबारच्या इतर सरदारांनीं तिला पदच्युत करून ठार मारिलें.

इ० स० १२३६ रजियाबेगम हीस मारलें.

**३४. बल्बन**—हा **अलतमाशा**च्या एका मुलाचा वजीर होता व पुढें **अलतमाशा**चा नातजांवईही पण झाला. यानें आपल्या सुभेदारांवर फारच करडी नजर ठेविली. हा क्रूरही बराच असे. एके प्रसंगीं मेवाडचे एक लाख रजपूत यानें कत्तल करून मारविले. **बल्बन** १२८७ त मरण पावला. **बल्बन**च्या वंशजांस पुढें तीनच वर्षांनीं विषप्रयोगानें ठार करण्यांत आलें, आणि अशा रीतीनें या **गुलामवंशा**चा अंत झाला. गुलाम वंशाचा शेवटला राजा **कैकोबाद** हा होता.

इ० स० १२९० त कैकोबाद मारला गेला.

## खिलजी घराणें. तीस वर्षे-(१२८९-१३२०.)

**३५. जलालुद्दीन**—हा कैकोबादनामक **"गुलामघराण्यांतील"** शेवटल्या बादशहाचा वजीर असे. यानें आपल्या धन्यास ठार मारून गादी बळकाविली

याचा पुतण्या **अल्लाउद्दिन.** यानेंच प्रथमतः नर्मदेच्या पलीकडे **दक्षिणें**त स्वारी केली. मुसलमानांचा दक्षिणेंत प्रवेश झाला तो येथपासूनच. **देवगिरी** येथें **'यादव'** किंवा **'जाधव'** या मराठे कुळींचें मराठी राज्य, **वरंगुळ** येथें **तेलंगी** लोकांचें तेलंगी राज्य, आणि **धूरसमुद्र** येथें **कानडी** लोकांचें कानडी राज्य; अशीं तीन राज्यें त्या वेळीं **दक्षिणेंत** होतीं. **देवगिरी**चा (ज्याला हल्लीं दौलताबाद ह्मणतात तेथील) राजा **रामदेवराव** होता. किल्ल्याजवळ एकाएकीं **अल्लाउद्दिन** प्रचंड सैन्यानिशीं येऊन उतरला. मी लहानसा सरदार पुढें आलों आहें, मागून बादशहाचें मोठें दांडगें सैन्य जवळच येत आहे, अशी त्यानें प्रथमतः हूल उठविली. त्यामुळें **रामदेवराव**

इ० स० १२९५ त अल्लाउद्दिनानें जलालुद्दिनास ठार मारलें.

घाबरला, आणि निमूटपणें **अल्लाउद्दिनाशीं** त्यानें तह केला. तेथून परत दिल्लीकडे गेल्यावर आपल्या चुलत्याचा **अल्लाउद्दिनानें** खून केला आणि लगेच दिल्लीतख्त बळकाविलें.

**३६. अल्लाउद्दीन खिल्जी**—आपला सेनानायक **मलीक काफूर** यास **अल्लाउद्दिनानें** चार वेळां दक्षिणेंत पाठविलें. त्यानें महाराष्ट्र देशाच्या **रामदेवरावास** कैद करून दिल्ली येथें नेलें. कानडी लोकांचें राज्य सफेजंग बुडवून **वरंगुळचेंही** बुडविलें. या प्रकारें **अल्लाउद्दिनाच्या** कारकिर्दीत थेट रामेश्वरापर्यंत मुसलमान लोकांच्या स्वाऱ्या झाल्या. रामेश्वर येथें एक याच काळची बांधलेली मशीद आहे.

इ० स० १२९७ त गुजराथ काबीज केला. १३०३ चितोरची लूट.

**अल्लाउद्दिनानें** गुजराथ प्रांतावर स्वारी करून तो देश पूर्णपणें आपल्या कबज्यांत आणिला. पुढें सहा वर्षांनीं **चितोरचा** किल्ला लुटला. या प्रसंगीं **देवलदेवी** ह्मणून एक रूपवती राजकन्या होती. तिचा अभिलाष धरून पुष्कळ हिंदु राजे आपसांत भांडत होते. ती एके प्रसंगीं आपल्या परिवारासह दुसऱ्या ठिकाणीं जात असतां **अल्लाउद्दिनाच्या** सैन्यानें तिला घेरून पकडलें आणि **दिल्लीस** नेलें. तेथें गेल्यावर पाहते तों आपली आई **कमलादेवी** ही बादशहाच्या जनानखान्यांत आहे. पुढें **अल्लाउद्दिनाचा** मुलगा **खुसरू** यानें **देवलदेवीशीं** लग्न लाविलें. **देवलदेवीचें** कपाळ इतकें फुटकें होतें कीं, पहिल्यानें तिला आपल्या नवऱ्याचा प्राण घेणाऱ्या **दिराशीं** आणि नंतर लौकरच **खुसरू** नामक राज्य बळकाविणाऱ्या हलकट सरदाराशीं लग्न लावावें लागलें!

इ० स० १३१५ त अल्लाउद्दीन मेला.

**अल्लाउद्दीन** इतका मद्यपी होता कीं त्यामुळेंच तो शेवटीं वेडा झाला. **काफूर** नांवाचा जो नांवाजलेला **अल्लाउद्दिनाचा** सेनापति होता, त्यानेंच **अल्लाउद्दिनास** विषप्रयोगानें मारिलें, असें म्हणतात.

**मलीक काफूर**नामक वजिराला **खुसरू** नांवाच्या त्याच्या आश्रितानें ठार मारविलें. **खुसरू** हा मूळचा हिंदु असून पुढें मुसलमान झाला होता. या **खुसरूला गाजीबेग तघलख** यानें ठार मारविलें. हा **गाजीबेग खुसरू**च्या सैन्यांतलाच एक अंमलदार होता.

खुसरूस इ० स० १३२० मध्यें मारलें.

## तघलख घराणें.

या घराण्यांतील आठ पुरुषांनीं सुमारें शंभर वर्षेंपर्यंत दिल्ली येथें बादशाही भोगिली. या बादशहांच्या अंगीं सांगण्यासारखें कर्तृत्व नव्हतें ह्मणून हळू हळू यांच्या नौकरांनीं पुष्कळ प्रसंगीं सत्ता बळकाविली, आणि क्वचित् स्वतंत्र होण्याचाही घाट घातला. त्यामुळें ही पठाणी बादशाही छिन्नविच्छिन्न होत चालली. अशा प्रसंगीं **तिमूरलंग**नामक तातरानें या देशावर स्वारी केली, त्यामुळें तर फारच झोटिंगपाच्छाई माजली. या तघलख घराण्यांतील प्रत्येक पुरुषाचें थोडथोडें इतिवृत्त येथें देणें जरूर आहे.

इ० स० १३२० पासून १४१२ पर्यंत तघलख घराणें याची कारकीर्द.

**३७. ग्यासुद्दीन तघलख**—हल्लींच्या दिल्ली शहराशेजारीं **तघलखाबाद** म्हणून एक किल्ला आहे, तेथें हा आपला दरबार भरवीत असे. पहिलीं चार वर्षें देशांत स्वस्थता करण्याच्या प्रयत्नाखालीं गेलीं. इतक्यांत **बंगाल्या**कडे बंड उठलें म्हणून त्याचा बंदोबस्त करण्यासाठीं **ग्यासुद्दीन** तिकडे गेला. **उलगाखान**नामक त्याच्या चिरंजिवाकडे दिल्लीचा कारभार होता. **बंगाल्या**कडे फत्ते मिळवून बाप आला म्हणून त्याला सामोरें जाण्यासाठीं **उलगाखान** निघाला. बापलेंकांची भेट एका मुद्दाम तयार केलेल्या लांकडी मंडपांत झाली. क्षेमकुशलाचीं बोलणीं संपल्यावर **उलगाखान** परत आला. तों इतक्यांत तो मंडप एकाएकीं कोसळला आणि **ग्यासुद्दीन** व त्याचा धाकटा मुलगा हे उभयतां त्यांत सांपडून चिरडून मेले. बापाचा आणि भावाचा घात

इ० स० १३२०–२५ ग्यासुद्दिनाची कारकीर्द.

इ० स० १३२५ त ग्यासुद्दीन मंडपाखालीं चिरडून मेला.

व्हावा म्हणून हा बेत अगोदरपासूनच **उलगाखाना**नें केला होता असें कित्येकांचें म्हणणें आहे. लोभाच्या पायीं कोणकोणतीं अनन्वित कृत्यें मनुष्य करील याचा कांहीं नियम नाहीं.

**३८. महंमद तघलख**—बापाचा अशा रीतीनें गादीवरील हक्क उडविल्यानंतर **महंमद तघलख** हें नांव धारण करून **उलगाखान** तख्तनशीन झाला. हा बादशहा मोठा चमत्कारिक असे. त्याच्यांत कित्येक सद्गुण मोठे जाज्वल होते. पण त्यांच्याच तोडीचे कांहीं दुर्गुण याच्या हाडीं अगदीं खिळून गेले होते. हा वेडा होता, असेंही कित्येक ह्मणतात.

इ० स० १३२५–१३५१ महंमदाची कारकीर्द.

हा "अनेक विद्यांत निपुण, युद्धांत कुशल आणि आहारविहारांत अत्यंत परिमित असा होता" तरी पराकाष्ठेचा क्रूर आणि निर्दय होता. त्याच्या एका पुतण्यानें कांहीं अपराध केला ह्मणून आपल्या डोळ्यांदेखत त्याच्या अंगाची कातडी सोलविली! सर्व जगत् जिंकण्याचें त्यास वेड लागलें होतें. **चीन** देश जिंकण्यासाठीं त्यानें एक लाख फौज तयार केली. पण हिमालयाच्या पाहाडांतच ती थंडीनें थंड पडली. **दिल्ली** सोडून **देवगिरी** येथें आपली राजधानी आणण्यासाठीं त्यानें दोनवेळां प्रयत्न केला. आपल्या बरोबर **देवगिरीस** कोणी येण्यास कांकूं करील तर त्याचा शिरच्छेद करावा असा **महंमदानें** हुकूम केला आणि त्याप्रमाणें सारा लवाजमा घेऊन **देवगिरी**कडे हा बादशहा आला. पण वाटेंत बहुतेक माणसें दुष्काळानें वगैरे मरत तें पाहून पुनः दिल्लीस परत जाण्याचें यानें ठरविलें. याच्या कारकीर्दींत जिकडे तिकडे बंडेंच उठलीं. हिंदुस्थानावर स्वारी करण्याकरितां अफगाण वगैरे लोक येत त्यांस मुकाट्यानें खंडणी देऊन **महंमद** परत लावी!

याच्या कारकिर्दींत **विजयनगर**चें हिंदुराज्य आणि **ब्राह्मणी**-नामक मुसलमानी राज्य यांची स्थापना दक्षिणप्रांतीं झाली.

इ० स० १३५१ महंमदाचें मरण.

**महंमद ठट्टा** मुक्कामीं मरण पावला.

३९. **फिरोजशहा—महंमदा**च्या मागें त्याचा मुलगा **फिरोजशहा** गादीवर बसला. याची कारकीर्द एकंदरींत प्रजेस मोठी सुखावह झाली. लोकोपयोगी व धर्माचीं कामें यानें बहुत केलीं. यमुनेचा कालवा रयतेच्या कल्याणाकरितां बांधला. याच्या पश्चात् गादीवर बादशहा आले ते केवळ नामधारी, अगदीं निर्माल्यवत् होते. तेव्हां त्यांचीं नांवें देण्यांत देखील अर्थ नाहीं. हें **तघलख** नांवानें प्रसिद्ध झालेलें राजघराणें गादीवर असतांना **तिमूरलंगा**ची स्वारी झाली, ती मात्र ध्यानांत ठेवण्याजोगी आहे.

इ० स० १३५१–१३८८ फिरोजशहाची कारकीर्द.

**तिमूरलंग** हा तातार देशांतला राहणारा. तो लंगडा होता म्हणून त्यास "लंग" ह्मणत. तघलख घराण्यांतल्या बादशहांमध्यें तंटे फार. तेव्हां आपण जाऊन बरीच लूट मिळवूं असें त्यास वाटलें; आणि त्याप्रमाणें तो या देशावर चाल करून आला. दिल्लीस येतांच गादीवरील **तघलख** बादशहा भीतीनें गुजराथेंत पळून गेला. तेव्हां **तिमूर** दिल्ली शहर लुटीत सुटला. त्यानें दिल्लीकरांस मनस्वी त्रास दिला. दिल्ली शहरभर रस्तोरस्तीं प्रेतेंच प्रेतें होऊन गेलीं. अशी कत्तल पांच दिवस चालली होती. आमच्या देशांतील एक लाख माणसांचीं डोकीं उडविलेलीं **तिमूरलंगानें** स्वत: आपल्या डोळ्यांनीं पाहिलीं म्हणतात ! लुटीची तर गोष्टच नको, ती अपार होती ! असो. अशा रीतीनें या देशावर आलेली ही धाड एकदांची परत स्वदेशीं गेली. **तघलख** वंशांतील शेवटला पुरुष वारल्यावर ती गादी दुसऱ्या वंशाकडे गेली.

## सय्यद आणि लोदी नांवाचे दोन राजवंश.

४०. **खैरखान—तिमूरलंग** स्वदेशीं गेला त्या वेळीं **खैरखानास** त्यानें मुलतानच्या सुभेदारीवर नेमिलें होतें. **तघलख** घराण्याचा शेवट झाला तेव्हां **तिमूरच्या** नांवानें दिल्ली येथें **खैरखान** कारभार चालवूं लागला. मुसलमानांत **सय्यद** किंवा शीया आणि

इ० स० १४१४–१४५० सय्यद घराणें आणि १४५०–१५२६ लोदी घराणें दिल्लीयेथें राज्यकारभार करीत असे.

**सुनी** असे दोन पंथ आहेत. **खैरखान** हा **सय्यद** होता. ह्मणून त्याच्या वंशास "सय्यद" वंश म्हणतात. हे बादशहा केवळ नामधारीच होते. यांची सत्ता दिल्लीबाहेर कांहीं नसे. त्यांचे ठिकठिकाणचे नौकरच स्वतंत्र बादशहा असत. या **सय्यद** घराण्यांतल्या शेवटल्या पुरुषानें आपली गादी **लाहोर**चा सुभेदार **बहिलोलखान लोदी** याच्या स्वाधीन केली आणि आपण मोकळा झाला.

## लोदीवंश.

**४१. बहिलोलखान लोदी**—दिल्लीची सत्ता पूर्वींप्रमाणें चोहींकडे वाढवावी ही याला मोठी इच्छा होती आणि त्याप्रमाणें ह्यानें थोडाबहुत प्रयत्नही केला. पण याच्या मागून गादीवर आलेल्या पुरुषानें सबंध बादशाहीच बुडविली.

इ० स० १४५०–८८.

**४२. इब्राहिम लोदी**—हा मोठा क्रूर व जुलमी बादशहा असे. त्याच्या दरबारच्या सरदार मंडळीस देखील तो आवडेना. त्यास ते फार कंटाळले आणि त्यामुळें त्यांनीं **तिमूर** घराण्यांतल्या **बाबर**-नामक पुरुषाला "आपणांस त्रासांतून सोडवा आणि हें दिल्लीतख्त एकदांचें आपणांकडे घ्या" असें विनयपूर्वक कळविलें. त्याप्रमाणें **बाबर** आला. **इब्राहिम लोदी**चें व त्याचें **पानपत** मुक्कामीं युद्ध झालें, त्यांत **बाबरा**ला पूर्ण जय मिळाला. तेव्हां पठाणाच्या वंशाची समाप्ति होऊन, मोंगल वंशांतील **बाबर** याच्या हातीं दिल्लीतख्त आलें.

पानपतची पहिली लढाई, इ० स० १५२६.

## तिसऱ्या प्रकरणावर प्रश्न.

**३१.** कुतुबुद्दीन कधीं मेला ?

**३२.** त्याच्या मागून गादीवर कोण आला ? महंमद बखत्यार हा कोण ? अलतमाशानें नाणें कां पाडलें ? तो कधीं मेला ?

३३. रजिया बेगम ही कोण ? तिला मुसलमान इतिहासकार काय ह्मणतात ? तिला कां, कधीं आणि कसें मरण आलें ?

३४. बल्बन कोण ? तो स्वभावानें कसा होता ? तो कधीं मेला ? त्याच्यानंतर गादीवर कोण बसलें ? त्याचा अंत कशानें व कधीं झाला ?

३५. जलालुद्दीन हा कोण ? याला राज्य कसें मिळालें ? दक्षिणेंतलीं प्रबळ राज्यें कोणतीं ? अल्लाउद्दीन कोण ? त्यानें मराठी राज्य कसें बुडविलें ? अल्लाउद्दिनानें गादी कशी मिळविली ? जलालुद्दीन कधीं मेला ?

३६. मलीक काफूर कोण ? त्यानें दक्षिणेंतलीं कोणकोणतीं राज्यें बुडविलीं ? अल्लाउद्दिनानें कोणतें राज्य स्वतः स्वारी करून काबीज केलें ? देवलदेवी कोण ? तिची माहिती थोडी सांगा. कमलादेवी कोण ? अल्लाउद्दीन कशानें मेला ? मलीक काफुराची अखेर दशा काय झाली ? खुसरू हा कोण ? त्यानें काय केलें ? त्याचा मूळचा धर्म कोणता ? गाजीबेग कोण ? त्यानें काय केलें ?

३७. तघलख घराण्यांत एकंदर राजे किती झाले ? ते कसे असत ? ग्यासुद्दीन कशानें व कधीं मेला ? तो दरबार कोठें भरवीत असे ?

३८. उल्गाखानानें गादीवर बसल्यानंतर कोणतें नांव धारण केलें ? त्याचा स्वभाव कसा होता ? त्याच्या क्रौर्याचें एखादें उदाहरण सांगा. त्यानें आपली राजधानी कोठें नेण्याचा बेत केला होता ? व तो साधला किंवा नाहीं ? त्याच्या कारकीर्दींत दक्षिणेमध्यें कोणतीं राज्यें स्थापन झालीं ? तो कोठें व कधीं मरण पावला ?

३९. महंमदानंतर गादीवर कोण बसला ? तिमूरलंग कोण, कोठला राहणारा व त्यानें काय केलें ?

४०. खैरखान कोण ? त्यानें कोठपासून कोठवर राज्य केलें ? सय्यद हें नांव कशावरून पडलें ? याच्यामागून कोण व कधीं गादीवर बसला ?

४१. बहिलोलखान लोदीनें कधींपासून कधींपर्यंत राज्य केलें ?

४२. इब्राहीम लोदीचा स्वभाव कसा होता ? बाबर कोण ? तो

या देशांत कां आला ? पानिपतचें पहिलें युद्ध कधीं व कोणाकोणामध्यें झालें ? त्याचा शेवट काय झाला ?

---

## प्रकरण ४ थें.

# दरम्यानच्या दक्षिणेंतल्या घालमेली.

१ ब्राह्मणी राज्य. २ विजयनगरचें हिंदु राज्य.

**४३.** आतां येथून मोंगल बादशाहीचा एकसारखा सुयंत्रित इतिहास कथन करण्यापूर्वीं दक्षिणेंतल्या कित्येक मोठ्या घालमेली कळविल्या पाहिजेत. मागें एके ठिकाणीं सांगितलेंच आहे कीं, **देवगिरीचें** मराठी राज्य, **वरंगूळचें** तेलंगी राज्य, **धूरसमुद्रचें** कानडी राज्य अशीं तीन राज्यें पठाणांच्या सत्तेखालीं आलीं, ह्मणून मुसलमानी अंमल दक्षिणेवरही बसला. **महंमद तघलखच्या** कारकीर्दीत दोन स्वतंत्र राज्यांची दक्षिणेंत स्थापना झाली. त्यांपैकीं पहिलें **ब्राह्मणीनामक** मुसलमानी राज्य होय व दुसरें **विजयनगरचें** हिंदु राज्य.

इ० स० १३४७–१३५६.

**ब्राह्मणी राज्य.**—**हुसेन** ह्मणून एक मुसलमान गुलाम **गंगू** नांवाच्या ब्राम्हणाच्या पदरीं **दिल्लींत** होता. **दिल्लीची** अंदाधुंदी पाहून त्याला वाटलें कीं, ही संधि बरी आहे. कांहीं बंडखोर लोक घेऊन तो **दक्षिणेंत** आला आणि एका स्वतंत्र राज्याची त्यानें स्थापना केली. **गंगूचे** झालेले उपकारांची फेड करण्यासाठीं " **गंगू ब्राह्मणी** " असें त्यानें आपल्या नांवापुढें जोडून दिलें व **गंगूस** दक्षिणेंत आणून त्यास आपल्या खजिन्यावर नेमिलें. याची राजधानी, हल्लींचें हैद्राबादकर निजामाच्या हद्दींतलें **कलबुर्गें** शहर होती. याच्या वंशांत एकंदर अठरा पुरुष झाले. तिकडे पठाणाची बादशाही बुडून ती मोंगलांकडे गेली आणि इकडे ब्राह्मणी बादशाही शरीरानें छिन्नविच्छिन्न झाली. शंभर वर्षें इभ्रत या ब्राह्मणी बादशहांनीं भोगिली. नंतर **विजापुरची आदिलशाही**, **अहमदनगरची निजामशाही**, **गोवळकोंड्याची कुतुबशाही**, **बेदरची बरीद-**

**शाही, वऱ्हाडांतली अम्मदशाही** अशा पांच भिन्न भिन्न शाह्या झाल्या. या पांचांच्या पुनः तीन होऊन, अखेर त्या तिन्ही **औरंगजेबाच्या** कारकिर्दीत अजी बुडाल्या.

**विजयनगरचें हिंदु राज्यः**—वरंगुळ बुडाल्यानंतर तिकडील तेलंगी राजवंशानें, खालीं, **विजयनगर** मुक्कामीं, तघलखांची गादी हयात असतांच, एक नवीन राज्य स्थापिलें. या राज्याची उत्तरोत्तर फारच भरभराट होत गेली. पण पुढें **विजापुरकर, नगरकर, गोवळकोंडेकर,** या तिघांनीं मिळून **तालीकोटच्या** लढाईंत **रामराजाचा** पराजय करून तें राज्य निखालस बुडविलें. याच लढाईंत **रामराजा** ठार झाला, हा राजवंश **तेलंगी** असल्यामुळें याच्याकडून तेलंगी भाषेस बरेंच उत्तेजन मिळत गेलें.

इ० स० १३३६–१५६५ विजयनगरचें राज्य.

वेदभाष्याचा कर्ता **माधव सायण** किंवा **विद्यारण्य** यास विजयनगरकर **बुक्क** राजाचा मोठा आश्रय होता. शेवटचा **रामराजा** हा **हेमराजाचा** मुलगा असून, **हेमराज** हा विजयनगरकरांचा पेशवा किंवा कुलकारभारी होता. **हेमराजानें** विजयनगरकरांस बाहुलें करून ठेविलें होतें. पुढें **रामराजानें** राजवंश समूळ बुडविला व सगळी सत्ता बळकाविली. याच्या व मुसलमानांच्या बऱ्याच लढाया झाल्या. अखेरीस यास बुडविण्यासाठीं अदिलशहा, निजामशहा व कुतुबशहा या तिघांनीं मिळून स्वारी केली. तेव्हां **रामराजा**बरोबर विजयनगरचें हिंदु राज्य साफ बुडालें.

## चौथ्या प्रकरणावर प्रश्न.

**४२.** हुसेन हा कोण ? तो आपणांस काय ह्मणवीत असे ? त्यानें यजमानाचे उपकार कसे फेडले ? त्याची राजधानी कोठें होती ? त्याच्या वंशांत एकंदर किती पुरुष झाले ? ब्राह्मणी वंशाच्या किती निरनिराळ्या शाखा झाल्या ? त्यांचीं नांवें सांगा. पुढें किती शिल्लक राहिल्या आणि अखेर त्यांचीही अवस्था काय झाली ? विजयनगरचें हिंदु राज्य कोणीं बुडविलें ? विजयनगरचा शेवटला राजा कोण ? ता-

लीकोटची लढाई कोणकोणांत झाली? विजयनगरकर जातीनें कोण? त्यांचा कोणकोणास आश्रय होता? रामराजा हा कोण होता?

---

## प्रकरण ५.

१ **बाबर**—त्याचे पराक्रम, शिक्रीची लढाई; चंदेरीचा वेढा; त्याचा स्वभाव; त्याचें मरण. २ **हुमायून**—शीरशहाशीं लढाया; हुमायुनाचें इराणाकडे पळून जाणें; वाटेंत अकबराचा जन्म. ३ **शीरशहा**—त्याची कारकीर्द; कालिंजरचा वेढा; हिम्मू वजीर; मुसलमान सरदारांचें बंड; हुमायुनास गादी मिळाली; हुमायुनाचें मरण. ४ **अकबर**—हिम्मूनें सत्ता बळकाविली; बहिरामखानाचा हिम्मूशीं झगडा; पानपतची लढाई; हिम्मूचा शेवट; अकबराचे पराक्रम; रजपुतांशीं झगडे; जिजिया कराची माफी; राजा तोडरमल्ल; ऐन अकबरी; त्याचा स्वभाव. ५ **सेलीम**—सेलीमचें दुसरें नांव; त्याचा स्वभाव; खुस्रु; खुस्रूचा शेवट; नूरजहान; तिची शीरखानाशीं शादी; शीरखानाचा खून; नूरजहान सेलिमाची पट्टराणी; तिची सत्ता; सेलिमाची दक्षिणेंत स्वारी; अहमदनगरकरांशीं झगडा; शहाजहानाचें दिल्लीस परत जाणें; शाहारीयार यास गादी मिळावी एतदर्थ नूरजहानचा प्रयत्न; शहाजहानाचें आग्र्यास जाणें; त्याची खोड मोडण्यासाठीं जहानगीरची सैन्यासुद्धां शहाजहानावर स्वारी; शहाजहानचें दक्षिणेकडे वळणें; मोहबतखानावर नूरजहानची मेहेरबानी; मोहबताचें बंड; उभयतांचें मोहबताचे हातीं लागणें; जहानगीरचा मृत्यु. ६ **शहाजहान**—आग्र्यास जातो; खानजहान लोदीचें बंड; पोर्तुगीज लोकांची कत्तल; शहाजहानाचीं मुलें; औरंगजेबाचा कावा; शहाजहानाचा कारागृहीं वास; त्याचें मरण. ७ **औरंगजेब**—बंधूंमधील यादवी; गुजराथ प्रांतावरील स्वाऱ्या; दक्षिणेंत झालेली फजीती; औरंगजेबाचा धर्माभिमान; जिजिया कर वसूल करण्याची पद्धत; अकबर औरंगजेबाचा पुत्र; त्याचें बंड; औरंगजेबाचा स्वभाव; त्याचा मृत्यु.

### मोंगल बादशहा. (१५२६–१७६५)

**४४. बाबर**—हा प्रख्यात **तिमूरलंगाच्या** वंशांतील साहावा

पुरुष होय. **पंजाबचा** सुभेदार **दौलतखान** लोदी याच्या बोलावण्यावरून हा हिंदुस्थान देशांत आला. **लोदीवंशां**तील बादशहाचें व याचें मोठें तुंबळ युद्ध पानपत येथें इ० स० १५२६ सालीं झालें वगैरे हकीकत मागील प्रकरणांत गेली आहे.

इ० स० १५२६–१५३० बाबराची कारकीर्द.

**त्याचा पराक्रम**—चितोरच्या **संग** राण्यानें **बाबरास** आपल्या देशांतून हुसकून लावावें ह्मणून अनेक हिंदु राजांची मदत मागितली. उभय सैन्यांची गांठ **शिक्री** येथें पडली पण त्यांत **बाबरास** पूर्ण जय मिळाला. पुढील सालीं **बाबरानें चंदेरीस** वेढा घालून पुष्कळ रजपुतांची भयंकर कत्तल उडविली! तेव्हांपासून रजपूत अगदीं नरम पडले व **बाबरा**ची सत्ता पूर्णपणें त्यांच्यावर बसली.

इ० स० १५२६, शिक्रीची लढाई.

इ० स० १५२७, चंदेरीचा वेढा.

**बंगाल** आणि **बहार** इकडे आपला मोर्चा **बाबरानें** फिरविला आणि अखेर फत्तेही मिळवली. याप्रमाणें एकंदर हिंदुस्थान आपल्या कबज्यांत त्यानें घेतलें.

**त्याचा स्वभावः**—त्यानें आपलें चरित्र स्वतः लिहून ठेवलें आहे. त्याचा स्वभाव कसा होता हें त्यावरून चांगलें व्यक्त होतें. तो विलक्षण धैर्याचा माणूस होता. शरीरानें बळकटही तसाच. एका प्रसंगीं एका दमानें दीडशें मैल घोड्यावरून मजल मारल्यानंतर लगेच **गंगा**नदींतून पोहून पार पडला, असें ह्मणतात. भर लढाईच्या प्रसंगीं फुरसत सांपडे त्या वेळीं तो फार्सी कविता रचीत असे. फार्सींतील उत्तम कवी अशी **बाबरा**ची ख्याति आहे. मैत्रीला तो उमदा असे. पोरांवर त्याची ममता प्राणाच्या पलीकडे होती. एके प्रसंगीं त्याचा वडील मुलगा **हुमायून** हा फार आजारी होता. तेव्हां मुसलमानांच्या समजुतीप्रमाणें पुत्राचें दुखणें आपणावर घेण्याचा धर्मोक्त विधि त्यानें केला. तेव्हां **हुमायून** बरा

इ० स० १५३०–बाबराचें मरण.

होऊन **बाबर** आजारी पडला, आणि अखेर तो त्याच दुखण्यानें वारलाही !

४५. **हुमायून**—यानें गुजराथेकडे प्रथमतः आपला मोर्चा फिरविला; कारण तो प्रांत **बाबरानें** काबीज केला नव्हता. गुजराथेंत **बहादूर**शहाची सत्ता होती. **बहादुराचा**

इ० स० १५३०–१५४०.

पुरा पराभव **हुमायूनानें** केला आणि **चांपनेर** मुक्कामची **बहादूरशहाची** अपार संपत्ति लुटून टाकिली. तत्रापि लगेच एक वर्षानें आपली सत्ता पुनः **बहादूरशहानें** मिळविली. गुजराथेंतून आग्र्याकडे **हुमायून** परत येत असतां त्यास बंगाल्यांत **शिरशहा**नामक सरदारानें दंगाधोपा माजविल्याचें वर्तमान कळलें; तेव्हां त्याचें पारिपत्य करावें ह्मणून **हुमायून** तिकडे वळला. **चुणार** किल्ला **हुमायुनानें** लढून घेतला, आणि तसाच पुढें जाणार तों इतक्यांत पावसाळा आला. पावसाळाभर **हुमायून**ला तळ देऊन स्वस्थ बसणें भाग पडलें आणि दुर्दैवानें बंगाल्यांतल्या सर्द हवेमुळें त्याच्या सैन्यांत रोगाच्या भयंकर सांती उद्भवूं लागल्या. आपल्या शत्रूच्या सैन्यांत असा हाहाकार उडाला, हें पाहतांच **शिरशहा**ला दुप्पट उमेद आली आणि त्यासरशी त्यानें **हुमायून**वर चाल करण्याचें योजिलें. उभय सैन्यांची गांठ **बक्सार** येथें पडली. **हुमायून**चा या प्रसंगीं पुरा मोड झाला. जीव बचावण्यासाठीं गंगानदींतून पोहत जाणें **हुमायुना**ला भाग पडलें. नदी उतरून गेल्यावर पुनः **हुमायुनानें** सैन्य जमा केलें

इ० स० १५३९.

आणि **शिरशहाची** **कनोज** येथें गांठ घेतली. पण तेथेंही पराभव झाला ह्मणून **हुमायून** **लाहोरा**कडे पळत सुटला. **लाहोरा**कडेही जम बसत नाहीं असें पाहून सिंधच्या मैदानांतून **अमरकोटा**कडे चालला. त्याच्या मनांत इराणच्या बादशहाकडे जाऊन त्याचें साहाय्य मागावयाचें होतें. वाटेंत **अमरकोट** शहरामध्यें **अकबर** नांवाचा पुत्र जन्मला.

इ० स० १५४३.
अकबर जन्मला.

त्या वेळीं **हुमायुना**जवळ नुसते सात जण नौकर होते. पुढें इराणच्या **तमास्प** बादशहानें सैन्य देऊन हिंदुस्थानाकडे **हुमायुनास** आपली गादी मिळविण्याचा प्रयत्न करण्यासाठीं परत पाठविलें.

**शीरशहा—कनोज** येथें **हुमायुनाचा** पराभव केल्यानंतर दिल्लीच्या गादीवर **शीरशहा** बसला. त्यानें राज्यकारभार पांचच वर्षे केला; पण तेवढ्या अवधींत रयतेला फारच सुख झालें. त्यानें दोन हजार मैल रस्ता तयार केला. टपालाची सुरुवात करण्याचा प्रयत्न करून तळीं, विहिरी, धर्मशाळा वगैरे जागजागीं बांधण्यांत त्यानें फार पैसा खर्चिला. बुंदेलखंडांतील **कालिंजर** शहरासभोंवतीं वेढा घातला असतांना अकस्मात् एक गोळी लागून **शीरशाहा** ठार झाला. त्याच्या मागें त्याचा मुलगा गादीवर आला. तो बापासारखा प्रजेच्या कल्याणाखातर झटणारा होता. पण तो अल्पायुषी झाला. त्याच्या पश्चात् त्याचा मुलगा गादीवर बसला, पण तो नादान आणि मूर्ख होता. **हिमू** म्हणून कोणी हिंदु प्रधानाची सत्ता फार वाढली आणि त्यानें हिंदु लोकांस मोठमोठ्या अधिकाराच्या जागा देण्याचा सारखा सपाटा चालविला. हें मुसलमान सरदारांस आवडलें नाहीं. त्यांनीं मोठें बंड उभारलें. ही संधि **हुमायुनाच्या** पथ्यावर पडली. मोठी लगबग करून तो **दिल्लीवर** चालून आला आणि लोकांनींही निमूटपणें त्याला पुनः गादीवर बसूं दिलें. आपली गादी इतके हालकष्ट सोसून **हुमायुनानें** मिळविली खरी; पण तिचा उपभोग कांहीं सहा महिन्यांहून जास्त त्याला घेतां आला नाहीं. एके दिवशीं सायंकाळीं जिन्यावरून उतरतांना निमाजाची वेळ झाल्याबद्दलच्या इशाऱ्याची आरोळी (मशिदींतली) त्यानें ऐकिली. त्यासरशीं निमाज करण्यासाठीं खालीं पायरीवरच बसला. निमाज संपल्यानंतर काठी टेंकून उठणार तों ती काठी पायरीवरून निसटली, त्यासरशीं तोल जाऊन **हुमायून** तोंडघशी पडला आणि त्याच इजेमुळें अखेर त्याचा प्राण गेला.

इ० स० १५४०–१५४५.

इ० स० १५४५.

इ०स० १५५६.

इ० स० १५५६, हुमायून मेला.

**४६ अकबर—(१५५६–१६०५) हुमायून** मेल्याचें वर्त-

मान **हिमू**नामक **शीरशहा**च्या वंशजांच्या प्रधानास बंगाल्यांत कळलें. तेव्हां एक मोठें लष्कर घेऊन आपण ती गादी बळकवावी या इच्छेनें तो दिल्लीवर चालून आला. **दिल्ली** व **आग्रा** हीं लोकांनीं दोन्ही शहरें राजीखुशीनें त्याच्या स्वाधीन केलीं. या समयीं **अकबर** पंजाबांत होता. **बहिराम** म्हणून एक शूर सरदार होता, त्याच्या स्वाधीन **अकबरा**ला हुमायूनानें केलें होतें. **अकबर** केवळ तेरा वर्षांचें नेणतें लेंकरूं. बापाची गादी **अकबरास** देववावी ही **बहिरामखाना**ची इच्छा, म्हणून जंगी सैन्य तयार करून **बहिरामखान** **हिमू**वर चालून गेला. **पानपत** येथें लढाई जुंपली आणि त्यांत फत्ते **बहिरामखाना**ची झाली. **हिमूस** कैद करून ठार मारिलें.

**अकबराची कारकीर्द**—प्रथमतः तीनचार वर्षें, ठिकठिकाणीं उठणारीं बंडें मोडण्यांत **अकबरास** काढावीं लागलीं. नंतर राजपुतान्यावर त्याची दृष्टि गेली. **चितूर**चा **राणा उदेसिंग** यानें आपणांकडे पुष्कळ रजपूत राजांस मिळविलें. मुसलमानांचीं व रजपुतांची तुंबळ युद्धें चालूच होतीं. आपणापाशीं हिंदु आणि मुसलमान असा भेदाभेद नाहीं; दोन्ही जातींत समेट व्हावा; आपण आपल्या मुली रजपूत राजांस देण्याला खुशी आहोंत; रजपुतांनींही आपणांशीं शरीरसंबंध करावा इत्यादि **अकबरा**च्या मसलती पुष्कळांस पसंत पडल्या. पण **उदेसिंगास** कांहीं हें मानवेना. त्यानें दंड थोपटून **अकबराशीं** सामना केला; मात्र लढाईत त्याचा पराजय झाला. अशा प्रकारें **अकबरानें** रजपुतांना स्वाधीन करून घेतलें. **काश्मीर, बंगाल, ओडीसा** हे प्रांतही त्याच्या कबज्यांत आले; दक्षिणेंत **अहमदनगर**ची **निजाम**शाही नरम पडली.

पूर्वींच्या कारकीर्दींत **जिजिया** म्हणून एक कर फक्त हिंदु लोकांवर असे, तो **अकबरानें** बंद केला. सती जाण्याची चाल बंद करण्यासाठीं **अकबरानें** बरीच खटपट केली व लढाईतून धरून आणलेल्या कैदी लोकांस गुलामांप्रमाणें वागविण्याची चाल बंद पाडली. **राजा, तोडरमल्ल** म्हणून वसुलाच्या कामांत नांवाजलेला सरदार होता, त्या-

च्याकडे जमीनवसुलाचें काम सोंपविलें होतें. जमीनधारा माफक बसवून वसुलाची उत्तम शिस्त या **तोडरमल्लनें** लावून दिली.

**ऐनअकबरी** नांवाचा ग्रंथ **अबुल फजल**नामक विद्वानाकडून तयार करविला, त्यांत **अकबरानें** चालू केलेल्या कायद्यांची नोंद आहे.

एकंदरींत **अकबराची** कारकीर्द हिंदु व मुसलमान या उभय प्रजेला मोठी सुखावह झाली. हिंदु लोकांस त्यांच्या योग्यतेप्रमाणें मोठमोठाले तो अधिकार देई. धर्माबाबद याच्या कारकीर्दींत कोणाचाही छळ झाला नाहीं. कोणत्या धर्मात काय आहे हें ऐकून घेण्याची **अकबरास** पराकाष्ठेची हौस असे. हिंदु शास्त्री, पुराणीक, मुसलमान काजी, ख्रिस्ती पाद्री वगैरे मंडळीस तो आपणापुढें आणवून तुमच्या धर्मातल्या उत्तम उत्तम गोष्टी सांगा, असें ह्मणत असे. शिवाय **अकबर** शूरही तसाच. त्याचा अपजय असा कोणत्याच लढाईत झाला नाहीं, जिकडेतिकडे फत्ते! तो मर्द शिपायी होता आणि तितकाच धोरणी राजकार्यधुरंधरही पण होता. तो दुखण्यानें मेला. याच्याच कारकीर्दींत **कबीरपंथ** निघाला, अनेक संस्कृत ग्रंथांचीं भाषांतरें याच **अकबर** बादशहानें फार्शींत करविलीं.

इ० स० १६०५, अकबराचा मृत्यु.

**४७ सेलीम**—(१६०५–१६२७) हा **अकबराचा** मुलगा आपल्या बापाच्या पश्चात् **जहांगीर** या नांवानें तखतावर बसला. जहांगीर याचा अर्थ जग जिंकणारा. हा बादशहा मोठा दारूबाज असे. त्याचप्रमाणें निर्दयता आणि मनाचा कठोरपणा हे गुण याच्या अंगीं पूर्णपणें होते. तथापि न्यायाच्या कामीं त्याची दक्षता पराकाष्ठेची असे. कोणींही आणि केव्हांही फिर्याद आणिली तरी तो स्वतः ऐकत असे. आपल्या बसण्याच्या ठिकाणीं एक घंटा टांगून तिची दोरी बाहेर देवडीवर सोडिली होती. ती दोरी कोणीं हालवितांच घंटा वाजूं लागे. मग **जहांगीर** बादशहा त्या वाजविणाऱ्यास बोलावून सर्व हकीकत स्वतः ऐके. इतका तो न्याय देण्याच्या कामीं दक्ष होता.

**खुस्त्रु** हा **जहांगीर**चा मुलगा. **अकबरा**ची याजवर फार प्रीति होती. पण ख्रिस्ती धर्माकडे याची प्रवृत्ति बरीच असल्यामुळें **जहांगीर**च्या मनांतून तो बराच उतरला होता. हा आपल्या बापाशीं बरीच स्पर्धा मांडी. एके प्रसंगीं तर खुद्द **जहांगीर** बादशहानें आपल्या या मुलावर स्वारी करून **खुस्त्रु** आणि त्याचे साथीदार यांस पकडून कैद केलें. आपल्या आश्रित मित्रांपैकीं सातशेंजणांचे हाल हाल करून **जहांगिरानें** प्राण घेतलेले **खुस्त्रूस** पाहण्याचा प्रसंग आला. निमूटपणें या सर्व यातना सोसून मरेतोंपर्यंत **खुस्त्रु** तुरुंगांत अडकून पडला होता.

इ० स० १६२१, खुस्त्रु तुरुंगांत मेला.

**नूरजहान**—ही **जहांगीर**ची पट्टराणी. नूरजहान या शब्दाचा अर्थ 'जगाचा उजेड' असा होतो. ही फार गरीब कुळांत जन्मली होती. तरी हिच्या लावण्यानें हें महत्पद तिला प्राप्त झालें. पालनपोषण करण्याचें सामर्थ्य नव्हतें ह्मणून इच्या आईबापांनीं एका रस्त्यावर अगदीं लहानपणीं तिला सोडून दिलें. तेव्हां ही पोर मरावयाचीच. पण ती एका व्यापाऱ्याच्या दृष्टीस पडली. त्यानें इला संभाळिलें. त्या व्यापाऱ्याचें जाणें येणें राजवाड्यांत फार असे. तेव्हां **अकबर** बादशाहा गादीवर होता. **जहांगीर**चें व तिचें सख्य लहानपणापासूनच जडलें. उभयतांचा विवाहही झाला असता. पण ही हलक्या कुळांतली सून **अकबरास** आवडली नाहीं, म्हणून त्यानें **शीरखान** नामक एका अफगाण सरदाराशीं आपल्या देखत इचें लग्न लावून दिलें आणि त्या सरदारास दूर बंगाल्याकडील कामगिरीवर पाठविलें. अशा तऱ्हेनें या उभयतांची तुटातूट **अकबरानें** केली खरी तरी पुढें **जहांगीर** गादीवर येतांच त्याचें लक्ष्य अगोदर **नूरजहान**कडे गेलें. **नूरजहानेस** सोडचिठ्ठी देण्याविषयीं **जहांगिरानें** **शीरखानास** निरोप पाठविला. तो कांहीं **शीरखानानें** ऐकिला नाहीं. तेव्हां **शीरखानास**च ठार करण्याचा **जहांगीर**नें निश्चय केला आणि तो साधलाही. त्यानें लगेच **नूरजहान** इजला आपल्या वाड्यांत आणिलें. आपल्या नवऱ्याचा **जहांगीर** यानें खून केला हें ती पक्केपणीं जाणत

होती. तरी पुढें ती लौकरच **जहांगीर**ची पट्टराणी झाली. सर्व सत्ता तिच्या हातीं गेली. आपल्या जवळच्या आप्तइष्टांस तिनें मोठमोठे अधिकार दिले. राज्यकारभारांत तिच्याखेरीज पानसुद्धां हालत नसे. प्रथम प्रथम तिचा कोणीं मत्सर केला नाहीं. पण तिच्या मनांत गादीची सर्व सत्ता बादशहाच्या मुलांकडे न जातां आपल्या सोयऱ्यांकडेच रहावी अशी इच्छा उत्पन्न झाली. यामुळें पुढें अनेक बंडें उद्भवून कैक घोंटाळे माजले. **नूरजहान** हीस "नूरमहाल" असेंही ह्मणत.

**शहाजहान**—हा **जहांगीर**चा तिसरा मुलगा. दक्षिणेंत **अकबरा**नें अहमदनगरकरांचें राज्य बुडविलें होतें; तरी **मलिकंबर** नांवाच्या एका निझामशाहींतील सरदारानें हल्लीं ज्यास **औरंगाबाद** ह्मणतात त्या ठिकाणीं दुसरें एक स्वतंत्र राज्य स्थापिलें होतें. **मलिकंबरा**स **गोवळकोंडेकर** व **विजापुरकर** जाऊन सामील झाले. त्यांचें पारिपत्य करण्यासाठीं **शहाजहान** दक्षिणेंत निघाला. **मलिकंबर**चा पराभव करून पुष्कळ खंडणी **शहाजहाना**नें घेतली. इतक्यांत **जहांगीर** बादशहा आजारी पडला. तेव्हां तिकडे लक्ष्य फारसें न देतां, पुढें कदाचित् बादशहा वारला तर गादीवर कोणास बसवायाचें तीं खलबतें राजवाड्याभर चालू झालीं असतील म्हणून तो दिल्लीस चालता झाला. **शहाजहाना**स गादी मिळाली असतां आपलें वजन मुळींच राहणार नाहीं ही **नूरजहा**नला धास्ती पडली. **शहारियार** ह्मणून **जहांगीर**चा सर्वांत धाकटा मुलगा होता त्याला गादी मिळावी ही इच्छा **नूरजहान** राणीची होती; कारण तिच्या पहिल्या नवऱ्यापासून झालेल्या मुलीशीं याचें लग्न लागलें होतें. ह्मणजे तिचा तो जांवईच होता. तिच्या भाचीशीं **शहाजहाना**नें लग्न लाविलें होतें ह्मणून पूर्वीं **शहाजहाना**वर सुद्धां **नूरजहान** राणीची प्रीति असे; पण आतां प्रत्यक्ष मुलीशीं लग्न लावणारा **शाहारियार** पाहतांच तिची **शहाजहाना**वरली भक्ति कमी झाली. **शहाजहाना**ला तख्त मिळूं द्यावयाचें नाहीं, असा तिनें निर्धार केला. तेव्हां तो आग्रा येथें पळून गेला.

आग्र्यास जाऊन बापाचा खजीना लुटावा हा **शहाजहानाचा** बेत. **जहांगीरला** हें मुलाचें करणें पाहून फार राग आला. त्याचें पारिपत्य करण्यासाठीं मोठें लष्कर घेऊन तो निघाला. उभयतां बापालेकांची गांठ दिल्लीनजीक पडली. **शहाजहानाचा** पूर्ण पराभव झाला ह्मणून तो दक्षिणेकडे गेला.

**मोहबतखान** ह्मणून एक मोठा शूर अफगाण सरदार असे. आपल्या मनाप्रमाणें सर्व गोष्टी घडवून आणण्यासाठीं कोणा तरी महाशूर सरदाराचें सहाय्य पाहिजे ह्मणून मुद्दाम त्याला **नूरजहाननें** आणविलें होतें. प्रथम प्रथम तो तिच्याच मनाप्रमाणें वागे, पण पुढें उभयतांत बेबनाव झाला. **नूरजहान** राणी आपला घात करणार असें कळतांच **मोहबतखानानें** बंड उभारिलें. त्यानें **जहांगीर** आणि **नूरजहान** राणी या उभयतांस पकडून कैद केलें; नंतर **मोहबतखान शहाजहानास** जाऊन मिळाला.

इ. स. १६२७
जहांगीर मेला.

आपल्या नवऱ्याची सुटका करण्यासाठीं **नूरजहान** खटपट करीत होती, पण सिद्धीस गेली नाहीं. पुढें एकाच वर्षानें **जहांगीर** बादशहाही वारला.

**सर टामस रो** नामक इंग्रज वकील **जहांगीर** बादशहाच्या दरबारीं इंग्लंडच्या **जेम्स** राजाकडून आला होता.

**४८ शहाजहान**—( १६२७—१६५८ ) बाप मेल्याचें वर्तमान ऐकतांच **शहाजहान** आग्र्यास गेला. तेथें सर्वांनीं त्याला बादशहा कबूल केलें. त्यानें **नूरजहान** इजला दरमहा वेतन देऊन राज्यकारभारांत बिलकूल ढवळाढवळ न करितां स्वस्थ राहवें असें ठरविलें. **मोहबतखानाचे** उपकार जाणून त्याला महत्पदास चढविण्यांत **शहाजहानानें** आपली कृतज्ञता बरीच व्यक्त केली. पण आपला भाऊ **शाहारियार** वगैरे तमाम वारस मंडळी त्यानें लंबी केली! अतितृष्णा मनुष्यपणास काळिमा लाविते ती ही!

**खानजहान लोदी** यानें बंड उभारिलें; पण **शहाजहानानें**

इ. स. १६३७ सांत अहमदनगरचें राज्य बुडालें.

बुंदेलखंडांत त्याला पकडून ठार केलें. अहमदनगरकरांचेंही यांत अंग होतें ह्मणून तें राज्यही पुढें अजी बुडविलें.

**पोर्तुगीज लोकांची कत्तल**—**अकबराच्या** कारकीर्दींत या लोकांस हुगळीनदीवर दुकानें घालून राहण्याची परवानगी मिळाली होती. **शहाजहानानें** आपल्या बापाविरुद्ध बंड केलें तेव्हां आपणांस साहाय्य करावें असें बोलणें त्या लोकांशीं चालविलें होतें तें यांनीं मान्य केलें नाहीं, त्याचा सूड घ्यावा असें आतां **शहाजहानानें** मनांत आणिलें. इतक्यांत आपल्या वखारींत दारूगोळा हे जमवीत आहेत असें वर्तमान **शहाजहानास** लागलें, तेव्हां लगेच त्यांची चीजवस्त लुबाडून जप्त करावी आणि त्यांसही कैद करावें असा हुकूम **शहाजहानानें** दिला. कैद केलेल्या लोकांस मुसलमान होत असाल तर जीवदान देतों असें सांगितलें, पण तें त्यांनीं मान्य केलें नाहीं. सर्वांची कत्तल उडविली; बायकांस मात्र जिवंत ठेविलें.

**शहाजहानाचीं मुलें**—याला एकंदर चौघे मुलगे, त्या सर्वांना यानें मोठमोठे अधिकार दिले होते. हे चौघे चार तऱ्हेचे. धर्ममतेंही चौघांचीं भिन्नभिन्न. **दारा, सुजा, मुराद** आणि **औरंगजेब** हीं त्यांचीं नांवें. **सुजा** बंगाल्याचा सुभेदार होता. **औरंगजेब** दक्षिणेचा आणि **मुराद** गुजराथचा. प्रथमतः बंड **मुरादानें** उभारिलें. त्याला साहाय्य द्यावें आणि नंतर आपला कार्यभाग उरकून घ्यावा असें **औरंगजेबानें** मनांत आणिलें. **दारा**सारख्या किंवा **सुजा**सारख्या नास्तिक भावाला तख्त मिळावें हें बरें नव्हे, आपणाला तर काय कसलीच इच्छा नाहीं, गादीवर चांगला धार्मिक बादशहा असावा ह्मणजे झालें, आपण मक्केस जाऊन स्वस्थ बसणार वगैरे मजकुराचें **औरंगजेबानें** आपल्या भावास पत्र लिहिलें. तें त्याला खरें वाटलें. उभयतांचीं सैन्यें एकत्र झालीं. **दाराच्या** सैन्याची गांठ आग्र्यानजीक पडली. **दारा** ठार झाला. नंतर बापाला त्यांनीं कैद केलें. **औरंगजेबानें मुरादाला** तख्तनिशीन करण्याचा आव घालून सर्व तयारी जारीनें चालविली. इतक्यांत दारू पिऊन **मुराद**

बेहोश झाला आणि यामुळें त्याला कैदेंत टाकिलें, असा बोभाटा झाला. तेव्हां **औरंगजेबानें** स्वतः तख्तारूढ व्हावें, असें ठरलें.

**शहाजहानाचा मृत्यु**—सात वर्षें कैदेंत काढिल्यानंतर हा दुर्दैवी बादशहा मरण पावला! एका मुलानें तिघे भाऊ मारिले आणि स्वतःस कैद केलें हें पाहून बिचाऱ्याच्या मनाची काय स्थिति झाली असेल!

इ० स० १६६६, शहाजहान मेला.

**ताजमहाल** वगैरे इमारती साऱ्या दुनयेस थक्क करून सोडणाऱ्या अशा या बादशहानें बांधविल्या. याचें वैभव पराकाष्ठेचें होतें. ज्या मयूरासनावर तो बसे तें फारच मौल्यवान् होतें.

**४९ औरंगजेब**—( इ० स० १६५८–१७०७ ) बापाला कैद करून सर्व अधिकार यानें आपणाकडे घेतला खरा, तरी त्याला थोडीशी भीति होतीच, कारण **दारा** आणि **सुजा** हे जीवंत असतपर्यंत त्यांनीं लष्कर जमवून **औरंगजेबाशीं** सामना देण्याचे इलाज चालविले होते. बंगाल्याकडून **सुजा** आला. **औरंगजेबाची** व त्याची गांठ **अलाहाबाद** येथें पडली. **औरंगजेबास** फत्ते मिळाली. **सुजा** पळून गेला आणि उपासमार करीत अखेर **अराकान** येथें मेला. पुढें **औरंगजेबाची** दृष्टि बंधु **दारा** याजकडे वळली. त्याचा पाठलाग केला व कैद करून त्याला नास्तिक या आरोपावरून शिरच्छेदाची शिक्षा दिली. नंतरही गांवांतून धिंड काढिली. राज्यलोभापुढें बापाची किंवा भावाची आठवण बिलकूल राहत नाहीं!

इ० स० १६५८–१७०७.

सारा दक्षिण देश उद्ध्वस्त करून त्याजवर आपली सत्ता बसवावी, हा **औरंगजेबाचा** पहिल्यापासूनचा आणि मनःपूर्वक संकल्प होता. दक्षिणेंत मराठी राज्याची भली जंगी इमारत उठविणारा आह्मां लोकांस परम पूज्य असा **श्रीछत्रपति शिवाजी** हळू हळू प्रबळ होत चालला होता. **गोवळकोंडा** व **विजापुर** हीं मुसलमानी राज्यें **औरंगजेबाच्या** डोळ्यांत फार सलत. तेव्हां दक्षिणेकडे त्याला बराच कार्यभागकर्तव्य असे.

**गुजराथ प्रांतांतल्या स्वाऱ्या**—आपल्या मुसलमीना धर्माखेरीज कोणताच अन्य धर्म या देशांत राहूं नये, ही **औरंगजेबा**ची क्रूर इच्छा असे. त्यामुळें रजपूत लोकांचा बिमोड करावा ह्मणून तो फार झटे. उदेपूरचा राणा **औरंगजेबा**ला पुरून उरण्यासारखा होता. त्याच्याशीं **औरंगजेबा**नें पुष्कळ बोलणीं चालविलीं. पण अखेर नाइलाजास्तव **औरंगजेब** परत दक्षिणेकडे गेला. तेथें बिचाऱ्याची फारच फजिती झाली.

**दक्षिणेंत औरंगजेबाची फजिती**—**औरंगजेब** आपलें अवाढव्य व अफाट सैन्य घेऊन दक्षिणेंत आला. मराठ्यांचा त्या वेळीं सुळसुळाट माजलेला होता. एकदम सर्व सैन्य रवाना करावें तर मराठे कोणीकडल्या कोणीकडे नाहींतसे होत. लहानसान टोळ्या पाठवाव्या तर त्यांचा बिमोड मराठे केव्हांच करीत. तेव्हां काय करावें हें औरंगजेबास कळेनासें झालें. सैन्य तळ देऊन राहील ह्मटलें तर, मारामाऱ्या, लुटालुटी मराठ्यांनीं कराव्या असा प्रकार चाले. त्यामुळें बिचारा **औरंगजेब** जेरीस आला. मराठ्यांच्या इतिहासाबद्दल निराळेंच प्रकरण आहे. त्यामुळें त्याचा येथें ज्यास्त उल्लेख करणें नकोच.

**औरंगजेबाचा धर्माभिमान**—हा कडवा मुसलमान होता. एका हातांत कुराण आणि एका हातांत समशेर, असा याचा क्रम असे. त्यामुळें त्याला सदा दगदगींत दिवस काढावे लागले. रजपूत राजे बिथरले. हिंदु लोकांवर यानें **जिजिया**नामक कर बसविला. तो कर वसूल करतेवेळीं मुसलमान सुभेदारांपुढें, आपण पूर्णपणें दीन झालों हें कबूल करण्यासाठीं, आ करून हिंदूंस उभें राहवें लागे आणि नंतर मुसलमान सुभेदारानें वाटेल त्याच्या तोंडांत थुंकावें; असा प्रघात होता म्हणतात! हिंदु लोकांस राज्यकारभारांतून हाकून लाविलें. यामुळें सारी हिंदुप्रजा नाखुश झाली. केव्हां प्रसंग साधेल आणि केव्हां बंड करूं, असे सदा सर्व टपलेले. दांडग्या सैन्याच्या जोरावर तो बंडखोरांची खोड कांहीं वेळ मोडी, पण लगेच त्याचा वचपा ते काढीत. दक्षिणेंत **मराठे** आणि उत्तरेंत **रजपूत** यांनीं **औरंगजेबास** अगदीं त्राहि त्राहि करून सोडिलें. **अकबर** म्हणून याचा एक मु-

लगा असे. या मुलानें बापाविरुद्ध बंड केलें. त्याला रजपूत लोक सामील झाले. पुढें त्या मुलाचा **औरंगजेबानें** पराभव करून त्याला इराणांत हुसकून लाविलें. नरपतिपणा अंगीं असणाऱ्या किंवा आणणाऱ्यांतील नीतिमत्तेचीं हीं उदाहरणें पाहून गरीबींतच सद्गुणसंपन्नता जास्त असते अशी बालंबाल खात्री होणें साहजिक आहे.

**औरंगजेबाचा स्वभाव**—बापाला कैद केलें आणि भावांला ठार मारिलें, यावरून त्याचें **क्रौर्य** व **पितृभक्ति** व्यक्त होते. धर्मवेड याच्या डोक्यांत फार असे; त्यामुळें हिंदुप्रजेला आवडण्यासारखा त्याचा स्वभाव नव्हता, हें तर उघडच आहे. **औरंगजेब** हा कपटी, संशयखोर आणि महादुरभिमानी असा होता. कावेबाजही तसाच खरा. तरी आपलें काम साधून घेण्याखातर दुसरीं धोरणें संभाळण्याचें शहाणपण त्याला नव्हतें. **अकबरही** कावेबाज, पण त्याचें शहाणपण असामान्य होतें. शरणागतांचा देखील सूड मोठ्या सख्त रीतीनें **औरंगजेब** घेई. आपलें काम साधण्यासाठीं शत्रूला मित्र करण्याची **अकबराची** खुबी व धोरण **औरंगजेबांत** नसे. विश्वास असा कोणावरच त्यानें टाकिला नाहीं; ह्मणून रात्रंदिवस काळजींत, भीतींत व विचारांत **औरंगजेबाचें** आयुष्य गेलें. सारांश आपल्या वर्तनानें जिकडे तिकडे यानें वैर संपादिलें. अखेरीस त्याचा परिणाम मोंगलाईचा लय, हा झाला. डामडौलाचा तिटकारा ह्याला फार होता. राज्यवैभव अपरंपार असे, तरी ह्मणतात **औरंगजेब** आपला उदरनिर्वाह स्वतःच्या कमाईवर करी. कुराणें लिहून तीं विकावीं आणि त्यांतून आपलें पोट भरावें, असा त्याचा क्रम असे. आपण महान् नीतिमान् न्यायी आणि परम धार्मिक, असें तो समजे!

**औरंगजेबाचा मृत्यु—मराठे** म्हणजे यःकश्चित्. त्यांनीं आपल्या डोळ्यांदेखत चार दिवस धामधूम माजविली आणि आपण तह करण्यास कबूल झालों, चौथाई सरदेशमुखी घ्या, असें म्हटलें तरी मगरुरीनें तह करीत नाहीं असें सांगून पाठवितात, ह्मणून **औरंगजेबाला** एका बाजूनें फार संताप आला. त्याला मोठा अपमान

इ० स० १७०७.

झाला असें वाटलें. इकडे आपण आपल्या बापाची जी वाट लाविली तीच आपलीं मुलें आपली लावितात कीं काय असें त्याला वारंवार वाटूं लागलें. अशा तऱ्हेच्या फजितींत व काळजींत असतां तो अहमदनगर येथें मरण पावला.

## चौथ्या प्रकरणावर प्रश्न.

४४ बाबर हा कोण ? कोठला राहणारा ? त्याला राज्य कसें मिळालें ? शिक्रीची लढाई कां, कधीं आणि कोणांकोणांमध्यें झाली ? बाबराचा स्वभाव कसा होता ? बाबर कशानें व कधीं मेला ? दिल्लींत तख्तावर एकंदर किती बादशहा बसले ? त्यांचीं नांवें सांगा ?

४५ हुमायुनानें कोणता प्रांत आधीं काबीज केला ? बहादुरशहा कोण ? शीरशहा कोण ? त्यानें काय केलें ? शीरशहा आणि हुमायून यांच्यांत कोणकोणत्या व कधीं कधीं लढाया झाल्या व त्यांचा शेवट कसा झाला ? हुमायून कोणीकडे व कशाकरितां गेला ? अकबर कधीं व कोठें जन्मला ? शीरशहानें किती वर्षें राज्य केलें ? त्याची कारकीर्द कोणत्या प्रकारची होती ? शीरशहा कशानें व कधीं मेला ? त्याच्या पश्चात् गादीवर कोण बसले ? हिमू हा कोण ? सरदार लोकांनीं कां बंड केलें ? त्याचा अखेर परिणाम काय झाला ? हुमायुनानें आपली गादी परत मिळविली ती किती वर्षें भोगिली ? हुमायून कधीं व कशानें मेला ?

४६ हुमायून मेल्यावर प्रथमतः त्याची गादी कोणीं बळकाविली ? बहिरामखान कोण ? हिमूचें पुढें काय झालें ? रजपुतांशीं त्यानें सल्ला कसा केला ? जिजिया ह्मणजे काय ? ऐनअकबरींत काय आहे ? अकबराचीं धर्ममतें कशीं होतीं ? तोडरमल्ल कोण ? तो कशाविषयीं प्रसिद्ध आहे ? अकबर कधीं व कशानें मेला ? त्याच्या कारकीर्दींत कोणता पंथ निघाला ?

४७ सेलिमचें दुसरें नांव कोणतें ? त्याचा अर्थ काय ? त्याचा स्वभाव कसा होता ? खुस्रु हा कोण ? त्याचें व सेलिमाचें कां पटेना ? खुस्रूचा अखेर परिणाम काय झाला ? तो कोठें आणि कधीं मेला ?

नूरजहान कोण? तिचें लग्न प्रथम कोणाशीं लागलें? जहांगिराची ती राणी कशी झाली? तिची सत्ता किती असे? तिच्या मनांत काय आलें? बंडें कां उद्भवूं लागलीं? शहाजहान कोण? तो दक्षिणेंत कां गेला होता? मलिकंबर कोण? दिल्लीकडे शहाजहान कां फिरत आला? नूरजहानच्या मनांत कोणास गादी मिळावी असें होतें? आणि कां? शहाजहान आग्र्यास कां गेला? जहांगीरनें मग काय केलें? मोहबतखान कोण? त्यानें पुढें काय केलें? जहांगीर कधीं मेला? सर टामस रो कोण? कोठून आला होता?

४८ शहाजहान कोठपासून कोठपर्यंत गादीवर होता? आपल्या भावांचें त्यानें काय केलें? खानजहान लोदीचें काय झालें? पोर्तुगीज लोकांची कत्तल उडविण्याचें कारण काय? शहाजहानाच्या मुलांचीं नांवें काय आणि त्यांचा स्वभाव कसा होता? त्यांनीं काय काय केलें? त्याच्या मुलांस कोणकोणते अधिकार दिले होते? शहाजहानास कोणीं कैद केलें? किती वर्षें?

४९ औरंगजेबाची कारकीर्द किती वर्षें होती? त्यानें राज्य कसें मिळविलें? दक्षिणेंत कोणीं गडबड मांडिली होती? दक्षिणेंत औरंगजेबाची फजीती कां व कशी झाली? जिजिया ह्मणजे काय? तो कसा वसूल करीत? औरंगजेबाच्या बिथरलेल्या मुलाचें नांव काय? त्याला इराणांत कां लाविलें? आपल्या भावांची औरंगजेबानें कशी व्यवस्था लाविली? त्याच्या व अकबराच्या स्वभावाची तुलना करा. औरंगजेब कधीं, कोठें व कशानें मेला? तो आपला उदरनिर्वाह कसा करीत असे? त्याचा मुख्य हेतु काय होता?

---

# भाग २ रा.

## प्रकरण ६ वें.

## मोंगलबादशाहीस उतरती कळा लागते.

१ मोअझीम ऊर्फ **बहादूरशहा** गादी मिळवितो. रजपूत लो-

कांशीं तंटे; शीख लोकांची माहिती; बंदा गुरूची हकीकत; झुलफिकारखान. बहादूरशहाचा मृत्यु. २ **जहांदरशहा** झुलफिकारच्या साहाय्यानें गादी मिळवितो; बहारची आणि अलहाबादची सुभेदारी मिळालेल्या दोन बंधूंच्या साहाय्यानें फिरुकसियरला गादी मिळते. ३ **फिरुकसियर**; सय्यदबंधूंचें प्राबल्य. रफिउद्दरजात व रफिउद्दवला यांस गादी मिळते; महंमदशहा. ४ **नादिरशहा**ची स्वारी.

**५०. बहादूरशहा.** ( १७०७–१७१२ ) **औरंगजेबा**नंतर त्याच्या मुलांमध्यें गादीबद्दल तंटे लागले. अखेर **मोअझीम** यानें आपल्या दोघां भावांस लढाईंत ठार करून गादी मिळविली. तो आपणास **बहादूरशहा** ह्मणवी.

रजपूत लोकांनीं **जिजिया** नामक कर देण्याचें नाकारिलें, ह्मणून त्यांजवर स्वारी करून जाण्याचा बेत **बहादूरशहा**नें केला. पण दुसरीकडे **शीख** लोकांनीं बरीच धुमाकूळ मांडिली ह्मणून रजपुतांचा नाद सोडणें त्याला भाग पडलें.

**शीख लोकांचा थोडासा वृत्तांतः**—शिष्य शब्दाचा अपभ्रंश **शीख** आहे. **नानकशहा** म्हणून कोणी संत पंधराव्या शतकाच्या शेवटीं होऊन गेला. हिंदु व मुसलमानी या दोन धर्मांचें संमेलन करून त्यानें एक नवा पंथ काढिला होता. या पंथाचे एकामागून एक असे बरेच गुरु होऊन गेले. त्यांपैकीं **गुरु गोविंद** हा दहावा. हे लोक पहिल्यानें फारसा दंगाधोपा न करितां स्वस्थ बसले होते. त्यांच्यावर **औरंगजेबा**नंतर फारच जुलूम झाला तो त्यांच्यानें सहन करवेना. त्यांनीं उघड बंड उभारिलें आणि मोंगल बादशहांनीं आपल्या क्रौर्याची शिकस्त करून अनेक राक्षसी कृत्यें केलीं. **बंदा** ह्मणून एक या शिखांचा गुरु होता, त्याची त्यांनीं शहरांतून धिंड काढिली. **बंदा** याच्या समक्ष त्याच्या मुलाचें काळीज चिरून तें मांस त्या नरपशूंनीं त्याच्या तोंडांत घातलें ! एवढ्यावरच हे राक्षस स्वस्थ राहिले नाहींत. तापलेल्या सांडसानें त्या बिचाऱ्या निरपराधी **बंदा** गुरूच्या शरीराचे लचके लचके काढून त्यांनीं त्याचा प्राण घेतला! यामुळें **शीख** लोक फार चवताळले. त्यांनीं पुढें लौक-

रच लश्करी पेशा पत्करिला आणि या मुसलमानांचीं हाडेंन् हाडें खुळखुळीं करून सोडलीं.

**बंदा** गुरूचा प्राण घेतल्यानंतर **बहादूरशहानें** एकंदर **शीख** लोकांची कत्तल उडवून दिली. तेथून तीस एक वर्षे कोणीकडल्या कोणीकडे ते लपून बसले. पण एकाएकीं पुढें चवताळून आले.

सदोदित आपल्या शरीरावर कोणत्या तरी रूपानें पोलाद बाळगावें, भगवा पोषाख वापरावा; केस मस्तकावर वाढवून जटाभार ठेवावा; एक देव, दुसरा कोणी नाहीं असें मानावें; आणि सद्गुरूच्या नांवें सदा जप करावा; इत्यादि शीख धर्माचीं तत्वें आहेत.

**झुलफिकारखान. बहादूरशहास** गादी मिळण्याला कारण हा झुलफिकारखान. त्याचें बरेंच प्रस्थ दरबारांत असे. यानें पुढें बऱ्याच उलाढाली केल्या. त्याची हकीकत पुढें येईलच.

पांच वर्षे कारभार करून **बहादूरशहा** वारला.

**५१. जहांदरशहा** ( १७१२–१७१३ ) **बहादूरशहा**नंतर झुलफिकारच्या साहाय्यानें हा **जहांदरशहा** गादीवर बसला. **झुलफिकार** हा वजीर असे. दोघांनीं मिळून **बहादूरशहाचे** एकंदर नातेवाईक ठार केले. कारण आपणांस कोणी दायाद नसावा. त्यांतून **फिरुकसियर** हा तेवढा बचावला. **बहादूरशहा**चा हा नातू. **सय्यद हुसेन अल्ली बहार**चा सुभेदार आणि त्याचा भाऊ **सय्यद अबदुला अलाहाबाद**चा सुभेदार या दोघांकडे **फिरुकसियर**नें आपणास गादीवर बसविण्याबद्दल साहाय्य मागितलें. त्यांच्या साहाय्यानें **जहांदरशहा**वर तो चालून गेला. उभय सैन्यांची आग्र्याजवळ गांठ पडली. लढाईत **फिरुकसियर**ला जय मिळाला. **जहांदरशहा** आणि त्याचा वजीर **झुलफिकारखान** हे याच लढाईत ठार झाले.

**५२. फिरुकसियर** ( १७१३–१७१९ ). यानें सहा वर्षे राज्य केलें. उभयतां **सय्यद** बंधूंस आपली सत्ता कमी होते असें वाटूं लागलें, म्हणून एके दिवशीं त्यांनीं बादशहास गांठून ठार केलें. **फि-**

**फरुकसियर**च्या मरणानंतर हे सय्यद बंधुच काय ते दिल्लीदरबारांतले प्रमुख. त्यांच्या मनास वाटे त्यांस ते बादशहा करीत. **रफिउद्दरजात** आणि **रफिउद्दवला** अशीं दोन मुलें सहा महिन्यांत बादशाही तखतावर एकामागून एक बसविलीं. नंतर तिसरा **महंमदशहा** ह्मणून एक बादशहा त्यांनीं तखतावर बसविला.

**५३. महंमदशहा** ( १७१९–१७४८ ). याच्या कारकीर्दींत मराठ्यांनीं आपले पाय हिंदुस्थानांत पसरले. **नादिरशहा**ची स्वारी झाली.

**नादिरशहाची स्वारी. नादिरशहा** हा इराणचा बादशहा. याचा अफगाणांशीं सामना कांहीं वर्षें चालला होता, त्यांत पराभव पावलेले बरेच अफगाण शिपाई दिल्लीस पळून आले. त्यांस आपल्या स्वाधीन करावें ह्मणून दिल्लीस **नादिरशहानें** पत्र लिहिलें व एल पाठविला. पण त्याचा कांहीं उपयोग झाला नाहीं. तेव्हां आणखी एकदा एका वकिलास समक्ष चार गोष्टी सांगण्यासाठीं **नादिरशहानें** दिल्लीकडे रवाना केलें. पण त्याला वाटेंतच अफगाण लोकांनीं ठार मारल्यामुळें **नादिरशहा** फार संतापला. **दिल्ली**ची बेबंद स्थिति त्याला ठाऊक होती. साधल्यास चांगली लूट मिळेल या आशेनें **नादिरशहा** दांडगें सैन्य घेऊन या देशावर चाल करून आला. त्याला वाटेंत कोणी फारसें अडविलें नाहीं. **लाहोर**च्या सुभेदारानें सामना देण्याचा आव घातला पण तो फुकट गेला.

कर्नाळची लढाई, इ० स० १७३९.

**नादिरशहा**ची आणि **दिल्लीपती**ची गांठ **कर्नाळा**जवळ पडली. त्यांत **महंमदशहा**चा पूर्ण पराभव झाला. लूट मिळविण्याची आशा **नादिरशहा**स मोठी होती, ह्मणून तो थेट दिल्लीकडे गेला. राजवाड्यांतच त्यानें आपला तळ दिला. प्रथमतः लुटालूट वगैरे न करितां सुखासमाधानानें खंडणी घ्यावी आणि नंतर आपल्या देशीं जावें ही नादिरशहाची इच्छा होती. पण इतक्यांत दिल्लीशहरामध्यें, **नादिरशहा** मेला अशी खोटीच अफवा कोणीं उठविली. त्यामुळें **नादिरशहा**च्या बेसावध इराणी

शिपायांवर दिल्लीचे लोक तुटून पडले आणि पुष्कळांची त्यांनीं कत्तल सुद्धां केली. यामुळें **नादिरशहा**ला फार संताप आला. तथापि आपल्या लोकांनीं याचा सूड घेण्यासाठीं शहराची नासाडी करूं नये ह्मणून बंदोबस्त करावा या हेतूनें **नादिरशहा** घोड्यावर बसून **दिल्ली** शहरांतून चालला असतां त्याजवर गोळी, तीर, दगड वगैरे एका घरांतून आले. त्याबरोबर **नादिरशहा** फारच संतापला. त्यानें बंदोबस्त करण्याचें काम एकीकडेच ठेविलें आणि दिल्ली शहराची कत्तल उडवा अशी आज्ञा आपल्या लोकांस दिली. मग जो भेटेल त्याला ठार मारावें, मिळेल ती संपत्ति घ्यावी असा कहर चालू झाला. **तीस हजार** लोकांचीं **प्रेतें** दिल्ली शहरांतल्या रस्त्यांत पडलीं होतीं ह्मणतात! पण पुढें लौकरच **नादिरशहा**चा राग शांत झाला. त्यानें कत्तल व लूट बंद ठेवण्यास शिपायांला सांगितलें. **महंमद** बादशहाला हा आकांत बघवेना. तो **नादिरशहा**स शरण गेला. तेव्हां **नादिरशहा**चा आणि बादशहाचा स्नेह जुळला. **नादिरशहानें** दिल्लीकरांशीं सोइरीक केली. **दिल्ली**च्या तखतावर मोठ्या समारंभानें पुनः **महंमदशहा**स बसविलें आणि नंतर **नादिरशहा** आपल्या देशीं जाण्यास निघाला. बरोबर **आठ कोटींची** लूट **नादिरशहा**नें नेली ह्मणतात.

याउपर हें दिल्लीतख्त परंपरेनें मराठ्यांच्या स्वाधीन झालें. तेव्हां बाकीचा इतिहास तिसऱ्या भागांत येईल.

या **महंमदशहा**चा एक वजीर **चिनकिलीचखान** यानें दक्षिणेंत एका राज्याची स्थापना केली. या वजिरास **निजामउल्मुलुख** असें ह्मणतात.

## सहाव्या प्रकरणावर प्रश्न.

**५०.** मोअझीम आपणास काय ह्मणवी? रजपूत लोकांशीं तंटे कां लागले? पुढें काय झालें? "शीख" शब्दाचा अर्थ काय? गुरु गोविंद कोण? बंदा गुरूची हकीकत सांगा. शीख धर्माचीं मुख्य तत्वें काय? मुसलमान व शीख यांच्या द्वेषाचा परिणाम कोठवर गेला? बहादूरशहा कधीं मेला? झुलफिकारखान कोण?

**५१.** बहादूरशहानंतर गादीवर कोण आला ? तो किती वर्षें गादीवर होता ?

**५२.** फिरुकासियर कोण ? त्याला गादी कशी मिळाली ? जहांदरशहा आणि त्याचा वजीर झुलफिकार यांची काय अवस्था झाली ?

**५३.** महंमदशहा किती वर्षें गादीवर होता ? सय्यद बंधूंचें काय झालें ? नादिरशहा कोण? त्यानें स्वारी कां केली ? त्याच्या स्वारीचें थोडेंसें वर्णन द्या ? चिनकिलीचखान कोण ?

---

# भाग ३ रा.

# मराठ्यांची हिंदुपद पादशाही.

## प्रकरण १ लें.

१. महाराष्ट्रदेश; त्याची मर्यादा; २. प्राचीन इतिहास; ३. मुसलमानी कारकीर्द; ब्राह्मणी राज्याची स्थापना; ब्राह्मणी राज्याचे तुटक विभाग आणि त्यांचा इतिहास.

**५४. द्रविड, तेलंगण, कर्नाटक** आणि **महाराष्ट्र** अशीं चार राष्ट्रें जरी फार प्राचीन काळापासून **दक्षिणेंत** प्रख्यात आहेत, तरी त्यांच्या मर्यादा अशा निश्चयात्मक ठरवितां येत नाहींत. त्यामुळें भाषेच्या विस्तारावरून देशविस्तार ठरवावा लागतो. अर्थात जेथें "मराठी" भाषा चालते तो **महाराष्ट्र देश** समजावा. प्राचीन काळीं एकदा नर्मदानदी **महाराष्ट्र देशाची** उत्तरेकडील सीमा होती. पण हल्लीं डावे बाजूस **दमणगंगा** नदीच्या वर सीमा नेतां येत नाहीं. उजवीकडेस **सातपुडा** पर्वताची ओळ ही सीमा समजावी. पूर्वेस "**वाइनगंगा**" (बाणगंगा) व "**वर्धा**" (विदर्भा) ह्या नद्या; पश्चिमेस **अरबीसमुद्र**. दक्षिण दिशेची मर्यादा "**गोमांतक**" प्रांत समजण्यास अडचण नाहीं.

**महाराष्ट्र देशाचा विस्तार** एक लक्ष दोन हजार चौरसमैलांपेक्षां जास्त असून लोकसंख्या सुमारें जवळजवळ एक कोटी आहे.

**महाराष्ट्र देशांतले स्वाभाविक विभागः**—**सह्याद्री**स लागून समुद्रतीराची पट्टी, **सदाशिवगडापासून तापीनदी**-पर्यंत **कोंकण** या नांवानें प्रख्यात आहे. "कोंकण" ही बरीच लांब गेलेली पट्टी पुष्कळ डोंगराळ आहे. **सह्याद्री**जवळील भागास **घांटमाथा** असें म्हणतात. **गंगा** ( गोदावरी ), **भीमा** आणि **नीरा** यांच्या तीरांजवळील प्रदेशांस **गंगथडी, भीमथडी, नीरथडी** असें म्हणण्याचा प्रघात आहे. **सह्याद्री**च्या दुसऱ्या बाजूच्या सपाट भागाला "**देश**" ही संज्ञा आहे. **कोल्हापुरा**पासून **जुन्नरा**पर्यंतच्या भागांत **मावळ** वगैरे प्रदेश आहेत. **खानदेश, बागलाण, वऱ्हाड, नागपूर** हेही या महाराष्ट्र देशांतले विभाग होत.

**या देशांतील लोक, धर्म, चाली, रीति, वगैरेः**—**महाराष्ट्र**देशांतील लोकांस **मराठे** म्हणतात. मराठ्यांमध्यें ब्राह्मण वगैरे अनेक जाती आहेत. सर्व जातींचे **मराठे** मोठे शूर, कडवे, धोरणी आणि शाहाणे आहेत. हे जरी शरीरानें फारसे धिप्पाड नाहींत, तरी रणभूमीवर मोठे काटक व हट्टी आहेत. शत्रूस युक्तिप्रयुक्तीनें जेरीस आणण्याचा गुण यांच्या अंगीं शालिवाहनाच्या १८ व्या शतकांत विशेष दृष्टोत्पत्तीस आला. धर्मवेड किंवा धर्माचा दुरभिमान यांस प्राय: नसतो; मुसलमानांच्या धर्माचा उच्छेद किंवा मुसलमानांचा छळ यांनीं कधीं आरंभिला नाहीं. आपल्या लोकांची, भाषेची, व देशाची चाड यांस फार. कंगालपणांतही बाणेदारपणा सोडणारे हे लोक नव्हत. हे उपजतच मोठे सोशिक, त्यामुळें दुसऱ्याच्या वाटेस फारसे जात नाहींत. पण एकदा का बिथरले ह्मणजे सामना करणाराची मस्ती जिरविल्याशिवाय रहायाचे नाहींत. कोणतीही परक्यांची चाल इष्ट व फायदेशीर दिसल्यास ती स्वीकारण्यास यांची प्राय: तयारी असते. एकंदरींत साऱ्या हिंदुस्थानदेशामध्यें या देशांतील लोकांसारखे शूर, मुत्सद्दी, मानी, कर्तबगार आणि हुशार असे लोक दुसरे कोठेंही नाहींत. हवें तितकें प्रत्यंतर त्यांच्याच इतिहासांत आढळून येईल. छप्पन्न देशचे छप्पन्न राजे या हिंदुस्थानांत होऊन गेले, पण अविंधांसारख्या कडव्या, एकोप्याच्या, नेकजात आणि रणधुरं-

धर लोकांच्या हातून सार्वभौम सत्ता हिसकावून घेऊन अपूर्व बादशाही स्थापिली मराठ्यांनींच. ही एकटी गोष्ट त्यांच्या अंगांतील अनेक गुण सहज सिद्ध करण्यास पुरे आहे.

**५५. प्राचीन इतिहासः--महाराष्ट्रदेश** हिंदुस्थानाच्या दक्षिणेस आहे. पुराणांतरीं आमच्या भूमीस **दंडकारण्य** म्हटलेलें आढळतें. **मांग, महार, कोळी ठाकुर, वारळी** या लोकांच्या वसाहती सर्वांत जुनाट होत. राव, वाणी, माळी हे शब्द अनुक्रमें सत्ताधारी, व्यापारी आणि शेतकरी या तीन जातींचे मूळचे वाचक होत. **"शालिवाहन"** नांवाचा वंश **पैठण** मुक्कामीं बावीसशें वर्षांपूर्वी राज्य करूं लागला. या वंशाचा अंमल **महाराष्ट्रदेशावर** सहाशें वर्षे चालला !

**शालिवाहन** वंशांतील एका राजानें **विक्रम** वंशांतील **हर्ष** राजाचा मोड **नर्मदे**वर केला व तेव्हांपासून आमच्या देशांत " **शालिवाहनशक** " मोजूं लागले. **शालिवाहनी** वंशांतील राजे जसे शूर तसेच विद्याव्यसनी होते. **शालिवाहन**शकाच्या पांचव्या शतकांत " **साळुंखे किंवा सोळंकी** " कुळींतील राजे गाजूं लागले. यांच्या राजधानीचें शहर **वातापी.** "वातापी" स हल्लीं **बदामी** म्हणतात, व ही विजापूर जिल्ह्यांत आहे.

**पुलकेशी** म्हणून एक मोठा शूर राजा **बदामी**कर **साळुंख्यां**मध्यें जन्मला. हिंदुस्थानांत **हर्षवर्धन** म्हणून सार्वभौम राजा होता, त्याचा, **नर्मदे**वर मोठी लढाई झाली तींत मोड करून **पुलकेशीनें** आपली व महाराष्ट्र देशाची स्वतंत्रता कायम राखिली. पुढें **राठोड** कुळींतील राजे शालिवाहनाच्या सातव्या शतकांत राज्य करूं लागले. याच सुमारास **मालखेडकर जाधव** नांवारूपास आले. यांची राजधानी **मालखेड** ही हल्लीं निजामशाहींत आहे. या काळीं मराठी बोलणारे व कानडी बोलणारे असे दक्षिणेंतील लोक दुभागले गेले. **जाधवां**चा अंमल मराठी बोलणारांवर राहून **कल्याण**कर **साळुंख्यां**चा अंमल कानडी बोलणारांवर राहिला. **कल्याण** हें **कलबुर्ग्या**जवळ आहे. शालिवाहनाच्या ११ व्या शतकापर्यंत

या **साळुंख्यांची** बरीच चलती होती. पुढें **देवगिरीचे जाधव** प्रसिद्धीस आले.

**देवगिरीस** हल्लीं **दौलताबाद** ह्मणतात. या **जाधवकुळाक**-डून महाराष्ट्रदेशाचें राज्य मुसलमानांनीं उपटलें. तेव्हां मुसलमान येत तोंपर्यंत १ शालिवाहन, २ बदामीकर साळुंखे, ३ राठोड, ४ मालखेडकर जाधव, ५ कल्याणकर साळुंखे, ६ देवगिरीकर जाधव, या सहा घराण्यांकडे अनुक्रमें महाराष्ट्रदेशाचें अधिपत्य आलें. **१ पैठण, २बदामी, ३ बंकापूर, ४ मालखेड, ५ कल्याण** व **६ देवगिरी** ( दौलताबाद ) हीं शहरें अनुक्रमें राजधानीचीं झालीं.

**५६. शालिवाहनाच्या** तेराव्या शतकाच्या पहिल्या पादांत **अल्लाउद्दीन खिलजी** यानें दक्षिणेंत स्वारी केली. **दौलताबाद**-च्या **रामदेव** नामक राजाचा यानें पूर्ण पराभव करून मराठी राज्य बुडविलें. पुढें **महंमद तगलख** बादशहाच्या कारकीर्दींत **हुसेन** नामक सरदारानें एका स्वतंत्र राज्याची स्थापना केली. **हुसेन** आपणास **सुलतान अल्लाउद्दीन गंगूब्राह्मणी** असें ह्मणवूं लागला. **हुसेन** हा **गंगू** नांवाच्या दिल्लीकर ब्राह्मणाचा पहिल्यानें गुलाम होता. त्या ब्राह्मणाचे उपकार झाले होते ह्मणून **हुसेनानें** आपली कृतज्ञता व्यक्त करण्यासाठीं **हुसेनगंगू** हें नांव घेतलें. इतिहासामध्यें या राज्यास **ब्राह्मणी** राज्य असें ह्मणण्याचा सांप्रदाय आहे.

इ० स० १३४७ पासून ब्राह्मणी राज्याची सुरुवात.

या ब्राह्मणी राज्यांत एकंदर अठरा पुरुष झाले. इ० स० १४७८ पासून या राज्यांत जिकडे तिकडे अव्यवस्था माजली. राज्याचा विस्तार फार होऊन सरदार उन्मत्त झाले आणि खासे यजमान राजविलासी होऊं लागले. ज्याला जसें फावलें तसें त्यानें आपलें काम साधून घेतलें व निरनिराळ्या सुभ्यांवरील सुभेदार स्वतंत्र झाले. ते आपणांवर कोणाचा ताबा आहे असें मानीनात. यामुळें इ० स० १५०० च्या सुमारास महाराष्ट्र देशांतील **ब्राह्मणी** राज्याचे तुकडे तुकडे होऊन

निरनिराळीं पुष्कळ राज्यें स्वतंत्र अशीं बनलीं. **विजापूर, गोवळकोंडें, अहमदनगर, वऱ्हाड** आणि **बेदर** या पांच ठिकाणीं पांच स्वतंत्र राज्यें स्थापन झालीं. ब्राह्मणी राज्याच्या ह्या पांच शाह्या स्वतंत्र झालेल्या शाखा होत. विजापुरच्या राज्यास **आदिलशाही,** गोवळकोंड्याच्या राज्यास **कुतुबशाही,** अहमदनगरच्या राज्यास **निजामशाही,** वऱ्हाडच्या राज्यास **अंमदशाही** आणि बेदरच्या राज्यास **बरीदशाही** असें ह्मणण्याचा प्रघात होता.

यांपैकीं **अहमदनगर**चें राज्य बुडविण्यासाठीं **अकबरा**नें पुष्कळ खटपट केली. इ० स० १५९९ मध्यें तेथल्या राजास **अकबरा**च्या सैन्यानें कैद केलें. तरी **मलिकंबर** नांवाच्या नगरकरांच्या नौकरानें कसें तरी करून ती गादी राखिली. प्रथमतः **अकबरा**चें सैन्य **अहमदनगरा**वर आलें. त्या वेळीं **चांदबिबी** ह्मणून एक राजघराण्यांतील स्त्री होती. तिनें मोठ्या विलक्षण पराक्रमानें **नगरकरां**ची बाजू राखिली. **अकबरा**च्या सैन्यानें तोफ लावून किल्ल्यास भगदाड पाडलें; आणि आंत चाल करून जाण्याची सिद्धता केली. पण भगदाडाच्या तोंडाशीं भरमध्यरात्रीं **चांदबिबी** आपली नंगी समशेर हातांत धरून उभी राहिली. चाल करून येणाऱ्या शिपायांची तिनें एकसारखी रात्रभर कत्तल चालविली होती! तों इतक्यांत कोणीं दुष्टानें दगा करून तिचा प्राण घेतला. पुढें **मलिकंबरा**नें आपल्या जिवांत जीव होता तोंवर **अहमदनगर**चें राज्य ह्मणून बुडूं दिलें नाहीं. दिल्लीच्या सैन्यानें आपला ताबा **अहमदनगरा**वर बसविला, तरी **मलिकंबरा**नें **दौलताबादे**कडे जाऊन एक नवा बादशहा गादीवर बसविला आणि **अहमदनगर**ची निजामशाही चालविली. **दौलताबादे**जवळ **खिडकी** नांवाचें शहर या **मलिकंबरा**नेंच वसविलें. त्यालाच पुढें **औरंगाबाद** ह्मणूं लागले. पुढें इ० स० १६३७ या वर्षीं हें **अहमदनगर**चें राज्य दिल्लीकरांनीं **शहाजहान** बादशहाच्या कारकीर्दींत साफ बुडविलें.

वऱ्हाडची **अंमदशाही** इ० स० १५७४ सालीं **अहमदनग-**

इ० स० १६३७ अहमनगरचें राज्य बुडालें.

रकरांनीं बुडविली आणि बेदरची **बरीदशाही** नाहींशी होऊन विजापूरकरांच्या **अदिलशाहींत** सामील झाली. उरतां उरतां उरल्या विजापूरची **अदिलशाही**, नगरची **निजामशाही** आणि गोवळकोंड्याची **कुबुतशाही**. यांपैकीं **शहाजहानानें** अहमदनगरची **निजामशाही** रसातळास नेली. बाकी विजापूरची **अदिलशाही** आणि गोवळकोंड्याची **कुतुबशाही** राहिल्या, त्यांच्यांतून मुलूख सवडीप्रमाणें हस्तगत करीत जाऊन अखेरीस "मराठेशाही" **शिवाजीनें** स्थापिली.

## पहिल्या प्रकरणावर प्रश्न.

५३. दक्षिणेंत कोणकोणतीं राष्ट्रें फार प्राचीनकाळापासून प्रख्यात आहेत? महाराष्ट्रदेशाच्या सीमा सांगा. महाराष्ट्रदेशाचा विस्तार केवढा आहे? त्या देशाचे स्वाभाविक विभाग कोणते? या देशांतील लोक कसे आहेत?

५४. महाराष्ट्रांतले मूळ रहिवाशी कोण? राज्य करणाऱ्या, व्यापारी व शेतकरी जाती कोणत्या? प्राचीनकाळीं महाराष्ट्रदेशावर कोणकोणत्या कुळांनीं राज्य केलें? त्यांच्या राजधानीचीं शहरें कोणकोणतीं?

५५. मराठ्यांचें राज्य पहिल्यानें कोणीं बुडविलें? **ब्राह्मणी** राजे असें कां ह्मणतात? ब्राह्मणी राज्यांत आणखी कोणकोणते विभाग कशानें झाले? त्यांचीं नांवें सांगा. बेदरचें राज्य कोणीं बुडविलें? चांदबिबी कोण? मलिकंबरानें काय केलें? अहमदनगरचें राज्य कधीं बुडालें? कुतुबशाही कोणत्या राज्याचें नांव? बेदरच्या राज्यास कोणती शाही म्हणतात?

---

# प्रकरण २ रें.

# श्रीशिवछत्रपति.

१ छत्रपतीची पूर्वपीठिका. २ **शिवाजीचें** बाळपण, व बाळसंवगडी. ३ शिवाजीला शुद्धीवर आणण्याबद्दल शहाजीस विजापूरकरांची ताकीद; शहाजीची कैद; अफझुलखानाची स्वारी; रुस्तुमजमानची र-

वानगी. ४ दिल्लीकरांच्या मुलुखांत धामधूम; षाहिस्तेखानाची रवानगी; सुरतशहरची लूट; मुसलमान यात्रेकरूंची लूट; दिलेरखान व राजा जयशिंग यांची शिवाजीवर रवानगी; चौथाई व सरदेशमुखी; शिवाजीचें दिल्लीस जाणें; तेथें कैद व सुटका; **सिंहगड**; मोहबतखानाचा पराभव. ५ पुनः विजापूरकरांशीं कटकटी; ६ राज्याभिषेक विजापूरकरांस सहाय्य; शिवाजीचा मृत्यु; त्याचा वंशवृक्ष.

**५६. पूर्वपीठिका**—महाराष्ट्रदेशाची प्राचीन राजधानी **देवगिरी**—दौलताबाद—त्या देवगिरीजवळ **वेरूळ** म्हणून एक खेडें आहे, तेथें **भोंसले** आडनांवाचें एक घराणें होतें. या घराण्यांत **शिवाजीचा** जन्म झाला. या **भोंसल्यां**च्या घराण्यामध्यें **मालोजी** ह्मणून होता, तो पहिल्यानें अहमदनगरच्या **निजाम**शाहीचा नोकर झाला. **मालोजी**च्या मुलाचें नांव **शहाजी.** शिंदखेडचा **जाधवराव** म्हणून एक बलाढ्य शूर मराठा सरदार होता त्याच्या मुलीशीं शहाजीचें लग्न झालें. **शिवनेरी** व **चाकण** या दोन किल्ल्यांची किल्लेदारी व त्या किल्ल्यांखालील प्रदेशाची मामलत अहमदनगरकरांकडून **मालोजी**स मिळाली होती व पुढें लौकरच **पुणें** आणि **सुपें** हे परगणे जाहगिरीदाखल **मालोजी**स निजामशाहींतून मिळाले.

**मालोजी**च्या पश्चात् **शहाजी** निजामशाही सरकारच्या चाकरींत राहिला. पण पुढें लौकरच ती निजामशाही शहाजहान बादशहानें बुडविली. **शहाजीनें** निजामशाहीच्या जीर्णोद्धारार्थ यत्न कांहीं कमी केले नाहींत. पण अखेरीस यश न येतां **शहाजीस** **विजापूरकरां**च्या पदरीं राहणें भाग पडलें. **विजापूरकरां**कडून **शहाजी**स तंजावर, पुणें व सुपें वगैरे प्रांतांची जाहगीर मिळाली. पुढें **विजापूरकरां**च्याच पदरीं असतां **शहाजी**चा शेवट झाला.

**शहाजी**च्या पहिल्या बायकोचें नांव **जिजाबाई.** शालि० शके १५४९ प्रभवसंवत्सरे या वर्षी **शिवनेरी** किल्ल्यांत **शिवाजी** जन्मला. हा **जिजाबाई**चा दुसरा मुलगा, पहिल्या मुलाचें नांव **संभाजी**. पुढें **विजापुरीं शहाजी**च्या दुसऱ्या बायकोस एक मुलगा झाला, त्याचें नांव **व्यंकोजी.**

**५७. शिवाजीचें बाळपण**:—**शहाजी** कर्नाटकांत आपल्या जहागिरीमध्यें राही. पुणें प्रांतीं **दादोजी कोंडदेव** ह्मणून त्याचा एक कारकून असे. त्याला तिकडील जहागिरीची व्यवस्था पहाण्यासाठीं ठेविला होता. रामायण, महाभारत वगैरे पौराणिक ग्रंथ ऐकण्याचा **शिवाजी**ला लहानपणापासून नाद होता, असें म्हणतात. **तानाजी मालुसरे, बाजी फसलकर, सुरराव कांकडे** व **एसा निकम**[१] हे **शिवाजी**च्या बाळसंवगड्यांपैकीं होत. हळूहळू डोंगरी किल्ले सर करण्याकडे **शिवाजी**ची प्रवृत्ति झाली. प्रथमतः **तोरणा** नामक विजापूरकरांचा किल्ला **शिवाजी**नें हवालदारास पैसा देऊन ताब्यांत घेतला. त्या किल्ल्यांत त्यानें बांधकाम सुरू केलें तेव्हां तेथें एक मोहरांचा हंडा पुरलेला मिळाला. अशा तऱ्हेनें पुष्कळ द्रव्य मिळाल्यामुळें ईश्वरी कृपा **शिवाजी**वर पूर्णपणें आहे असें सर्वांस वाटलें, त्यांत नवल नाहीं. तें सांपडलेलें द्रव्य **राजगड** नांवाचा दुसरा एक किल्ला बांधण्यांत **शिवाजी**नें खर्चिलें.

इ० स० १६४६
शिवाजी तोरणा किल्ला घेतो.

**५८. पुढील हकीकत**:—हें वर्तमान **विजापूरकरांस** कळलें, तेव्हां त्यांस फार राग आला. आपल्या पदरच्या नौकराचा मुलगा आणि आपणांस न विचारतां आणि आपलेच किल्ले बळकावितो हें त्यांस खपेल कसें? आपल्या मुलाला शुद्धीवर आणावें असें पत्र **शहाजीस** विजापूर दरबारांतून आलें. तेव्हां **शहाजी**नें **शिवाजी**स मार्गावर आणण्याचें काम **दादोजी**कडे सोंपविलें. आपलें कांहीं चालत नाहीं असें पाहून **दादोजी**नें अखेरीस विषाची गोळी खाऊन प्राण दिला, असें म्हणतात.

इ० स० १६४७
दादोजी कोंडदेव मरण पावला.

लौकरच **चाकण, पुरंदर, कोंडाणा**, वगैरे एकामागून एक किल्ले, दारूगोळा न उडवितां आणि रक्ताचा थेंब न सांडतां **शिवाजी**नें घेतले. **कल्याण**चा सुभा व कोंकणपट्टीचा बराच भाग यांजवरही त्यानें हळूच आपली सत्ता बसविली. एवढ्यावरच स्वस्थ न ब-

१. एसा निकम याचा अपभ्रंश होत एसाजी कंक असें रूप होऊन बसलें आहे.

सतां पुढें **शिवाजीनें** आपला मोर्चा विजापूरकरांच्या मुलुखाकडे वळविला. विजापूरकरांच्या प्रांतांत **शिवाजीनें** धामधूम मांडली तेव्हां त्याच्या पुंडाईस आंतून **शहाजीची** फूस असावी, असें वाटून **बाजी घोरपड्यास** आंतून विजापूरकरांनीं निरोप धाडला कीं, हरयुक्तीनें **शहाजीस** कैद करून विजापुरास हुजूर पाठवावें. त्याप्रमाणें **बाजीनें** आपल्या घरीं **शहाजीस** जेवायास बोलावून दग्यानें त्याला कैद करून, **विजापुरीं** रवाना केलें. हें वर्तमान **शिवाजीस** कळलें. तेव्हां दिल्लीचा बादशहा **शहाजहान** याच्याशीं संधान बांधून व बादशहाच्या पदरीं रहाण्याचें पतकरून **शिवाजीनें** आपल्या तीर्थरूपांस विजापूरकरांच्या आंधारकोठडींतून मुक्त केलें. पुढें सवड सांपडतांच एकाएकीं छापा घालून व त्याची जहागीर खाक करून दगेखोर **बाजी घोरपड्याचा** शिवाजीनें सुरेख सूड घेतला. या छाप्यांत **बाजी घोरपडा** ठार झाला.

पुढें सबंध कोंकणपट्टी स्वाधीन करून घेण्याच्या उद्देशानें **जंजिऱ्याच्या शिद्यावर शिवाजीनें शामराजपंतास** पाठविलें. पण **शामराजपंताचा** तेथें मोड झाला. **शामराजपंताच्या** अंगीं कर्तबगारी नाहीं असें पाहून **शिवाजीनें** त्याची ती पेशवाई लगेच काढून घेतली. अशा रीतीनें **शिवाजी** वाढत चालला असें पाहून विजापूरकरांनीं त्याचें पारिपत्य करण्याचे कामीं **अफझुलखान** नामक मातबर सरदाराची योजना केली. **शिवाजीला** जिवंत धरून अगर निदान त्याचें शिर तरी आणतों अशी या खानानें विजापूरच्या दरबारांत प्रतिज्ञा केली होती. "पांच हजार स्वार व सात हजार प्यादे" एवढें मोठें सैन्य घेऊन **अफझुलखान शिवाजीवर** आला. वाटेंत **तुळजापूर** लागलें. **तुळजापूरच्या** भवानीचा **अफझुलखानानें** जात्यांत घालून भरडा केला ! **शिवाजीकडे** बोलणें करावें ह्मणून **गोपीनाथपंत** नामक वकीलास **अफझुलखानानें** पाठविलें. **गोपीनाथपंताकडून अफझुलखानानें** दरबारीं केलेली प्रतिज्ञा समजल्यामुळें भेटीचे प्रसंगीं **शिवाजी** अतिशय सावधगिरीनें वागला. पाठीं कडेकोट तयारी ठेवून, प्रसंगीं दगा झाल्यास स्वतःचा बचाव करण्या-

साठीं **शिवाजीनें** आपल्या अंगांत " जिराची कुडती घातली. डोईस मंदील बांधला, त्यांत तोडा बांधला, पायांत चोळणा घालून कांस कसली व हातांत एक बिचवा व वाघनख चढविलें" आणि त्याजवर दुसरा दरबारी पोषाक चढवून तो **अफझुलखानाची** भेट घेण्यास निघाला. भेट होत असतां खानानें **शिवाजीची** "मुंडी कांखेखालीं कवटाळून धरिली व हातीं जमदाड होती तिचें मेण टाकून ती **शिवाजीचे** कुशींत चालविली ती अंगांत जिरेची कुडती होती तीवर खरखरली, अंगास लागली नाहीं." हें पाहून **शिवाजीनें** डाव्या हातांतलें वाघनख जोरानें खुपसून खानाची चरबी बाहेर काढिली व उजव्या हातांतल्या बिचव्यानें वार करून लागलाच पाय काढिला. **अफझुलखानानें** " मारिलें मारिलें" अशी ओरड केली, तेव्हां लगेच **अफझुलास** भोयांनीं पालखींत घातलें. भोई निघतात इतक्यांत **संभाजी कावजीनें** वार करून भोयांस खालीं पाडिलें व **अफझुलाचें** डोकें कापून तें घेऊन तो **शिवाजीस** मिळाला. अशा प्रकारें दगा करण्यास आलेल्याचें पारिपत्य **शिवाजीनें** यथायोग्य केलें.

इ० स० १६५९, अफझुलखानाचें मरण.

हें वर्तमान विजापुरीं कळतांच दरबारच्या मंडळीची तळव्याची आग मस्तकास पोंचली. **रुस्तुमजमान** नामक दुसरा एक सरदार **शिवाजीवर** विजापुराहून आला; त्याचा पूर्ण पराभव **शिवाजीनें** केला आणि विजापूरकरांच्या मुलुखावर खंडण्या घेण्यास सुरुवात केली. पुढें कोंकणांत लुटालुट मांडली तेव्हां **शिवाजीचें** पारिपत्य करण्यासाठीं **शिद्दीजोहार** याला पाठविलें. त्या वेळीं **शिवाजी** पन्हाळ्याच्या किल्ल्यांत होता. **शिद्दीजोहारानें** त्या किल्ल्याला वेढा दिला, तेव्हां **शिवाजीचें** कांहींएक चालेना. चार महिने झटपट केली पण कांहीं साधेना. **तानाजीस** कुमक घेऊन येण्यासाठीं निरोपावर निरोप गेले तरी त्याचें येणें होईना तेव्हां एकदा **शिद्दीजोहार** व त्याचें सैन्य

इ० स० १६६० रुस्तुमजमानाची शिवाजीवर रवानगी.

जरा बेसावधपणानें राहिलेलें पाहून **शिवाजी** फळी फोडून जाण्याच्या उद्देशानें रात्रींचा निघाला. **अफझुलखाना**चा मुलगा **फाझल, शिवाजी**च्या पाठीं नेटानें लागला. या आणीबाणीच्या प्रसंगीं **बाजी प्रभू**नें वाट बंद केल्यामुळें **शिवाजी**चा बचाव झाला. **बाजीस** गोळी लागली. पण रांगण्यावर पोंचून संकेताप्रमाणें **शिवाजी**नें इशारतीची तोफ मारविली. ती कानीं पडल्यानंतर **बाजी**चा प्राण गेला. हा मोड झाल्यामुळें **शिद्दीजोहार** फार खट्टू झाला. इतक्यांत कर्नाटकांत पुष्कळ बंडें उठलीं, त्यांचा बंदोबस्त करणें विजापूरकरांस ज्यास्त अगत्याचें वाटलें. म्हणून **शिवाजी**चा नाद त्यांनीं कांहीं दिवस सोडिला. तरी **शिवाजी** कांहीं स्वस्थ बसला नाहीं. त्यानें विजापूरकरांचे प्रांतावर प्रांत घेण्याचें काम सपाट्यानें चालविलें

इ० स० १६६२, शिवाजीशीं विजापूरकर तह करितात.

तेव्हां अखेरीस निरुपाय होऊन **शिवाजी**शीं तह करणें विजापूरकरांला भाग पडलें. "कल्याणपासून गोंव्यापर्यंत सारी कोंकणपट्टी आणि भीमेपासून वारणेपर्यंत सुमारें १६० मैल लांबीचा घांटमाथा इतका मुलूख **शिवाजी**च्या ताब्यांत या वेळीं होता."

**५९. मोंगलांशीं दंडेलगिरी.** अशाप्रकारें विजापूरकरांशीं चाललेला दावा बंद पडल्यानंतर दिल्लीच्या बादशहाच्या मुलुखाकडे **शिवाजी**ची दृष्टि गेली. **औरंगाबादे**पर्यंत **शिवाजी**नें मुलूख उध्वस्त केला. हें समजतांच **षाहिस्तेखान** ह्मणून एक बलाढ्य सरदार **औरंगजेबा**चा मावसा होता, त्याची, **शिवाजी**चें पारिपत्य करण्याचे कामीं योजना झाली. **षाहिस्तेखान** भलें दांडगें लष्कर घेऊन आला. त्यानें, पूर्वीं **शिवाजी** पुण्यास राहत होता त्या वाड्यांतच तळ दिला. एके रात्रीं बाहेरगांवाहून पुण्यांत एक वरात आली. त्या वरातींत **शिवाजी** व त्याचे कांहीं विश्वासू संवगडी शिरले आणि पुण्यांत दाखल झाले. वेशीबाहेर शिवाजीचें सैन्य उभें होतेंच. मध्य रात्रीचा वेळ, **षाहिस्तेखाना**चे लोक बेसावध, कारण वेशीवर चौकीपाहऱ्याचा बंदोबस्त भक्कम होताच. **शिवाजी**स त्या वाड्याच्या

खुणानखाणा सर्व माहीत. त्यानें एकाएकींच मध्यरात्रीला खानावर छापा घातला. पुष्कळ लोक मारले. **षाहिस्तेखाना**स गांठलें. **शिवाजी** राजा नेकजात, बायकांवर हत्यार टाकीत नसे व त्यांच्या वाटेस जात नसे. हें **षाहिस्तेखाना**स कळलें होतें ह्मणून तो लगबगीनें जनानखान्याकडे जाऊं लागला. तरवारीचा वार **षाहिस्तेखाना**वर झाला, पण हाताचीं तीन बोटें कापलीं गेलीं. दुसरे दिवशीं "काल येऊन बोटें तोडिलीं; आज मागुतीं येऊन आपलें शिर कापून नेईल" अशी धास्ती पडून **षाहिस्तेखान** दिल्लीस मुकाट्यानें परत गेला.

इ० स० १६६२, षाहिस्तेखानाचा मोड.

इ० स० १६६४ सालीं दिल्लीपतीच्या अमलांतील गुजराथेंतलें **सुरत** शहर **शिवाजी**नें भरदिवसा लुटलें. त्यांत त्याला अपार संपत्ति मिळाली. पण तें शहर लुटून तो माघारा रायगडास येतो तोंच, **शहाजी** वारल्याचें वर्तमान कळलें. पुढें लौकरच **शिवाजी** आपणास **राजा** ह्मणवूं लागला, व आपल्या नांवाचें स्वतंत्र नाणें पाडण्यासही त्यानें आरंभ केला.

इ० स० १६६४, शहाजीचा मृत्यु.

**मक्केस** जाणाऱ्या मुसलमान यात्रेकरूंस **शिवाजी**च्या लोकांनीं लुटल्याचें वर्तमान **औरंगजेबास** कळलें. तेव्हां **शिवाजी**ची विलकुल गय करतां कामा नये असें समजून त्यानें राजा **जयसिंग** व **दिलेरखान** या दोघां मातबर सरदारांस दक्षिणेंत **शिवाजी**वर पाठविलें. या मोंगलांच्या दक्षिणेंतील मोहिमेंत **पुरंदर** मुक्कामीं **मुरारराव** देशपांड्यानें मोठी मर्दुमकी करून मराठ्यांचें नांव गाजविलें. त्यामुळें मराठ्यांस सहज बुडवितां येणें नाहीं, अशी **दिलेरखाना**ची व **जयसिंगा**ची खात्री झाली. या काळीं भरमैदानांत जंगी लढाई देण्यापुरती फौज जवळ नसल्यामुळें **शिवाजी**नेंही सलूख्याचें बोलणें लाविलें. **जयसिंगा**नें तें कबूल केलें. कारण, पुढें विजापूरकरांस बुड-

इ० स० १६६५ त शिवाजीवर दिल्लीहून दोघे सरदार येतात.

विण्यासाठीं जाणें होतें. पुढें कांहीं पथकें घेऊन **शिवाजी जयसिंगा-** बरोबर विजापूरकरांच्या मुलुखांत घुसला. मावळ्यांच्या शौर्यामुळें पुष्कळ ठिकाणीं मोंगलांस जय मिळाला. तेव्हां दरबारीं **शिवाजीची** शिफारस केल्यामुळें दिल्लीपतीनें **शिवाजीस** आपल्या राजधानीस बोलाविलें.

पुढें आपल्या पुत्रासह **दिल्लीस** जाण्यास **शिवाजी** निघाला. बरोबर एक हजार मावळे व तीन हजार स्वार **शिवाजीनें** घेतले होते. औरंगाबादेस **शिवाजी** पोंचला तेव्हां पांचशें स्वार व पांचशें पायदळ त्यास सामोरें आलें. एक लाख रुपये **शिवाजीस** औरंगाबादच्या तिजोरींतून द्यावे असा बादशहाचा फरमान आला होता. आणि "**शिवाजी**राजे मुलाजमतीस येतात. ते ज्या गांवीं मुक्कामास राहतील तेथील फौजदारांनीं येऊन भेटावें. दाणापाणी जो लागेल तो द्यावा. शाहाजादे यांचेप्रमाणें अदब चालवावी" अशीं "आपले कुळ फौजदार व महालमोकासे यांसी ताकीदपत्रें" **औरंगजेबानें** पाठविलीं होतीं.

**दिल्लीस** गेल्यावर बादशहाची मुलाखत झाली. पण मान चांगला राहिला नाहीं म्हणून **शिवाजी** रागावला व तो राग **शिवाजीनें** उघड दर्शविला तेव्हां **औरंगजेबानें शिवाजीस** युक्तीनें कैद केलें. त्याच्या लोकांस परत पाठवून **शिवाजी**भोंवतीं पांच हजार मोंगल शिपायांचा पाहरा ठेविला. पाहरेकऱ्यांशीं स्नेह ठेवून **शिवाजीनें** त्यांचा आपणावर पूर्ण भरंवसा बसविला. **अमीरउमरावांस** खैरात नजराणे वगैरे पाठविण्याचा **शिवाजीनें** क्रम आरंभिला. ते जिन्नस पेटाऱ्यांत घालून **शिवाजी** बाहेर पाठवी. रोज पेटारे तपासून पाहण्याचें कारण नाहीं, अशी पाहरेकऱ्यांची पूर्ण खात्री होतांच एक दिवशीं एका पेटाऱ्यांत आपण व दुसऱ्यांत पुत्र **संभाजी** असे बसून कैदेंतून बापलेंक बाहेर पडले.

पुढें **औरंगजेबानें** हरयत्न केले, पकडून देणारास लालुची पुष्कळ दाखविल्या, पण **शिवाजी** एकदा दिल्लीहून निसटला तो दक्षिणेंत येऊन दाखल झाला.

पुनः **शिवाजीस** आणखी एकदा दग्यानें पकडावें म्हणून **औरंगजेबानें** अनेक लालुची दाखविण्याचा यत्न केला. त्यामुळें **शिवाजीचा** मात्र फायदा झाला. **औरंगजेबानें** १६६७ सालीं **शिवाजीस** राजा हा किताब आणि **वऱ्हाडांत** कांहीं जहागीर दिली. आणि **शिवाजीला** कैद करावें ह्मणून सुलतान **मासजूर** या दक्षिणेंतल्या मोंगल सरदारास त्यानें ताकीद दिली. इकडे **शिवाजी** हळू हळू एकेक मोगलांचे प्रांत काबिज करूं लागला. **तान्हाजी मालुसरा** ह्मणून **शिवाजीचा** बाळसंवगडी होता त्यानें नेटानें हल्ला करून **सिंहगड** किल्ला मोंगलांकडून घेतला. "गड" हातीं आला पण **तान्हाजी** "सिंह" मात्र गेला. ह्मणजे हल्ल्यांत **तान्हाजी** पडला. पुढें **पुरंदर** वगैरे गड एकामागून एक सर करण्याचें काम **शिवाजीनें** एकसारखें चालविलें होतें. पुनः **सुरत** शहर **शिवाजीनें** लुटलें. **खानदेश** लुटण्यास **प्रतापराव** गुजरास **शिवाजीनें** पाठविलें होतें. असा चोहोंकडून मोंगलांच्या प्रांतावर कहर उसळला. तेव्हां **मोहबतखान** नामक सरदारास **औरंगजेबानें** **शिवाजीवर** रवाना केलें. त्याचा **प्रतापराव** गुजरानें पुरा पराभव केला आणि **मोहबतखानाला** सैन्यासुद्धां औरंगाबादेकडे पिटाळून लाविलें. इतकें होतांच मोंगलांच्या प्रांतावर चौथाईबाब बसविण्याला **शिवाजीनें** सुरुवात केली. याच सुमारास गोवळकोंडेकर पांच लाख व विजापूरकर तीन लाख **शिवाजीस** दरसाल खंडण्या देऊं लागले !

इ० स० १६७२, मोहबतखान शिवाजीस कैद करावयास येतो.

**६०. पुनः विजापुरकरांशीं कटकटी.**—या सुमारास **शिवाजीनें** विजापूरकरांचें **हुबळी** शहर लुटलें आणि **साताराचा किल्ला** सर केला. तेव्हां विजापूरकरांनीं दांडगें सैन्य **शिवाजीवर** पाठविलें. त्याचा **प्रतापराव** गुजरानें मोड केला. पण त्यानें विजापूरकरांचें लष्कर लुटलें नाहीं यासाठीं

१६७३, हुबळी शहर लुटलें.

**शिवाजी, प्रतापरावाला** रागें भरला. ह्मणून पुनः त्याच्या पाठीस **गुजर** लागला. पण फत्ते मिळाली नाहीं. ती **हंसाजी** मोहिते यानें मिळविली. तेव्हां त्याला **हंबीरराव** हा किताब देऊन सेनापतिपद दिलें.

**६१. राज्याभिषेक.** याप्रमाणें जिकडेतिकडे आपला प्रताप गाजविल्यानंतर मोठ्या थाटानें **रायगड** किल्ल्यावर **शिवाजीनें** आपणास राज्याभिषेक करविला. आतां आपलें स्वतंत्र राज्य झालें असें समजून सर्व व्यवस्था लावण्याच्या कामीं बाकीचीं वर्षें **शिवाजीनें** घालविलीं. अभिषेकापासून **छत्रपति** शब्द **शिवाजीस** लागूं लागला. आपल्या राज्याचा बंदोबस्त चांगलासा लाविल्यानंतर, आपला भाऊ **व्यंकोजी तंजावराकडे** बापाची जाहगीर उपभोगीत होता तिकडे **शिवाजी** तीस हजार सैन्य घेऊन गेला. **व्यंकोजीनें** छापा घातला पण **शिवाजीनें** त्याला दाद दिली नाहीं. जाहगिरीची वांटणी करून पुनः तिची वहिवाट **व्यंकोजीस** सांगितल्यानंतर, **शिवाजी** रायगडास परत आला. वाटेंत कर्नाटकावर चौथाई व सरदेशमुखी या बाबी बसविण्याचा क्रम चालू होताच.

इ० स० १६७४,
शिवाजीचा राज्याभिषेक.

इतक्यांत **औरंगजेबानें** विजापूरकरांवर, दिल्लीहून **दिलेरखानास** पाठविलें. तेव्हां विजापूरकरांनीं **शिवाजीचें** साहाय्य मागितलें. **शिवाजीच्या** सैन्यानें मोंगलसैन्याचा पूर्ण पराभव केला. तेव्हां कृतज्ञ होऊन विजापूरकरांनीं कर्नाटक वगैरे प्रांत **शिवाजीच्या** हवालीं केला.

इ० स० १६७९,
दिलेरखान विजापूर बुडविण्यास येतो.

अशा रीतीनें आपल्या पराक्रमाचा साऱ्या दक्षिणेभर दरारा बसवून **मराठी** पादशहातीची, अनेक क्लेश सोसून, प्राणप्रतिष्ठा करणारा महान् श्रेष्ठ **श्रीशिवछत्रपती, राजारामाचें** लग्न करण्यासाठीं **रायगडीं** आला तो लौकरच

इ० स० १६८०,
शिवाजीचा मृत्यु.

ज्वराची भावना होऊन निवर्तला. या महापुरुषाच्या गुणांचें वर्णन निराळें करावयास नको. त्याच्यासारखा **सच्छील, गुणज्ञ, धोरणी, धुरंधर, हिकमती** व **शूर** त्याच्या पाठीं आजपर्यंत कोणी झाला नाहीं. आपल्या देशाकरितां आणि आपल्या लोकांकरितां या **शिवाजी**नें आपलें शरीर चंदनाप्रमाणें झिजविलें. मराठी राज्याचा मूळ संस्थापक **शिवाजी** ह्मणून त्याची वंशावळ खालीं जोडली आहे.

शहाजी

- संभाजी
- **श्रीशिव छत्रपति** १६७४–१६८०.
  - **२ संभाजी** १६८०–१६८९.
    - **५ शाहू** १७०८–१७४९.
      - **६ रामराजा** (दत्तक.) १७४९–७७.
        - **७ शाहू** (दुसरा) दत्तक. १७७७–१८०८.
          - **८ प्रतापसिंह** १८०८–३९.
          - **९ शहाजी** १८३९–४८.
  - **३ राजाराम** १६८९–१७००.
    - **४ शिवाजी** (दुसरा.) १७००–१७०८.
      - कोल्हापूर घराणें.
- व्यंकोजी तंजावरकर. तंजावर घराणें.

## पहिल्या प्रकरणावर प्रश्न.

**५६.** शिवाजीच्या घराण्याचें आडनांव काय? ते कोठले राहाणारे? कोणाच्या पदरीं असत? शिवाजीच्या आजाचें नांव काय? त्याची इभ्रत कोणीं वाढविली? निजामशाही सरकारची चाकरी शहाजीनें कां सोडिली? तो विजापूरकरांकडे कां गेला? शिवाजीच्या

आईचें नांव काय ? तो कोठें व कधीं जन्मला ? शहाजीला जहागीर काय काय होती ?

५७. दादोजी कोंडदेव कोण ? शिवाजीच्या बाळसंवगड्यांचीं नांवें सांगा. शिवाजीनें प्रथमतः कोणता किल्ला घेतला ? राजगड किल्ला कोणीं बांधविला ?

५८. विजापूरकरांनीं हें शिवाजीचें आचरण पाहून काय केलें ? दादोजीच्या मरणानंतर शिवाजीनें आणखी काय मिळविलें ? बाजी घोरपड्या कोण ? शहाजीस कां कैद केलें ? त्याची सुटका कशी झाली ? बाजी घोरपड्याचें पुढें काय झालें ? जंजिऱ्याच्या शिद्यावर शिवाजीनें कोणास आणि कां पाठविलें ? पुढें त्याचें काय झालें ? अफझुलखान कोण ? त्याच्या स्वारीची सबंध हकीकत सांगा. अफझुलखानाचा शेवट काय झाला ? रुस्तुमजमान कोण ? त्याचें पुढें काय झालें ? शिद्दीजोहार कोण ? त्याच्या हातून आपली सुटका शिवाजीनें कशी करून घेतली ? विजापूरकरांनीं शिवाजीशीं तह कां केला ?

५९. षाहिस्तेखान कोण ? तो कोठें उतरला; त्याच्या स्वारीची हकीकत सांगा. शहाजी कधीं वारला ? शिवाजीनें कोणतें शहर लुटलें ? दिलेरखान व राजा जयसिंग हे शिवाजीवर कां आले ? पुरंदरीं मर्दुमकी कोणीं केली ? पुढें काय झालें ? पुढें शिवाजी कोठें गेला ? दिल्लीस कां गेला ? शिवाजी कैदेंतून कसा सुटला ? सिंहगड किल्ला कोणीं सर केला ? खानदेश लुटण्याला शिवाजीनें कोणास पाठविलें ? मोहबतखान कोण ? त्याचें पुढें काय झालें ? गोवळकोंडेकर व विजापूरकर शिवाजीला किती आणि कां खंडणी देत ?

६०. हंबीरराव किताब कोणाला व कां दिला ?

६१. राज्याभिषेक कोणत्या सालीं झाला ? तंजावराकडे शिवाजी कां गेला ? शिवाजीनें विजापूरकरांचें सहाय्य करून कोणते प्रांत मिळविले ? शिवाजी कधीं निवर्तला ? त्याच्यामध्यें कोणकोणते गुण होते ?

---

## प्रकरण ३ रें.

### संभाजी—( १६८०–१६८९ ). ९ वर्षें कारकीर्द.

१ लहानपणचें वर्तन; २ राज्यप्राप्ति; ३ राज्यकारभार; ४ मृत्यु.

**६२. लहानपणचें वर्तन.**—**शिवछत्रपतीचा** वडील मुलगा **संभाजी** चांगलासा नव्हता. त्याला संगति वाईट लागलेली. **शिवाजी**चा मोड करण्यासाठीं, **संभाजी**ला आपल्या पक्षाकडे वळविण्याचा **दिलेरखानानें** पूर्वीं एकदा प्रयत्न केला होता. **शिवाजी**चें राज्य देण्याचें वचन **दिलेरानें** दिल्यामुळें ही स्वारी मोंगलांकडे एकदा एकाएकीं धांवली. **दिलेरानें संभाजीस** पुढें ठेवून **भूपाळगडा**स पहिल्यानें मोर्चे लाविले व **औरंगजेबा**सही **संभाजीस** फितूर केल्याची बातमी कळविली. **शिवाजीच्या** मुलावर गोळा टाकण्याची छाती **फिरंगोजी** नांवाचा भूपाळगडचा हवालदार होता त्याची झाली नाहीं. मुळींच भांडण न करितां किल्ला मोंगलांच्या हवालीं करून **फिरंगोजी शिवाजी**कडेस आला. आपल्या देशाच्या आणि लोकांच्या कल्याणाकडे **शिवाजीचें** सारें लक्ष. स्वार्थपरायणता त्याच्यांत मुळींच नव्हती. असला पुरुष आपल्या पोटच्या पोराची पर्वा राखणार आहे थोडीच! "**शत्रूप्रमाणें पुढें आल्यास आपल्या मुलावरही बेलाशक गोळा चालवावा**" अशा अभिप्रायाचा हुकूम आपल्या राज्यांतील गडांतून **शिवाजीनें** फर्माविला. **संभाजी** आला तो, मोंगलांच्या लष्करांत फितुरी करण्यासाठीं **शिवाजीनें** पाठविला असावा, अशी बळकट शंका येऊन **औरंगजेबानें दिलेरास** आज्ञापत्र पाठविलें कीं, **संभाजीस** मुळींच नांवाजूं नये किंवा कांहीं सरंजाम देऊं नये. त्यामुळें **संभाजी**चा मान राहिला नाहीं व **दिलेरानें** दिलेल्या वचनांत जीव नाहींसा पाहून **संभाजीही शिवाजी**कडे परतला. सारांश **शिवाजी** जिवंत असतांही **संभाजीनें** अशा प्रकारें आपले गुण पावळले होते.

**६३. राज्यप्राप्ति.** **शिवाजी** वारला तेव्हां **संभाजी** २३

वर्षाचा असून पन्हाळगडीं **जनार्दनपंता**च्या नजरकैदेंत होता. **संभाजी**वर नीट नजर ठेविण्याविषयीं रायगडाहून **जनार्दनपंतास** आज्ञापत्र गेलें व **राजारामास** देशैकनिष्ठ प्रधानमंडळीनें गादी दिली. पण **शिवाजी** निवर्तल्याची बातमी कळून **संभाजी**नें कांहीं लोक मिळविले व **जनार्दनपंता**च्याच पायांत आधीं बेड्या ठोकल्या. लगेच **संभाजी** निघाला, तो रायगडीं आला तेव्हां प्रधानमंडळी बिचकली. **हंबीरराव** सेनापतीनें **संभाजी**ची बाजू उचलली. **संभाजी**नें **राजारामास** कैदेंत टाकिलें. पुढें **संभाजीस** राज्याभिषेक झाला. **संभाजी** दुर्व्यसनी असून त्याच्या अंगीं राज्य संभाळण्यास अवश्य लागणाऱ्या गुणांचा जवळ जवळ चांगला अभावच होता, ह्मणून **शिवाजी**च्या तालमेंतील प्रधानमंडळीचें आणि त्याचें बिलकुल पटेना. पूर्वीच्या अनुभवशीर आणि हुशार प्रधानांचा अपमान करून त्यांस **संभाजी**नें घरीं बसावयास लाविलें आणि **कलुशा**नामक एका मूर्ख, व्यसनासक्त आणि हलकट **कनोज** ब्राह्मणाच्या हातीं सर्व सत्ता देऊन खांसा आपण प्रायः मजा मारीत राहिला.

अशा प्रसंगीं मराठ्यांस रसातळास नेण्यासाठीं मोठें सैन्य घेऊन **दिल्लीपति औरंगजेब** दक्षिणेंत आला होता. **संभाजी** एकदा दारूच्या धुंदींत असतां तकरीबखान नांवाच्या सरदारानें त्यास व **कलुशास** पकडून कैद केलें आणि दिल्लीपतीच्या छावणींत दाखल केलें. मुसलमान होशील तर तुला जीवदान देईन असें **औरंगजेब** म्हणाला पण **संभाजी**नें मुसलमानी धर्माची व त्याच्या **पैगंबरा**ची यथेच्छ निर्भर्त्सना केली. तेव्हां संतापलेल्या **औरंगजेबा**नें तुळापुरींच हाल हाल करून **संभाजी**चा वध करण्यास हुकूम दिला. याप्रमाणें संभाजीचा शेवट झाला.

इ० स० १६८९, संभाजीस औरंगजेब कैद करितो.

## तिसऱ्या प्रकरणावर प्रश्न.

**६२.** संभाजी कशा प्रकारचा मनुष्य होता ? तो दिल्लीकरांकडे पूर्वी एकदा कां गेला ? फिरंगोजी नरसाळा कोण ? त्यानें किल्ला न

लढवितां मोंगलांच्या स्वाधीन कां केला ? शिवाजीनें दरोबस्त गडकऱ्यांस काय ताकीद दिली ?

६३. शिवाजीचे अंतकाळीं संभाजी कोठें होता ? शिवाजीच्या मरणाची बातमी समजतांच संभाजीनें काय केलें ? कलुशा कोण ? औरंगजेब दक्षिणेंत कां आला होता ? संभाजीला ठार मारण्याचें कारण काय ? संभाजी कोठें व कोणत्या सालीं मेला ?

---

## प्रकरण ४.

### राजाराम-( १६८९—१७०० ).

१ राज्यप्राप्ति; २ कारकीर्द ११ वर्षें; ३ मृत्यु.

६४. **राज्यप्राप्ति. संभाजी** मरण पावला व त्याच्या मुलास कैद करून दिल्लीस नेलें. तेव्हां **संभाजी**चा सावत्रभाऊ **राजाराम** याला सर्वानुमतें गादीवर बसवावें असें ठरलें. पण लौकरच **रायगड** पडला आणि **संभाजी**ची बायको **येसूबाई** व मुलगा **शिवाजी** हीं उभयतां मोंगलांच्या हातीं लागलीं. मराठ्यांची राजधानी मोंगलांच्या हातीं लागल्यानंतर जिकडे तिकडे मोंगलांच्या चौक्या बसल्या आणि महाराष्ट्रमंडळावर मोठा आणीबाणीचा प्रसंग कोसळला. या प्रसंगीं **प्रल्हाद निराजी** आणि **रामचंद्र नीळकंठ** या दोन **ब्राह्मणांनीं राजारामा**चा आणि महाराष्ट्रमंडळाचा बचाव केला. **रामचंद्रपंता**नें मराठी महाराष्ट्रांत रहावें व **प्रल्हादपंतांनीं** हुजूर राहून गादी **तंजावरीं** न्यावी, ही मोठी मसलत या काळीं केली. जागोजागीं मोंगलांचीं ठाणीं बसल्यामुळें मार्गीं जरी मनस्वी हाल झाले, तरी **शिवाजी**च्या पुण्यानें **राजाराम** अखेरीस चंदी मुक्कामीं **प्रल्हादपंता**सहित सुखरूप येऊन पोंचला.

६५. लौकरच **चंदीस** मोंगलांचा वेढा पडला. वेढा उठविण्यास **रामचंद्रपंता**नें **संताजी** घोरपड्यास पाठविलें. **संताजी** मोठा शिस्तखोर म्हणून नांवाजलेला असून, **रामचंद्रपंता**चा त्याच्यावर विशेष भरंवसा होता. **संताजी**नें कधीं लिचेपिचेपणानें किंवा धिमे-

पणानें काम केलेलें नाहीं. **संताजी** कोसळला कीं, शत्रूची दाणादाण व पळापळ सुटली. **संताजी**च्या हाताखालीं **धनाजी जाधव** होता. **धनाजी** शिस्तीनें अमळ ढिला होता, ह्मणून शिपायांस अधिक आवडे. **खोवरेपाक**ची दांडगी लढाई मारून **संताजीनें** मोंगलांस दातीं तृण धरूं लाविलें. **चंदी**चा वेढा उठला. **कासिमखानास औरंगजेबानें** आज्ञा केली कीं, **संताजीस** पिटाळून लावावें पण **संताजीनें** पुरा मोड केल्यामुळें **कासिमानें** विष खाऊन आत्महत्या केली. **दिल्लीपतीस** चैन पडेनासें झालें. इतक्यांत **संताजी**चा खून झाला व पुन: **चंदीस** वेढा पडला. अखेरीस **चंदी** पडली आणि **राजाराम** कानडी महाराष्ट्रांतून निसटला तो मराठी महाराष्ट्राकडे वळला. पुढें वऱ्हाडांत स्वारी करून **जालना** पेठ लुटून **सिंहगडीं** असतांना श्रम पुष्कळ झाल्यामुळें ज्वर येऊं लागला, तो असाध्य होऊन **राजाराम,** शालि० शके १६२१ फाल्गुन व० ८ या दिवशीं ( इ. स. १७०० त ) वारला.

**राजारामाला** दोन बायका होत्या. एकीचें नांव **ताराबाई** व दुसरीचें **राजसबाई. ताराबाई**च्या मुलाचें नांव **शिवाजी** आणि **राजसबाई**च्या मुलाचें नांव **संभाजी.**

## चौथ्या प्रकरणावर प्रश्न.

**६४.** संभाजीनंतर गादीवर कोण बसला? संभाजीच्या पाठीं त्याच्या बायकोचें व मुलाचें काय झालें? या काळीं महाराष्ट्रमंडळाचा भार कोणावर पडला? मसलत कोणती केली व गादी कोठें गेली? मोंगलांनीं चंदीस वेढा घातला तो कोणीं उठविला? धनाजी जाधव कोण? संताजीमध्यें मोठा गुण कोणता? धनाजींत मोठा दोष कोणता? संताजीनें कोणती दांडगी लढाई मारली?

**६५.** राजाराम कोठें, कशानें व कोणत्या सालीं वारला?

---

## प्रकरण ९ वें.

# हिंदुपदपादशाही.

### शिवाजी—( १७००–१७०८ ).

राज्यप्राप्ति; औरंगजेबाचा मृत्यु.

६६. **शिवाजी** लहान होता ह्मणून **राजारामा**चे पश्चात् **ताराबाई** स्वतः कारभार पाहूं लागली. **ताराबाई** ही शिवाजीस शोभणारी सून होती. तिच्यांत कर्तृत्व विशेष असून, तिची शिस्तही सक्त होती. **संताजी**चा खून होण्यापूर्वींच **प्रल्हादपंत** वारला. दोघांचाही मृत्यु आमच्या मंडळास अतिशय भोंवला. तरी **प्रल्हादपंता**ची जागा **रामचंद्रपंता**नें नीट चालविली. पण **धनाजीस** शिस्त नसे, त्यामुळें मराठ्यांचा लुटारूपणा पुष्कळ वाढला. **ताराबाई** ही बायको, अर्थात् यःकश्चित्, अशी कल्पना करून **दिल्ली-पती**नें मोठा खटाटोप केला. **रामचंद्रपंतास** फोडण्यासाठीं ह्मणून **औरंगजेबा**नें स्वदस्तूरचें पत्र लिहिलें. पण **रामचंद्रपंता**नें आपलें सत्व न घालवितां **ताराबाई**ची बाजू संभाळली. **ताराबाई**ची मर्जी पुढें थोडी खप्पा झाली व प्रतिनिधिपद रिकामें पडलें तें **रामचंद्रपंतास** न देतां त्याच्याच हाताखालीं **परशुरामपंत** होता त्यास दिलें. तरी **रामचंद्रपंता**ची निष्ठा तिळभरही ढळली नाहीं व मराठ्यांच्या पादशहातीचें अकल्याण त्यानें स्वप्नींही चिंतिलें नाहीं. मराठ्यांमध्यें दुफळी व्हावी ह्मणून **शाहूस** एकदा **औरंगजेबा**नें सोडिलें व नांवानें ताबेदारी कबूल केल्यास मराठ्यांस अधिक मुलूख देण्याचीही लालूच दिल्लीपतीनें दाखविली. **धनाजी**च्या तोंडास पाणी सुटलें, पण **रामचंद्रपंत** पाठीं होता. लश्करासुद्धां **धनाजी** नांवाचीही ताबेदारी पतकरण्यास राजी होईना व **शाहूस** **औरंगजेबा**कडे परत जावें लागलें. **रामचंद्रपंत, परशुरामपंत** आणि **शंकराजी नारायण** या तीन **ब्राह्मणांनींच ताराबाईचे कारकीर्दींत महाराष्ट्रमंडळाचें स्वातंत्र्य राखिलें,** असें म्हटलें पाहिजे. मोंगल किल्ले एकदा घेत, पण ते गेले कीं ल-

गेच ही **ब्राह्मणमंडळी** अनेक धाडसें करून ते किल्ले पुनः काबीज करी. **धनाजी**ही बादशाही छावणीस त्रास देत होताच. दिल्लीहून दाणा व पैसा येई त्यावर मराठे तुटून पडत व त्यामुळें बादशाही छावणींत दुष्काळ पडून पगारासाठीं शिपाई लोक कुरकुरूं लागले. अशा प्रकारें सर्वतोमुख हाल चालले असतां **अहमदनगरीं** कृतकृत्य होण्यापूर्वींच **औरंगजेबास** देवाज्ञा झाली, आणि महाराष्ट्रमंडळाच्या स्वातंत्र्यासाठीं जो झगडा चालला होता त्याच्यावर पडदा पडून **शिवाजीनें** सूत्रधारपणा स्वीकारलेला पहिला अंक कृतकृत्य झालेल्या **शिवाजीच्या** देशबंधूंच्या टाळ्यांचा गजर चाललेला असतांच आटोपला.

## पांचव्या प्रकरणावर प्रश्न.

**६६.** ताराबाई स्वतःच कारभार कां पाहूं लागली ? ज्या दोघांचा मृत्यु आमच्या मंडळास भोंवला ते कोण ? रामचंद्रपंतास फोडण्यासाठीं दिल्लीपतीनें काय केलें ? रामचंद्रपंताच्या निष्ठेचें आणखी एक उदाहरण सांगा ? औरंगजेबानें मराठ्यांमध्यें दुफळी करण्यास आणखीं काय केलें ? ताराबाईचे कारकीर्दींत मंडळाचा सगळा भार पडलेले तिघे ब्राह्मण कोणते ? हे तिघे काय करीत ? धनाजी काय करीत असे ? बादशाही छावणींत दाण्याचा दुष्काळ व पैशाची तूट कां पडे ? कोठें व कसा औरंगजेब वारला ?

---

## प्रकरण ६ वें.

# हिंदुपदपादशाही.

### शाहू; (१७०८–१७४९) ४१ वर्षें.

१. शाहूची सुटका; त्याचें दक्षिणेंत येणें; ताराबाईशीं युद्ध; कोल्हापुरच्या राज्याची स्थापना; फत्तेसिंग अक्कलकोटकर; शाहूस राज्य मिळतें. २. बाळाजी विश्वनाथ. ३. खटावकरांची पुंडाई; आंग्र्याशीं सलूख; पेशवाई बाळाजीस मिळते. ४. दिल्लीदरबारांत बाळाजीचा प्र-

वेश. ५. दक्षिणेंत एका स्वतंत्र राज्याची स्थापना. ६. बाळाजीचा मृत्यु; वंशवृक्ष. ७. बाजीरावास पेशवाईचा अधिकार मिळतो; बाजीरावाची खानदेशांत स्वारी. ८. निजामाशीं भांडण; त्याच्या प्रांतावर मुलुखगिरी; दाभाड्याशीं युद्ध. ९. बुंदेलखंडावरील स्वारी; जंजिऱ्याच्या शिद्याला कुमक. १०. दिल्लीवर स्वारी; पोर्तुगीजलोकांशीं युद्ध; तालभोपाळची लढाई; बाजीरावाचा मृत्यु; त्याच्या हाताखालीं वाढलेले सरदार. ११. नानासाहेब पेशवा; नागपुरकरांचें व नानासाहेबाचें वैर; त्याचा निकाल; शाहूचा मृत्यु; पेशव्यास स्वातंत्र्यप्राप्ति.

**६७. रायगड** पडला तेव्हांपासून **संभाजी**चा मुलगा **शिवाजी** कैदेंत होता. त्याला दिल्लीपति "शाहू" (साव) ह्मणे. त्याचे लाड करून **औरंगजेबा**च्या मुलीनें संरक्षण केलें. गादी मिळविल्यानंतर **शहाअलमनें**—जसें पूर्वीं औरंगजेबानें तसें—**शाहू**स दक्षिणची सुभेदारी देऊन पाठविलें. या प्रसंगीं **शहाअलमनें** कांहीं लश्करही बरोबर देऊन, विजयी झाल्यास सुभेदारीचा मुलूखही वाढविण्याचें वचन **शाहू**स दिलें होतें. **संताजी**च्या वधाच्या पश्चात् लुटीचें व्यसन मराठ्यांस लागलें होतें, तें पुढें अनिवार होत चाललें व लश्करांत शिस्त बिलकुल राहिली नाहीं. त्यामुळें लुटीपलीकडे कोणाचें लक्ष जाईनासें झालें व **शाहू** सुटल्यानें **दाभाडे, भोंसले** वगैरे बेशिस्त व बेबंद सरदारांचे दुधांत साखर पडली. शिस्त व व्यवस्था राखूं पहाणारी **ताराबाई, रामचंद्रपंता**सारख्या **शिस्त**खोर प्रधानांनिशीं आवडेनाशी होऊन या सरदारांनीं द्रोह चालविला व **शाहू**चा पक्ष उचलला. तरी **ताराबाई** डगमगली नाहीं. **रामचंद्रपंता**नेंही कच खाल्ला नाहीं आणि **परशुरामपंत** प्रतिनिधीस **धनाजी जाधव** व **खंडो बल्लाळ** चिटणीस या दोहोंस बरोबर घेऊन **शाहू**शीं टक्कर देण्यास पाठविलें. ज्या **धनाजी** जाधवास व **खंडो बल्लाळास, शहाअलम**च्या बापानें अंकित केलेला **शाहू** पूर्वीं नको होता त्यांसच **शहाअलमनें** अंकित केलेला **शाहू** आतां पसंत पडला. **धनाजी** व **खंडो बल्लाळ** या उभयतांनीं द्रोह आरंभिला. लढाईस सुरुवात होतांच कृतघ्न **धनाजी** सगळ्या

लश्करासहित व **खंडो बल्लाळा**सहित **शाहू**स जाऊन मिळाला. तेव्हां **परशुरामपंता**स पळावें लागलें व **शाहू**चें आयतें काम झालें. या वेळीं **शाहू**चें वय चोवीस वर्षांचें होतें.

आपल्या हातची सत्ता गेली असें पाहून **ताराबाई** कोल्हापुरास गेली आणि तेथें एका स्वतंत्र राज्याची तिनें स्थापना केली. हल्लींचें कोल्हापुरचें घराणें आहे, हा **ताराबाई**चाच वंश.

**शाहू** दिल्लीपतीचा अंकित झालेला दक्षिणेंत येत असतां एके गांवांत कोणी बाईनें आपलें लहान लेंकरूं आणून त्याच्या पायांवर ठेविलें आणि हें मूल तुह्मांस अर्पण केलें आहे असें बोलून ती बाई निघून गेली. लौकरच **ताराबाई**च्या लोकांची व **शाहू**ची लढाई वर वर्णन केल्याप्रमाणें जुंपली व तींत **शाहू**ला फत्ते मिळाली. तेव्हां त्या मुलाचें नांव **फत्तेसिंग** असें ठेवून त्याला एका संस्थानचा मालक केलें. तें संस्थान **अक्कलकोट** होय. **फत्तेसिंगा**चा वंश हल्लीं चालू आहे.

**६८. बाळाजी विश्वनाथ** हा मूळचा **धनाजी**चा कारकून. **धनाजी**बरोबर हा **शाहू**कडे गेला. हा **बाळाजी** मूळ **श्रीवर्धन**चा कुळकर्णी. श्रीवर्धन शिद्द्याच्या अंमलाखालीं आहे. **बाळाजी** मोठा हुशार, खोल मसलती आणि चांगला व्यवहारनिपुण असा होता. कांहीं वर्षांनीं **शाहू**कडून **बाळाजीस पेशवाई** मिळाली. पेशवा ह्मणजे कुलकारभारी; मुख्य प्रधान. हा पेशवाईचा अधिकार **बाळाजी**स मिळाला तो पुढें वंशपरंपरा चालला. सर्व सत्ता पेशव्यांच्याच हातीं असे. **शाहू**नेंही सगळा राज्यकारभार **बाळाजी विश्वनाथा**वर सोंपविला होता. तेव्हां दिल्लीपतीची ताबेदारी पत्करलेल्या **शाहू छत्रपती**च्या कारकीर्दीचें आणि त्याच्या पुढील सातारकर छत्रपतींच्या कारकीर्दीचें ह्मणजे पेशव्यांचेंच वर्णन होय.

**बाळाजी विश्वनाथ, १ ला पेशवा; इ० स० १७१४–२०. ६ वर्षें.**

**६९. बाळाजी विश्वनाथा**स **शाहू**नें एकदा **कृष्णराव खटावकर** ह्मणून एक ब्राह्मण जहागीरदार होता त्याच्यावर पाठविलें.

हा मोगलांच्या आश्रयास होता, व **बाळाजी**बरोबर **श्रीपतराव** प्रतिनिधि होता. **खटावकर शाहू**च्या राज्यास फार उपद्रव देऊं लागला. **श्रीपतराव** मोठा शूर होता ह्मणून **बाळाजीस खटावकर** कृष्णरावाचा पूर्ण पराभव करितां आला. या काळापासून **बाळाजी**चें वजन वाढत चाललें. इतक्यांत कोंकणचा **कान्होजी आंग्रे** प्रबळ होऊन **शाहू**च्या मुलुखावर स्वाऱ्या करूं लागला. तो **ताराबाई**च्या पक्षाकडे असे. **शाहू** खरा मालक नव्हे, असें तो समजे. त्याचें पारिपत्य करावें ह्मणून **शाहूनें बहिरोपंत पिंगळे** यास सैन्य देऊन पाठविलें. पण पराभव करून आंग्र्यानें **बहिरोपंतास** कैद केलें. त्याची सुटका करून **आंग्र्यास शाहू**च्या बाजूस ओढण्यासाठीं **बाळाजी विश्वनाथ** गेला. **बाळाजीनें** त्यास बराच नवीन मुलूख **शाहू**जवळून देवविण्याचें कबूल करून फत्ते मिळविली. त्यामुळें **शाहू** खुश झाला. **बहिरोपंता**कडे पेशवाईचा अधिकार होता, तो त्याच्याकडून काढून **बाळाजीस शाहूनें** दिला आणि **रामचंद्रपंत भानूस बाळाजी**ची फडनिशी सांगून **आबाजी** पुरंदऱ्यास **बाळाजी**ची मुतालिकी दिली.

इ. स. १७१४, बाळाजीस पेशवाईचा अधिकार मिळतो.

**७०. दिल्लीहून शंकराजी साताऱ्यास येतो.** अशा रीतीनें **शाहू**च्या राज्याचा बंदोबस्त चालला असतां, दिल्लीदरबारांत **अबदुल सय्यद** व **हुसेनखान सय्यद** या उभयतां बंधूंचें आणि बादशहा **फिरूकशियर** याचें बनेनासें झालें. ते बादशहाशीं भांडूं लागले. **शंकराजी मल्हार** नांवाचा **राजारामा**चे कारकीर्दीतील सचिव काशींत रहात होता त्यास आपल्या देशाचें कल्याण करावेंसें वाटून ज्ञातारपणीं पुनः मोंगलाची चाकरी पत्करण्याची इच्छा झाली. या **शंकराजीनें हुसेनखानास शाहू**कडून मदत मागण्याची मसलत दिली. तेव्हां **हुसेनखानानें शंकराजी**सच सातारा मुक्कामीं पाठविलें. "आम्हांस साहाय्य कराल तर दक्षिणेंतील सर्व मोंगलप्रांतांवर चौथाई व सरदेशमुखीहक्क व **शिवाजी**चा मोंग-

त्यांनीं घेतलेला प्रदेश देऊन आणखी कांहीं इतर जहागिरी देतों" असें **सय्यदबंधूंनीं शाहूस शंकराजी**च्या मार्फत कळविलें. त्याप्रमाणें **बाळाजी विश्वनाथ सय्यदबंधूंस** मदत करण्यासाठीं दिल्लीस गेला. **बाळाजी**बरोबर **खंडेराव दाभाडे** मोठें लश्कर घेऊन गेला होता. तेथें या **सय्यदांनीं फिरूकशियर** बादशहास ठार मारून आपल्या मर्जीस येईल त्याला गादीवर बसविण्यापर्यंत अधिकार संपादिला आणि अखेरीस **महंमदशहास** गादीवर बसवून वचन दिल्याप्रमाणें **शाहूस** सर्व हक्क, जहागीर वगैरे देऊन सैन्याच्या खर्चाबद्दल नक्त पैसेही दिले. **महंमदशहा** गादीवर बसेपर्यंत **दाभाडे सेनापति** व **पेशवे** उभयतां दिल्ली मुक्कामीं होते. पुढें लौकरच **शाहूची** आई व **बायको** यांस बरोबर घेऊन **पेशवे** व **सेनापति** उभयतां दक्षिणेकडे वळले.

**७१. दक्षिणेंत मराठी राज्याशेजारीं एका स्वतंत्र मुसलमानी राज्याची स्थापना.** **चिनकिलीचखान** म्हणून गुजराथचा व माळवाप्रांताचा मोंगल सुभेदार होता. त्यानें दिल्लीदरबारांत बंडाळी माजली आहे असें पाहून, दक्षिणेंत आपण एक राज्य स्थापावें असा विचार मनांत आणिला. आपलें सैन्य घेऊन लगेच तैलंगणच्या मध्यभागीं व मराठ्यांच्या सरहद्दीवर आपला ताबा **चिनकिलिचानें** बसविला. **सय्यदबंधु** दिल्लीस प्रबळ झाले होते, त्यांच्या हातीं बहुतेक ती गादी होती. तेव्हां **चिनकिलीचखानाचें** पारिपत्य करावें असें मनांत आणून **धाकटा सय्यद** दक्षिणेंत येऊं लागला. **चिनकिलीचखानानें** दगा करून आपल्या लोकांच्या मार्फत त्याला वाटेंतच ठार मारविलें. **थोरल्या सय्यदा**सही एका लढाईत कैद केलें. तेव्हां दिल्लीपतीनें सय्यदबंधूंच्या त्रासांतून आपणांस मोकळें केल्याबद्दल **चिनकिलीचखानास** आपली वजीरात दिली. पण पुढें **चिनकिलिचाचें** आणि बादशहाचें पटेना. तेव्हां मुकाट्यानें तो दक्षिणेंत आला आणि **निजामउलमुलुख** या नांवानें आपलें स्वतंत्र राज्य स्थापिता झाला. तो आपणांस **"निजाम"**


ह्मणवी. पण मराठे त्यास **नबाब** असेंच सर्वत्र म्हणत. याची राजधानी **हैद्राबाद** शहर होती. याच्याशीं पुढें मराठ्यांनीं पुष्कळ कटकटी केल्या त्यांची हकीकत क्रमवार येईलच.

**७२. बाळाजी विश्वनाथाचा मृत्यु. दिल्ली**हून आल्यानंतर **बाळाजी** लौकरच **सासवड** मुक्कामीं मृत्यु पावला. हा **पेशवाई** मिळविणारा मूळपुरुष. त्याच्या वंशजांकडे हा अधिकार पुढेंही चालत आला. त्याचा वृक्ष पुढें जोडला आहे.

इ० स० १७२०.
बाळाजीचा मृत्यु.

**७३. खंडेराव दाभाडे** दक्षिणेकडेस वळल्यानंतर, **औरंगाबाद**चा नायबसुभा **अलमअल्ली** याच्याकडे **शंकराजी मल्हार** हा **शाहू**चा वकील या नात्यानें होता. "निजामा"नें उचल केलेली पाहून, **शंकराजीनें** सय्यदाच्या मदतीस मराठ्यांस बोलाविलें. **कानोजी** भोंसले आणि **हैबतराव** निंबाळकर **शंकराजीस** येऊन मिळाले, इतक्यांत **खंडेराव** दाभाडेही येऊन मिळाला. **बाळापूर** मुक्कामीं निजामाशीं लढाई झाली तींत **अलमअल्ली** ठार झाला व **शंकराजी** जखमी होऊन शत्रूंच्या हातीं लागला. पुढें **धाकटा सय्यद** दक्षिणेंत येऊं लागला, त्याचा निजामानें खून करविला. ही हकीकत मागें सांगितलीच आहे.

**७४. बाळापुर**च्या लढाईतून येऊन **खंडेरावानें दमाजी** गायकवाडाची **शाहू**जवळ शौर्याच्या संबंधानें तारीफ केली. तेव्हां दमाजीस **समशेर बहादूर** हा किताब देऊन **खंडेरावा**च्या हाताखालीं **शाहूनें** नेमलें. हा **दमाजी** बडोदेकरांचा मूळपुरुष होय. परत आल्यानंतर **खंडेराव** व **दमाजी** हे लौकरच वारले. **खंडेरावाचा** मुलगा **त्रिंबकराव** यास **सेनापतीचीं** वस्त्रें मिळून **दमाजीचा** पुतण्या **पिलाजी** यास **समशेर बहादुरी शाहू**कडून मिळाली.




## बाजीराव ( १७२०–४० ) २० वर्षें.

**७६. बाळाजी विश्वनाथा**नंतर त्याच्या मुलाला **शाहू**नें आपला पेशवा केलें. हा मोठा पराक्रमी आणि कार्यधुरंधर होता. याच्या

कारकीर्दींत मराठ्यांची सत्ता फारच वाढली आणि मराठ्यांचा वचक साऱ्या हिंदुस्थान देशावर बसला.

**खानदेशांतील स्वाऱ्या**—खानदेश प्रांतांत स्वाऱ्या करून **मोकासपणा** ( ह्मणजे राज्यांतल्या उत्पन्नाचा पाऊण हिस्सा ) मिळवावा, हा **बाजीरावा**चा मुख्य हेतु होता. आपलें राज्य संभाळून दरसाल मराठ्यांचें सैन्य दुसऱ्यांच्या प्रांतांवर स्वाऱ्या करीत असे. या स्वाऱ्यांस **मुलुखगिरी** ह्मणत. परक्यांचें राज्य हळू हळू बळकावीत असावें, हाच ह्या मुलुखगिऱ्यांचा उद्देश. अशी मुलुखगिरी मराठ्यांनीं खानदेश प्रांतावर सुरू केली. तेव्हां बऱ्हाणपूरचा सुभेदार व **दाऊदखान** ह्मणून मोंगल सरदार यांनीं, **बाजीरावा**च्या आपल्या प्रांतावरील **मुलुखखगिऱ्या** बंद कराव्या म्हणून मोठें सैन्य तयार करून लढाईची तयारी चालविली. पण **बाजीरावा**पुढें त्यांचें कांहीं चालेना. त्या लढायांत त्यांचा पराभवच झाला. मुलुखगिरी करून **सरदेशमुखी** ह्मणजे उत्पन्नामागें शेंकडा दहा, **चौथाई** ह्मणजे शेंकडा पंचवीस, **मोकासा** ह्मणजे शेंकडा पंचाहत्तर, अशा प्रकारें वसुलाचे हक्क इतर राजे, नबाब वगैरेंवर मराठे बसवीत. या बाजीरावाच्या स्वाऱ्यांत तीन मराठ्यांनीं नांव गाजविण्यास आरंभ केला. पहिला **मल्हारराव होळकर** हा जातीचा धनगर. **नीरा** नदीवर **होळ** नांवाचा गांव आहे, तेथील **मल्हारराव** हा **चौगुले,** ह्मणजे पाटिलाचा मदतनीस. दुसरा **राणोजी शिंदे.** शिंद्याचें घराणें मूळचें कुलीन. पण गरीबी फार आली; ती इतकी कीं **राणोजी** पहिल्यानें **बाळाजी**च्या पागेंत बारगीर राहिला होता. तिसरा **उदाजी** पोंवार. उदाजीच्या बापास **रामचंद्रपंतानें राजारामा**च्या कारकीर्दींत पदरीं ठेविलें आणि तलवारबहादुरी पाहून नांवाजिलें. **उदाजीनें** माळव्यांत धारानगरीवरही स्वारी केली होती.

**७७. निजामाशीं भांडण.** "अशा प्रकारें मराठे दिवसेंदिवस प्रबळ होत चालले, त्यांना प्रतिबंध असा कोणाचाच नाहीं; न जाणो, यांच्या **मुलुखगिऱ्या** पुढें आपणावरच यावयाच्या; तेव्हां आतांपासूनच ह्यांचा प्रतिकार करावा" असा विचार **निजामउल्मुलुखानें**

केला. **सातारकर** आणि **कोल्हापुरकर** भाऊबंद; त्यांच्यांत भांडणें लागतील तर बरें, असें समजून त्या उद्योगास **निजामउल्मुलुख** लागला. हें वर्तमान **बाजीरावास** कळलें. तेव्हां हा **निजामाचा** कावा कळवून, आपली **मुलुखगिरी** यंदां निजामाकडे व्हावी अशी **शाहू**पाशीं **बाजीरावानें** गोष्ट काढिली. **शाहूनें** निजामावर स्वारी करण्यास लागलाच हुकूम दिला.

त्याप्रमाणें इ० स० १७२८ सालीं आपला मोर्चा **बाजीरावानें** हैद्राबादकर निजामाकडे वळविला. **शाहूस** अभिषेक झाल्यानंतर **धनाजी** लौकरच वारला. नंतर **धनाजी**चा मुलगा **चंद्रसेन** जाधव हा **शाहू**वर रागावून मोंगलांकडे वळला होता. हा **चंद्रसेन** जाधव या काळीं निजामाच्या पदरीं होता. कोल्हापूरकर **संभाजी**ही कुमक घेऊन निजामाच्या मदतीस आला होता. **निजामास** व त्याच्या लश्करास **बाजीरावानें** अशा एका प्रदेशांत कोंडलें कीं शिपायांस प्यायासही पाणी मिळेना. अशी स्थिति झाल्यामुळें **निजामास** मराठ्यांबरोबर तह करणें भाग पडलें. अशी आपली स्थिति लश्करानें केल्याबद्दल निजामानें **चंद्रसेन जाधवास** दोष दिला. तेव्हां 'लश्करांत सगळे मराठे नसून मोंगल मनस्वी भरले आहेत' अशा अर्थाचा उलट जबाब **चंद्रसेनानें** दिला.

पण तेवढ्यावरच **निजामउल्मुलुखास** स्वस्थ बसवेना. मराठ्यांचा झोरका **बाजीराव** फारच प्रबळ होतो, असें पाहून त्यानें दुसरीच एक युक्ति योजिली. **त्रिंबकराव दाभाड्याचा** आणि **बाजीरावाचा** वैरभाव होता, तो **निजामउल्मुलुखानें** ज्यास्त वाढविला. **बाजीरावाचा** पराभव करावा ह्मणून गुजराथेंत **दाभाडे** सैन्य गोळा करीत होता. अशा प्रसंगीं साहाय्य देण्याचें अभिवचन **दाभाड्याला** निजामानें दिलें. तेव्हां आपलें सैन्य घेऊन **त्रिंबकराव** निघाला. **निजामाचें** सैन्य येऊन **त्रिंबकरावास** मिळणार, तोंच **बाजीरावानें दाभाड्यास** गांठलें. गुजराथेंत बडोदें व डभोई या दोहोंच्या दरम्यान मोठी अरेतुरेची लढाई झाली. गोळीनें **त्रिंबकराव** ठार झाला आणि **बाजी-**

इ० स० १७३१, त्रिंबकरावाशीं युद्ध.

**रावास** मोठा जय मिळाला. निजामानें लगेच बाजू बदलली आणि मोठा स्नेहभाव दाखवून दिल्लींत चाललेल्या घोटाळ्यांत हात घालण्याची मसलत **बाजीरावास** दिली.

**७८. बुंदेलखंडावरील स्वारीः**—बुंदेलखंडांत **छत्रसाल** नांवाचा राजा होता. माळवाप्रांतांत **बंगश महमदखान** ह्मणून सुभेदार होता त्यानें **छत्रसालावर** स्वारी केली. छत्रसालानें **बाजीरावाची** मदत मागितली. **बाजीरावानें** जाऊन मोंगलांचा पराभव केला त्या कामगिरीबद्दल सव्वादोन लाखांचा मुलूख **बाजीरावास** जहागीर मिळाला. इतकेंच नाहीं, तर **बाजीराव** आपला एक मुलगा असें समजून **छत्रसालानें** आपल्या पश्चात् आपल्या राज्यांतील तिसरा हिस्सा **बाजीरावास** दिला.

इ०स०१७३१, बुंदेलखंडांतील स्वारी.

**७९. जंजिऱ्यांच्या शिद्याशीं तह.** जंजिरेकरावर **शाहूनें** **श्रीपतराव** प्रतिनिधीस पाठविलें होतें. **श्रीपतराव** हा मोठा धोरणी व शूर होता. "महाराष्ट्रमंडळ पहिल्यानें एकवटून व त्यांत नीट व्यवस्था लावून, नंतर नर्मदेवरील घोटाळ्यांत हात घालावा" असें **श्रीपतरावाचें** पहिल्यापासून ह्मणणें होतें. "एकवटण्याच्या किंवा व्यवस्था लावण्याच्या भानगडींत बिलकूल न पडतां पहिल्यानें दिल्लीकडील घोटाळ्यांत हात घालावा" अशी **बाजीरावानें** **शाहूस** मसलत दिली. ही **शाहूस** पसंत पडली, व तेव्हांपासून **श्रीपतरावावर** जशी बाजीरावाची तशी बाजीरावाचा धाकटा बंधु **चिमणाजी** याचीही वक्रदृष्टि राहिली. जंजिरेकरावर पाठविलेल्या **श्रीपतरावास** मदत करण्यास जावें, अशीं स्वदस्तूरचीं पत्रें **शाहूनें** **चिमणाजीस** पाठविलीं. तरी **चिमणाजी** गेला नाहीं. तेव्हां **श्रीपतरावाचा** मोड झाला. पुढें **बाजीराव** बुंदेलखंडांतून आला, तेव्हां **शाहूनें** त्यास जंजिरेकरावर पाठविलें. **बाजीरावानें** कांहीं मुलूख देऊन व कांहीं मुलूख घेऊन **शिद्याशीं** तह केला आणि जो मुलूख घेतला त्याची सनदही **शाहू**कडून मिळविली.

**८०. दिल्लीवरील स्वारीः**—दिल्लीकडे चाललेल्या घोटाळ्यांत **बाजीरावानें** पुनः हात घातला. या प्रसंगीं **राणोजी शिंदे** व **मल्हारराव होळकर** या दोहोंनींही, ज्या चकमकी झडत त्यांमध्यें तलवार चांगली गाजविली. लौकरच माळव्याची सुभेदारी व १३ लाख रुपये मिळाल्यानंतर, **बाजीरावा**ची स्वारी दक्षिणेकडेस वळली.

इ० स० १७३६, बाजीरावाची दिल्लीवरील स्वारी.

**पोर्तुगीज लोकांशीं मराठ्यांचें युद्ध.** कबूल केलेला मुलूख **सातार**च्या दरबारांतून न मिळाल्यामुळें **पोर्तुगीज** लोकांनीं कुलाब्यास उपद्रव देण्याचें काम चालविलें. तेव्हां **चिमणाजी**ची पोर्तुगिजांचें पारिपत्य करण्याचे कामीं योजना झाली.

या भांडणांत मराठ्यांचा नाश मनस्वी झाला खरा. पण **वसई**चा किल्ला शेवटीं हस्तगत झाला आणि **पोर्तुगिजां**चा अंमल ढिला पडला. **वसई** घेण्याचें मोठें काम करून, **चिमणाजीनें** आपली तलवार गाजविली.

इ० स० १७३९.

**भोपाळची लढाई. वसई** पडण्याचे पूर्वीं कांहीं महिने **बाजीरावा**ची आणि **निजामा**ची गांठ **भोपाळा**जवळ पडली. रोज चकमकी झडत. पण **बाजीरावानें** चौतर्फा घेरून टाकल्यामुळें निरुपाय होऊन **निजामानें** तह केला. या तहाअन्वयें खर्चाबद्दल ५० लाख रुपये, माळवा प्रांत व नर्मदा आणि चंबळा या नद्यांतील सगळा मुलूख **बाजीरावास** मिळाला.

याच सुमारास **नादिरशाहा** नांवाचा इराणचा बादशहा होता, त्यानें दिल्लीवर स्वारी केली आणि उमाप लूट आपल्या मुलुखीं नेली. **बाजीरावा**चा आणि **निजामा**चा तंटा पुनः जुंपला. पण विशेष निष्पन्न न होतां **बाजीरावानें** अखेरीस कंटाळून **मुंगी पैठणचा** तह केला. खिन्न व उदास होऊन **बाजीरावानें** दिल्लीची दिशा धरली. पण दिल्लीस पोंचण्याचे पूर्वींच नर्मदेच्या तीरीं **बाजीरावास** देवाज्ञा झाली. **बाजीराव**

इ. स. १७४०, बाजीरावाचा मृत्यु.

मोठा शूर होता व लष्करी धोरणही त्यास पुष्कळ होतें. **बाजीरावापेक्षां** अधिक लष्करी धोरणाचा दुसरा पेशवा झाला नाहीं.

## नानासाहेब पेशवा. १७४०—६१. २१ वर्षें.

**८१. बाजीरावानंतर** पेशवाईचीं वस्त्रें त्याचा वडील मुलगा **नानासाहेब** यास न मिळतां **बाबूजी नाईक** बारामतीकर यास मिळावीं, ह्मणून **रघोजी भोंसले नागपूरकर** यानें बरीच खटपट केली. पण **चिमणाजी**च्या शिफारशीनें पेशवाईचीं वस्त्रें **शाहू**कडून **नानासाहेबा**सच मिळालीं. **बाबूजी** नायकानें **बाजीरावास** दिलेल्या कर्जाचा फडशा करून टाकण्याविषयीं तगादा **नानासाहेबास** लाविला. तेव्हां मध्यस्थी करून **महादजी**पंत **पुरंद्ऱ्यानें** बारामतीकराची समजूत घातली आणि **नानासाहेबास** त्यांतून सोडविलें. **बाबूजी** नाईक बारामतीकर हा **मोरोपंत कवी**चा आश्रयदाता होय!

इ. स० १७४९, शाहू राजा वारला.

एकेचाळीस वर्षें राज्य केल्यानंतर, दिल्लीची ताबेदारी स्वीकारलेला **शाहू राजा नानासाहेबा**च्या पेशवाईंत वारला. तो निपुत्रिक होता. त्याच्या मागें सगळी सत्ता पेशव्यांकडे गेली आणि सातारकर शुद्ध बाहुलीप्रमाणें झाले.

## पांचव्या प्रकरणावर प्रश्न.

संभाजीचा मुलगा कोठें होता? शाहू कोण? कोणत्या ब्राह्मणाचा या काळीं मराठे सरदारांनीं द्रोह चालविला? मराठ्यांमध्यें दुफळी व्हावी म्हणून शहाअलमनें पुनः काय केलें? आणखी शहाअलमनें काय केलें? संभाजीचा मुलगा कोण? त्यास शाहू कोण ह्मणे? त्याची सुटका कशी झाली? शाहूस गादी कशी मिळाली? कोल्हापूरची गादी कोणीं स्थापिली? फत्तेसिंग अक्कलकोटकर हा कोण? शाहूस राज्य कधीं मिळालें?

**६८.** धनाजीचा बाळाजी कोण? बाळाजी विश्वनाथ मूळचा कोठला राहणारा? त्याला पेशवाईपद कोणीं दिलें?

६९. आंग्र्याच्या पारिपत्यास शाहूनें कोणास पाठविलें? त्या कामगिरीबद्दल शाहूनें काय दिलें? बाळाजीस पेशवाई कधीं मिळाली? फडणिशी कोणाला सांगितली?

७०. दिल्लीस बादशहा कोण होता? सय्यद बंधु कोण? आपणांस साहाय्य करण्याकरितां सय्यदांनीं काय देऊं केलें? ही सगळी खटपट कोणामुळें झाली? शंकराजी मूळचा कोण? काशीस कां गेला, पुनः राजकारणी खटपटींत कां पडला?

७१. चिनकिलीचखान कोण? धाकटा सय्यद दक्षिणेंत कां येत होता? त्याचें काय झालें? थोरल्या सय्यदाचें अखेरीस काय झालें? चिनकिलीचखानास दिल्लीच्या बादशहानें काय दिलें?

७२. बाळाजी कधीं वारला? त्याच्या पाठीं पेशवाई कोणाकडे चालली?

७३. बाळापूरची लढाई वर्णन करा.

७४. दमाजीस काय मिळालें?

७५. बाळाजीच्या वंशजांचीं नांवें सांगा.

७६. उदाजी कोण? राणोजी कोण? मल्हारराव जातीचा कोण? त्याचें होळकर नांव कसें पडलें?

७७. त्रिंबकरावाची व बाजीरावाची लढाई कोठें झाली? शेवट काय झाला?

७८. बुंदेलखंडांत कोण राजा होता? त्यानें बाजीरावाचें कां साहाय्य मागितलें? त्याला साहाय्य केल्यापासून बाजीरावास काय मिळालें?

७९. जंजिरेकरांवर स्वारी केली तींत श्रीपतरावाची फत्ते कां झाली नाहीं? श्रीपतरावावर चिमणाजीची वक्रदृष्टि कां?

८०. बाजीरावानें दिल्लीकडे जाऊन काय मिळविलें? वसई पोर्तुगिजांपासून कोणीं घेतली? भोपाळची लढाई कधीं व कोणांमध्यें झाली? या लढाईपासून बाजीरावास काय काय मिळालें? बाजीराव कधीं व कोठें वारला? बाजीरावाचें थोडक्यांत वर्णन करा.

८१. बाजीरावानंतर पेशवाईचा अधिकार कोणास मिळाला?

नागपूरकरानें पेशवाई कोणास मिळावी ह्मणून खटपट चालविली? मोरोपंतकवीचा आश्रयदाता कोण? शाहू कधीं वारला? त्याच्या पश्चात् सातारकरांची स्थिति कशी झाली?

---

## प्रकरण ६ वें.

### रामराजा. १७४९–७७ (२८ वर्षे).

१ राज्यप्राप्ति. २ नानासाहेबाची कर्नाटकावर मोहीम. गुजराथेवर स्वारी; आंग्र्याचें शासन; राघोबाची उत्तरेकडील स्वारी; राघोबाची व सदाशिवरावाची बोलाचाली व त्याचा निकाल. ३ उदयगिरीची लढाई; अबदालीची स्वारी; पानपतची लढाई; मराठ्यांचा पराभव; नानासाहेबांचा मृत्यु. ४ माधवरावास पेशवाईचीं वस्त्रें; राघोबाचें व माधवरावाचें वैर. ५ निजामअल्लीशीं युद्ध; विठ्ठल सुंदर ठार होतो. ६ हैदरावरील मोहीम. तहाचीं बोलणीं. ७ नागपूरकराशीं कलागती; हैदराशीं पुनः तंटा; माधवरावाचा मृत्यु. ९ नारायणराव; त्याचा वध. १० राघोबास पेशवाई मिळते; कारभारी मंडळी त्याच्या हातून अधिकार काढून घेते. ११ सवाईमाधवराव. १२ राघोबा इंग्रजांकडे जातो; पुरंदरचा तह. १३ रामराजाचा मृत्यु.

**८२.** मरते वेळीं शाहूनें आज्ञा केल्याप्रमाणें ताराबाईच्या नातवास **सातार**ची गादी मिळाली. या नातवाचें नांव **रामराजा. शाहू**च्या मरणानंतर जेव्हां पेशव्यांस स्वतंत्रता मिळाली, तेव्हां त्यांस **साताऱ्यास** येण्याचें कारण पडेनासें झालें. ह्मणून **शाहू**च्या पश्चात् राज्यच पेशव्यांचें होऊन, **पुणें** शहरास राजधानीपणा मिळाला.

इ० स० १७५०, पुणें शहर पेशव्यांची राजधानी होतें.

**८३. नानासाहेबाची कर्नाटकावर मोहीम.** बाजीरावाला कर्नाटकाकडे लक्ष देण्याला फारशी फुरसत नव्हती. **कर्नाटकां**तील **शहाजी**ची जहागीर **शिवाजी**चा सावत्र भाऊ **व्यंकोजी** याच्या वंशाकडे होती. **व्यंकोजी** याचा वंश **तंजावर**

मुक्कामीं रहात असे. **अर्काट, कडप्पा** वगैरे मुलूख मुसलमान नबाबांकडे असून म्हैसूरसारखें बरेंच मोठें राज्यही कर्नाटकांत राहिलेलें होतें. अशा मुलुखांत मुलुखगिरी **नाना**साहेबानें आरंभिली. मुलूख लुटून बराच पैसा **नाना**साहेबानें या स्वारींत आणिला. जिकडे तिकडे ढवळाढवळ करून अव्यवस्था माजविण्याचा आणि स्वराज्यांतही व्यवस्था न ठेवण्याचा परिणामीं अतिघातुक असा क्रम पहिल्या **बाजीरावानें** आरंभिला, तो **नाना**साहेबानेंही पुढें चालविला. याच क्रमामुळें आमच्या मंडळाचा अखेरीस घात झाला.

इ० स० १७५३, कर्नाटकची स्वारी.

**गुजराथ व अजमीर प्रांतांतल्या मोहिमा.** कर्नाटकांतून पैसे येतांच पेशव्याचा भाऊ **राघोबा** मोठें सैन्य घेऊन **गुजराथ**प्रांतीं गेला. **दमाजी गायकवाड** आणि **राघोबा** यांनीं **अमदाबाद** किल्ला कबजांत घेतला. पुढें **दत्ताजी शिंदे** आणि **मल्हारराव होळकरा**चा मुलगा **खंडेराव** यांस बरोबर घेऊन राघोबा **अजमीर** प्रांताकडे वळला. रजपुतांपासून खंडण्या मिळाल्यानंतर "जाटां"च्या "कुंभेरी" किल्ल्यास मराठ्यांचा वेढा पडला. या वेढ्यांत **खंडेराव** होळकर पडला. लौकरच "जाटां"नींही खंडणी देण्याचें कबूल केलें. **आंग्र्या**चें आणि पेशव्याचें पुष्कळ दिवसांपासून वैमनस्य होतें. **आंग्र्या**ची भाईबंदी कोल्हापुरकर व सावंतवाडीकर या उभयतांशीं विशेष असून, हे त्रिवर्ग पेशव्यांच्या मुलुखास उपद्रव देत असत. **आंग्र्या**चें पारिपत्य करण्यासाठीं **इंग्रजां**ची मदत पहिल्यानें **नाना**साहेबानें मागितली. इंग्रजांची मदत मिळाल्यामुळें **सुवर्णदुर्गा**पर्यंत मुलूख पेशव्यांस काबीज करितां आला. **इंग्रजां**नीं आपली तलवार समुद्रावर गाजवून, चार दिवसांत **सुवर्णदुर्गे**चा किल्ला काबीज केला. लौकरच ८०० गोऱ्या व १००० काळ्या शिपायांनीं भरलेलीं १४ मन्वारीं इंग्रजांस कुमक

इ० स० १७५५, गुजराथप्रांतावर स्वारी.

इ० स० १७५५, आंग्र्यावरील स्वारी.

करण्यासाठीं येऊन दाखल झालीं आणि **विजयदुर्गा**स वेढा पडला. मन्वारांच्या **सर्नोबता**चें नांव "वाटसन" होतें. **विजयदुर्ग**ही पडलें. गोळा चाललेला असतां एक कुलपी गोळा **आंग्र्या**च्या एका मन्वारांत फुटला आणि मन्वार पेटलें. त्यामुळें **आंग्र्या**चें सगळें आरमार पेटलें. आणि एक तासांत खाक होऊन गेलें. **तुळाजी** आंग्र्यास व त्याच्या कबिल्यासही पकडून इंग्रजांनीं पेशव्यांच्या हवालीं केलें. याप्रमाणें इंग्रजांचा पाय कोंकणच्या किनाऱ्यावर पेशव्यांकडून कायम करण्यांत आला.

**८४. राघोबाची पंजाबावर मोहीम. मल्हारराव** होळकर आणि **राघोबा** यांनीं सारा **पंजाब** प्रांत या काळीं केवळ लुटारू बनलेल्या मराठ्यांच्या रिवाजास अनुसरून उद्ध्वस्त करून टाकला. सर्वत्र ढवळाढवळ करून अव्यवस्था माजविणें यांतच मोठा मुत्सद्दीपणा

इ० स० १७५८, पंजाबावर राघोबा स्वारी करितो.

**नानासाहेब** वगैरे मंडळी समजूं लागली; ह्मणून आपल्या मंडळांतही व्यवस्था न लावितां व शिस्तीचा धाक न ठेवितां, या मंडळीनें सर्वत्र बखेडा माजविला. **अबदालीनें पंजाब** प्रांत काबीज करून आपला सुभेदार **लाहोरास** ठेविला होता त्याला **राघोबानें** पहिल्यानें हाकवून लाविलें; पण विचार केला नाहीं कीं इतका दूरचा मुलूख राखतां तरी कसा येईल. जरीपटका कांहीं दिवस **लाहोर** मुक्कामीं फडकला, हा मात्र फायदा हवा असल्यास ह्मणावा. पण नक्त ऐवज सांगण्यासारखा न मिळाल्यामुळें उलट **राघोबास** कर्ज पुष्कळ झालें आणि अखेरीस असल्या थिल्लर मुत्सद्दीपणाचें कडूजहर फळ आमच्या मंडळास **पाणिपत**च्या लढाईत घशाखालीं उतरवावें लागलें. कर्ज झाल्यामुळें **सदाशिवराव राघोबास** टाकून बोलले, तें **राघोबास** सहन झालें नाहीं. त्यामुळें इतउत्तर **राघोबानें** मुलकी काम पाहून **सदाशिवरावानें** फौजेचा कारभार संभाळावा, असें ठरलें.

**८५. उदयगिरीची लढाई. निजामाचें अहमदनगर** शहर एका कारकुनानें किल्लेदारास धनप्रयोग केल्यामुळें पेशव्यांस मिळालें. जरी **हैदराबादकरांच्या** मुलुखांत या काळीं बखेडा मनस्वी माजला होता, तरी युद्धाची तयारी करून **निजामअल्ली** मराठ्यांवर आला. **सदाशिवरावभाऊ** या प्रसंगीं सेनापति होते. तोफखाना या प्रसंगीं **इब्राहिमखान गार्द्या**कडे होता. उभय सैन्यांची गांठ **मांजरा** नदीच्या तीरीं **उदयगिरी** येथें पडली. **इब्राहिमखानाच्या** लोकांच्या गोळ्यांनीं शत्रूच्या लष्करांत कहर करून सोडिला. तीन हजार लोक ठार झाले, असें पाहून **निजामअल्लीच्या** तोंडचें पाणी पळालें आणि आपलें मोर्तब **सदाशिवरावाकडे** पाठविलें. इतका **निजामअल्ली** जर्जर झाला. सुमारें पांसष्ट लाखांचा मुलूख घेऊन **भाऊसाहेबांनीं** निजामाशीं तह केला.

इ० स० १७६०, निजाम व पेशवे यांच्यांत तह होतो.

**अहमदशहा अबदालीची स्वारी—राघोबानें लाहोरां**तून आपल्या सुभेदारास हांकवून लाविलेलें पाहून **अबदालीस** फार राग आला. त्या संतापासरसें मोठें सैन्य घेऊन मराठ्यांचें पारिपत्य करावें या इच्छेनें **अबदाली** हिंदुस्थानांत आला. त्यानें मराठ्यांच्या सुभेदारांस पंजाबांतून हांकवून लाविलें आणि **शिंदे, होळकर** यांचाही पुरा मोड केला. हें वर्तमान पुण्यास कळतांच **सदाशिवराव** भाऊ मोठें सैन्य घेऊन **अबदालीचें** पारिपत्य करण्यास निघाले. झाडून सर्व मराठे सरदार **भाऊसाहेबांबरोबर** होते. **नानासाहेबांचा** वडील मुलगा **विश्वासराव** हाही या स्वारींत होता. मराठ्यांचें सर्व सैन्य सुमारें दोन लाख होतें. दिल्लीस जाऊन तें शहर मराठ्यांनीं आपल्या कबजांत घेतलें. अबदालीनें हळूच आपलें सैन्य यमुनापार उतरविलें. **कुंजपुऱ्यांत** जाऊन मराठ्यांनीं त्या शहराची फार नासाडी केली आणि **अबदालीच्या** **कुतुबशाहा** नांवाच्या सेंद्यास हाल हाल करून ठार मारिलें. **पानिपता**जवळ दोन्ही लष्करें तळ देऊन बसल्यानंतर लहान लहान लढाया अनेक झाल्या;

पण मराठ्यांस सांगण्यासारखा फायदा झाला नाहीं. **मल्हारराव** होळकर वगैरे मंडळींनें हळू हळू हटत जाऊन **अबदाली**च्या लष्करास उपद्रव देण्याची अत्युत्तम युक्ति सुचविली. पण ती **भाऊसाहेबांस** पसंत पडली नाहीं. अखेरीस चौतर्फा **अबदालीनें** मराठ्यांस घेरलें. दिवसेंदिवस मराठे निराश होत चालले. अखेरीस जिवावर उदार झालेल्या मराठ्यांनीं एके दिवशीं "हर हर महादेव" करून निकराची लढाई आरंभिली. पहिल्यानें अफगाणांनीं थोडा कच खाल्ला. पण ही बातमी कळतांच **अहमदशहा** घोड्यावर स्वार होऊन जिकडे तिकडे नेटानें थावराथावर करीत सुटला. तेव्हां मराठ्यांचा पुरा मोड झाला. **विश्वासराव** आरंभींच गोळी लागून पडला. तेव्हां **भाऊसाहेब** एकदां गर्दीत शिरले ते पुनः दृष्टीस पडले नाहींत. इतका मराठ्यांचा फजिता **शिवाजी**च्या काळापासून हा काळपर्यंत झालेला नव्हता. जवळ जवळ दोन लाख मराठ्यांनीं आपल्या रक्तानें पानिपतची भूमी भिजविली. हें

इ० स० १७६१, पानिपतची लढाई.

पराभवाचें दुःख सहन न होऊन **नानासाहेबांची** कंबर खचली आणि त्यामुळें थोड्याच दिवसांनीं ते वारले.

इ० स० १७६१, नानासाहेबांचा मृत्यु.

## माधवराव १७६१–७२ ( १२ वर्षें. )

८६. **नानासाहेबाचा** पहिला मुलगा **विश्वासराव** पानिपतच्या लढाईत पडल्यामुळें दुसरा मुलगा **माधवराव** यास पेशवाईचीं वस्त्रें **रामराजानें** दिलीं. पेशव्यांच्या कुळांत **माधवरावासारखा** पेशवा जन्मला नाहीं. वस्त्रें मिळालीं तेव्हां **माधवराव** केवळ सत्रा वर्षांचा मुलगा होता, ह्मणून सर्व कारभार त्याचा चुलता **राघोबा** पहात असे. राज्याचा विभाग होऊन अर्धा वांटा **माधवरावास** मिळावा व अर्धा आपणास मिळावा, असा विचार **राघोबाच्या** मनांत आला. तशांत त्याची बायको **आनंदीबाई**, हीही सरळ स्वभावाची आणि थोर दिलाची नव्हती. त्यामुळें पुतण्याचुलत्यांचें बनेना. **माधवरावाची** आई **गोपिकाबाई** हिचें **राघोबाशीं** किंवा

**आनंदीबाई**शीं पूर्वीपासूनच पडत नव्हतें. तिनें **राघोबास** कैद करण्याची खटपट चालविली. **त्रिंबकराव पेंठे** यास **गोपिकाबाई**नें राज्यकारभाराचें काम सांगितलें आणि **गोपाळराव पटवर्धन** यांस नायब दिवाणीच्या जागेवर नेमून, **बाळाजी जनार्दन भानू** ऊर्फ **नानाफडणीस** यास **फड** दिलें. नंतर **राघोबास** कैद करणार, इतक्यांत बातमी बाहेर फुटली आणि **राघोबा** वगैरे मंडळी पहिल्यानें **नाशिकास** व नाशिकाहून **औरंगाबादेस** निघून गेली. **औरंगाबाद**चा सुभेदार **मुरारखान** यानें **राघोबाचा** मोठा मान ठेविला.

**राघोबाचें व माधवरावाचें युद्ध.—राघोबा**नें आपल्या तर्फेचे सर्व सरदार एकत्र करून पुणें शहरावर चाल करण्याचा निश्चय केला. पंचवीस हजार स्वारांनिशीं मदत करण्यासाठीं **निजामअल्लीस राघोबा**नें सांगून पाठविलें. **जानोजी** भोंसले नागपुराहून **राघोबा**च्या मदतीस येणार, अशीही बातमी होतीच. अशा प्रकारें तयारी करून **राघोबा** औरंगाबादेहून निघाला. पुणें व अहमदनगर यांच्या दरम्यान **माधवरावा**च्या लष्कराची गांठ पडली. **राघोबा**च्या लष्करापुढें **माधवरावा**च्या लष्कराचा टिकाव लागला नाहीं आणि पुणेंशहरीं राज्यक्रांती होण्याचीं चिन्हें चमकूं लागलीं. **माधवराव** वयानें जरी लहान होता तरी धोरणानें थोर आणि दिलानें उदार होता. घरफूट नापसंत करून **माधवराव** पुढें सरसावला आणि " काका, आपल्या घरांत कलह असणें हें आपल्या नाशाचें कारण आहे, याकरितां मी आपल्या ताब्यांत राहतों, आपण राज्यकारभार चालवावा " अशा अर्थाचा गंभीर उद्गार त्यानें काढिला. याप्रमाणें ज्ञात्याऱ्यांनींही उदाहरण घेण्याजोगा शहाणपणाचा कित्ता घालून, **माधवरावा**नें घरफूट मिटविली. याप्रमाणें कारभार हातीं आल्यानंतर **विठ्ठल शिवदेव** (विंचूरकरांचा मूळपुरुष) यास मोठा हुद्दा देऊन, **भानू**च्या घराण्यांत चालत आलेली फडणिशी **राघोबा**नें चिंतो विठ्ठलास दिली; इतकेंच नाहीं, तर मिरजेचा किल्ला हल्ला करून घेऊन, गोपाळराव पटवर्धनावरही **राघोबा**नें सूड काढिला

८७. **निजामअल्लीशीं युद्ध.**—**राघोबानें** ज्यांचें ज्यांचें याप्रमाणें नुकसान केलें, ते सगळे **निजामअल्लीस** जाऊन मिळाले. तशांत **राघोबाच्या** कुमकेस पूर्वीं सैन्य पाठविलें होतें, तें येऊन मिळण्यापूर्वींच **राघोबाचा** व पेशव्यांचा समेट झाला, आणि स्वतः-चा सांगण्यासारखा फायदा झाला नाहीं; ह्मणून **निजामास** फार वाईट वाटलें होतें. त्यामुळें दुधांत साखर पडावी तसें **निजामअल्लीस** झालें आणि पेशव्यांस बुडविण्यास ही संधि अति उत्तम आहे असें वाटून त्यानें लढाईची तयारी केली. या काळीं निजामअल्लीचा मुख्य दिवाण **विठ्ठल सुंदर** नांवाचा ब्राह्मण होता. **राघोबानें**ही आपणाकडून तयारी चालविली. **माधवरावास राघोबानें** जरी कैदेंत ठेविलें होतें, तरी **राघोबाच्या** हिताची जी मसलत तीच **माधवरावानें** दिली. पुतण्ये असावे तर माधवरावासारखे असावे. **मल्हारराव होळकर** व **दमाजी गायकवाड** या दोघांचेंही पाठबळ **राघोबास** या प्रसंगीं चांगलें होतें. **मल्हारराव** वगैरे मंडळी निजामाचा मुलूख जाळून खाक व लुटून फन्ना करीत सुटली. **नागपूरकरांचा** मुलूख मराठ्यांनीं उध्वस्त करून टाकला. हाच क्रम **निजामअल्लीनें** व त्याच्या सरदारांनीं चालविला. **नागपूरच्या** एका लष्करी कामगारानें पुणेंशहर लुटून फन्ना केलें, आणि बराच भाग जाळून खाक केला. लौकरच **राघोबानें** नागपूरकरास **निजामअल्लीकडून** फोडलें. त्यामुळें गोदावरीवर "राक्षसभुवना" नजीक दोन लष्करांची गांठ पडली असतां "शिपायांचा पगार अजून पोंचला नाहीं" या बहाण्यानें **जानोजी** भोंसले बऱ्याच अंतरावर जाऊन राहिला. ही बातमी कळतांच **राघोबानें** निकरानें हल्ला केला. लढाई मोठी अरेतुरेची झाली. तींत **विठ्ठल सुंदर** ठार झाला. **राघोबानें** आपली तलवार या लढाईंत नीट गाजविली. **सखाराम** हरि व नजरकैदेंत ठेविलेला **माधवराव** या उभयतांनीं मनापासून मदत केली, म्हणून **राघोबाच्या** तलवारीस या प्रसंगीं यश आलें. मोंगलांच्या बाजूस ठार व जायां झालेले मिळून १००००लोक पडले. या लढाईस **तांदुळजाची** लढाई म्हणतात. तह झाल्यानंतर करा-

राप्रमाणें मुलुखाच्या सनदा देतांना, कृतघ्नपणाबद्दल **जानोजी भोंसल्या**चा माधवरावानें पुष्कळ निषेध केला.

**८८. हैदरावरील मोहीम.—म्हैसूरप्रांतीं** आपल्या **हिंदु** धन्याची गादी बळकाविल्यानंतर हळूहळू **हैदरअल्ली**च्या मुलुखाची हद्द मराठ्यांच्या मुलुखास येऊन लागली.

इ० स० १७६३ त **वेदनूर** सर करून **राणी**स व तिच्या दत्तक मुलास **हैदरानें** कैद केलें. दुसरे वर्षाचे आरंभींच **हैदरानें** स्वतः स्वारी करून **सावनूर**च्या नबाबाचा मोड केला व "**फझलउल्लाखाना**" स या प्रांतीं व्यवस्था लाविण्यासाठीं ठेवून **हैदर** **बेदनूरीं** परत गेला. **सावनूरकरानें** पेशव्यांची मदत मागितली. **माधवरावानें** स्वतः जाण्याचा आग्रह धरल्यामुळें **राघोबा** रुसून **नाशिका**कडे गेला. पुढें **माधवराव** ३०००० प्यादे व ३०००० स्वार घेऊन **कर्नाटकां**त शिरला. **गोपाळराव** पटवर्धनास पूर्वी **माधवरावानें** पाठविलें होतें; पण त्याचा **फझलउल्लानें** पुरा मोड केला होता. **माधवराव** ६०००० लष्कर घेऊन येतो हें समजतांच **फझलउल्ला** थोडा पाठीं हटला आणि **हैदरास** मिळाला. **हैदरा**जवळ २०००० स्वार व ४०००० प्यादे होते. **माधवरावाचे** अंगीं **बाजीरावाचें** लष्करी धोरण भरलेलें होतें. **हैदरास** थोडें थोडें लष्कर गमवीत जाऊन पीछेहट करणें भाग पडलें. या प्रसंगीं **संताजी घोरपड्या**चा वंशज **मुरारराव** हा स्वतंत्रपणें मुसलमानांच्या मुलुखास उपद्रव करीत असे, तो **माधवरावास** येऊन मिळाला. **नानासाहेबांचे** कारकीर्दींत "सेनापती"चें ही पद **ब्राह्मणांनीं** बळकाविलें होतें, तें **माधवरावानें** **मुराररावास** या प्रसंगीं देऊन **संताजी घोरपड्याची** मोठी तारीफ केली. हें **माधवरावाचें** धोरण सामान्य नव्हे. पुढें **धारवाड** वगैरे शहरें काबीज केल्यानंतर मराठ्यांस यश निखालस येणार असें पाहून थोर मनानें **राघोबास** सगळें यश घेण्यासाठीं **माधवरावानें** बोलाविलें, तेव्हां **राघोबा**ही आला. पुढें **हैदरानें** तहाचें बोलणें चालविलें व

इ. स. १७६५.

तहही झाला. तह जरी **माधवरावास** नापसंत होता, तरी **राघोबानें** आपण सगळी मुख्त्यारी दिल्यामुळें केला, ही मुख्य गोष्ट लक्षांत ठेवून कोणतीही तक्रार न करितां तो माधवरावानें मंजूर केला.

इ० स० १७६८.

या सालीं **दमाजी गायकवाड** व **मल्हाररावाचा** दिवाण **गंगाधर** या दोहोंच्या मसलतीनें **राघोबानें** पेशवाई बळकाविण्याचा विचार केला. **नागपूरकराचीही** मदत यावयाची होती. पण **माधवरावानें** एकाएकीं हल्ला करून फौजेची दाणादाण केली आणि **राघोबास** कैद करून पुणेंमुक्कामीं पेशव्यांच्या वाड्यांत ठेविलें.

इ० स० १७६९, नागपूरकरांशीं तंटा.

**८९. नागपूरकर भोंसल्यांशीं कलागत.—नागपूरकर** स्वतःस **सातारकरांचा** नोकर समजे. पेशवे त्याच्यावर आपला अंमल चालवूं पहात. दोहोंमध्यें जें वैमनस्य होतें, त्याचें मुख्य कारण हें. **माधवरावानें निजामास** आपल्या बाजूस ओढून **जानोजीस** जर्जर करण्याचा विचार केला. **पेशवे** व **निजाम** असे उभयतां वऱ्हाडांत शिरले. **जानोजीनें** मुलूख देऊन तह केला.

**९०. हैदरअल्लीवर स्वारी.**—याही स्वारींत **माधवराव** स्वतः होते; पण प्रकृति बिघडल्यामुळें **पटवर्धन** सरदाराकडे मोहीम सोंपवून **माधवरावांस** परत येणें भाग पडलें. इ० स० १७७२ त **थेऊर** मुक्कामीं असतां **माधवरावांस** देवाज्ञा झाली व त्यांची बायको **रमाबाईसाहेब** सती गेली.

**रामशास्त्री** परभुणे नांवाचा न्यायाधीश **माधवरावानें** नेमिला. **रामशास्त्री** हा मोठा न्यायी, निर्भीड, निस्पृह, स्पष्टवक्ता असा न्यायाधीश होऊन गेला. **रामशास्त्र्याच्या** चरित्रांतील सर्व गोष्टी उदाहरण घेण्यासारख्या आहेत.

## नारायणराव १७७२–७३.

**९१. माधवरावानें** मरतेवेळीं **राघोबास** आपल्या धाकट्या भावाला पेशवाईचीं वस्त्रें देववावीं, असें सांगितलें. **नारायणराव**

ह्या माधवरावाचा धाकटा भाऊ. त्याप्रमाणें माधवराव वारल्यानंतर पेशवाईचीं वस्त्रें रामराजानें नारायणरावास दिलीं. तरी नारायणराव लहान असल्यामुळें सर्व कारभार राघोबा पाहूं लागला. इतक्यांत पेशव्याच्या घरांत कलहाग्नि पुनः धुमसूं लागला. या अग्नीनें सर्व पेशवाईची राखरांगोळी करून सोडिली.

राघोबाची बायको आनंदीबाई मोठी कजाग होती. तिचें आणि नारायणरावाचें पटेना. लौकरच मुत्सद्दी मंडळीनें सर्व कारभार नानाफडणीस[1] व हरिपंत[2] फडके यांजकडे देण्याचें ठरवून राघोबास कैदेंत टाकलें. तेव्हां आनंदीबाईनें गुप्त मसलती चालवून नारायणरावास ठार मारविण्याचा बेत केला. सुमेरसिंग व महंमद यूसफ असे दोघे एके दिवशीं दुसऱ्या कित्येक शिपायांसहवर्तमान पगार मागूं लागले. बारांवर दोन वाजतां ही तकरारी मंडळी वाड्यांत शिरली आणि सुमेरसिंग नारायणरावाच्या पाठीस लागला. नारायणराव राघोबाकडे पळाला. राघोबाचेंही सुमेरसिंग या प्रसंगीं ऐकेना. अखेरीस नारायणराव ठार झाला, तेव्हां सुमेरसिंग वगैरे मंडळी शांत झाली. नारायणरावास ठार करण्याचा जो संकल्प आनंदीबाईनें केला, त्यांत राघोबाचें अंग किती होतें तें नीट कळत नाहीं. कैदेंत टाकल्यामुळें राघोबा जरी चिडला होता, तरी तो जात्या दुष्ट दिसत नाहीं.

इ. स. १७७३ त नारायणरावाचा मृत्यु.

नारायणरावास धरण्याचा हुकूम त्यानें दिलेला असून "ध" च्या ठिकाणीं "मा" आनंदीबाईनें केला असें ह्मणतात. याप्रमाणें नारायणरावाचा अकालींच शेवट झाला.

## राघोबा १७७३–७४.

९२. याप्रमाणें राघोबास पेशवाईचीं वस्त्रें मिळालीं. पण तीं त्यास फार दिवस निर्विघ्नपणें भोगण्यास सांपडलीं नाहींत. हैदरअ-

१।२ ह्यांचीं चरित्रें छापून प्रसिद्ध झालीं आहेत.

इ. स. १७७४ सवाईमाधवरावाचा जन्म.

ल्यांनीं पुनः धामधूम चालविली. तेव्हां त्याचें पारिपत्य करण्यासाठीं **राघोबा म्है-सुराकडे** गेला, तों इकडे **नानाफडणीस** वगैरे कारभारी मंडळींनें **राघोबा**च्या विरुद्ध खटपट चालविली. **नारायणरावा**ची बायको **गंगाबाई** गरोदर होती तिला **पुरंदर** किल्ल्यावर बंदोबस्तानें ठेविलें होतें. तीस लौकरच मुलगा झाला. या मुलास पेशवाईचीं वस्त्रें मिळून **सवाईमाधवराव** ह्मणूं लागले.

## सवाईमाधवराव १७७४–९६ (२२ वर्षें.)

**९३. सवाईमाधवरावा**च्या नांवानें कारभारीमंडळी अधिकार चालवूं लागली. **नानाफडणिसा**कडे सर्व कारभार आला आणि **परशुरामभाऊ पटवर्धन** हे सेनापति झाले.

**९४. राघोबादादा इंग्रजांकडे मदत मागतो.—सवाई-माधवरावा**च्या नांवानें अधिकार चालूं लागला, असें पाहून **राघोबा** इंग्रजांकडे गेला. पण कलकत्त्याहून परभारें एक इंग्रजांचा वकील आला होता, त्याच्याशीं पेशव्याच्या दरबारांतल्या मंडळीनें तह करून "राघोबानें दरमहा पंचवीस हजार रुपये घेऊन स्वस्थ रहावें, व इंग्रजांनीं राघोबाचा पक्ष इतउत्तर घेऊं नये" असें ठरलें. या तहास **पुरंदरचा तह** ह्मणतात. पण अशा तऱ्हेनें पेशव्यांच्या दरबारांतून नेमणूक घेत राहणें **राघोबा**स पसंत पडलें नाहीं.

**रामराजा** इ. स. १७७७ सालीं वारला.

## सहाव्या प्रकरणावर प्रश्न.

**८२.** शाहूनंतर गादीवर कोण बसला? **८३.** नानासाहेबानें कर्नाटकावर स्वारी करून कोणता क्रम चालविला? गुजराथेंत कोण व कधीं गेले? खंडेराव होळकर कोण व तो कोठें पडला? **८४.** आंग्र्यास कोणीं व कसें बुडविलें? पंजाबांत कोण गेले? त्या मोहिमेंत नक्त ऐवज राघोबानें किती आणिला? राघोबाकडे पुढें कोणतें काम व कां सांगितलें?

**८५.** उदयगिरीच्या लढाईत कोणाचा पराभव झाला? अबदाली

कोण? तो कां आला? त्याच्यावर दक्षिणेंतून कोणाची रवानगी केली? पानपतच्या लढाईची थोडक्यांत हकीकत सांगा? या लढाईत किती मराठे पडले? ही लढाई कोणत्या सालीं झाली? नानासाहेब कशानें व कोणत्या सालीं वारले?

**८६,८७,८८.** नानासाहेबानंतर पेशवाईचीं वस्त्रें कोणास मिळालीं? राघोबाच्या मनांत कोणता विचार आला? घरफूट कां लागली? राघोबा कोठें गेला? पुढें राघोबाचा व माधवरावाचा समेट कसा झाला? विठ्ठल सुंदर कोण? कोणत्या लढाईत पडला? हैदरअल्ली कोण? त्याच्यावर मोहीम करण्याचें कारण काय? या मोहिमेंत कोणकोण होते? या मोहिमेचा शेवट कसा झाला?

**८९,९०.** नागपूरकरांचें व पेशव्यांचें वांकडे कां होतें? माधवराव कधीं व कोठें वारले? रामशास्त्री कोण?

**९१.** माधवरावानंतर पेशवाई कोणास मिळाली? राघोबाची बायको कोण? नारायणरावाचा वध कोणीं, कधीं व कोठें आणि कशासाठीं केला? **९२.** नारायणरावानंतर कोण पेशवा झाला? त्याचें लौकरच काय झालें? **९३.** राघोबानंतर कोण पेशवा झाला? **९४.** राघोबा कोणाकडेस मदत मागावयास गेला? पुरंदरचा तह कोणाकोणामध्यें काय अटीवर झाला? रामराजा कधीं वारला?

# हिंदुपदपातशाही.

## दुसरा शाहू. १७७७–१८०७.

१ राज्यप्राप्ति; इंग्रजांशीं वैमनस्य; वडगांवची लढाई. २ टिपूशीं युद्ध; महादजी शिंदा. ३ खरड्याची लढाई; सवाईमाधवरावाचा मृत्यु. ४ बाजीरावाला पेशवाईचा अधिकार मिळाला; नानाफडणिसाची कैद; पुण्याची लूट. ५ नानाफडणिसाची सुटका, त्याचा मृत्यु; ६ बाजीरावाचें होळकरांशीं भांडण; यशवंतराव होळकराचा पराक्रम; पुण्याची लढाई; बाजीराव पदच्युत होतो; वसईचा तह; बाजीरावास पुनः पेशवाई मिळते; शाहूचा मृत्यु.

**९५. रामराजा** निपुत्रिक होता. त्यानें मुलगा दत्तक घेतला, त्याचें नांव **शाहू.** तो इ. स. १७७७ मध्यें गादीवर बसला.

## सवाईमाधवराव.

**इंग्रजांशीं वैमनस्य. पुरंदरच्या** तहानें **इंग्रजांचा** व पुण्यांतल्या दरबारी मंडळीचा सलोखा झाला. पण **राघोबाला** दरमहा दहा हजार रुपये देऊन **इंग्रजांनीं** आपल्या पदरीं ठेवून घेतलें. ह्मणून **नानाफडणीस** रागावला. लौकरच **फ्रेंचांचा** एक वकील पुण्यास आला, त्याचा आदरसत्कार करून **नानानें** आपल्या दरबारीं ठेवून घेतलें. तेव्हां **मोरोबा** नांवाचा **नानाचा** चुलता होता, तो **राघोबाच्या** पक्षास जाऊन मिळाला. **राघोबास** पेशवाईचा नाद अद्याप होताच. पेशवाई मिळवून दिल्यास उत्पन्नाचा चौथा हिस्सा तुह्मांला देतों असें **राघोबाचें** बोलणें मान्य करून **इंग्रजांनीं** बरेंच सैन्य **राघोबाबरोबर** दिलें आणि त्याची पुण्याकडे रवानगी केली.

**वडगांवची लढाई.** इंग्रजांनीं **बोरघांट** ताब्यांत घेऊन **खंडाळे** मुक्कामीं तंबू ठोकले आणि त्यांच्या नेहेमींच्या रीतीप्रमाणें **राघोबाच्या** नांवें त्यांनीं जाहीरनामा काढिला. पण इंग्रजलोकांनीं या प्रसंगीं विलक्षण प्रकारचा धिमेपणा दाखविला. रोज १ मैल किंवा १॥ मैलापेक्षां अधिक मजल होईना आणि **कालें** मुक्कामीं चकमक झडली तींत दुर्बीन घेऊन पहात असतां **"इष्टुर फांकडा"** या नांवानें नावाजलेला कप्तान **स्टुअर्ट** गोळी लागून ठार झाला. **तळेगांवीं** इंग्रज पोंचला, तेव्हां मराठ्यांचें लष्कर सरसावणार व लढाई देणार, असा रंग दिसला. पण मराठे पाठीं हटूं लागले. नानाच्या हुकुमानें **तळेगांव** जाळून खाक केलें होतें. **चिंचवड** व **पुणें** हीं जाळून खाक करण्याचा हुकूम झाला आहे, अशी बातमी **इंग्रजांस** कळली. तेव्हां पुढें पाऊल टाकायाचें सोडून देऊन **इंग्रजानें** दहशत खाल्ली आणि पीछेहट चालविली. या वेळीं, मराठ्यांचें लष्कर चाळीस पन्नास हजार होतें. इंग्रज हटतात असें पाहून मराठ्यांस जोर आला. इंग्रज **वडगांवीं** पोंचले. येथेंही मराठ्यांनीं बराच उपद्रव दिला. सुमारें ३५० तीनशें पन्नास लोक **इंग्रजांचे** ठार किंवा जायां झाले. तेव्हां इंग्रजांनीं तह केला.

हा तह इंग्रजांच्या वरिष्ठ कामगारांनीं मंजूर केला नाहीं; इतकेंच

नाहीं, तर ज्यांनीं तह केला त्यांस बंडतर्फ करून किंवा मानमरातब कमी करून यथायोग्य शिक्षा केली. अशा प्रकारचा वचक असल्या-शिवाय लष्कारांत शिस्त राहणें नाहीं.

९६. **टिपूशीं युद्ध.** इ. स. १७८२ च्या अखेरीस **हैदरअल्ली** वारला, आणि त्याचा मुलगा **टिपू** यास गादी मिळाली. **टिपूनें नरगुंदकर** देसायाची खंडणी वाढविली व **नरगुंदकरानें** पटवर्धनांच्या मार्फत **नानाफडणिसा**शीं संधान बांधलें. इ. स. १७८५ च्या सुमारास **टिपूनें** नरगुंदास वेढा दिला, तेव्हां **नानानें** गणेशपंत बेहेरे व **परशुरामभाऊ** या उभयतांस वेढा उठविण्यास पाठविलें. आपला हक्क **नरगुंदकरांवर** राहूं दिल्यास दोन वर्षांची खंडणी **नानास** देण्याचें **टिपूनें** पतकरलें व या शर्तीवर मराठ्यांशीं तह झाला. मराठे **नरगुंदकरांस** याप्रमाणें **टिपूच्या** हवालीं करून कृष्णा उतरले. तेव्हां **नरगुंदकरानें टिपूशीं** मांडीवाळ केली. तरी दगा करून **टिपूनें नरगुंदकरांस** पकडून कैदेंत पाठविलें आणि **कित्तूरच्या** देसायाचीही अशीच अवस्था करून **नरगुंद** व **कित्तूर** या दोन्ही किल्ल्यांत आपलें ठाणें ठेविलें; इतकेंच नाहीं, तर हजारों हिंदूंस बाटविलेंही. तेव्हां **नानानें** जशी **होळकराशीं** तशी **निजामअल्लीशीं**ही मसलत केली आणि **टिपूचा** सगळा मुलूख काबीज करून २ वांटे पेशव्याचे, २ होळकर व शिंदे मिळून दोघांचे, २ निजामाचे, असे सहा वांटे करण्याचा ठराव केला. त्या ठरावाप्रमाणें पावसाळ्यानंतर **बदामीस** वेढा घातला. मराठ्यांनीं व मोगलांनीं मिळून नेटाचा हल्ला केला आणि **बदामीचा** किल्ला सर केला. मुसलमानांनीं **टिपूचा** मुलूख घ्यावा व **टिपूनें** मराठ्यांचा घ्यावा, असें कांहीं दिवस चालून अखेरीस इ. स. १७८७ मध्यें तह झाला. पण पुनः **टिपूनें** तह मोडून **कित्तूर** सर केलें. तेव्हां **नानानें** निजामाप्रमाणें इंग्रजांसही मसलतींत घेतलें. इंग्रजांनींच पहिल्यानें मोहिमेस सुरवात केली. पुढें **लार्ड कार्नवालिस** गवर्नर जनरल हा स्वतः लढाई चालविण्यासाठीं आला. पुढें लौकरच **श्रीरंगपट्टणास** वेढा पडला. तेव्हां जेरीस येऊन इ. स. १७९२ मध्यें अर्धा मुलूख व ३ कोट रुपये देण्याचें कबूल करून टिपूनें तह केला.

**महादजी शिंदा.** हा शूर आणि कारस्थानी सरदार पहिल्यानें **नर्मदे**च्या उत्तरेस नांवाजूं लागला. **पाणिपत**च्या लढाईपासून नर्मदेच्या उत्तरेस मराठ्यांचा वचक नाहींसा झाला होता, तो पुनः **महादजी**नें बसविला. **महादजी**नें फ्रेंच कामगारांस आपले पदरीं राखलें आणि दिल्लींतील घोटाळा बराच मोडून टाकला. **इस्मायल बेग** व **गुलाम कादर** हे दोन मुसलमान चिडले, कारण दिल्ली मुक्कामीं व्यवस्था लागत चालली ती त्यांस पसंत पडेना. **इस्मायला**नें आग्र्यावर हल्ला केला, पण **लखबादादा** शेणवी यानें किल्ला **इस्मायल**च्या हातीं जाऊं न देऊन, मराठ्यांची अब्रू राखली. तेव्हां **इस्मायल** व **गुलाम कादर** पळाले ते दिल्लीस गेले. लांच देऊन **गुलाम कादर** राजवाड्यांत शिरला. नंतर या दुष्टानें आपल्या हातानें बादशाहाचे डोळे फोडले आणि राजस्त्रियांचा छळ आरंभिला. तेव्हां अंगाचा संताप होऊन **इस्मायला**नें गुलाम कादरास सोडलें आणि **शिंद्या**ची नोकरी पतकरली. दिल्लीच्या तख्ताचा उपमर्द केला; त्याबद्दल **गुलाम कादरास** शिक्षा करण्याची **महादजी**नें तयारी चालविली. **राणेखान महादजी**च्या हुकुमानें निघाला तो दिल्ली मुक्कामीं पोंहचला, तेव्हां मराठे मदतीस आले हें ऐकून बादशहास अत्यानंद झाला. दुर्दैवी बादशाहाचें **राणेखाना**नें समाधान करून कोणत्याही पदार्थांची वाण राजवाड्यांत पडूं दिली नाहीं. पुढें पाठलाग करून **गुलाम कादरास** पकडलें आणि त्याचा यथायोग्य वध करण्यांत आला. इतक्यांत **महादजी**ही येऊन पोंचला. **महादजी**नें **शहाअलमास** पुनः गादीवर बसविलें. तेव्हां **शहाअलम**नें पेशव्यांस “ वकील–ई–मुतलक ” हा किताब देऊन, **शिंद्यास** त्याची **मुतालिकी** दिली. **शिंद्या**नें विनंति केल्यावरून दिल्लीपतीनें गोवध बंद करण्याचेंही आज्ञापत्र काढिलें. नंतर आपल्या लश्करांत **महादजी**नें नवीन सुधारणा केल्या. पुढें **महादजी** दिल्लीहून पोशाक घेऊन पुणें मुक्कामीं आला. मोठा दरबार भरला, त्यांत **महादजी**नें पेशव्यास पोशाक दिला व दिल्लीपतीनें गोवध बंद करण्यासाठीं का-

ढलेला खलिताही वाचून दाखविला. पण मराठ्यांचें वजन वाढून ब्राह्मणांच्या हातची सत्ता जाईल, अशी धास्ती **नानास** पडली व **महादजी**च्या विरुद्ध पेशव्याचे कान फुंकण्याचें काम **नानानें** चालविलें. **नानाचे** सगळे प्रयत्न मोघ करण्याचें सामर्थ्य **महादजी**मध्यें होतें. पण दुर्दैवानें लौकरच **महादजी** वानवडी मुक्कामीं नवज्वरानें वारला. **महादजी**च्या पाठीं त्याच्या एका पुतण्याचा **दौलतराव** नांवाचा मुलगा होता त्यास सगळा अधिकार मिळाला.

इ० स० १७९४, महादजीचा मृत्यु.

**९७. खरड्याची लढाई.—मश्रुल्मुल्क** नांवाचा **निजामा**चा दिवाण होता, त्याच्या अंगीं फाजिलपणा बराच होता. **गोविंदराव** काळे पेशव्यांकडून वकील आला होता, त्याच्याबरोबर कांहीं बाबीच्या संबंधानें तक्रार चालली असतां, दिवाण थोडा टाकून बोलला. "काशीक्षेत्रीं पेशव्यांस रामराम ह्मणण्यासाठीं पाठवून पुणें लुटून फन्ना व जाळून खाक करायाचें" असें मोगल बोलूं लागले. **नानाफडणिसानें** लढाईची तयारी चालविली. सर्व सरदारांस मोहिमेवर येण्याविषयीं पत्रें गेलीं, त्याप्रमाणें ते तमाम सैन्यासह येऊन दाखले झाले. उभय सैन्यांची गांठ **खरडे** मुक्कामीं पडलीं. तह करण्यास **निजाम** राजी झाला असें पाहतांच मराठ्यांनीं हल्ला बंद केला. निंदा करणाऱ्या **मश्रुल्मुल्क** दिवाणास आपल्या स्वाधीन करावें ही पेशव्यांची पहिली अट होती. पेशव्यांच्या सर्व अटी निमूटपणें, **निजामानें** मान्य केल्या व **मश्रूस** पेशव्यांच्या स्वाधीन केलें. जेव्हां मराठे या लढाईंत फत्ते मिळविल्याबद्दल बढाई मारूं लागले, तेव्हां "दोन्ही बाजूंस मिळून जेमतेम २०० लोक पडले, अशी स्थिति असतां शरण येण्यासारखा नादानपणा मोगलांनीं करावा आणि फत्ते मिळविल्याबद्दल बढाई मारण्यासारखा नादानपणा मराठ्यांनीं करावा, हें पाहून मला नवल वाटतें" या अर्थाचा उद्गार **सवाईमाधवरावानें** काढिला. हा उद्गार वाजवी होता.

इ० स० १७९५, खरड्याची लढाई.

## सवाईमाधवरावाचा मृत्यु.

इ० स० १७९५, माधवरावाची आत्महत्या.

**सवाईमाधवराव** आतां २१ वर्षांचा झाला, तरी **नाना** त्यास एखाद्या कैद्याप्रमाणें वागवी. त्यामुळें त्रासून आपल्या वाड्याच्या तिसऱ्या मजल्यावरून त्यानें उडी टाकून आत्महत्या केली. उडी टाकल्यानंतर अत्यवस्थ असतां आपल्या पश्चात् पेशवाईचीं वस्त्रें **राघोबा**दादाचा वडील मुलगा **बाजीराव** यासच मिळावीं अशी आपली इच्छा पेशव्यानें **नाना**स कळविली.

## बाजीराव १७९६—१८१८ ( २२ वर्षें. )

९८. **सवाईमाधवरावानंतर** पेशवाईचीं वस्त्रें कोणास द्यावीं, हा विचार कारभारीमंडळीस पडला. **सवाईमाधवरावा**च्या बायकोनें दत्तक घ्यावा आणि त्याला पेशवाईचीं वस्त्रें देववावींत, हा **नानाफडणिसा**चा विचार; कारण **नाना**स सगळा अधिकार आपल्या एकट्याच्या हातीं हवा होता. ह्मणून पेशव्यानें दर्शविलेल्या इच्छेच्या विरुद्ध दत्तकाची खटपट **नानानें** चालविली. इतक्यांत **बाजीरावानें** शिंद्याचा कारभारी **बाळोबातात्या** ह्मणून असे, त्याच्याकडे संधान बांधिलें. **बाळोबानें बाजीरावा**स गादीवर बसविण्याचें कबूल केलें. असें ऐकतांच **शिंदा** काम करणार तें आपण होऊन करावें असा **नानानें** बेत केला आणि लगेच **बाजीरावास** आणवून आपणाकडे सगळा कारभार ठेविल्यास पेशवाईचीं वस्त्रें देवविण्याचें **नानानें** कबूल केलें. **बाजीरावा**स ही **नाना**ची मसलत पसंत पडली. हें वर्तमान **बाळोबा**स कळतांच त्याला राग आला. त्यानें **शिंद्यास** पुणें मुक्कामीं सगळ्या लश्करासहित आणविण्याचा विचार चालविला. तेव्हां **परशुरामभाऊनें** धास्ती न खातां लढाई करण्याची मसलत **नानास** दिली. पण **नानाचें** हाड वीराचें नव्हतें. त्यास ही मसलत पसंत पडली नाहीं. **परशुरामभाऊस** पुणें मुक्कामीं **बाजीरावा**जवळ ठेवून **नाना** पहिल्यानें **पुरंदरास** व नंतर पुरंदराहून **साताऱ्यास** गेले. नंतर **दौलतराव** पुण्यास आला,

तेव्हां **बाळोबानें बाजीरावाचा** धाकटा बंधु **चिमणाजी** यास **सवाईमाधवरावा**च्या बायकोच्या मांडीवर देऊन नंतर पेशवाईचीं वस्त्रें देण्याची आणि **परशुरामभाऊस** मुख्य कारभारी करण्याची मसलत दिली. **परशुरामभाऊनें नाना**ची मंजुरी मिळविल्यानंतर ही मसलत अंमलांत आणण्याचें ठरलें. पुढें **चिमणा**जी नको ह्मणत असतांही त्यास **सवाईमाधवरावा**च्या बायकोच्या मांडीवर बसवून पेशवाईचीं वस्त्रें देण्यांत आलीं. नंतर सगळा मुलकी कारभार हवालीं करण्यासाठीं **परशुरामभाऊनें नानास** बोलाविलें. पण कोणाचा विश्वास कोणास नाहीं, अशी या काळची स्थिति. बाबाराव **फडके** नांवाचा ब्राह्मण सरदार होता त्यानें **परशुरामभाऊ**च्या मनांत दगा असावा अशी शंका कळविली तेव्हां **नाना** पळाला. पुढें **बाळाजी कुंजरा**च्या मार्फत **बाजीरावा**शीं **नानानें** पत्रव्यवहार चालविला.

इ० स० १७९६, बाजीराव पुनः पेशवा झाला.

**तुकोजी होळकर नाना**च्या बाजूचा होताच. **रयाजी** पाटील नांवाचा **बाळोबातात्या**चा शत्रु होता त्याच्या मार्फत **नानानें शिंद्यास** फोडण्याचा विचार केला. **बाजीरावास** पेशवा करून **बाळोबास** कैद केल्यास अहमदनगरचा किल्ला, **परशुरामभाऊ**ची जहागीर आणि आणखी १० लक्षांचा मुलूख इतकी देणगी देण्याचा आपला मानस आहे, असें **सर्जेराव घाटग्या**च्या मार्फत **रयाजीस नानानें** कळविलें. **सर्जेरा**वाची मुलगी बायजाबाई मोठी सुरूप होती, ह्मणून **दौलतरावा**चा तिच्याशीं लग्न लाविण्याचा विचार झाला होता. अशी हकीकत असल्यामुळें **दौलतरावानें नाना**ची बाजू धरल्यासारखीच झाली होती. पण ही गुणगुण **बाळोबा तात्या**च्या कानीं आली. **बाळोबानें बाजीरावास** नर्मदेच्या उत्तरेस **सर्जेराव घाटग्या**बरोबर पाठविलें. वाटेवर **बाजीरावानें सर्जेरावास**च फोडलें. पेशवाई मिळाल्यास **बाजीरावानें** दोन कोटि रुपये शिंद्यास देण्याचें कबूल करावें आणि शिंद्याचा कुलकारभार **सर्जेरावास** देण्याविषयींची शिफारस करून कागल गांव इनाम करून देण्यासाठीं

खटपट करावी, असा **सर्जेरावाचा** व **बाजीरावाचा** वाटेवर संकेत झाला. **बाजीरावास** पेशवाई मिळवून दिल्यास खर्ड्याच्या लढाईनंतर मिळालेला सगळा मुलूख परत देण्याचें कबूल करून, **नानानें** निजामासही आपल्याकडे ओढिलें. पंधरा लाख रुपये रोख व आणखी मुलूख देण्याचें कबूल करून **नानानें** नागपूरकर भोंसलाही वश केला. त्याचीही संमति मिळाली. लगेच **शिंद्यानें** बाळोबास कैद केलें आणि **परशुरामभाऊ** पळाले असें ऐकून त्यांचा पाठलाग करण्यास कांहीं लोक पाठविले. त्यांनीं **परशुरामभाऊस** लौकरच पकडून आणिलें. याप्रमाणें इ. स. १७९६ मध्यें **बाजीरावास** पेशवाईचीं वस्त्रें मिळून, **नानास** कुलकारभारीपणा मिळाला.

**होळकराशीं भांडण. तुकोजी** होळकर वारल्यानंतर त्याच्या चार मुलांमध्यें भांडणें लागलीं. **काशीराव** व **मल्हारराव** हे तुकोजीचे दोन औरस मुलगे असून, **यशवंतराव** व **विठोजी** हे दोन नाटकशाळेचे होते. **काशीरावाचा** पक्ष **दौलतरावानें** घेतला व एका धाकट्या लढाईत **मल्हारराव** ठार झाला असें पाहून **यशवंतराव** नागपुरीं व **विठोजी** कोल्हापुरीं पळाला. पण **यशवंतरावाची** तलवार मोठी विलक्षण होती. लौकरच **काशीरावास** पदच्युत करून **मल्हाररावाचा** मुलगा **खंडेराव** पुणें मुक्कामीं कैदेंत होता त्याचे नांवें **यशवंतरावानें** अधिकार चालविला, आणि लश्कर गोळा केलें. उज्जयिनीजवळ मोठी लढाई जुंपली. तींत इंग्रज कामगारांचीही डाळ शिजूं न देतां त्यांस व शिंद्याच्या लष्करास **यशवंतरावानें** साफ बुडविलें, आणि मराठ्यांच्या अंगीं शौर्य असतें कीं नसतें हें इंग्रजांसही दाखविलें.

**नानाची कैद**—करारप्रमाणें शिंद्यास अहमदनगर देण्यांत आलें आणि नागपुरकरासही मुलुखासुद्धां रोकड पैसा मिळाला. पण निजामाशीं केलेला करार **बाजिराव** पाळीना. तेव्हां निजामाचा वकील **मश्रुलमुल्क** रागावून पुणें सोडून गेला. "नाना कारभारी असे पर्यंत तुम्हांस शिंद्याचा कुलकारभार करारप्रमाणें मिळणें नाहीं, तर त्यास पहिल्यानें कोणत्या तरी प्रकारें कैदेंत टाकणें" असा निरोप

**बाजीरावानें सर्जेरावास** पाठविला. **सर्जेरावानें** कामगिरी उत्तम प्रकारें बजाविली ह्मणून **नाना**च्या कपाळीं कैद आली. लौकरच **शिंद्याचें** आणि **सर्जेरावा**च्या मुलीचें लग्न झालें. या लग्नास मनस्वी खर्च झाला आणि दरमहिना लष्कराचा पगार देण्यास शिंद्यास २० लक्षांहून अधिक रुपये लागत. यामुळें पैशाची टंचाई पडली तेव्हां करारप्रमाणें २ कोटि रुपयांचें मागणें शिंद्यानें केलें. **सर्जेरावास** पैसेवाले सावकार लुटून पैशाची भरपाई करून घेण्याचा हुकूम **बाजीरावानें** दिला. पुण्यांत जिकडे तिकडे आकांत चालला आणि झोटिंगपाच्छाई सुरू झाली. अखेरीस **नानास** कैदेंतून सोडिलें. पण **बाजीराव** पहिल्या प्रतीचा अविश्वासू पडल्यामुळें **नाना**च्या हातून पुढें सांगण्यासारखें निष्पन्न झालें नाहीं. अखेरीस इ० स० १८०० मध्यें **नाना** वारला.

जशी **सवाईमाधवरावा**वर तशीच सातारकरावर **नाना**ची करडी नजर होती. पुढें **नानानें बाजीरावा**विरुद्ध व **बाजीरावानें नाना**विरुद्ध सातारकरास चिथविलें. सातारकराचा **चतुरसिंग** नांवाचा भाऊ होता. **चतुरसिंगानें** व कोल्हापुरकरांनीं मिळून पेशवाईच्या विरुद्ध बरीच खटपट चालविली. तेव्हां **परशुरामभाऊंस**ही कैदेंतून मुक्त करावें लागलें. एकदा चतुरसिंगाजवळ ५०० लोक होते आणि रास्त्याच्या ५००० लोकांनीं त्यास घेरलें. तरी **चतुरसिंग** फळी फोडून निसटला. **परशुरामभाऊं**ची जहागीर लुटून कोल्हापुरकरांनीं फस्त केली आणि तासगांवचा वाडाही जाळला. **परशुरामभाऊ** जंगी फौज घेऊन निघाले. पण पट्टणकुंडीच्या लढाईत पुरा मोड झाला; इतकेंच नाहीं, तर भाऊ स्वतःच ठार झाले. ही लढाई इ० स० १८०० त झाली. याप्रमाणें **नाना** व **भाऊ** या दोहोंचा अंत एकेच वर्षी झाला.

**९२.** इतक्यांत **बाजीरावानें** आपला बंधु **विठोजी** यास हत्तीच्या पायांखालीं मारलें अशी बातमी कळल्यामुळें **यशवंतराव** संतापला आणि रागासरशी त्यानें पुण्यावर चाल केली. **नरसिंग खंडेराव विंचूरकर** यांस, १५०० स्वार बरोबर देऊन, **शहाअहमद**-

**खान** नांवाचा सरदार **यशवंतरावानें** पाठविला होता, त्यास अड-विण्यासाठीं पाठविलें. पण हे स्वार जवळ जवळ सगळे **शहाअहमदनें** कापून काढिले. **बाजीरावानें** तहाचें बोलणें चालविलें. "माझा विठोजी गेला तो गेला तो आतां परत येणें नाहीं; पण खंडेराव कैदेंत आहे त्यास जर मुक्त कराल, तर तह करूं" असा स्पष्ट जबाब **यशवंतरावानें** पाठविला. पण **बाजीराव** दाद देईना. लौकरच शिंद्याचें लष्कर येऊन पेशव्याच्या लष्करास मिळालें आणि लढाई जुंपली. मोड होतोसा भास होतांच, **यशवंतरावानें** पहिल्यानें आपला घोडा पुढें घातला. त्यासरसें लष्करही सरसावलें. शिंद्याच्या गोऱ्या कामगारांनीं शर्थ केली. पण पुनः पुनः **यशवंतराव** नेटानें हल्ले करूं लागला, त्यामुळें सगळा फजिता उडून गेला आणि गोरे कामगार खडे होते तसेच मराठ्यांनीं कापून काढले. शिंद्याच्या तोफा व सर्वसामान सगळें यशवंतरावाच्या हातीं लागलें. **यशवंतरावानें** पुण्यांत न शिरण्याची सक्त ताकीद आपल्या शिपायांस दिली; इतकेंच नाहीं, तर कोणी कदाचित् सबब सांगून आंत जातील, अशी शंका आल्यामुळें तोफांची मारगिरी आंत जाणारांवर सुरू करण्याची व्यवस्था करून ठेविली. पुढें **बाजीराव** पळाला तो येत नाहीं असें पाहून **यशवंतरावानें** पेशवाई **बाजीरावाचा** बंधु **अमृतराव** यास दिली. पुढें **बाजीराव** पळाला आणि इंग्रजांस जाऊन मिळाला, हें समजलें तेव्हां सातारकरानें **अमृतरावास** पेशवाईचीं वस्त्रें धाडलीं. याप्रमाणें **बाजीराव** पेशवाईस मुकला. पुढें **यशवंतरावानें** मराठ्यांमध्यें राष्ट्रीयपणा उत्पन्न करून इंग्रज लोकांस हांकवून लावण्याचा यत्न केला. मराठ्यांच्या पदरीं जे गोरे कामगार होते, ते इंग्रजांच्या बाजूस आल्यास त्यांस मराठ्यांकडे जो पगार मिळत होता तोच कायम करण्यांत येईल असा गवर्नर जनरलानें जाहीरनामा लाविला होता. या जाहीरनाम्यामुळें तीन इंग्रज कामगार गवर्नर जनरलास फितूर होऊं पहातात, असें दिसतांच **यशवंतरावानें** त्यांस देहांताची शिक्षा दिली. पण **यशवंतरावाचें** धोरण व पराक्रम हीं डोळ्यांत सलूं लागल्यामुळें, **दौलतरावानें** **यशवंतरावास** मदत केली नाहीं; इतकेंच नाहीं,

तर यशवंतरावाची सगळी खटपट आंतून इंग्रजांस कळविली. **यशवंतरावा**वर "मानसन" नांवाच्या कामगाराची योजना गवर्नर जनरलानें केली. पहिल्यानें **यशवंतराव** पाठीं हटला आणि चंबळा ( नदी ) उतरला. पण लौकरच बातमी आली कीं **यशवंतराव** तलवार गाजविण्यास येत आहे. **यशवंतरावानें** दोन जंगी लढाया मारून गोरे लोकांसही मराठ्यांचा दम दाखविला होता. ह्मणून **मानसन** पाठीं हटूं लागला. **यशवंतरावानें** त्याच्या शिरस्त्याप्रमाणें नेटानें काम चालविलें. १२ गोरे कामगार त्यांच्या सर्नोबतांसहित ठार झाले. याप्रमाणें **मानसन**चा व त्याच्या हाताखालच्या पथकांचा **यशवंतरावानें** इतका फजिता उडविला कीं थोडेच लोक पळून अखेरीस आग्र्यास पोंचूं शकले. **दुसरा शाहू** इ० स० १८०८ मध्यें वारला.

पुढें इंग्रजांनींही **यशवंतरावास** बुडविण्यासाठीं मोठी तयारी चालविली. पण **यशवंतराव** डगमगणारा मनुष्य नव्हता. जरी **दौलतराव** विरुद्ध होता, तरी इंग्रजांस **यशवंतरावानें** पुष्कळ उपद्रव दिला. इ० स० १८०८ पर्यंत इंग्रजांस बुडविण्याची तयारी **यशवंतरावानें** चालविली. पुढें हेंच वेड लागून इ० स० १८११ त **यशवंतराव** वारला. यशवंतरावाचे पराक्रम वाचून राजारामाचे काळीं नामांकित झालेल्या संताजी घोरपड्याची आठवण होते. इतकेंच कीं, या काळीं कोणी प्रल्हादपंताचा किंवा रामचंद्रपंताचा भार घेऊं शकला नाहीं, ह्मणून **यशवंतरावाच्या** पराक्रमापासून आमच्या लोकांस व्हावा तसा फायदा झाला नाहीं.

**वसईचा तह.** आपला अधिकार गेला असें पाहून बाजीराव इंग्रजांस शरण गेला. **वसई** मुक्कामीं तह करून **बाजीरावाला** इंग्रजांनीं पेशवाईचा अधिकार मिळवून दिला. **अमृतरावास** गादीवरून इंग्रजांनीं काढिलें आणि दरसाल आठ लाखांची नेमणूक करून दिली आणि काशींत राहण्यास सांगितलें.

वसईचा तह, इ. स. १८०२.

## सहाव्या प्रकरणावर प्रश्न.

८९. रामराजानंतर गादीवर कोण बसला ? इंग्रजांशीं वैमनस्य ये-

ण्याचें कारण काय ? इष्टुर फांकडा कोण व कसा मेला ? इंग्रज हरले कां ? पुढें काय झालें ?

९०. टिपूशीं पेशव्यांचा तंटा कां सुरू झाला ? अखेरीस टिपूनें कोणत्या शर्तीवर तह केला ? दिल्लींतील घोटाळा या काळीं कोणीं मोडला ? लखबादादा कोण व त्यानें काय केलें ? गुलामकादरनें कोणतें वाईट काम केलें व पुढें त्याचें काय झालें ? दिल्लीपतीनें पुढें कोणतें आज्ञापत्र काढिलें ? महादजीच्या मनांत काय होतें व नानाच्या मनांत काय होतें ? महादजी कोठें व कशानें वारला ?

९१. खरड्याची लढाई कोणकोणांमध्यें, कां व कधीं झाली ? या लढाईच्या संबंधानें पेशव्यानें कोणता उद्गार काढला ? सवाईमाधवरावानंतर पेशवाई कोणास मिळाली ? नानाच्या मनांत कोणास पेशवा करावयाचें होतें ? बाळोबा तात्या कोण ? नानाफडणिसास कैद कोणीं केलें ? त्याची सुटका कां झाली ? तो कधीं वारला ?

९२. होळकर पुण्यावर कां आला ? पुण्यास येण्याचे पूर्वीं यशवंतरावानें कोणती मोठी लढाई मारली ? पुण्याच्या लढाईचें वर्णन करा. बाजीराव कां पळाला ? यशवंतरावानें पेशवा कोणास केलें ? यशवंतरावानें आणखी कोणता पराक्रम केला ? यशवंतराव कसा व कधीं वारला ? पेशवाईचा तह कोणाकोणांत आणि कशाकरितां झाला ? बाजीरावास पुनः पेशवाई कशी मिळाली ? अमृतराव पुढें कोठें गेले ?

---

## प्रकरण ७ वें.

### प्रतापसिंह १८०८–३९ ( ३१ वर्षें. )

# हिंदुपदपातशाही.

१. राज्यप्राप्ति; बाजीरावाचें वर्तन; त्रिंबकजी डेंगळा; गंगाधर शास्त्र्याचा खून. २. इंग्रजांशीं तह; इंग्रजांशीं वैर; बापू गोखला; खडकीची लढाई; बाजीरावाचा पळ; कोरेगांवची लढाई; अष्ट्याची लढाई. ३. बाजीरावाचें शरण येणें; प्रतापसिंहास स्वतंत्र अधिकार; राज्यभ्रष्टता.

९३. **दुसरा शाहूराजा** मरण पावला तेव्हां त्याचा वडील पुत्र

**प्रतापसिंह** हा गादीवर आला; त्या **वेळीं** दुसरा बाजीराव पेशवा होता.

## बाजीराव.

आपल्या सरदारांच्या जाहगिरी वगैरे जप्त कराव्या हें वेड **बाजीरावा**च्या डोक्यांत फार शिरलें होतें. पूर्वींचे पिढीजाद कैक सरदारांचीं मनें **बाजीरावानें** फार दुखविलीं. कोणाच्या जाहगिरी जप्त कर, कोणास कैदेंत टाक, हा क्रम त्यानें चालविला.

**त्रिंबकजी डेंगळा** ह्मणून अगदीं हलक्या कुळांतला यःकश्चित् मनुष्य होता तो आतां मराठी साम्राज्यांतील राज्यसूत्रें हालवूं लागला. त्यानें **बाजीरावा**ला इंग्रजांस आपल्या मुलखांतून हाकलून देण्याची सल्ला दिली आणि त्याप्रमाणें शिंदे व नागपूरकर भोसले यांच्याशीं संधान ठेविलें.

**गंगाधरशास्त्र्याचा मृत्यु.** गाईकवाडानें पेशव्यांचें कांहीं देणें होतें त्याचा निकाल करण्यासाठीं **गंगाधर शास्त्री पटवर्धन** हा वकील गाईकवाडांकडून आला होता. **बाजीराव** देवदर्शनासाठीं पंढरपुरास गेला तेव्हां बरोबर **गंगाधर** शास्त्री होते. श्रीविठ्ठल मंदिरांत प्रदक्षिणा करीत असतां **त्रिंबकजी** डेंगळ्यानें मारेकऱ्यांच्या हातें **गंगाधर** शास्त्र्यास ठार मारविलें. तेव्हां इंग्रजांस त्या गोष्टीचा मोठा राग आला. **त्रिंबकजी**ला आपल्या स्वाधीन करा ह्मणून इंग्रजांनीं **बाजीरावा**स सांगितलें, तें ह्मणणें बाजीरावास मान्य होईना. इंग्रजही आपला हट्ट सोडीतना: तेव्हां नाइलाजास्तव **त्रिंबकजी**ला इंग्रजांच्या स्वाधीन करणें बाजीरावाला भाग पडलें.

इ. स. १८१५ त गंगाधर शास्त्र्याचा खून.

**९४. त्रिंबकजीचें बंड.** आपल्या स्वाधीन करून घेतल्यानंतर **त्रिंबकजी**ला इंग्रजांनीं ठाण्याच्या किल्ल्यांत अडकवून ठेविलें. तेथें एक वर्षभर तो कैदेंत होता. कैदेंतून पळाल्यानंतर बंडखोर लोकांच्या सहाय्यानें बरीच धामधूम त्यानें चालविली. इंग्रजांशीं युद्ध करण्याला लष्कर जमविण्याचें काम **बाजीरावानें त्रिंबकजी**स सांगितलें आणि

**शिंदे, होळकर, भोसले** वगैरे सरदारांस इंग्रजांविरुद्ध उठण्याच्या तयारींत असावें ह्मणून बाजीरावानें पत्रें लिहिलीं. हें सर्व वर्तमान इंग्रजांस कळलें, तेव्हां अगोदर आमच्या स्वाधीन **त्रिंबकजी**ला करा असा तगादा **बाजीरावा**स लाविला. मला **त्रिंबकजी** कोठें आहे तें माहीत नाहीं वगैरे उडवाउडवीचीं पुष्कळ उत्तरें बाजीरावानें दिलीं. "त्रिंबकजीस धरून देणार नाहीं तर लढाईस उभे रहा" ह्मणून धमकी देतांच "**त्रिंबकजी**ला पकडून देणारास बक्षीस मिळेल" असे जाहीरनामे **बाजी**नें लाविले आणि **त्रिंबकजी** सांपडे तोंपर्यंत सिंहगड वगैरे किल्ले इंग्रजांच्या स्वाधीन केले.

**बाजीरावाशीं आणखी तह.** इंग्रजांनीं एक नवा तह बाजीरावाशीं केला. त्यामुळें बाजीरावाची बहुतेक स्वतंत्रता नष्ट झाली.

इ. स. १८१७, पुण्याचा तह.

इतउत्तर पेशव्यांनीं मुलुखगिऱ्या करूं नयेत, इंग्रज सैन्याच्या खर्चासाठीं बत्तीस लाखांचा मुलूख इंग्रजांस द्यावा अशीं कलमें या तहांत होतीं. तीं **बाजीरावा**नें निमूटपणें मान्य केलीं.

**९५. इंग्रजांशीं वैर.** दिवसेंदिवस इंग्रज आपलें स्वातंत्र्य हिसकावून घेतात असें पाहून बाजीरावानें त्यांचा

इ. स. १८१७, इंग्रज व पेशवे यांचें युद्ध.

द्वेष करण्यास सुरुवात केली. **बापू गोखल्या**च्या मसलतीनें इंग्रजांशीं बाजीरावानें पुनः युद्ध सुरू केलें.

पहिलीच लढाई खडकी येथें झाली. या लढाईत पराभव झाला असें पाहतांच बाजीराव पळत सुटला. बरोबर सातारकर **प्रतापसिंह** राजालाही बाजीरावानें घेतलें होतें. कोरेगांव मुक्कामीं इंग्रजसेना व पेशवे यांची पुनः गांठ पडली. हींतही पेशव्याचा मोड झाला.

इ. स. १८१८, आष्टें मुक्कामची लढाई.

पुढें इंग्रज आणि **गोखले** यांची गांठ पुनः **आष्टें** मुक्कामीं पडली. **बापू** गोखला मोठ्या शौर्यानें लढला. ऐन लढाईच्या प्रसंगीं शत्रूच्या सैन्यांतून एकामागून एक अशा तीन गोळ्या आल्या आणि **बापू** गोखला ठार होऊन पडला. याही लढा-

ईंत इंग्रजांस फत्ते मिळाली. सातारकर राजा **प्रतापसिंहही** याच ठिकाणीं इंग्रजांच्या हातीं लागला. त्यास साताऱ्यांत नेऊन गादीवर इंग्रजांनीं बसविलें.

**९६. बाजीरावाचा शेवट**—आष्ट्याच्या लढाईनंतर नागपूरकराच्या आश्रयास राहावें ह्मणून तिकडे बाजीराव चालला, तों वाटेंत पुनः इंग्रजांची गांठ पडली. तेव्हां आपण शरण आलों असें त्यानें **मालकम** साहेबास कळविलें. दरसाल **आठ लाख** रुपये नक्त घेऊन पेशवाईचा सर्व हक्क बाजीरावानें सोडावा असें ठरलें. बाजीराव **ब्रह्मावर्तास** निघून गेला. बाजीराव दुर्व्यसनी, हलक्या मनाचा, चंचलबुद्धी, खुनशी आणि भेकड होता. बाजीरावाच्या या गुणांनीं आमच्या लोकांच्या स्वातंत्र्याचा नाश झाला आणि आह्मी नादान व बंदेगुलाम होऊन बसलों.

इ० स० १८३९, प्रतापसिंहास पदच्युत केलें.

**प्रतापसिंह पदच्युत होतो.** लौकरच **प्रतापसिंहावर** फितुरीचा आरोप आला आणि त्यामुळें इंग्रजांनीं त्यास पदच्युत केलें.

## सातव्या प्रकरणावर प्रश्न.

**९३.** गंगाधरशास्त्री कोण ? तो पेशव्यांकडे कां आला होता ? त्याचें पुढें काय झालें ?

**९४.** त्रिंबकजीची पुढील हकीकत काय ? बाजीरावानें इंग्रजांशीं कोणता तह केला ? त्याचीं कलमें ?

**९५.** इंग्रजांशीं बाजीरावानें वैर कोणाच्या मसलतीनें आरंभिलें ? लढाया किती झाल्या ? त्या कोणकोणत्या ?

**९६.** बाजीरावाचा शेवट कसा झाला ? सातारकरांची काय व्यवस्था झाली ? प्रतापसिंहाला पदभ्रष्ट कां केलें ?

## प्रकरण ८ वें.

# हिंदुपदपातशाही.

### शाहाजी १८३९–४८. (९ वर्षें.)

१ राज्यप्राप्ति. २ मरण. ३ हिंदुपदपातशाहीचा अस्त.

९७. प्रतापसिंहास गादीवरून काढल्यानंतर त्याचा भाऊ **शाहाजी** याला इंग्रजांनीं मराठी राज्याचा वारसदार कबूल केलें. भावाची गादी **शाहाजी**ला मिळाली. तिचा उपभोग त्यानें नऊ वर्षें घेतला. आपणाला औरस संतति नाहीं ह्मणून एक मुलगा यानें दत्तक घेतला होता. याच्या कारकिर्दींत ह्मणण्यासारख्या कांहींएक महत्वाच्या गोष्टी झाल्या नाहींत, कारण सर्व सत्ता इंग्रजांच्या हातीं गेली होती.

**शाहाजी** मेल्यानंतर साताराचें राज्य इंग्रजांनीं खालसा केलें. लार्ड डलहौसी हा कलकत्त्याचा गव्हर्नर जनरल होता. औरस संततीखेरीज इतरांस राज्य चालवूं द्यावयाचें नाहीं असा यानें नियम केला होता.

इ. स. १८४८ त इंग्रजांनीं साताराची गादी बुडविली.

हिंदु धर्मशास्त्राप्रमाणें दत्तक पुत्र आणि औरस पुत्र यांच्यांत मुळींच अंतर नाहीं. पण कंपनी सरकाराला तें मान्य नव्हतें. आपलें राज्य वाढेल तितकें वाढवावें, या इच्छेमुळें इंग्रज लोकांच्या अधिकाऱ्यांनीं असला नियम केला. अशा प्रकारें साताराचें राज्य इंग्रजांनीं आपल्या राज्यांत सामील केलें आणि हिंदुपदपातशाहीची इमारत जमीनदोस्त झाली.

## आठव्या प्रकरणावर प्रश्न.

९७. प्रतापसिंहानंतर गादीवर कोणास बसविलें ? तो किती वर्षें होता ? त्याचें राज्य कां खालसा केलें ? कंपनी सरकारचा गव्हर्नर जनरल कोण होता ?

---

# भाग ४.

## इंग्रजी साम्राज्य.

### प्रकरण १ लें.

( युरोपच्या लोकांचा आमच्या देशीं प्रवेश. )

१ हिंदुस्थानचा शोध; पोर्तुगालचे लोक; त्यांचा अंमल. २ डच लोक; इंग्रज; फ्रेंच लोक.

**९८.** ज्या काळीं मोगल बादशहाशीं भांडून **मराठ्यांनीं** आपली पातशाही स्थापिली, त्याच काळीं दिगंतींही रहाणारे विविध लोक व्यापाराच्या वगैरे निमित्तानें हिंदुस्थानांत ये जा करूं लागले होते. या विविध लोकांपैकीं एका जातीचे लोक आपले हात पाय सवडी-प्रमाणें हळूहळू पसरीत गेले, ते अखेरीस आपल्या देशीं आज एक-छत्री होऊन बसले आहेत.

आमच्या देशांत युरोपखंडांतून आलेले लोक **फिरंगी, वलंदेज, फ्रेंच** व **इंग्रज** होत. या चारांपैकीं पहिल्या तीन लोकांच्या कांहीं निशाण्या राहिलेल्या असून, आज हिंदुस्थानांत साम्राज्य इंग्रज लोकांचेंच आहे.

**वास्कोडिगामा** नामक एका फिरंगी नावाड्यानें हिंदुस्थानाला येण्याचा जलमार्ग इ० स० १४९८ मध्यें प्रथमतः शोधून काढिला. याच्यापूर्वीं जलमार्गें हिंदुस्थानास येण्याचें युरोपखंडामध्यें कोणाला माहीत नव्हतें. आफ्रिकाखंडास वळसा घालून केप ऑफ् गुड होपवरून हिंदुस्थानांतल्या पश्चिम किनाऱ्यावर वास्कोडिगामा येऊन उतरला. गोव्याखालीं कालिकत बंदर आहे तेथील **तंबुरिन** नांवाच्या हिंदुराजानें आपला आश्रय **वास्कोडिगामा** यास दिला. आज थोडा, उद्यां थोडा, असा वसाहतीस मुलूख मागत मागत बरींच ठाणीं पोर्तुगीज लोकांनीं येथें वसविलीं. तीं लौकरच वाढूं लागलीं आणि त्या सर्वांची देखरेख पाहण्यासाठीं एक स्वतंत्र सुभेदार नेमणें पोर्तुगालच्या

इ० स० १५०८, अल्बुकर्क हिंदुस्थानांत प्रथम येतो.

राजास भाग पडलें. फिरंगी लोकांस पोर्तुगीज असें इंग्रजींत ह्मणतात व यांच्या देशाचें नांव पोर्तुगाल. **अल्फान्सो अल्बुकर्क** हा फिरंग्याच्या राजानें पाठविलेला पहिला सुभेदार.

इ० स० १५१५. गोवाप्रांत अल्बुकर्कानें प्रथमतः सर केला. अल्बुकर्कानें ७ वर्षांत जितकीं ठाणीं इकडे वसविलीं, त्याच्या चतुर्थांशही पुढें २० वर्षांत दुसऱ्या पोर्तुगीज सरदारांस वसवितां आलीं नाहींत **अल्बुकर्क** हा जसा रणधुरंधर होता, तसाच राज्यकार्यधुरंधर होता. फिरंगी लोकांच्या ताब्यांत हिंदीमहासागरांतील बहुतेक बंदरें या काळीं आलीं. बंगाल्यांत व गुजराथेंतही त्यांनीं वखारी घातल्या.

**९९.** लौकरच फिरंग्यांचा उत्कर्ष पाहून हालंडदेशांतील 'वलंदेज' किंवा डच लोकही हिंदुस्थानाशीं व्यापार करूं लागले. बंगाल्याकडील **चिनसुरा** हें डच लोकांच्या वसाहतीचें मुख्य ठिकाण होतें.

हिंदुस्थानांत आपणही व्यापाराला जावें, ह्मणून इंग्रज लोक प्रथमतः १५९१ मध्यें गुडहोपवरून हिंदुस्थानांत यावयास निघाले. पण वाटेंतच त्यांचीं जहाजें वगैरे बुडून भारी वाताहत झाली. तथापि न डगमगतां पुढें ९ वर्षांनीं आणखी एक मंडळी **ईस्ट इंडिया कंपनी** या नांवानें हिंदुस्थानांत व्यापार करावयास आली. दिल्लीचा बादशहा जहांगिर यानें आपल्या राज्यांत वखारी स्थापण्याची इंग्लिशांस प्रथम परवानगी दिली. सर टामस रो ह्मणून इंग्रज वकील बादशहाचे दरबारीं असे, त्यानें केवळ कंपनीच्या हिताकडे लक्ष देऊन बरींच कामें केलीं. डाक्टर **बौटन** या इंग्रज वैद्यानें शहाजहान बादशहाची मुलगी फार आजारी होती, तिला बरें केलें. तेव्हां इनामादाखल अनेक व्यापारी हक्क आपल्या लोकांसाठीं या वैद्यानें बादशहाकडून मागून घेतले. पुढें हुगळी येथें एक किल्ला बांधण्याची इंग्रजांस परवानगी मिळाली. आणि मुंबई बेट आंदणादाखल पोर्तुगालच्या राजाकडून इंग्रजांच्या राजास मिळालें होतें तेंही त्या राजानें या इंग्रज कंपनीस दिलें. औरंगजेबानें यांचीं कित्येक ठाणीं

इ. स. १६००, ईस्ट इंडिया कंपनीची स्थापना.

कांहीं अपराधावरून एकदां जप्त केलीं होतीं पण पुढें औरंगजेबाच्या नातवानें जप्त केलेलीं व दुसरींही अनेक नवीं ठाणीं इंग्रजांस विकत दिलीं.

इ. स. १६०४, फ्रेंच हिंदुस्थानांत आले.

इंग्रज आल्यावर थोडक्याच दिवसांनीं त्यांचे प्रतिस्पर्धी फ्रेंचही या देशांत आले. **मार्टिन** नांवाच्या फ्रेंचानें पूर्व किनाऱ्यावरील **पांदेचेरी** हें शहर विकत घेतलें. औरंगजेबाची इंग्रज व्यापाऱ्यांवर खप्पा मर्जी झाली असें पाहून, फ्रेंच लोकांनीं त्याची बरीच मर्जी संपादन करून घेतली. **चंद्रनगर** हें फ्रेंचांचें कलकत्याजवळचें शहर वसविण्याला औरंगजेबानेंच परवानगी दिली होती.

**डुप्ले** ह्मणून एक मोठा कारस्थानी सुभेदार फ्रेंचांनीं नेमला होता. त्याच्या मनांतून इंग्रजांस येथून हुसकून लावावें आणि आपली राज्यसत्ता येथें स्थापावी असें होतें. त्याप्रमाणें तो त्या उद्योगास लागला आणि या दोन परदेशी लोकांमध्यें तंटा जुंपला.

## पहिल्या प्रकरणावर प्रश्न.

९८. युरोपखंडांतील कोणकोणते लोक आमच्या देशांत आले. पहिल्यानें जलमार्ग (आमच्या देशाचा) कोणीं व कधीं शोधून काढिला? तो प्रथमतः कोणत्या ठिकाणीं उतरला? अल्बुकर्क हा कोण? त्यानें कोणता प्रांत सर केला?

९९. डच लोक कोणत्या देशाचे रहिवाशी? त्यांचें अगदीं पहिलें ठाणें कोणतें? ईस्ट इंडिया कंपनी कधीं व कोणीं स्थापिली? डा. बौटन हा कोण? त्यानें काय केलें? मुंबई इंग्रज व्यापाऱ्यांस कोणाकडून मिळाली? इंग्रज व्यापाऱ्यांस व्यापार करण्याला कोणत्या बादशहानें परवानगी दिली? डुप्ले कोण? त्याच्या मनांत काय होतें?

# इंग्रजी साम्राज्य.

## प्रकरण २ रें.

( फ्रेंच आणि इंग्रज यांच्या कर्नाटकांतील लढाया. )

१ भांडणास सुरवात; डुप्लेची फत्ते. २ अर्काटवर हल्ला. वांदिवाशची लढाई आणि फ्रेंचांचा पराभव.

१००. फ्रेंच आणि इंग्रज हे लोक युरोपखंडांतही पिढीजादे प्रतिस्पर्धी ह्मणून नांवाजलेले आहेत. डुप्ले आणि लाबरदोने या उभयतां फ्रेंच सरदारांनीं आपला पक्ष पहिल्यानें चांगला संभाळिला होता. इंग्रजांकडील **मद्रास** हें ठाणेंसुद्धां फ्रेंचांनीं सर केलें. इतक्यांत **अनवरुद्दीन** नामक कर्नाटकाच्या नबाबानें "नुक्तेंच सर केलेलें मद्रास शहर आपल्यास द्या" असा डुप्लेस निरोप पाठविला. तो त्यानें मान्य केला नाहीं. यामुळें नबाबास राग येऊन दहा हजार सैन्याची फ्रेंचांवर रवानगी केली. पण त्यापासून तादृश फायदा झाला नाहीं. फ्रेंचांनीं सर केलेलें ठाणें इंग्रजांनीं लवकरच परत घेतलें. चार लाख रुपये लांच लाबदरदोने यास देऊन **इंग्रजांनीं** मद्रास पुनः काबीज केलें, असें ह्मणतात. **पांदेचरी**नामक फ्रेंच ठाण्यासही वेढा दिला, तेव्हां उभयतांत कांहीं दिवस तह झाला.

इ. स १७४८, फ्रेंच व इंग्रज. यांच्यांत तह होतो.

याच सालीं हैद्राबादची गादी स्थापणारा **निजामउलमुलुख** वारला. तेव्हां **मुजफरजंग** आणि **नासरजंग** हे उभयता वारसदार पुढें सरसावले. या उभयतांत गादीसंबंधानें तंटे लागले: **नासरजंगा**नें गादी बळकाविली तेव्हां **मुजफरजंग** साताऱ्यास मराठ्यांकडे मदत मागावयाला आला. **मुजफरजंग** साताऱ्यास असतां त्याचा आणि **चंदासाहेब** याचा अप्रतिम स्नेह जमला. **चंदासाहेब** हा **दोस्तअली** नामक कर्नाटकच्या नबाबाची गादी स्थापणाऱ्या मूळ पुरुषाचा जांवई. मराठ्यांनीं दोस्तअलीचा पराभव करून युद्धांत त्याला ठार मारिलें

आणि त्याच्या जांवयास कैद करून सातारा येथें आणिलें होतें. त्या दोघांची जोडी जमतांच पुढें आपण कसें राज्य मिळवावें या विचारांत ते निमग्न झाले. फ्रेंचांकडील सरदार **डुप्ले** यानें मराठ्यांस मुबलक पैसे देऊन, **चंदा**साहेबाची कैदेंतून मुक्तता करून घेतली आणि **मुजफरजंगा**स तुला तुझी गादी देववितों असें आश्वासन दिलें. **मुजफरजंग, चंदासाहेब** आणि **फ्रेंच** असे तिघे मिळून **अनवरुद्दीना**वर चाल करून गेले. **अनवरुद्दीन** यानें **दोस्तअल्ली**ची म्हणजे चंदासाहेबाच्या चुलत्याची गादी बळकाविली होती. **अनुवरुद्दीन** याचा पुरा मोड **अंबूर** येथील लढाईंत झाला. **अनवरुद्दीन** आणि त्याचा वडील पुत्र असे उभयतां त्याच लढाईंत पडले. तेव्हां अनायासें कर्नाटकची गादी **चंदासाहेबास** मिळाली. परंतु **महंमदअल्ली** ह्मणून अनवरुद्दीनचा धाकटा मुलगा होता. आपला बाप आणि भाऊ यांस फ्रेंचांनीं व **चंदासाहेबानें** मारलें त्याचा सूड घ्यावा व बापाची गादी आपण मिळवावी यासाठीं त्यानें प्रयत्न चालविले. या कामीं मला मदत करा असें **महंमदअल्ली** इंग्रजांस विनवूं लागला, तें त्यांनीं मान्य केलें. याप्रमाणें हैद्राबादच्या नबाबाचा धाकटा मुलगा **नासरजंग** व कर्नाटकच्या नबाबाचा धाकटा मुलगा **महंमदअल्ली** यांचा पक्ष इंग्रजांनीं उचलला. हैद्राबादकराचा वडील मुलगा **मुजफरजंग** आणि कर्नाटकच्या नबाबाचा मुलगा **चंदासाहेब** यांचा पक्ष फ्रेंचांनीं घेतला. मुजफरजंग व नासरजंग ह्यांचा वध झाला, त्यामुळें **सलाबतजंग** ह्मणून सर्वांत धाकटा त्यांचा भाऊ होता त्याला फ्रेंचांनीं हैद्राबादची गादी देवविली आणि **चंदासाहेबास** कर्नाटकची नबाबी मिळाली. यामुळें फ्रेंचांचा पगडा चांगला बसून इंग्रज फिक्के पडले.

इ० स० १७४८, अंबूरची लढाई, अनवरुद्दीनचा मृत्यु.

**१०१.** या इंग्रजांवर कोसळलेल्या प्रसंगीं राबर्ट क्लैव्ह ह्मणून एक साधारण कारकून आणि विलक्षण धाडसी होता त्यानें आपली तलवार गाजविली आणि नांव मिळविलें. **त्रिचनापल्ली**ला चंदासाहेबानें

वेढा घातला होता, तो उठविण्यासाठीं अर्कोटास **क्लैवनें** वेढा घातला. तों त्या वेढ्यांत **मुराररराव घोरपडे** हा मराठा सरदारही क्लैवास येऊन मिळाला. क्लैवच्या तलवारीला या वेढ्यांत चांगलें यश आलें. पुढें क्लैव कलकत्याकडे गेला आणि फ्रान्सांतून लालीनामक सरदार डुप्लेच्या जागेवर आला.

इ. स. १७५१, अर्कोट सर केलें.

इंग्रजांशीं भांडण्यासाठीं **लाली** व **बूसी** हे फ्रेंच सरदार सैन्य घेऊन निघाले. त्यांना सर **आयर कूट** हा इंग्रज सरदार **वांदिवाश** येथें भेटला. उभयतांमध्यें फार निकराचें युद्ध या प्रसंगीं झालें. त्यांत पुरा मोड होऊन फ्रेंचांस उतरती कळा लागली. सर्व ठाणीं इंग्रजांनीं सर केलीं आणि **लालीस** फ्रेंच सरकारानें कैद करून स्वदेशीं नेलें.

इ. स. १७५९ वांदिवाशची लढाई.

## दुसऱ्या प्रकरणावर प्रश्न.

**१००.** मुजफरजंग कोण? तो साताऱ्यास कां गेला? चंदासाहेब कोण व तो साताऱ्यास कशाला गेला होता? महंमदअल्ली कोण? त्याचा पक्ष कोणीं घेतला? इंग्रजांनीं आणखी कोणाचा पक्ष धरला होता? अंबूर येथें कधीं व कोणाकोणांत लढाई झाली?

**१०१.** अर्कोटास वेढा कोणीं व कां दिला? वांदिवाशची लढाई कोणकोणांत व कधीं झाली? त्यांत पराभव कोणाचा झाला? लाली कोण? सर आयर कूट कोण?

---

# इंग्रजी साम्राज्य.

## प्रकरण ३ रें.

### ( बंगाल्याकडील हकीकत. )

१ कलकत्याचा कोंडमारा आणि प्लासीची लढाई. क्लैवनें केलेला बनावट कागद.

**१०२. अलीवर्दीखान** ह्मणून **बंगाल, बहार** व ओरिसा या प्रांतांचा सुभेदार होता. हा लौकरच या काळीं स्वतंत्र नबाब बनला.

त्याच्या पश्चात् ती गादी **सुजाउद्दौला** नांवाच्या त्याच्या नातवास मिळाली. **सुजाउद्दौल्या**चें इंग्रजांशीं नीट नव्हतें, ह्मणून एके प्रसंगीं कासिमबजारांतील इंग्रजांच्या दुकानांवर **सुजाउद्दौल्या**नें शिपाई पाठवून तें दुकान लुटविलें. इतक्यांत फोर्ट सेंट जार्ज नामक किल्ल्याची कलकत्ता येथें इंग्रजांनीं नबाबाची परवानगी न घेतां दागदुजी चालविली. तेव्हां कलकत्त्यावर नबाब चालून गेला. बरेच इंग्रज पळून गेले, तरी नबाबाच्या हातीं सुमारें १५० लोक सांपडले. त्यांस एका अंधारकोठडींत घालून ठेवण्यास **सुजाउद्दौल्या**नें आपल्या लोकांस फर्माविलें. रात्रीच्या वेळीं त्या कोंडलेल्या कैद्यांचे फार हाल होऊं लागले. पण नबाब साहेब त्या वेळीं निजलेले. त्यांस जागें करण्याचें शिपाई लोकांस धैर्य होईना त्यामुळें ते बिचारे इंग्रज कैदी तडफडून मेले. या कृत्याचा सूड घेण्याचा निश्चय करून इंग्रजांनीं **सुजाउद्दौल्या**चा सेनापति **मिरजाफर** नांवाचा होता, त्यास नबाबाची गादी देण्याचें कबूल केलें आणि फितविलें. त्याचप्रमाणें राजा **रायदुर्लभ** नामक **सुजाउद्दौल्या**चा खजानजीही इंग्रजांकडे फितला. तेव्हां **सुजाउद्दौल्या**स लढाईंत गांठून ठार करण्याचा विचार इंग्रजांचा कायम झाला व तें काम त्यांनीं **क्लैव**कडे सोंपविलें. या मसलतींत **ओमिचंद्** नामक एक अति लोभी बंगाली सावकार होता. तीस लाख रुपये द्या, नाहींतर ही मसलत मी नबाबास कळवितों, असें त्यानें **क्लैव**ला ह्मटलें. तेव्हां नाइलाजास्तव **क्लैव**नें बरें आहे असें ह्मणून तीस लाखांची चिठी **ओमिचंदा**स करून दिली. त्याच्यावर **वाटसन** नांवाच्या कामगाराची सही हवी होती. पण ती **वाटसन** यानें केली नाहीं. तेव्हां एक खरी व एक खोटी अशा दोन चिठ्या करून, एकीवर **वाटसन**ची बनावट सही **क्लैव**नें केली. अशा प्रकारें आंतून पक्का बंदोबस्त करण्यांत आल्यावर **प्लासी** मुक्कामीं इंग्रज आणि **सुजाउद्दौला** यांची लढाई जुंपली.

इ० स० १७५७, प्लासीची लढाई.

लढाईंत नबाबाचा पराभव झाल्यानंतर गादी बोलीप्रमाणें **मिरजाफरा**स इंग्रजांकडून मिळाली. नंतर लौकरच **क्लैव** विलायतेस

गेला. त्याच्या जागयावर आलेल्या **वान्सिटार्टा**चें आणि **मिरजाफरा**चें जमेना; कारण **मिरजाफर** पूर्वी गादी मिळाली तेव्हां जरी श्रीमंत झाला होता, तरी **क्लैव**ला व इंग्रज यांस देणग्या देऊन देऊन आतां बहुतेक निर्धन झाला. त्यामुळें **मिरजाफरा**स पदच्युत करून त्याच्या **मिरकासिम** नांवाच्या जांवयास गादीवर बसविण्याचा घाट **वान्सिटार्ट**नें घातला व त्याप्रमाणें सर्व लौकरच घडूनही आलें. **मिरकासिम**नेंही गादी मिळाल्यानंतर इंग्रजांचा पुष्कळ फायदा करून दिला. पण पुढें **मिरकासिमा**शींही इंग्रजांचें पटेना. इंग्रजांचे वरचेवर तगादे लागूं लागले व त्यामुळें भांबावल्यासारखी अवस्था होऊन, इंग्रजांची कत्तल करण्याचा हुकूम **मिरकासिमा**नें आपल्या लोकांस दिला. ही कत्तल पाटणा येथें झाली. या कत्तलींत "वाल्टर रेन्सडार्ड" नांवाच्या एका गोऱ्यानेंच नांव विशेष मिळविलें. यास इतिहासांत **समरू** असें ह्मणतात.

इ० स० १७६४, पाटणा येथील कत्तल.

पुढें या कत्तलीचा सूड घेण्यासाठीं इंग्रजांचें लष्कर आलें, त्याची व **मिरकासिम**ची गांठ बक्सार येथें पडली. त्या लढाईंत **मिरकासिम**चा पराभव झाला व **मिरजाफर** यासच पुनः इंग्रजांनीं नबाब केलें ! लौकरच **मिरजाफर** मरण पावला. त्याच्या पश्चात् **निजामउद्दौला** नांवाचा त्याचा मुलगा नबाब झाला. इतक्यांत नामधारी दिल्लीपतीपासून बंगाल्याची सनद आपण घेऊन, **निजामउद्दवल्या**स इंग्रजांनीं हुसकून लाविलें. याप्रमाणें गादीवर बसवितेवेळीं नबाब **निजामउद्दौला** यानें इंग्रजांस नजराणा दिलेला व्यर्थ जाऊन, परभारें तोच मुलूख इंग्रजांस दिल्लीपतीकडून मिळाला. याप्रमाणें बंगाल्यांत इंग्रजी अंमलाची स्थापना झाली.

इ. स. १७६४, बक्सारची लढाई.

इ. स. १७६५, मिरजाफराचा मृत्यु.

## तिसऱ्या प्रकरणावर प्रश्न.

**१०२.** सुजाउद्दौला कोण ? मिरजाफर हा कोण ? प्लासीची लढाई कधीं झाली ? ओमीचंदाबद्दल काय हकीकत आहे ? क्लैवानें खोटी

सही कोणाची केली व बनावट कागद कां केला ? मिरजाफराला गादीवरून काढण्याचें कारण ? मिरकासिम कोण ? पाटणा येथें कोणाची, व कधीं कत्तल झाली ? समरू कोण ? बक्सारच्या लढाईचें कारण काय ? मिरकासिमची गादी कोणास मिळाली ? मिरजाफर कधीं मेला ? मिरजाफरानंतर कोण गादीवर आला ? त्याचें राज्य कसें गेलें ?

# इंग्रजी साम्राज्य.

## प्रकरण ४ थें.

## (वारन हेस्टिंग्स.)

१ रोहिल्यांशीं युद्ध. २ गव्हर्नर जनरलाचा अधिकार; नंदकुमार; चेतसिंग; अयोध्येच्या बेगमा; हैदरशीं युद्ध; मराठ्यांशीं प्रसंग.

बंगाला हातीं आल्यानंतर व्यवस्था ठेवण्यासाठीं एका सुभेदाराची नेमणूक झाली. **हेस्टिंग्स** हा पहिला सुभेदार.

**१. रोहिल्यांशीं युद्ध.** अयोध्या प्रांताशेजारील बुंदेलखंड नांवाच्या प्रांतांत रोहिले नांवाचे लोक राहत. या लोकांचे पूर्वज अफगाण होते. रोहिलखंडावर मराठ्यांनीं स्वारी केली, तेव्हां आपल्या बचावासाठीं अयोध्येच्या नबाबाकडे त्या रोहिल्यांनीं कुमक मागितली व साहाय्य केल्यास ४० लाख रुपये देऊं असें कबूल केलें. पण मराठ्यांच्या वाटेस दुसऱ्या कोणाच्या मदतीशिवाय जाण्याचें नबाबाला धैर्य होईना. तेव्हां रोहिल्यांनीं कबूल केलेले ४० लाख रुपये देण्याचें कबूल करून रोहिलखंड जिंकून आपल्या हातीं देण्याची कामगिरी नबाबानें इंग्रजांवर सोंपविली. तेव्हां इंग्रजांनीं रोहिल्यांशीं झगडा सुरू केला.

इ. स. १७७४, रोहिल्यांशीं युद्ध.

**वारन हेस्टिंग्सला अव्वल इलाखाधिपतीचा (गव्हर्नर जनरलचा) अधिकार मिळतो.** हिंदुस्थानांत कंपनीच्या ताब्यांतील मुलुखांत अतिशय अंदाधुंदी आहे व राज्यव्यवस्थेचा धरबंध ह्मणून कसा तो बिलकूल-नाहीं, असा बोभाटा झाल्यामुळें व्यवस्थितप-

णानें राज्यकारभार चालावा या हेतूनें विलायतेच्या पार्लमेंट सभेनें एक कायदा पसार केला. त्या कायद्याअन्वयें बंगाल्याच्या इलाख्याच्या अधिपतीस (गव्हर्नरास) अव्वल इलाखाधिपति (गव्हर्नर जनरल) ह्मणून त्याचाच अंमल हिंदुस्थानांतील इतर इंग्रजी मुलुखावर चालावा; त्याच्या हाताखालीं चार मंत्र्यांचें एक मंडळ (कौन्सिल) असावें; या मंत्रिमंडळाचा सल्ला घेऊन अव्वल इलाखाधिपतीनें मुलकी वगैरे सर्व कारभार चालवावा; जी व्यवस्था लागणें ती चौघे मंत्री व पांचवा अव्वल इलाखाधिपति ही पंचकडी बहुमतानें ठरवील त्याप्रमाणें लागावी; इतका या कायद्याचा हेतु होता.

इ० स० १७७३ मधील कायदा पसार झाला.

या कायद्याअन्वयें **वारन हेस्टिंग्स** हा पहिला अव्वल इलाखाधिपति (गव्हर्नर जनरल) झाला. कायद्याअन्वयें सगळी सत्ता अव्वल इलाखाधिपतीकडे नसून, ती या मंत्रिमंडळाकडे आहे, असें जेव्हां लोकांस कळलें तेव्हां अव्वल इलाखाधिपतीवरही लांच खाल्ल्याचे आरोप येऊं लागले. **नंदकुमार** नांवाचा एक हिंदु व्यापारी होता, त्यानें हेस्टिंग्सनें एके प्रकरणांत लांच घेतला अशी फिर्याद कौन्सिलापुढें आणिली. कौन्सिलदारांनींही फिर्यादीचा निकाल करण्याचें मनावर घेतलें. पण या निकालाचे पूर्वींच खोटा दस्तऐवज केल्याची फिर्याद **नंदकुमारा**वर एकाकडून आणविण्यांत आली. **एलिजा इंपी** ह्मणून **हेस्टिंग्स**चा बाळमित्र व सहाध्यायी या काळीं कलकत्त्याचा सर न्यायाधीश होता, त्याच्याकडे ही फिर्याद चालली. आरोप शाबीत झाला, असें ठरवून **नंदकुमारास** फांशीची शिक्षा या न्यायाधिशानें ठोठाविली !!! खोटी सही करणाऱ्या **क्लैवाची** दिवसेंदिवस बढती करणाऱ्या इंग्रजांकडूनच बनावट दस्तऐवज केल्याचा आरोप आलेल्या **नंदकुमारास** फांशीची शिक्षा ठोठाविण्यांत यावी काय ? धर्मवृत्ति व सत्यनिष्ठ असे जे अनेक गृहस्थ आज इंग्रज लोकांमध्यें आहेत, ते जसें **क्लैवचें** तसें **हेस्टिंग्स**चेंही नांव निघालें ह्मणजे तोंड खालीं घालतात.

बनारस ऊर्फ काशी हा तालुका पूर्वीं अयोध्येच्या नबाबाकडे होता. तो

नबाबाकडून इंग्रजांनीं घेतला, व त्यामुळें काशीचा राजा **चेतसिंग** इंग्रजांस खंडणी देऊं लागला. पण या काळचे इंग्रज अंमलदार त्यांच्या शब्दावर डोळे मिटून विश्वास ठेवण्यासारखे नव्हते. **हेस्टिंग्स**ला पैशाची गरज लागली व दुप्पट पैशाची मागणी **चेतसिंगा**कडे **हेस्टिंग्स**नें केली. तगादा लागूं नये या हेतूनें **चेतसिंगा**नें एक वर्ष तितकी सगळी रकम दिलेली पाहून, **हेस्टिंग्स** कोंपरानें खणूं लागला व पुढलेच वर्षीं जास्त पैसे मागूं लागला. बरीच मोठी रकम **हेस्टिंग्स**कडे येऊनही पोंचली होती. ही रकम घशाखालीं उतरविण्याचा **हेस्टिंग्स**चा विचार दिसतो. पण **चेतसिंग** इतर कौन्सिलदाराचा स्नेही आहे तेव्हां न जाणों कदाचित् ही गोष्ट बाहेर उघडकीस येईल, या भीतीनें आपणांजवळ दडपून ठेविलेली वीस लाखांची रकम कंपनीकडे जमा केली आणि पुनः दहा लाखांची जास्त मागणी करून ती वसूल करण्यासाठीं सैन्याची रवानगी केली, इतकेंच नाहीं, तर स्वतः **हेस्टिंग्स** बनारसला गेला. **हेस्टिंग्स**चें ह्मणणें **चेतसिंग** ऐकेना. तेव्हां त्याला कैद करण्याचा हुकूम सुटला. **चेतसिंगास** कैद केलें ह्मणतांच बनारसेंतील बैरागी संन्यासी वगैरे लोकांनींसुद्धां बंड करून **चेतसिंगास** सोडविलें आणि **हेस्टिंग्स** उतरला होता त्या जागेला गराडा देऊन त्याला नकोनकोसें करून सोडिलें. त्या दिवशीं **हेस्टिंग्स** प्राणालाच मुकावयाचा; पण त्याच्या हिंदु नौकरांनीं आपलें इमान जाणून धन्यास कसें तरी संकटांतून सोडविलें. **चेतसिंग** सुटला, तो **हेस्टिंग्स**सारख्या कंपनीच्या इमान न राखणाऱ्या अगदीं अव्वल अधिकाऱ्याच्या जुलमाला कंटाळून पळून गेला!

**चेतसिंगा**ला अशा प्रकारें लुबाडल्यानंतर **हेस्टिंग्स**ची वक्र दृष्टि अयोध्येच्या बेगमांकडे वळली. नबाबाच्या **बायकां**जवळ मुबलक संपत्ति स्त्रीधनाची होती, ती उपटण्यासाठीं **हेस्टिंग्स**नें त्या अबलांवरही पुष्कळ जुलूम चालविला आणि अखेरीस ७६ लाख रुपये काढले.

**चेतसिंगा**शीं आणि बेगमांशीं **हेस्टिंग्स** कसा वागला ती कच्ची हकीकत जेव्हां कंपनीस विलायतेंत कळली, तेव्हां **हेस्टिंग्स**ला मोठा

ठपका देण्यांत आला. हिंदुस्थान देशांत इंग्रजी साम्राज्याचा पाया याप्रमाणें **क्लैव** व **हेस्टिंग्स** या दुकलेनें घातला.

**मराठ्यांशीं युद्ध.** मराठ्यांनीं आपलें स्वतंत्र साम्राज्य स्थापिलें होतें, त्यांच्याशीं इंग्रजांचा पहिल्यानें अर्थाअर्थीं संबंध नव्हता. दुसऱ्या **बाजीराव** पेशव्याचा बाप **राघोबा** यानें गृहकलह माजवून इंग्रजांस पहिल्यानेंच घरांत आणिलें. **नारायणरावा**च्या वधानंतर पुण्याच्या दरबारांत फळ्या झाल्या, एक **राघोबा**ची व दुसरी त्याच्या उलट. लवकरच पळून जाण्याचा प्रसंग **राघोबा**वर आला, तेव्हां **राघोबा** इंग्रजांकडे गेला. **राघोबास** पेशवाई देण्याची खटपट इंग्रजांनीं चालविली. **राघोबा**शीं इंग्रजांनीं तह केला, त्यास "सुरते"चा तह ह्मणतात. पण हा तह **वारन हेस्टिंग्स**नें रद्द करून, त्याच्या उलट दुसरा तह मराठ्यांशीं पुरंदर मुक्कामीं केला. इंग्रजांनीं **राघोबा**चा पक्ष सोडावा व तो सोडण्याबद्दल पुण्याच्या दरबारानें साष्टी बेट इंग्रजांस द्यावें; हीं या तहाचीं मुख्य कलमें होतीं. पुढें जिकडे तिकडे अंदाधुंदी माजलेली पाहून,—जसा पूर्वीं **शिवाजी**चा विजापुरकरांच्या मुलखांत तसा—इंग्रजांचा या काळीं पेशव्यांच्या मुलखांत पाय पसरत चालला आणि साष्टी प्रांतीं व्यवस्था लागूं लागली. त्यामुळें वडगांव मुक्कामीं पेशव्यांशीं तह करण्याचेही प्रसंग इंग्रजांवर पडले. पुढें साल्पे मुक्कामींही आणखी तह करण्यांत आला. इतके प्रसंग मराठ्यांशीं इंग्रज लोकांचे **वारन हेस्टिंग्स**च्या कारकिर्दींत पडले.

इ० स० १७७५-८२.

इ. स. १७७६, पुरंदरचा तह.

इ. स० १७७८, वडगांवचा तह.

इ. स. १७८२, साल्पे मुक्कामचा तह.

**हैदरअलीशीं युद्धः**—ह्मैसूरशीं पहिलें युद्ध झालें त्याचा शेवट मद्रासच्या तहानें झाला. त्या तहांत अशी एक अट होती कीं, प्रसंगीं एकावर दुसरा शत्रु चाल करून आला असतां एकमेकांनीं एकमेकांस मदत करावी. इतक्यांत मरा-

त्यांनीं हैदरावर स्वारी केली. अशा प्रसंगीं हैदरास साहाय्य करणें इंग्रजांच्या हातून अनेक निमित्तांनीं झालें नाहीं. त्यामुळें मराठ्यांशीं तह करून हैदरानें इंग्रजांशीं तंटा सुरू केला. पोर्टोनोव्हो, **शिवलिंगगड** यालाच इंग्रज शालिगड ह्मणतात. वगैरे ठिकाणीं लढाया झाल्यानंतर, मंगळूरचा तह होऊन जुंपलेलें युद्ध थंडावलें. परस्परांनीं परस्परांचे जिंकलेले मुलूख परत द्यावे, ही मंगळूरच्या तहाची मुख्य अट होती.

इ० स० १७८१, पोर्टोनोव्हो, शिवलिंगगडच्या लढाया.

इ० स० १७८४, मंगळूरचा तह.

**हेस्टिंग्स**नें असला निंद्य क्रम चालविलेला पाहून त्यास त्याच्या वरिष्ठांकडून बराच ठपका येऊं लागला व अखेरीस त्रासून **हेस्टिंग्स**नें आपल्या कामाचा राजीनामा दिला. तेथें गेल्यावर एडमंड **बर्क** नांवाच्या एका मोठ्या वक्तया व थोर दिलाच्या राजकारणी गृहस्थानें या अव्वल इलाखाधिपतीस न्यायदेवतेच्या पुढें खेंचून बसविलें. पुढें अनेक निमित्तांनीं आठ वर्षांनीं जरी **हेस्टिंग्स** आरोपांतून मुक्त झाला, तरी **बर्क**नें सत्याची व न्यायाची बाजू घेऊन इंग्लंड देशाच्या राजकारणी इतिहासांत आपलें नांव अजरामर करून ठेविलें आहे. प्रसंग पडतो तेव्हां "**बर्क**" सारखे उदाहरणीय पुरुष खऱ्याच्या बाजूनें लढण्यास तयार असतात, ही गोष्ट इंग्रज लोकांस मोठी भूषणास्पद आहे. **बर्क**सारख्या उदाहरणीय ऐतिहासिक पुरुषावर किंवा त्याच्या चरित्रावर झांकण घालण्याचा किंवा त्यास कसपटाप्रमाणें लेखण्याचा उपदेश करण्याचा निंद्य क्रम इंग्लंडांतील कोणतेंही वर्तमानपत्र चालवीत नाहीं, या गोष्टींतही तिकडील वर्तमानपत्रकारांचा समंजसपणा उघड दिसून येत आहे.

इ. स. १७८५ हेस्टिंग्स विलायतेस जातो.

## ४ थ्या प्रकरणावर प्रश्न.

रोहिले कोठले लोक? त्यांच्यावर कोणीं स्वारी केली? नबाबानें साहाय्य करावें ह्मणून त्याला त्यांनीं काय देऊं केलें? हेस्टिंग्सनें रोहिल्यांवर कां स्वारी केली? १७७३ मधील कायद्यांचीं मुख्य कलमें

कोणतीं ? नंदकुमार कोण ? त्याचें पुढें काय झालें ? चेतसिंग कोण ? त्याला पकडून कैद करण्याचें कारण काय ? पुढें काय झालें ? अयोध्येच्या बेगमांवर हेस्टिंग्सची वक्र दृष्टि कां ? अखेरीस लाभ किती झाला ? हिंदुस्थानांत इंग्रजी साम्राज्याचा पाया घालणारी दुकल कोणती ? हैदराशीं तंटा जुंपण्याचें कारण काय ? कोणकोणत्या लढाया झाल्या ? हा तंटा कशानें बंद पडला ? मराठ्यांशीं इंग्रजांचा संबंध केव्हां जडला ? हेस्टिंग्स विलायतेला कां गेला ? एडमंड बर्क कोण? त्यानें काय केलें ?

विलायतेंतील लोकांस भूषणास्पद गोष्ट कोणती व तिकडील वर्तमानपत्रकारांचा समंजसपणा कशांत ?

# इंग्रजी साम्राज्य.

## प्रकरण ९ वं.

### लार्ड कार्नवालीस इ. स. १७८६–१७९३

१ राज्यव्यवस्था. २ म्हैसूरशीं तिसरें युद्ध.

**वारन हेस्टिंग्स**च्या पश्चात् **लॉर्ड कार्नवालीस** हा गव्हर्नर जनरल झाला. त्यानें राज्यव्यवस्था लावण्याकडेच आपलें बहुतेक लक्ष घालविलें. बंगाल्यांत कायमच्या साऱ्याची पद्धति **लार्ड कार्नवालीस**नें सुरू केली. बंगाल्यांतील जमिनीचा सारा एकदां ठरला तो ठरला. आपल्या इलाख्यांत तीस वर्षें गेलीं कीं पहाणी सुरू होते. आणि सारा वाढविण्यांत येतो. बंगाल्यांतील पद्धतीस "जमीनदारी" म्हणतात. जशी "जमीनदारी" व्यवस्थेंत आबादानी असते, तशी ३० वर्षांनीं पहाणीच्या व्यवस्थेंत नसते. पहिल्या व्यवस्थेंत उत्पन्न आपल्याच हातीं लागणार हें जमिनीचा मालक जाणून असतो. पण दर ३० वर्षांनीं सरकारचा हात पडतो आणि सारा वाढतो, म्हणून रयतेस शेतकीची सुधारणा करण्यास उमेद ३० वर्षांनीं पहाणीच्या व्यवस्थेंत येत नाहीं. बंगाल्यांतील लोक आज सधन आहेत, त्याचें मुख्य कारण **लार्ड कार्नवालीस** हा शहाणा गव्हर्नर जनरल होय.

**म्हैसूरशीं ३ रें युद्धः**—कुर्ग, मलबार वगैरे प्रांतांतल्या लोकांस जुलुमानें मुसलमान करण्याचा व ख्रिस्ती लोकांवर अतोनात जुलूम करण्याचा **टिप्पूनें** एकसारखा क्रम चालविला. त्रावणकोरच्या राजावर **टिप्पूनें** हल्ला केला, हेंही पाहून इंग्रजांचें पित्त खवळलें, कारण इंग्रज त्रावणकोरकरांशीं विशेष स्नेहभावानें वागत. मराठे व मोंगल यांसही **टिप्पूनें** दुखविलें होतें. त्यामुळें निजाम, मराठे व इंग्रज या त्रिवर्गानीं एकत्र होऊन **टिप्पूवर** स्वारी करण्याचा बेत केला. **लार्ड कार्नवालीस** हा स्वतः सेनाधिपतीचें काम पतकरण्यास कलकत्त्याहून आला. बेंगळूर शहर सर झाल्यानंतर श्रीरंगपट्टणाला **लार्ड कार्नवालीसनें** वेढा दिला. पेशव्यांचें लश्कर वाटेंत धुमाळी करण्यांत गुंतलें व समयीं येऊन पोंचलें नाहीं, ह्मणून **कार्नवालीस** हल्ला उठवून परत निघाला. इतक्यांत तें येऊन दाखल झालें. श्रीरंगपट्टणावर हल्ला जमलेलें लश्कर करणार, इतक्यांत **टिप्पूनें** तहाचें बोलणें लाविलें. त्यामुळें **लार्ड कार्नवालीसनें** तहाचीं कलमें **टिप्पूकडे** पाठविलीं. १. अर्धें राज्य या त्रिवर्गास द्यावें. २. लढाईच्या खर्चाबद्दल ३ कोटि ३० लक्ष रुपये पोंचवावे व या अटी पूर्ण होई तोंपर्यंत आपले दोन पुत्र ओलीस ठेवावेत, अशा या तहाच्या अटी होत्या. ह्या सर्व अटी **टिप्पूनें** मान्य केल्या. याला श्रीरंगपट्टणचा तह असें ह्मणतात. अशा प्रकारें म्हैसूरकरांशीं या तंट्याचा शेवट झाला.

इ. स. १७९२, श्रीरंगपट्टणचा तह.

इ. स. १७९३, लार्ड कार्नवालीस विलायतेस जातो.

यानंतर **लार्ड कार्नवालीस** विलायतेस चालता झाला.

## पांचव्या प्रकरणावर प्रश्न.

१ म्हैसूरशीं युद्ध जुंपण्याचें कारण काय? श्रीरंगपट्टणचा हल्ला अर्धाच सोडून **लार्ड कार्नवालीस** परत कां निघाला? या तंट्याचा शेवट कसा लागला?

# इंग्रजी साम्राज्य.

## प्रकरण ६ वें.

### सर जान शोर. इ. स. १७९३–९८.

**१ अयोध्येचा दंगा.**

**लार्ड कार्नवालीस** विलायतेस गेल्यानंतर गव्हर्नर जनरलच्या जागीं **सर जान शोर** याची नेमणूक झाली. तो फार भला माणूस होता. एतद्देशीय राजेरजवाड्यांच्या भांडणातंट्यांत बिलकूल पडावयाचें नाहीं असा त्याचा निर्धार होता व त्याच्या मालकांची ह्मणजे "कंपनीसरकार" चीही त्याला तशीच ताकीद होती. त्यामुळें मराठ्यांनीं हैदराबादकर निजामावर हल्ला करून खर्ड्यांची लढाई मारली, तरी इंग्रजांनीं आंत हात घातला नाहीं.

इ. स. १७९८, अयोध्येंतला दंगा.

**असफउद्दौला** अयोध्येचा नबाब वारला, तेव्हां त्याची गादी **वजीरअल्ली** ह्मणून कोणी दूरचा व व्यसनी नातेवाईक होता त्यानें बळकाविली. **सादतअल्ली** म्हणून **असफउद्दौल्याचा** भाऊ होता त्याला मात्र **सर जान शोरनें** गादीवर बसविण्याची खटपट केली. **वजीरअल्लीस** पदच्युत केल्यामुळें त्यानें खूप दंगा माजविला. पण तो लवकरच इंग्रजांनीं मोडला व **वजीरअल्लीस** कैद करून बनारस येथें अडकवून ठेविलें.

## सहाव्या प्रकरणावर प्रश्न.

१ खर्ड्यांच्या लढाईत इंग्रज कां पडले नाहींत? लार्ड कार्नवालीसनंतर गव्हर्नर जनरल कोण झाला? असफउद्दौला कोण? वजीरअल्लीस कां पदच्युत केलें?

# इंग्रजी साम्राज्य.

## प्रकरण ७ वें.

## मार्कीस आफ वेलस्ली. इ. स. १७९८–१८०५.

१ म्हैसूरकरांशीं चवथा तंटा. २ कर्नाटक व वायव्यप्रांत खालसा. ३ मराठ्यांशीं तंटा.

**म्हैसूरकरांशीं चवथा तंटा**—श्रीरंगपट्टणच्या तहापासून **टिप्पू** इंग्रजांचा अधिक द्वेष करूं लागला. मराठे इंग्रजांचे हितचिंतक नव्हत, हेंही "**वेलस्ली**"च्या लक्षांत आलें होतें. ह्मणून निजामास आपल्या बाजूस ओढून नेटानें काम उरकून घेण्याची मसलत वेलस्लीनें केली आणि लगेच **टिप्पूवर** स्वारी चालविली. सिद्धेश्वर व मालवेली या लढायांत **टिप्पूचा** मोड झाल्यावर, श्रीरंगपट्टणाला इंग्रजांनीं वेढा दिला. त्या वेढ्यांत **टिप्पू** पडला. त्याचा कांहीं मुलूख ह्मैसूरच्या मूळ राजास देऊन बाकीचा इंग्रजांनीं आपल्याकडे घेतला. ह्मैसूरकरांशीं चाललेल्या या तंट्यांत गव्हर्नर जनरलचा भाऊ **आर्थर वेलस्ली** ( ज्याला पुढें डयूक आफ वेलिंग्टन ह्मणूं लागले ) त्यानें आपली तलवार फारच सुरेख गाजविली.

इ. स. १७९९, मालवेली व सिद्धेश्वर येथील लढाया आणि श्रीरंगपट्टणचा वेढा.

कर्नाटकच्या नबाबास नक्त नेमणूक देऊन तो प्रांत इंग्रजांनीं आपल्याकडे घेतला. अयोध्येच्या **सादतअलीस** इंग्रजांनीं आपलें सैन्य चाकरीसाठीं दिलें होतें, त्याच्या खर्चाकरितां म्हणून वायव्यप्रांत तोडून मागितला. सैन्याचा खर्च एतद्देशीय राजेलोकांनीं चालवावयाचा आणि सैन्यावर सत्ता इंग्रजांची !!! खर्चासाठीं मुलूख तोडून द्या ह्मणून मागणी केली म्हणजे तेवढा प्रांत मिळाला, व शिवाय सैन्य आपलें तें आपलेंच. या खोल मसलतीचा पाया **वारन हेस्टिंग्सनेंच** घातला. होळकरानें **बाजीरावास** पदच्युत केलें, तेव्हां इंग्रजांशीं वसई मुक्कामीं तह करून आपलें व आपणाबरोबर महाराष्ट्रमंडळाचेंही स्वातंत्र्य **बाजीरावानें** घालविलें. **बाजीरावाचा** कपटी व छद्मी स्वभाव

अनेक मराठे सरदारांस भोंवला. त्यामुळें शिंद्याशीं आसई वगैरे ठिकाणीं लढाया झाल्या त्यांत इंग्रजांसच जय मिळत चालला.

### ७ व्या प्रकरणावर प्रश्न.

म्हैसूरकरांशीं शेवटच्या तंट्याचा शेवट कसा झाला ? वायव्यप्रांत व कर्नाटक इंग्रजांस कसें मिळालें ? महाराष्ट्रमंडळास व अनेक मराठे सरदारांस कोण व कसा भोंवला ?

# इंग्रजी साम्राज्य.

## प्रकरण ८ वें.

| | |
|---|---|
| १ लार्ड कार्नवालीस ( दुसऱ्यानदां ). | १८०५–१८१३. |
| २ सर जार्ज बार्लो. | |
| ३ लार्ड मिंटो. | |

### १ वेलोरचा दंगा. २ पंजाबचे शीख.

**लार्ड कार्नवालीस** याची आणखी एकदां गव्हर्नर जनरलच्या जागेवर नेमणूक झाली. पण येथें येऊन पोंचल्यावर थोडक्याच महिन्यांत **कार्नवालीस** हा मृत्यु पावला. त्याच्या मागून सर जार्ज **बार्लो** याची नेमणूक झाली. **लार्ड कार्नवालीस**प्रमाणेंच जार्ज **बार्लो**नें सर्व राजेरजवाड्यांशीं गुण्यागोविंदानें वागण्याचा निश्चय केला होता.

इ. स. १८०६, वेलोरचें बंड.

**वेलोरचा दंगा.** लश्करी पेहराव चमत्कारिक तऱ्हेचा देऊन "सर्वांनीं दाढ्या राखाव्या, गंध कपाळावर लावतां कामा नये" वगैरे ठराव केल्यामुळें वेलोरच्या शिपायांनीं बंड उभारलें आणि कित्येक अधिकारी कापून काढण्यासही त्यांनीं कमी केलें नाहीं. पण हें बंड लवकरच थंडावलें.

या काळीं **रणजीतशिंग** नांवाच्या सरदाराच्या हातीं सत्ता गेल्यापासून पंजाब प्रांत इतिहासांत नांवाजूं लागला. शीख लोक जितके मुसलमानांचे कट्टे द्वेष्टे होते तितकेच कडवे शूर होते; म्हणून पंजाबाची हद्द बरीच वाढत चालली.

## ८ व्या प्रकरणावर प्रश्न.

१ लार्ड कार्नवालीसच्या जागेवर बार्लोस कां नेमिलें? वेलोरच्या दंग्याचीं कारणें काय? रणजीतसिंग कोण?

# इंग्रजी साम्राज्य.

## प्रकरण ९ वें.

### मार्किस आफ् हेस्टिंग्स. १८१३–१८२३.

१ नेपाळकरांशीं लढाई. २ पेंढाऱ्यांचा पाठलाग.

नेपाळच्या लोकांस "गुरखे" ह्मणतात. "गुरखे" हे लोक शौर्यासाठीं नांवाजलेले आहेत. त्यांनीं आपल्या राज्याची हद्द खालीं बरीच आणिली. भुतवालचा जमीनदार इंग्रजांच्या आश्रयाखालीं होता, त्यानें कुरापत काढल्यामुळें नेपाळकरांनीं त्यास कैद केलें व त्यांच्या राज्यांतील १८ इंग्रज पोलीस अधिकाऱ्यांना ठार केलें. तेव्हां "गुरख्यां"शीं इंग्रजांचा तंटा जुंपला. कलुंग येथील किल्ला सर करतांना इंग्रजांचा मोड झाला व एक इंग्रज सेनापति प्राणास मुकला. पुढें उभयतांमध्यें तह झाला.

इ. स. १८१६, नेपाळी लोकांशीं तह.

**पेंढारी**–हे मराठ्यांच्या सैन्याबरोबर लुटालूट करीत सुटणारे लोक. पेशवाई बुडाली व हे लोक निराश्रित झाले. यांनीं पुष्कळ पुंडाई चालविली; ती पाठलाग करून इंग्रजांनीं अखेरीस मोडिली.

## ९ व्या प्रकरणावर प्रश्न.

१ गुरखे हे कोठले लोक? त्यांच्याशीं इंग्रजांनीं कां तंटा मांडिला? तो कशानें व कधीं बंद पडला? पेंढारी कोण? त्यांच्या पुंडाईचें अखेरीस काय झालें?

# इंग्रजी साम्राज्य.

## प्रकरण १० वें.

## लार्ड अमहर्स्ट. १८२३–२८.

१ ब्रह्मी लोकांशीं युद्ध.

ब्रह्मदेश ह्मणून बंगाल्याच्या पूर्वेस एक प्रांत आहे. ब्रह्मी लोक धर्मानें बौद्ध आहेत. **इंग्रजांनीं** बळकावलेला मुलूख ब्रह्मी लोकांनीं मागितला व त्यामुळें यांचा **इंग्रजांशीं** तंटा जुंपला. तेव्हां ब्रह्मदेशावर **इंग्रजांनीं** स्वारी केली. **पघम** येथें एक लढाई झाली तींत **ब्रह्मी** लोकांचा पराभव झाला. तेव्हां **यांदेबो** येथें एक तह होऊन, या तंट्याची समाप्ति झाली. यांदेबोच्या तहाअन्वयें आसाम, आराकान व तेनासरीम वगैरे **ब्रह्मी** लोकांचे बरेच तालुके व खर्चाबद्दल एक कोटि रुपये, इतका लाभ इंग्रजांस झाला.

इ. स. १८२४, यांदेबोचा तह.

### १० व्या प्रकरणावर प्रश्न.

१ ब्रह्मदेशाशीं तंटा लागला त्यांत इंग्रजांचा किती फायदा झाला? तह कोठें झाला?

# इंग्रजी साम्राज्य.

## प्रकरण ११ वें.

## लार्ड उइल्यम बेंटिंक. १८२८–३५.

१ ह्मैसूर आणि कुर्गप्रांताची व्यवस्था. राज्यकारभार.

हा पूर्वीं मद्रासेला **गव्हर्नर** होता. त्याला आतां **गव्हर्नर जनरलची** जागा मिळाली.

**ह्मैसूरच्या** शेजारीं **कुर्ग** ह्मणून प्रांत आहे. या प्रांताच्या राजाला कारभार बरोबर चालवितां येत नाहीं म्हणून **बेंटिंकनें** पदच्युत केलें आणि "**कुर्ग**" प्रांत कंपनीसरकारच्या राज्यास जोडला. त्याप्रमाणें **ह्मैसूरच्या** राजाजवळील प्रधान जुलमी आहेत व राजाला कांहीं त्यांचा बंदोबस्त करितां येत नाहीं, ही

इ. स. १८२९, कुर्गप्रांत इंग्रजांनीं आपल्या राज्यास जोडला.

सबब सांगून आपला एक इंग्रज अधिकारी **बेंटिंकनें म्हैसूर** प्रांतावर पाठविला. तो राजा लौकरच वारला. तेव्हां त्याच्या राज्याचा सर्व कारभार इंग्रजच पाहूं लागले. "सती" जाण्याची चाल याच गव्हर्नर जनरलनें प्रथम बंद केली.

इ. स. १८२९, सतीची चाल बंद पडली.

## ११ व्या प्रकरणावर प्रश्न.

१ कुर्गप्रांत इंग्रजांनीं कां खालसा केला? व कधीं? म्हैसूरच्या राज्याचें पुढें काय झालें? सतीची चाल कधीं व कोणीं बंद केली?

# इंग्रजी साम्राज्य.

## प्रकरण १२ वें.

## लार्ड आक्लंड. १८३६–४२.

१ अफगाणिस्थानाशीं युद्ध.

उइल्यम बेंटिंक स्वदेशीं परत गेला, तेव्हां आक्लंड येईतोंपर्यंत सर चार्लस मेट्काफ हा एक वर्षभर गव्हर्नर जनरलाचें काम पहात होता. त्याची एकच वर्षाची कारकीर्द, पण ती प्रजेला फार हितावह झाली.

अफगाणिस्थान हा देश हिंदुस्थानच्या वायव्येस आहे. पंजाबांतून त्या देशाला जावयाचें तर वाटेंत मोठमोठाले घांट लागतात. हिंदुस्थानदेशावर आशियाखंडांतील लोकांनीं आजपर्यंत ज्या स्वाऱ्या केल्या, त्या या घांटांतून आंत शिरून केल्या. पाणिपतचा विजयी वीर अहमदशाहा अबदल्ली याचा नातू **शहासुजा,** हा या काळीं अफगाणांचा राजा होता. यास लार्ड उइल्यम बेंटिंकच्या कारकीर्दींत **महमद** नांवाच्या बंधूनें पदच्युत करून अफगाणिस्थानाबाहेर हुसकून लाविलें व स्वतः गादी बळकाविली. पण "बराकझाई" नांवाची एक अफगाणांची कुळी आहे तिचा दोस्तमहमद नांवाचा नाईक होता त्यानें महमदाचा खून केला आणि ती गादी आपण बळकाविली. या दोस्तमहमदाशीं सख्य ठेवावें असा आक्लंडचा मानस होता व त्याप्रमाणें त्यानें प्रयत्नही केला. परंतु दोस्तमहमदास इंग्रज आपल्या राज्यांत नको

होते' ह्मणून तो त्यांस आपल्या मुलखांत येऊं देईना. तेव्हां आपली डाळ दोस्तमहमद शिजूं देत नाहीं, असें पाहून शहासुजाचा पक्ष घेण्याचें आक्लंडनें ठरविलें. शहासुजा हा या काळीं शीखांचा राजा रणजीतसिंग याचा आश्रय मागण्यासाठीं हिंदुस्थानांत आला होता. रणजीतसिंग व इंग्रज या उभयतांनीं मिळून शहासुजाला अफगाणिस्थानच्या तख्तावर पुनः बसविण्याचा निश्चय केला. पण इतक्यांत रणजीतसिंग वारला. तेव्हां इंग्रजांनीं आपलें सैन्य बरोबर देऊन शहासुजाला अफगाणिस्थानांत रवाना केलें. कंदाहार येथें पोंचल्यावर शहासुजास इंग्रजांनीं राज्याभिषेक करविला. नंतर गझनीचा किल्ला सर करून इंग्रजांचें लश्कर काबुलाकडे वळलें. इंग्रज शहासुजाला बरोबर घेऊन आले, असें पहातांच दोस्तमहमद पळून गेला. शहासुजाला आपलें राज्य पूर्णपणें मिळालें असें पहातांच इंग्रजांचें लश्कर हिंदुस्थानाकडे यावयास निघालें. दोस्तमहमद कैदी झाला. कांहीं इंग्रजी लश्कर शहासुजानें आपल्या संरक्षणार्थ ठेवून घेतलें होतें.

हीं वर्तमानें १८३९ त झालीं.

परंतु पुढें एक वर्ष लोटलें न लोटलें तोंच सर्व अफगाणिस्थानभर दंगा उसळला. **अकबरखान** ह्मणून दोस्तमहमदाचा मुलगा होता; त्यानें अगदीं कहर उडवून दिला. इंग्रजांच्या अफगाणिस्थानांतील सैन्याची अशी धुळधाण झाली कीं विचारून सोय नाहीं. हिंदुस्थानाकडे यावयास हें इंग्रजांचें राहिलेलें सैन्य निघालें, तों वाटेंतच अफगाण लोक त्यावर तुटून पडले. या भयंकर पराजयाचें वर्तमान सांगावयास फक्त एक मनुष्य काय तो अफगाण लोकांनीं जिवंत सोडिला. बाकी सर्वांस त्यांनीं ठार केलें. इंग्रज सैन्याचा असा निःपात यापूर्वीं हिंदुस्थानांत झाला नव्हता. इंग्रजांच्या शुभ्र कीर्तीस ही मोठी काळोखी लागल्यासारखी झाली. जिकडे तिकडे हाहाकार उडून गेला. लार्ड आक्लंडची या युद्धामुळें भारी अपकीर्ति झाली व तो राजीनामा देऊन लगेच विलायतेस निघून गेला.

इ. स. १८४२ अफगाणिस्थानांत इंग्रजांचा निःपात.

## १२ व्या प्रकरणावर प्रश्न.

शहासुजा कोण? त्याला कोणीं पदच्युत केलें? दोस्तमहमद कोण? इंग्रजांच्या सैन्यापैकीं किती लोक परत आले? शहासुजाचा इंग्रजांनीं पक्ष कां उचलला? आणखी कोण साहाय्य देतों असें शहासुजास बोलला? त्यानें साहाय्य दिलें काय? अकबरखान कोण? त्यानें काय केलें?

# इंग्रजी साम्राज्य.

## प्रकरण १३ वें.

### लार्ड एलिनबरो १८४२–४४.

१ काबूलची लढाई. २ सिंधदेश खालसा. ३ ग्वालेरीस युद्ध.

१ लार्ड आक्लंडनंतर एलिनबरो हा गव्हर्नर जनरल झाला. शहासुजा लोकप्रिय नाहीं असें इंग्रजांस कळून आलें तेव्हां अमुक राजा कबूल करा आणि तमुक कबूल करूं नको अशा भानगडींत अफगाणिस्थानांत इत:पर न पडण्याचा इंग्रजांनीं निश्चय केला. इतक्यांत शहासुजाचा खून झाल्याची बातमी आली. तेव्हां जरी अफगाणांच्या गादीवर कोण राजा असावा या भानगडीचा आपण विचार करणार नाहीं असें इंग्रजांनीं ठरविलें होतें, तरी पूर्वीं कत्तल केलेल्या इंग्रजांचा सूड घेण्यासाठीं हिंदुस्थानांतून सैन्य रवाना करण्यांत आलें. तेव्हां काबूलचा बाजार वगैरे लुटून आपल्या ताब्यांत असलेले किल्ले इंग्रजांनीं परत घेतले आणि दोस्तमहमद इंग्रजांच्या अटकेंत होता त्यास मुक्त केलें. अफगाणांच्या गादीवर कोण बसतो याची पंचाईत करावयाची नाहीं आणि दोस्तमहमदाला कैदेंत ठेवावयाचें नाहीं, असा इंग्रजांचा निर्धार पाहिल्यावर अफगाण लोक मग पुढें इंग्रजांच्या वाटेस गेले नाहींत.

अफगाणिस्थानाकडे इंग्रज सैन्य चाललें तेव्हां सिंधदेशांतून त्यांनीं आपला रस्ता काढला. सिंधदेशाचे "अमीर" ह्मणून मांडलिक राजे होते. ते अगदीं स्वतंत्र होते. आपल्या देशांतून कुच करतेवेळीं आपणांस इंग्रजांनीं विचारलें नाहीं ह्मणून अमीरांस वाईट वाटलें, व त्यांनीं इंग्र-

जांशीं विरोध आरंभिला. अफगाणिस्थानांतून परत आल्यावर "अमीर" आपल्याशीं मित्रभावानें वागतात किंवा दुस्मनगिरी दाखवितात, याची प्रचीति पाहावी हें निमित्त करून सर चार्लस नेपियर या शूर शिपायास सिंधदेशांत इंग्रजांनीं पाठविलें. आपल्या प्रांतांत इंग्रज आले, तेव्हां कांहीं दंगा फटका आहे अशी **अमीरांची** खात्री झाली आणि त्यामुळें मेजर औटऱ्याम याला पकडून अमीरांनीं लुटलें. यामुळें अमीरांशीं लगेच इंग्रजांनीं युद्ध सुरू केलें. **मियानी** व **हैदराबाद** या दोन ठिकाणीं लढाया झाल्या आणि त्यांत अमीरांचा पूर्ण पराभव झाला. अमीरांस कैद करून त्यांचें राज्य इंग्रजांनीं खालसा केलें.

इ. स. १८४३, मियानी व हैदराबाद येथील लढाया होऊन सिंधदेश काबीज झाला.

**ग्वालेरचें** युद्ध. तरुण शिंद्याचें संरक्षण कोणीं करावें याजबद्दलचा लढा पडला आणि गृहकलह भडकतोशी भीति वाटूं लागली. तेव्हां इंग्रज आपल्या शिरस्त्याप्रमाणें या तंट्यांत पडले. कांहीं संबंध नसतां इंग्रज सैन्य आपणावर चालून येतें असें पाहून, शिंद्याच्या सैन्यानें इंग्रजसैन्यास सामना दिला. **महाराजपूर** आणि **पनियार** येथें लढाया झाल्या, त्यांत इंग्रजांसच फत्ते मिळाली. तेव्हां शिंद्याचा इंग्रजांशीं स्नेह अधिकच जडला.

इ. स. १८४३, महाराजपूर व पनियारच्या लढाया.

## १३ व्या प्रकरणावर प्रश्न.

१ लार्ड आक्लंडनंतर गव्हर्नर जनरल कोण झाला? इंग्रजांनीं अफगाणिस्थानाचें पुढें काय केलें? शहासुजाचें काय झालें? दोस्तमहमद इंग्रजांच्या कैदेंतून कसा सुटला? अमीर कोण? त्यांच्याशीं युद्ध होण्याचें कारण काय? कोणकोणत्या लढाया झाल्या व कधीं झाल्या आणि त्यांत जय कोणास मिळाला? ग्वालेरीवर इंग्रज कां गेले? तेथें लढाया किती झाल्या? कोठकोठें व कधीं?

# इंग्रजी साम्राज्य.

## प्रकरण १४ वें.

## लार्ड हार्डिंग १८४४–४७.

१ शीखांशीं युद्ध.

इ. स. १८३९ सालीं रणजीतसिंग वारला. तेव्हांपासून त्याच्या राज्यांत मनस्वी अंदाधुंदी होऊन गेली. कोणास कोणी विचारीना. गादीवर कोणीं बसावें याजबद्दल तंटे माजून राहिले. **धुलीपसिंहास** शेवटीं गादी मिळाली. राज्यांत दोन तीन तट झाले होते. तिकडे कांहीं का घोंटाळा माजेना, आपण त्या भानगडींत पडावयाचें नाहीं, असा हार्डिंगचा कृतसंकल्प होता. पण शीखांनींच इंग्रजाच्या मुलुखामध्यें लुटालूट सुरू केल्यामुळें सैन्य पाठविणें इंग्रजांस भाग पडलें. **मुदकी** आणि **फिरोजशहर** येथें लढाया झाल्या, त्यांत इंग्लिशांस ह्मणण्यासारखा कांहीं जय मिळाला नाहीं. परंतु **सुब्रावन**च्या लढाईंत शीखांचा चांगला पराभव झाला. त्यामुळें लाहोर येथें शीखांनीं तह केला. हीं वर्तमानें १८४५ त झालीं. लढाईचा खर्च शीखांनीं द्यावा व इंग्रजांचें लश्कर लाहोर येथें ठेवून घ्यावें, या ह्या तहाच्या मुख्य अटी होत्या.

### १४ व्या प्रकरणावर प्रश्न.

१ शीखांचा राजा रणजीतसिंग कधीं वारला ? त्याच्या गादीवर कोण बसला ? शीखांशीं युद्ध जुंपण्याचें कारण काय ? किती लढाया झाल्या ? हें युद्ध कशानें बंद पडलें ?

# इंग्रजी साम्राज्य.

## प्रकरण १५ वें.

## लार्ड डलहौसी १८४८–५६.

१ शीखांशीं दुसरें युद्ध. २ एतद्देशीय राज्यांची खालसात.

शीखांचा सुभेदार **मूळराज** यानें अग्न्यु नामक आंग्लाचा खून केला. अग्न्यु यास जमिनीच्या बाबीची सुधारणा करण्याकरितां डल-

हौसीनें पाठविलें होतें. या खुनामुळें इंग्रज व शीख यांच्यामध्यें तंटा सुरू झाला. **रामनगर** येथें इंग्रजांस जय मिळाला नाहीं, आणि **चिलियनवाल**च्या लढाईंत तर शीखांनीं इंग्रजांचा भयंकर पराभव केला. तीन हजार गोऱ्यांस शीखांनीं धारातीर्थीं पावन केलें, त्यामुळें पहिल्या सेनापतीस भारी ठपका देऊन दुसरा सेनापति शीखांवर इंग्रजांनीं पाठविला. त्यानें **गुजराथ** येथें शीखांचा पराभव केला. शीखलोकांच्या मनांतून "प्राण गेला तरी बेहत्तर, पण इंग्रजांशीं झुंजावयाला कमी करावयाचें नाहीं" असा निर्धार होता. त्याचप्रमाणें त्यांनीं क्रमही चालविला. इंग्रजांस शीखलोक कांहीं चैन पडूं देईनात; इतक्यांत शीखांचा बालराजा **धुलीपसिंह** यानें "मला ही गादी नको ती तुह्मी संभाळा" अशा प्रकारचा तह करून आपलें राज्य इंग्रजांच्या हवालीं केलें. याप्रमाणें राज्य इंग्रजांच्या ताब्यांत करणाऱ्या धुलीपसिंहाचें वय १२ वर्षांचें सुद्धां नव्हतें. दरसाल ६ लाखांची नेमणूक करून धुलीपसिंहास विलायतेला नेलें. तेथेंच ख्रिस्ती झालेला तो नुक्ताच अक्टोबर १८९३ त वारला. इंग्रजांवर एतद्देशीय राजांचे त्या त्या प्रसंगीं उपकार झाले होते. पण त्या उपकारांची फेड करण्याचा मार्ग जो लार्ड डलहौसीनें काढिला, तो मात्र अपूर्व. निपुत्रिक राजा मरण पावला कीं त्याच्या बायकोस दत्तक घेऊं न देतां त्याचें राज्य आपल्या मुलुखास जोडावें, असा डलहौसीनें सपाटा चालविला. यामुळें सातारा, नागपुर, अयोध्या हीं राज्यें खालसा होऊन इंग्रजी राज्यांत सामील झालीं.

इ. स. १८४९, पंजाब इंग्रजी राज्यास जोडला.

ब्रह्मदेशचा राजा इंग्रज व्यापाऱ्यांस छळतो असा बोभाटा झाल्यामुळें इंग्रजी लष्कराची एक टोळी डलहौसीनें ब्रह्मदेशांत पाठविली. तिनें रंगून शहर व पेगू प्रांत सर केला. तो मुलूखही इंग्रजी राज्यांत सामील झाला.

इ. स. १८५३, पेगू व रंगून हीं इंग्रजांस मिळालीं.

## १९ व्या प्रकरणावर प्रश्न.

१ शीखलोकांशीं युद्ध होण्याचें कारण काय? चिलियनवाला येथें

कोणाचा पराभव झाला ? पंजाब प्रांत कधीं सर केला ? कसा ? धुलीपसिंह कोण ? त्याचें पुढें काय झालें ? एतद्देशीय कोणकोणतीं राज्यें इंग्रजी राज्यास जोडिलीं ? कां ब्रह्मदेशांत इंग्रजी लश्कर कां गेलें ?

# इंग्रजी साम्राज्य.

## प्रकरण १६ वें.

### लार्ड क्यानिंग १८५६–६२.

१ शिपायांचें बंड. २ कंपनीचा अस्त.

लार्ड डलहौसीनें एतद्देशीय राज्यें भराभर आपल्या राज्यांत सामील केलीं, त्यामुळें लोक दुश्चित्त झाले. तशांत इंग्रजी अंमलदारांकडूनही लहानमोठ्या चुका झाल्या, ह्मणून लश्करी शिपायांमध्यें प्रहिल्यानें बंड उत्पन्न झालें. यांस नानासाहेबही मिळाला. शेवटचा पेशवा बाजीराव आपलें राज्य इंग्रजांस देऊन आपण पेनशन खात ब्रह्मावर्तीं बसला होता, त्याचा मुलगा नानासाहेब. याला, इंग्रज, बाजीरावाच्या पश्चात् पेनशन देतना. त्यानें इंग्रजी कामदारांची अनेक प्रकारें विनवणी केली. विलायतेस आपला वकील पाठवूनही त्यानें पाहिलें. कांहीं दाद लागेना. तेव्हां सूड घ्यावा या हेतूनें नानासाहेब पेशवाही या बंडांत मिळाला. संस्थानिक निपुत्रिक वारल्यामुळें झांशीचें संस्थान खालसा करण्यांत आलें होतें, ह्मणून झांशीची बालविधवा राणी लक्ष्मीबाई हीही बंडखोरांमध्यें शिरली. बंडखोरांमध्यें सांगण्यासारखी शिस्त नव्हती; इतकेंच नाहीं, तर लहान मोठे बरेच देशी राजेरजवाडे इंग्रजांशीं केवळ स्नेहभावानें वागले, म्हणून विशेष आयास न पडतां बंडखोरांची खोड इंग्रजांस मोडतां आली.

बंड मोडलें तेव्हां इंग्लंडच्या राणीनें कंपनीचा सर्व राज्यकारभार आपल्या हातीं घेतला आणि "तुमचें उत्तम प्रकारें संरक्षण करूं, धर्मांच्या बाबींमध्यें हात घालणार नाहीं" इत्यादि आश्वासनांचा एक जाहीरनामा प्रसिद्ध केला. त्या जाहीरनाम्यावर भरंवसा ठेवून हिंदुस्थानाच्या प्रजेनें इंग्लंडच्या राणीचे राज्यांत सुखासमाधानांत कालक्रमण करण्याचें कबूल केलें. अशा प्रकारें "कंपनी" च्या कारकीर्दीची समाप्ति होऊन इंग्लंडच्या राणीची हिंदुस्थानावर साक्षात् सत्ता बसली.

# इंग्रजी साम्राज्य.

## प्रकरण १७ वें.

### लार्ड एलजीन १८६२–६३.

क्यानिंगमागें हा गव्हर्नर जनरल झाला. वाहाबी नांवाचा मुसलमानांमध्यें एक पंथ निघाल्यामुळें पेंढाऱ्यांचा क्रम सुरू झाला; ह्मणून त्यांतील लोकांचा दंगा मोडणें लार्ड एलजीनला भाग पडलें. तशाच प्रकारचा भुतानी लोकांनींही दंगा माजविला होता, पण तोही यानें मोडला. हा गव्हर्नर जनरल लौकरच हिंदुस्थानांत मरण पावला.

### १७ व्या प्रकरणावर प्रश्न.

वाहाबी ह्मणजे काय? वाहाबींनीं काय केलें? लार्ड एलजीनची कारकीर्द कशामुळें संपली?

# इंग्रजी साम्राज्य.

## प्रकरण १८ वें.

### सर जॉन लारेन्स. १८६४–६९.

याच्या कारकीर्दींत ह्मणण्याजोगें कांहींएक घडून आलें नाहीं. अफगाणिस्थानांत मनस्वी घोंटाळा माजला होता, पण तिकडे यानें बिलकुल लक्ष न देतां राज्यकारभार सुरळीत चालविला. हा साधारण नोकरापासून गव्हर्नर जनरलच्या हुद्यापर्यंत चढला होता.

# इंग्रजी साम्राज्य.

## प्रकरण १९ वें.

### लॉर्ड मेयो १८६९–७२.

हा गव्हर्नर जनरल फार चांगला होता. यानें राज्यव्यवस्थेंत पुष्कळ सुधारणा केली. परंतु इतक्यांत अंदमान बेट पहावयास हा गेला, तेव्हां तेथील एका मुसलमान कैद्यानें याचा खून केला!

## इंग्रजी साम्राज्य.

### १९ व्या प्रकरणावर प्रश्न.

मेयो कसा होता? तो कशानें व कोठें मेला?

## इंग्रजी साम्राज्य.

### प्रकरण २० वें.

### लॉर्ड नार्थब्रूक १८७२–७६.

गायकवाडींतला घोंटाळा.

मल्हारराव गायकवाडानें इंग्रज रेसिडेंटास विषप्रयोग केल्याबद्दल संशय आला, ह्मणून चौकशीसाठीं कमिशन नेमिलें. मल्हारराव निर्दोषी ठरला, तरी राज्य करण्यास नालायक ही सबब सांगून त्यास पदच्युत करण्यांत आलें. पुढें एक दत्तक पुत्र देऊन गायकवाडी गादी इंग्रजांनीं चालविली. या दत्तक पुत्राचें नांव सयाजीराव.

### २० व्या प्रकरणावर प्रश्न.

मल्हाररावास कां पदच्युत केलें? ती गादी कोणास दिली?

## इंग्रजी साम्राज्य.

### प्रकरण २१ वें.

### लॉर्ड लिटन १८७६–८०.

१ बादशाहीण किताब. २ अफगाणिस्थानाशीं युद्ध.

लॉर्ड नार्थब्रूकमागून गव्हर्नर जनरलाचें काम लॉर्ड लिटन हा पाहूं लागला. हा आला त्या वर्षी दक्षिण हिंदुस्थानांत फार भयंकर दुष्काळ पडला होता. लाखों लोक उपाशीं मरूं लागले. अशा कहराच्या वेळीं राणी विक्टोरिया इजला हिंदुस्थानची 'बादशाहीण' हा किताब देण्याचा फार मोठा समारंभ दिल्ली येथें झाला.

इ. स. १८७७, बादशाहीण किताब राणीनें घेतला.

अफगाणिस्थानाच्या **शीरअली** नांवाच्या राजानें दरबारीं रशि-

यन सरकारचा वकील आला त्याचा मान केला, हें ऐकून इंग्रजांनींही आपला वकील पाठविला. इंग्रजांच्या वकिलास शीरअलीनें दरबारांत येऊं दिलें नाहीं. हा आपला फार मोठा अपमान समजून अफगाणिस्थानाशीं युद्ध लिटननें सुरू केलें. शीरअली रूस लोकांकडे पळून गेला. तेव्हां त्याच्या गादीवर **याकूबखानाला** इंग्रजांनीं बसविलें व काबूल येथें आपला एक रेसिडेंट ठेवून दिला. पण इतक्यांत इंग्रज रेसिडेंटास काबुली लोकांनीं कापून काढिलें आणि एकदम दंगा उभारला. लोकांनीं याकूबखानाला पदच्युत करून इंग्रजांशीं तंटा जुंपिला. इतक्यांत लॉर्ड लिटन विलायतेस निघून गेला.

### २१ व्या प्रकरणावर प्रश्न.

१. विक्टोरिया राणीस बादशाहीण हा किताब कधीं व कोठें मिळाला?

२. अफगाणिस्थानाशीं युद्ध जुंपण्याचें कारण काय? शीरअली कोठें गेला? त्याची गादी कोणाला दिली? पुढें काय झालें?

# इंग्रजी साम्राज्य.

## प्रकरण २२ वें.

### लॉर्ड रिपन १८८०-८४.

लॉर्ड लिटनच्या मागें हा थोर पुरुष हिंदुस्थानचा गव्हर्नर जनरल झाला. कारभारावर येऊन रुजू होतांच अफगाणिस्थानांतून आपलें सैन्य यानें परत बोलाविलें आणि **अबदुल रहिमानास** अफगाणिस्थानाची गादी दिली.

वर्तमानपत्राचें स्वातंत्र्य लॉर्ड लिटनच्या कारकीर्दींत नष्ट झालें होतें, तें यानें पुनः थोर मन करून परत दिलें. लोकांस राज्यकारभारांत घेण्यासाठीं यानें एक कायदा केला त्याला "स्थानिक स्वराज्य" ह्मणतात. याच्या सारखा लोकप्रिय गव्हर्नर जनरल अलीकडे दुसरा झाला नाहीं.

### २२ व्या प्रकरणावर प्रश्न.

लॉर्ड लिटनानंतर गव्हर्नर जनरल कोण झाला? अफगाणिस्थानाच्या गादीवर कोणास बसविलें? हा लोकप्रिय होण्याचें कारण काय?

# इंग्रजी साम्राज्य.

## प्रकरण २३ वें.

## लॉर्ड डफरिन १८८४–१८८८.

१ ब्रह्मदेशाशीं युद्ध.

लॉर्ड रिपन यांच्या पश्चात् लॉर्ड डफरिन हा गव्हर्नर जनरल होऊन आला. पहिल्यानें अफगाणिस्थानाच्या अमीराशीं स्नेहसंबंध जुळवून, तो जास्त दृढ करावा ह्मणून रावळपिंडी येथें लौकरच मोठा दरबार यानें भरविला. अमीराला दरसाल बारा लाख रुपये दारूगोळ्यासाठीं देत जाऊन, रूस लोकांस त्यानें मिळूं नये याबद्दल या गव्हरनर जनरलानें पुष्कळ प्रयत्न केले.

इ. स. १८८५, ब्रह्मदेश काबीज केला.

ब्रह्मदेशाचा **थीबा** राजा इंग्रज व्यापाऱ्यांस हव्यात त्या सवलती देईना. तेव्हां त्याच्यावर हिंदुस्थानांतून सैन्य रवाना केलें. थीबा इंग्रजांच्या स्वाधीन झाला. तेव्हां त्यास कैद करून इंग्रजांनीं रत्नागिरी येथें आणून ठेविलें आणि त्याचें राज्य आपल्या राज्यांत सामील केलें. आपलें स्वातंत्र्य गेलें, असें पाहून ब्रह्मी लोक इंग्रजांशीं एक वर्षभर लढत होते. पण अखेरपर्यंत त्यांच्यानें टिकाव धरवला नाहीं.

मिठावरील कर वाढविल्यानें आणि असल्याच दुसऱ्या कारणांनीं हा गव्हर्नर जनरल अप्रिय झाला. मुदत भरण्यापूर्वीं एक वर्ष हा विलायतेस निघून गेला.

## २३ व्या प्रकरणावर प्रश्न.

लॉर्ड डफरिन यानें रावळपिंडीस दरबार कां भरविला? ब्रह्मदेशच्या थिबाला हिंदुस्थानांत कां आणिलें? पुढें ब्रह्मदेशाचें काय झालें? हा गव्हर्नर जनरल कसा होता?

# इंग्रजी साम्राज्य.

## प्रकरण २४ वें.

### लॉर्ड ल्यान्सडौन. १८८८—१८९४

डफरिनाच्या मागून हा गव्हर्नर जनरल होऊन आला. मणिपुर म्हणून नाग नांवाच्या लोकांचें एक संस्थान पूर्वेकडील सरहद्दीवर आहे. त्याच्याशीं यानें तंटा आरंभिला. दरबारांत एकाएकीं आपल्या राजास पकडण्याचा बेत इंग्रजांनीं केला असें कळतांच इंग्रज कामदारांना धरून मणिपुरच्या "नाग" लोकांनीं ठार मारलें. तेथील पुढारी लोकांस फांशीं देऊन, मणिपुर प्रांतीं दुसरा राजा गव्हर्नर जनरलानें स्थापन केला.

---

# भाग ५ वा.

# परीक्षेची तयारी.

## प्रकरण १ लें.

### महत्वाच्या गोष्टींचे सन.

(ख्रिस्ती शकापूर्वी.) सुमारें २००० व्या वर्षी. सेसोट्रिस यानें हिंदुस्थानावर स्वारी केली.

" " १५००. असीरिया देशाची राणी सेमीरामीस हिची स्वारी व तिचा सत्राप राजाकडून पराभव झाला.

" " ५२९. इराणचा बादशहा डरायस हिस्टासपस याची हिंदुस्थानावरील स्वारी.

" " ३२६. मासिदोन देशचा शिकंदर बादशहा याची हिंदुस्थानावरील स्वारी.

" " ५७. विक्रमादित्य शकाचा प्रारंभ.

(ख्रिस्ती शकानंतर.) इ. स. ७८. ह्या वर्षी शालिवाहन शकाचा प्रारंभ.
,, ७१२. अरबांची हिंदुस्थानावर स्वारी.
,, ९७५. अफगाणिस्थानचा सबक्तिगीन याची स्वारी; लाहोरची लढाई व जयपाळ राजाचा पराजय.
,, १००१. सुलतान महमुदाची हिंदुस्थानावर पहिली स्वारी.
,, १०१३. सुलतान महमुदानें कनोज व मथुरा प्रांत काबीज केले.
,, १०२२. लाहोर प्रांत मुसलमानांनीं सर केला.
,, १०२४. सोमनाथ देवालयाचा महमुदानें विध्वंस केला.
,, १०३०. सुलतान महमुदाचा मृत्यु.
,, ११७६. गजनी घराण्यास पदच्युत करून घोरी घराण्याची स्थापना.
,, ११९३. मुसलमान बादशाहीची हिंदुस्थानांत कायम स्थापना.
,, १२०६. महमद घोरीचा मृत्यु, आणि कुतुबुद्दीनास राज्यप्राप्ति.
,, १२१२. कुतुबुद्दीनाचा मृत्यु.
,, १२९२. अल्लाउद्दीन खिलजीची दक्षिणेंत पहिली स्वारी.
,, १३०३. अल्लाउद्दीन खिलजीनें राजपुताना सर केला.
,, १३२०. खिलजी घराण्याची समाप्ति व तगलख घराण्याची स्थापना.
,, १३४७. ब्राह्मणी नामक मुसलमान राज्याची दक्षिणेंत स्थापना.
,, १३९८. तिमुरलंग याची हिंदुस्थानावर स्वारी.

इ.स. १४८७. बार्थलोमिओदायाज याला केप आफ गुड होपवरून हिंदुस्थानास येण्याचा रस्ता सांपडला.

,, १४९८. कालिकट येथें पोर्तुगीज लोकांचें प्रथम आगमन.

,, १५१०. अलबुकर्क यानें गोमांतक सर केलें.

,, १५२६. बाबरला राज्यप्राप्ति. पानपतची लढाई. लोदी घराण्याची समाप्ति.

,, १५२७. शिक्रीची लढाई.

,, १५४०. हुमायूनचें पलायन.

,, १५४५. कालिंजर मुक्कामीं शीरशहाचा मृत्यु.

,, १५६७. अकबराची रजपुतान्यावरील मोहीम.

,, १५९९. ईस्ट इंडिया कंपनी नामक व्यापारी मंडळीची विलायतेस स्थापना. चांदबीबीचा मृत्यु.

,, १६००. इंग्रजांचा हिंदुस्थानांत प्रवेश.

,, १६०४. फ्रेंचांचा हिंदुस्थानांत प्रथमप्रवेश.

,, १६११. सेलीम ऊर्फ जहानगिरानें नूरजहानशीं शादी केली.

,, १६१२. सुरत शहरांत इंग्रजांनीं एक वखार स्थापिली.

,, १६२१. मलिकंबरचा शहाजहाननें पराभव केला.

,, १६२६. जहांगिरास कैद केलें.

,, १६२७. श्रीछत्रपति शिवाजी महाराजांचा जन्म.

,, १६३७. अहमदनगरच्या राज्याची समाप्ति.

,, १६३९. इंग्रजांनीं मद्रास शहर खरेदी घेतलें.

इ.स. १६४६. शिवाजीनें तोरणा किल्ला काबीज केला.
,, १६४८. शिवाजीनें कोंकण सर केलें.
,, १६५८. औरंगजेबानें बापास कैद करून गादी मिळविली.
,, १६५९. अफझुलखानाचा मृत्यु.
,, १६६४. शहाजीचा मृत्यु.
,, १६६६. शहाजहानाचा मृत्यु.
,, १६६८. मुंबई बेट इंग्रजांस मिळालें.
,, १६७६. शिवाजीची कर्नाटकावर मोहीम.
,, १६८३. औरंगजेबाची दक्षिणेवर स्वारी.
,, १६८६. औरंगजेबाचा पुत्र मोअजिम याची मराठ्यांवर स्वारी. विजापूरच्या राज्याची समाप्ति.
,, १६८७. गोवळकोंड्याच्या राज्याची समाप्ति.
,, १७००. औरंगजेबानें सातारा सर केला.
,, १७०७. शाहूची दिल्लीहून सुटका.
,, १७०८. शाहूची राज्यावर स्थापना.
,, १७०९. रजपुतांचें स्वातंत्र्य.
,, १७१२. कोल्हापूरची स्थापना.
,, १७१३. निजामाची दक्षिणेंत स्थापना.
,, १७१४. बाळाजी विश्वनाथास पेशवाई प्राप्त होते.
,, १७३१. बडोद्यानजीक **डुभई** येथील लढाई.
,, १७३९. नादीरशहाची स्वारी.
,, १७४६. फ्रेंच सरदार लाबोरदोनीस यानें मद्रास सर केली.

इ.स. १७४८. निजाम उल्मुलुखाचा मृत्यु.
,, १७५१. अर्काट शहर क्लैवनें सर केलें.
,, १७५५. पांदेचेरीचा तह.
,, १७५६. कलकत्त्याचा कोंडमारा.
,, १७५८. मराठ्यांनीं पंजाब सर केला.
,, १७६१. हैदरनें म्हैसूरची गादी बळकाविली. जनकोजीचा मृत्यु.
,, १७६३. पाटणा येथें इंग्रजांची कत्तल.
,, १७६५. बंगाल, बाहार आणि ओरिसा यांची सनद इंग्रजांस मिळाली.
,, १७६६. मल्हारराव होळकराचा मृत्यु.
,, १७७३. रेग्युलेटिंग आक्टाची सुरवात.
,, १७७५. नंदकुमाराला फांशीची शिक्षा.
,, १७८९. मराठ्यांनीं दिल्लीपतीस आपल्या अंकित केलें.
,, १७९१. मराठे, निजाम व इंग्रज यांची टिपूवर मोहीम.
,, १७९२. श्रीरंगपट्टणचा वेढा आणि तह.
,, १७९४. महादजी शिंद्याचा मृत्यु.
,, १८०५. वेलूरचा दंगा.
,, १८१८. पेशवाईची परिसमाप्ति.
,, १८२४. रंगून सर केलें.
,, १८२७. दौलतराव शिंद्याचा मृत्यु.
,, १८३४. कुर्गप्रांत खालसा.
,, १८३९. रणजितसिंहाचा मृत्यु.
,, १८४२. अफगाणिस्थानांत इंग्रजांचा पराभव.
,, १८४३. सिंधप्रांत खालसा.
,, १८५२. पेगू प्रांत खालसा.
,, १८५३. सातारा, नागपूर, झांशी, पंजाब इंग्रजांनीं खालसा केले.
,, १८५७. हिंदुस्थानांतलें बंड.

इ. स. १८५८. बंडाची समाप्ति. कंपनी राज्याची इतिश्री. विक्टोरिया (महाराणी)चें राज्य.

,, १८५९. तात्या टोपीस फांशीची सजा.

,, १८७२. विक्टोरिया राणीच्या द्वितीय पुत्राचें हिंदुस्थानांत आगमन.

,, १८७५. युवराज ( राणीच्या प्रथम पुत्राचें ) आगमन. मल्हारराव गाइकवाडाची पदच्युति.

,, १८७७. दक्षिणेंत भयंकर दुष्काळ.

,, ,, विक्टोरिया राणी ह्यांनीं बादशाहीण हा क़िताब घेतला.

,, १८७९. अफ़गाणिस्थानाशीं युद्ध.

,, १८८५. ब्रह्मदेश काबीज.

,, १८९३. हिंदुमुसलमानांचे तंटे. (मुंबईतला भयंकर दंगा.)

# परीक्षेची तयारी.

## प्रकरण २ रें.

### महत्त्वाच्या लढायांचे सन.

ख्रिस्ती शकापूर्वी ३२७ व्या वर्षी **गुजरात**च्या लढाईत शिकंदरानें पुरूरव्याचा पराभव केला.

ख्रिस्ती शकानंतर इ. स. १००१. **पेशावर.** महमदगझनीनें जयपाळ राजाचा पराभव केला.

,, १०२४. **सोमनाथ.** सुलतान महमुदानें हिंदूंचा पराभव केला.

,, ११९१. **ठाणेश्वर** ( पहिली ). अजमीरचा पृथुराजा यानें महमद घोरीचा पराभव केला.

,, ११९३. **ठाणेश्वर** ( दुसरी ). पृथुराजाचा महमदानें पराभव केला.

,, ११९४. **चंद्रवाडा.** कनोजच्या जयचंदराजाचा महमद घोरीनें पराभव केला.

,, १५२६. **पानिपत.** ( पहिली ). बाबरनें इब्राहीम लोदीचा पराभव केला.

,, १५२७. **शिक्री.** बाबरनें राणा संगयाचा पराभव केला.

,, १५२८. **चंदेरी**चा वेढा. मेदनीरायाचा बाबरानें पराभव केला.

,, १५४०. **कनोज.** शिरशहानें हुमायुनचा पराभव केला.

,, १५५६. **पानिपत.** ( २ री ) बहिरामख़ानानें हिमूचा पराभव केला.

,, १५६५. **तालिकोट.** विजयनगरच्या रामराजाचा दक्षिणेंतील मुसलमान बादशाहांनीं बींमोड केला.

,, १६२८. **आग्रा.** शहाजहानानें शाहीरियरचा पराभव केला.

,, १६५७. **दिल्ली.** ( १ ली ) औरंगजेबानें दाराचा पराभव केला.

इ. स. १७३९. **कर्नूल.** नादीरशहानें महमूदशहाचा पराभव केला.

,, १७४०. **अंबूर** (१ ली). मुराराव घोरपड्यानें दोस्तअल्लीचा पराभव केला.

,, १७४८. **सरहिंद.** अबदालीचा दिल्लीकरांनीं पराभव केला.

,, १७४९. **अंबूर** ( २ री ). मुजफरजंग आणि चंदासाहेब यांनीं अनवरुद्दीनचा निःपात केला.

,, १७५१. **अरनी.** मुराराव घोरपड्यांच्या सहाय्यामुळें क्लैवानें राजासाहेबाचा पराभव केला.

,, १७५७. **प्लासी.** मुख्यसेनापतीशीं फितूर करून क्लैवानें सुजाउद्दौल्याचा पराभव केला.

,, १७६०. **पाटणा.** (१ ली). शहाअलमाचा इंग्रजांकडून पराभव.

,, १७६०. **चिनसुरा.** डचलोकांचा इंग्रजांनीं पराभव केला.

,, १७६०. **वांडिवाश.** इंग्रजांनीं फ्रेंचांचा पराभव केला.

,, १७६०. **उदयगिरी.** मराठ्यांनीं मोंगलांचा पराभव केला.

,, १७६१. **पानिपत** ( ३ री ). मराठ्यांचा अबदालीनें पराभव केला.

,, १७६१. **पाटणा** ( २ री ). शहाअलमचा इंग्रजांकडून पराभव.

,, १७६४. **बक्सार.** इंग्रजांनीं शहाअलमचा पराभव केला.

,, १७६७. **चंगम** आणि **त्रिनोमाली.** हैदराचा इंग्रजांनीं पराभव केला.

,, १७७२. **चिरकुली.** मराठ्यांकडील त्रिंबकराव मामानें हैदराचा पराभव केला.

,, १७७९. **वडगांव.** इंग्रजांची मराठ्यांनीं धुळधाण उडवून सोडिली.

इ. स. १७८०. **पालिलूर.** (१ ली). हैदरानें इंग्रजांचा पराभव केला.

,, १७८१. **पालिलूर.** (२री). **शिवलिंगगड.** **पोर्टोनोवो.** } हैदराचा इंग्रजांकडून पराभव.

,, १७९५. **खर्डा.** मराठ्यांनीं मोंगलांस खूप जेरीस आणिलें.

,, १७९९. **सिद्धेश्वर,** मालवेली, श्रीरंगपट्टण. } टिप्पूचा पराभव.

,, १८०३. **दिल्ली** (२ री). **अलीगड.** } इंग्रजांनीं शिंदे यांस पराभूत केलें.

,, १८०३. **असई.** शिंदे व भोंसले यांचा पराभव पेशव्यांच्या सहाय्यानें इंग्रजांनीं केला.

,, १८०३. **लासवारी.** शिंद्याचा पराजय इंग्रजांनीं केला.

,, १८०३. **अरगांव.** भोंसले व शिंदे यांचा इंग्रजांनीं पराभव केला.

,, १८०४. **डीग.** होळकराचा पराभव.

,, १८०४ **डीगचा** वेढा:—भरतपूरच्या राजाचा पराभव

,, १८०४. **भरतपूर**चा वेढा: भरतपूरच्या राजानें इंग्रजांचा पराभव केला.

,, १८१६. **मकवानपुर.** गुरख्यांचा इंग्रजांनीं पराभव केला.

,, १८१७. **खडकी:**—पेशव्यांचा पराभव.

,, १८१७. **सीताबर्डी.** भोंसल्यांचा पराभव.

,, १८१७. **नागपूर.** भोंसल्यांचा पराभव.

,, १८१७. **महीदपूर.** होळकरांचा पराभव.

,, १८१८. **कोरेगांव** पेशव्यांचा पराभव.

,, १८१८. **अष्टे.** ,, ,,

,, १८२५. **दोन्याबू.** ब्रह्मीलोकांचा इंग्रजांनीं पराभव केला.

इ. स. १८२६. **पघम.** ब्रह्मीलोकांचा इंग्रजांनीं पराभव केला.

,, १८२६. **भरतपुरचा** वेढा (२). दुर्जनसालचा पराजय.

,, १८३७. **परवान.** दोस्तमहमदचा पराभव.

,, १८४३. **मियानी. हैद्राबाद.** } अमीरांचा पराजय.

,, १८४३. **महाराजपूर.** शिंद्यांचा पराजय.

,, १८४३. **पनियार.** ,,

,, १८४५. **मुदकी. फिरोजपुर.** } शिखांचा पराजय.

,, १८४६. **अलिवाल. सुब्रावन.** } ,,

,, १८४८. **सदुसाम. रामनगर.** } ,,

,, १८४९. **चिलियनवाला, गुजरात.** } शिखांचा पराजय.

,, १८५२. **रंगून.** ब्रह्मीलोकांचा पराजय.

,, १८५६. **कंतान.** चिनीलोकांचा पराभव.

,, १८५७. **कवरपाक. काल्पी. ब्रह्मावर्त. लखनौ. दिल्ली.** (३री). } बंडवाल्यांचा पराजय.

# परीक्षेची तयारी.

## प्रकरण २ रें.

### वंशावळी.

नंबर १:—दिल्लीकर मोंगल बादशहांची वंशावळ.

- १ बाबर. ( १५२६–१५३० )
  - २ हुमायून. १५३०–५६.
    - ३ अकबर. १५५६–१६०५.
      - ४ सेलीम ऊर्फ जहांगीर १६०५–२७.
        - खुश्रु.
        - फरवीज.
        - ५ शहाजहान. १६२७–१६५८.
          - दारा.
          - सूज[illegible]
          - ६ औरंगजेब. १६५८–१७०७.
          - मुराद.
      - मुराद.
      - दानियल.
  - कामरान.
  - हिंदल.
  - मिरझा.

७ बहादुरशहा. १७०७–१२.

८ जहांदरशहा.

अजीमशहा.

९ फिरूकशीर. १७१३–१९.

यानंतरचे १० व ११ वे हे बादशहा तीन महिन्यांत सय्यदबंधूंनीं मारून गादी आपल्याच हातीं बळकाविली. पुढें राजघराण्याचा एक पुरुष गादीवर बसविला.

१२ महमदशहा. १७१९–१७४८.

१३ अहमदशहा. १७४८–१७५४.

१४ अलमगीर. १७५४–१७५९.

१५ शहाअलम. १७५९–१८०६.

१६ अकबर. १८०६–१८३७.

१७ महमदबहादूर. १८३७–१८५७.

## नंबर २.—साताराचे राजे.

मालोजी.

शहाजी.

१ शिवाजी महाराज छत्रपती. १६७४–१६८०.

व्यंकोजी (तंजावरकर).

२ संभाजी. १६८०–१६८९.

३ राजाराम. १६८९–१७००.

५ शाहूमहाराज.(१) १७०८–४९.

६ रामराजा. १७४९–१७७७.

७ शाहू.(२) १७७७–१८०८.

४ शिवाजी. १७००–१७०८.

संभाजी कोल्हापूर घराणें.

८ प्रतापसिंह. १८०८–३९.

शाहू.

९ शहाजीमहाराज. १८३९–४८. खालसा.

व्यंकोजी. (दत्तक.) मृत्यु १८६४.

राजाराम. (दत्तक.)

## नंबर ३.—नागपूरकर भोंसले.

परसोजी.

१ रघोजी.

२ जनकोजी. ३ रघोजी. ४ अप्पासाहेब.

५ रघोजी.
राज्य खालसा.

## नंबर ४.—पेशवे घराणें.

**१ बाळाजी विश्वनाथ.** १७१४–२०.

**२ बाजीराव.** १७२०–४०. चिमणाजीअप्पा.

सदाशीवरावभाऊ
पानपतीं ठार.

**३ बाळाजीपंत.**१७४०–६१. **६ राघोबा.**
नानासाहेब.

विश्वासराव
पानपतांत
ठार झाले.

**४ माधवराव.**
१७६१–७२.

**५ नारायणराव.**
(मारला गेला.)
१७७२–७३.

**७ सवाईमाधवराव.**
१७७३–९५.

अमृतराव. **८ बाजीराव.** १७९५–१८१८. चिमणाजी.

विनायकराव. नानासाहेब बंडवाले.

माधवराव.

## नंबर २.—सातारचे राजे.

- मालोजी.
  - शहाजी.
    - १ शिवाजी महाराज छत्रपती. १६७४–१६८०.
      - २ संभाजी. १६८०–१६८९.
        - ५ शाहूमहाराज.(१) १७०८–४९.
          - ६ रामराजा. १७४९–१७७७.
            - ७ शाहू.(२) १७७७–१८०८.
              - ८ प्रतापसिंह. १८०८–३९.
                - शाहू.
              - ९ शहाजीमहाराज. १८३९–४८. खालसा.
                - व्यंकोजी. (दत्तक.) मृत्यु १८६४.
                - राजाराम. (दत्तक.)
      - ३ राजाराम. १६८९–१७००.
        - ४ शिवाजी. १७००–१७०८.
        - संभाजी कोल्हापूर घराणें.
    - व्यंकोजी (तंजावरकर).

## नंबर ३.—नागपूरकर भोंसले.

- परसोजी.
  - १ रघोजी.
    - २ जनकोजी.
    - ३ रघोजी.
    - ४ अप्पासाहेब.
      - ५ रघोजी. राज्य खालसा.

## नंबर ४.—पेशवे घराणें.

- **१ बाळाजी विश्वनाथ. १७१४–२०.**
  - **२ बाजीराव. १७२०–४०.**
    - **३ बाळाजीपंत. १७४०–६१.** नानासाहेब.
      - विश्वासराव पानपतांत ठार झाले.
      - **४ माधवराव.** १७६१–७२.
      - **५ नारायणराव.** (मारला गेला.) १७७२–७३.
        - **७ सवाईमाधवराव.** १७७३–९५.
    - **६ राघोबा.**
      - अमृतराव.
        - विनायकराव.
          - माधवराव.
      - **८ बाजीराव. १७९५–१८१८.**
        - नानासाहेब बंडवाले.
      - चिमणाजी.
  - चिमणाजीअप्पा.
    - सदाशीवरावभाऊ पानपतीं ठार.

## नंबर ५.—कोल्हापूर घराणें.

- १ संभाजी.
  - २ शिवाजीमहाराज.
    - ३ संभाजी. मारले गेले.
    - ४ शहाजी.
      - ५ शिवाजी बाबासाहेब.
        - ६ राजाराम माहाराज. फ्लारेन्स येथें वारले.
          - ७ शिवाजी (४.) नगरकिल्ल्यांत वारले.
            - ८ सध्याचे ( अज्ञान ).
      - शाहू ऊर्फ चिमासाहेब कराचीस मृत्यु.

## नंबर ६.—ग्वाल्हेरीकर शिंदे अलिजाबाहाद्दर.

- १ राणोजी.
  - तुकोजी.
    - आनंदराव.
      - दौलतराव. महादजीचे दत्तक.
  - २ महादजी.
    - ३ दौलतराव. (दत्तक.)
      - ४ जनकोजी.
        - ५ भगीरथराव ऊर्फ जयाजीराव.
          - ६ महादजी ( सांप्रतचे. )
  - जनकोजी. पानपतीं ठार.

## नंबर ७.—इंदूरचे होळकर.

१ मल्हारराव.

२ खंडेराव=साध्वी अहिल्याबाई.

३ तुकोजी. (दत्तक.)

तिघे ठार. ४ यशवंतराव. विठोजी.

५ मल्हारराव. ६ हरीहरराव.

७ खंडेराव.

८ तुकोजीराव.

९ शिवाजी बाळासाहेब (सांप्रतचे.)

## नंबर ८.—बडोद्याचे सेनाखासखेल गायकवाड.

१ पिलाजी.

२ दमाजी.

३ सयाजी. ४ गोविंदराव. बाळाराव.

५ आनंदराव. ६ सयाजीराव.

७ गणपतराव. ८ खंडेराव=जमनाबाई. ९ मल्हारराव. पदच्युत.

१० सयाजीराव सांप्रतचे.

# धनुर्धारी.

या लेखकांचें नांव माहीत नाहीं असा मराठी वाचक विरळा. यांच्या लेखांतील ऐटदार भाषा, खोंचदार व मार्मिक टीका आणि "आपण कोण" याची चटकन् ओळख पटे अशा तऱ्हेनें विषय प्रतिपादण्याची खुबी, आतां, सर्वांच्या चांगल्या पसंतीस उतरली आहे. खुद्द **सरकारी रिपोर्टांत** यांची भाषा "अगदीं **शुद्ध**—इडियामेटिक—**आवेशयुक्त** आणि **अभिमानोत्तेजक** असते" असा शेरा मिळालेला आहे. व शिवाय त्याबद्दल सर्वांची खात्री पूर्वींच झालेली असल्यामुळें आह्मीं येथें जास्त लिहिलें पाहिजे असें नाहीं. सदरहू लेखकाकडून बरींच पुस्तकें आह्मीं आजवर लिहविलीं आहेत व लिहिण्याचें काम अद्यापही तसेंच चालू आहे. त्या पुस्तकांपासून आमच्या मंडळीच्या मनावर मोठा कल्याणप्रद संस्कार होण्याचा निश्चितपणें संभव आहे. ह्मणून तीं पुस्तकें सत्वर मिळण्याची आह्मीं मुद्दाम तजवीज योजिली आहे.

## धनुर्धारीकृत पुस्तकें, विक्रीस तयार.

एकदम दोन रुपयांचीं पुस्तकें घेणारास किंमतीच्या **पाऊणपटीनें** मिळतील.

### १ महाराष्ट्रकुटुंबसंग्राह्यपुस्तकावलि.

१ **मराठ्यांच्या मर्दुमकी.** भाग १. किं. ०=

यांत मराठ्यांनीं हैदराबादकर नबाबावर केलेल्या मोहिमांची साद्यंत हकीकत आहे.

२ **मराठ्यांच्या मर्दुमकी.** भाग २. किं. ०≡

यांत हैसूरकर हैदरटिप्पू यांच्याशीं चाललेल्या झुंजांचें व कर्नाटकांतील स्वाऱ्यांचें वर्णन आहे.

३ **जवानमर्द ब्राह्मणभाई.** भाग १. किं. ०=

बापू गोखले यांच्या पराक्रमाचें वर्णन.

४ **जवानमर्द ब्राह्मणभाई.** भाग २. किं. ०≡

विठ्ठल शिवदेव यांच्या पराक्रमाचें वर्णन.

५ जवानमर्द ब्राह्मणभाई. भाग ३. किं. ८=

हरिपंत फडके यांच्या पराक्रमाचें वर्णन.

६ जवानमर्द मराठेगडी. भाग १. किं. ८=

होळकर मल्हारराव यांच्या पराक्रमाचें वर्णन.

७ जवानमर्द मराठेगडी. भाग २ किं. ।–

वीरशिरोरत्न जनकोजी शिंदे यांच्या पराक्रमाचें वर्णन.

८ पानपतचा मोहरा. किं. ।–

यांत पानपतच्या भयंकर रणकंदनाचा साग्र वृत्तांत आहे.

९ शूर अबला. किं. ८=

झांशीकर राणी लक्ष्मीबाई, कित्तूरकर चन्नवा, ताई तेलीण या स्त्रियांचीं चरित्रें.

१० वीरस्नुषा राधाबाई. किं. ८=

एक हृदयद्रावक ऐतिहासिक गोष्ट.

११ राजकार्यधुरंधर मंडळी. भाग १. किं. ।=

फडणीस नानाच्या कारकिर्दीचें वर्णन.

## २ प्रापंचिकांचा पुस्तकसंग्रह.

१ पैसा कसा मिळेल? किं. ।।॰

हें पुस्तक "आतां पुढें काय करावें" ही विवंचना पाठीस असलेल्यांच्या वाचनांत येईल तर त्यांची निम्मेहून अधिक काळजी दूर झाली असें खास समजावें.

## ३ लहान मुलांचें चिमुकलें पुस्तकालय.

१ नीतिधर्मपाठ पुस्तक पहिलें. किं. ८–

२ आपणांवरील जबाबदारी. किं. ८–।।॰

३ स्वभाव. किं. ८–।।॰ ४ अभ्यास. किं. ८।।॰

५ आजोबानें नातवास सांगितलेल्या गोष्टी. किं. ८–

जनार्दन महादेव गुर्जर, रामवाडी, मुंबई.

रंभीं विषयानुक्रम व शेवटीं कै. **रा. सा. मंडलिक** ह्यांनीं खासगी उपयोगाकरितां तयार केलेली वर्णानुक्रमानें **श्लोकांची सूची** जोडली आहे. सांचा सुपररायल ८ पेजी. टाईप सुंदर, कागद उत्तम, पुस्तकालयांत शोभणारी मनोहर बांधणी.

# केरळकोकिळच्या वर्गणीदारांस मात्र.

## किं. रु. ३ ट. ख. ८६.

ह्मणजे हल्लीं असलेल्या व नवीन होणाऱ्या वर्गणीदारांस मात्र हें पुस्तक ह्या किंमतीस मिळेल.

एका वर्गणीदारास एकच प्रत मिळेल. मागणी करतांना वर्गणीदारांनीं **आपला नंबर मात्र कळविला पाहिजे.**

**मनुस्मृति** हा आर्य ( हिंदु ) धर्मांचा मुख्य, प्राचीन व विश्वसनीय ग्रंथ आहे. याचे आचार, व्यवहार व प्रायश्चित्त अशा विषयांचे अध्याय १२ आहेत. त्यांत **ब्रह्मचर्य, गृहस्थ, वानप्रस्थ** व **संन्यास** हे आश्रम व धर्म, **संकीर्ण जाति** व त्यांचे धर्म, राजकीयविचार, दायविभागादि न्याय; ह्मणजे दिवाणी फौजदारीचे प्राचीन कायदे आणि प्रायश्चित्त इत्यादि व्यवहारी मनुष्यांस लागणारे सर्व विषय आहेत. मनुस्मृतीवरील **मेधातिथि** वगैरे संस्कृत टीका पाहून विषयमतांतराकरितां अनेक ठिकाणीं टिप्पण्या जोडल्या आहेत. श्लोकार्थ समजावा अशा रीतीनें हल्लींचें हें भाषांतर केलें आहे.

---

# केरळकोकिळ वर्ष ५ वें, सबंध पुस्तक.

( आवृत्ति २ री, सन १८९१ चे बाराही अंक एकत्र, सुरेख, जाड कापडी पुठ्यानें बांधलेलें. )

ह्यांत निरनिराळीं सुरेख अपूर्व **चित्रें** १३, **अनेक विषय** २५, **कविता** भिन्न भिन्न विषयांच्या व छंदांच्या ६ वेळ, **मलबारवर्णन** ७ वेळ, **लोकोत्तर चमत्कार** १६, अनेक ग्रंथकारांनीं पाठविलेल्या पुस्तकांपैकीं ४४ पुस्तकांची **पुस्तकपरीक्षा**, कर्त्यांच्या

नांवासह, **स्फुट विषय** ४, **नवीन शोध** १०, **किरकोळ** २ आणि **सिंहावलोकन.** ह्मणजे सन १८९१ मध्यें जगांत घडलेल्या **ठोकळ गोष्टींची** थोडक्यांत तारीखवार अनुक्रमणिका, **हरपलेलीं नररत्नें** आणि शेवटीं **संवत्सरमाहात्म्य,** यांत हिंदुस्थानच्या लोकांस १८९१ चें साल कसें काय सुखासमाधानांत गेलें ह्याचा थोडक्यांत विचार केला आहे. **किंमत** १॥ **रु. ट. ख.** ॅ३. व्हा. पे. पाठवूं.

# केरळकोकिळ वर्ष ६ वें, सबंध पुस्तक.

विषयधोरण वगैरे वरीलप्रमाणें किं. १॥ रु. ट. ख. ॅ३.

# केरळकोकिळ वर्ष ७ वें, सबंध पुस्तक.

विषयसरणी वरीलप्रमाणें असून सर्वप्रिय झालेलें **विद्युन्मानसशास्त्र सुरू.** किं. रु. १॥ ट. ख. ॅ३.

# सचित्र लोकोत्तर चमत्कार.

## सचित्र भाग १ ला.

श्वेतगज, शिंगांचीं मनुष्यें, १५०० रु. पुस्तक, पिंपांत राहणारा मनुष्य, बर्फाचा वाडा, चित्तविभ्रम, जलबिंदूंतील सूक्ष्मप्राणी, तारबातमी, पक्ष्यादिकांचीं युद्धें, बुद्धाचा दांत, दगडांच्या नद्या, राक्षसी गुलाब, मुंग्यांचा राक्षस, भविष्यकाळाचे ठोकताळे, नरमांसभक्षक लोक, २१ शें वर्षांचा वटवृक्ष, विजातीय कुत्रा, २२०॥ रु. शब्द. विमान, बर्फांत गाडलेली बाई, खरा शूर, झाडावर चढणारे मासे, पूर्वयुगांतील प्राणी, स्वप्नसृष्टि, हातभर उंचीचीं माणसें, याप्रमाणें यांत विषय आहेत. किं. १० आणे, टपालखर्च ॅ॥ आणे.

# मोडी पहिलें पुस्तक—चित्रांसह.

( रामचंद्र दत्ताजी आजरेकर. गोवें विद्याप्रसारक मंडळीचे चिटणीसकृत ) अगदीं थोड्याच दिवसांच्या अभ्यासानें मोडीमध्यें शुद्धले-